171	नाशिक महानगरपालिकेतील गणवेशपात्र स्त्री व पुरूष कर्मचा-यांना विविध प्रकारचे गणवेश कापड व साडया इत्यादी खरेदी बाबत.	
172	जंगम मालमत्ता नोंदवही एकत्रितरित्या परीरक्षित केले नसले बाबत	
173	विविध विभागासाठी लागणा-या फर्नीचर साहीत्य खरेदी बाबत.	
174	नशिक महानगरपालिकेच्या छपाई विभागातील सन 2012-2013 मधील छपाई काम खर्चातील अनियमितते बाबत	
175	नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक 2012 च्या अनुषंगाने भांडार विभागामार्फत करण्यात आलेल्या खर्चा बाबत	
176	नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक 2012 च्या अनुषंगाने छपाई विभागामार्फत करण्यात आलेल्या खर्चा बाबत	
177	अग्नीशमन यंत्रणेकडून अग्नीप्रतीबंधक उपययोजना करू घेणेबाबत	
178	महानगरपालिकेच्या हद्दीतील वाहतुक करणारे टॅक्सी व रिक्षा स्टॅन्ड फी आकारणी बाबत	
179	नाशिक महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयातील विविध कर विभागतील उणिवांबाबत	
180	नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक 2012 चे निवडणुकीच्या अनुषंगाने विविध टप्प्यातील कामकाजासाठी खर्च भागविण्यासाठी पश्चिम विभागाच्या प्रभाग विभागीय अधिकारी यांना देण्यात आलेल्या अग्रीमाचे समायोजन करणे बाबत.	
181	नगरसचिव विभागातील हार,पुष्पगुच्छ व शाली इत्यादी बाबींवरील आकस्मित खर्च लेखाशिर्षांतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत	
182	नगरसचिव विभागातील अल्पोपहार बाबींवरील आकस्मित खर्च या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या अनियमितते बाबत	
183	नगरसचिव विभागातील महासभा व स्थायी समिती सभेसाठी केलेल्या अल्पोपहार व	

	चहापान इ.बाबींवरील आकस्मित खर्च या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या खर्चातील अनियमितते बाबत	
184	नगरसचिव विभागातील मा. महापौर यांचे स्वीय सचिव तसेच नगरसचिव विभागातील कर्मचाऱ्यांना दूसरा व चौथा शनिवार व रविवार तसेच सार्वजणिक सुट्टीचे दिवशी अतिरिक्त काम केल्या बाबत अतिरिक्त कामाचा मोबदला (O.T) प्रदान करतांना झालेल्या अनियमिततेबाबत	
185	नाशिक महानगरपालिका अंतर्गत संगणक यंत्रणेसाठी वार्षिक देखभाल व दुरुस्ती (AMC) करणे बाबत	
186	आरोग्य विभागाकडील घंटा गाडयांवर जीपीएस यंत्रणेची जोडणी करणेबाबत	
187	इंटिग्रेटेड ॲप्लीकेशन पध्दतीच्या संगणक कार्यप्रणाली पूर्णपणे कार्यान्वित करण्यातील विलंबाबाबत	
188	वेब जि.आय.एस. कार्यप्रणाली विकसीत करणे बाबत	
189	झोपडपट्टी (स्लम) विभागाकडील थकीत सेवाशुल्का बाबत	
190	महानगरपालिकेने दिलेल्या अग्रीमाच्या रकमेचे समायोजन किंवा वसुली न करणे बाबत	
191	घसारा निधी मध्ये पूरेशी तरतुद करणेबाबत	
192	भविष्य निर्वाह निधी मधील अनियमिततेबाबत	
193	परीक्षित केलेल्या गुंतवणूक नोंदवहीबाबत	
194	सेवापुस्तकातील सर्वसाधारण उणीवांबाबत	
195	नगरविकास/लेखा/बांधकाम विभागात लघुलेखक या एकाकी पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चीती करतांना झालेल्या अनियमीततेबाबत	
196	सर्वीस लेव्हल बेंच मार्कीगबाबत	
197	नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक 2012 च्या अनुषंगाने जनसंपर्क विभागा मार्फत करण्यात आलेल्या खर्चा बाबत	
198	माहिती व जनसंपर्क विभागातील सेवानिवृत्त माहिती व जनसंपर्क अधिकारी श्री मधुकर यादव झेंडे यांना सेवानिवृत्ती नंतर कार्यासन , मानद अधिकारी म्हणुन मानधनावर ठेवणे बाबत.	
199	वकील फी/मानधन कायदेशीर सल्लागारास केलेल्या प्रदानाबाबत	
200	नाशिक महानगरपालिका संचलित 10 माध्यमिक विदयालयांसाठी सन 2012-2013 मध्ये लागणारे विविध प्रकारचे प्रयोगशाळा साहित्य ई-निविदा मागवून खरेदी केले बाबत.	
201	नाशिक महानगरपालिका संचलित उर्दु माध्यमिक विदयालय, बडी दर्गाह, पिंजार घाटरोड, नाशिक या शाळेचे अपूर्ण अभिलेखे लेखपरीक्षणास सादर केले बाबत	
202	सन 2012-2013 शिक्षण मंडळास महानगरपालिकेने दिलेले बंधनात्मक 50 टक्के वेतन व भत्ते यावरील अनुदानाबाबत.	
203	नाशिक महानगरपालिका संचलित अनुदानीत व विनाअनुदानीत माध्यमिक विदयालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना अदा होत असलेले वेतन व भत्ते तसेच त्यांचे परीरक्षित केलेल्या सेवा पुस्तकां बाबत	

204	लेखापरीक्षणात आढळून आलेल्या सर्वसाधारण अनियमितता	
205	पाणी पुरवठा योजनेचे पाणी लेखापरीक्षण, उर्जा लेखापरीक्षण व पुनर्वसन कार्यक्रम करणेबाबत	
206	इतर विकास निधी अंतर्गत तरतुद करून केलेल्या खर्चाबाबत	
207	नाशिक रोड विभागामधील वार्ड क्रमांक 75 फर्नांडीस वाडीजवळ जलराम रो-हाऊस परिसरात 100 मिमी व्यासाची सीआय पाईप लाईन टाकणे	
208	नाशिक महानगरपालिका लेखापरीक्षण सन 2013-2012 पाणीपुरवठा विभागाकडील नाशिक रोड विभागामधील वा.क्र 34 .मधील गोकुळनगर ,इच्छामणीनगर ,परिसरातील पाणीपुरवठा सुधारणा करणे कामी 200,150 मिमी व्यासाची सीआय पाईप लाईन टाकणे खर्चा बाबत	
209	नाशिक रोड विभागामधील वार्ड क्रमांक 36 मध्ये सहयाद्री कॉलनी कॅनालरोड परिसरात पाणीपरवठा व्यवस्था करणे	
210	नाशिक रोड विभागामधील वार्ड क्रमांक 34 मधील पवारवाडी येथील जलकुंभासाठी डीआयके-7, 500 मीमी व्यासाची वितरण वाहिनी टाकणे	
211	नाशिक रोड विभागामधील वार्ड क्रमांक 35 मधील शिवशक्तीनगर व शिवाजीनगर परिसरातील पाणीपुरवठा सुधारणा करणेकामी पाईपलाईन टाकणे.	
212	नाशिक रोड विभागामधील वा.क्र 35 मधील पवारवाडी न 2.मधील महलक्ष्मीनगर येथे 100 मीमी .व्यासाची सी.आय.पाईपलाईन टाकणे.	
213	नवीन नाशिक विभागामधील वा.क्र 85 .मधील साईग्राम ,उपेद्रनगर ,गणेशकॉलनी पाईप लाईन टाकणे.	
214	नवीन नाशिक विभागामधील वा.क्र 100 .मधील सहयाद्रीनगर भागातील पाईप लाईन खोदुन जास्त खाली टाकणे कनेक्शन करणे	
215	नवीन नाशिक विभागामधील वा.क्र 91 .मधील एचएल कॉलनी भागात पाईप लाईन टाकणे	
216	नवीन नाशिक विभागामधील जुना वा.क्र 100.मधील स.न) 309.भाग (म्हाडा येथील उर्वरित जागेत पाईप लाईन टाकणे	
217	पंचवटी विभाग वा.क्र 20.क्रांतीनगर ,पोटीदेचाळ व परिसरात पाईप लाईन टाकणे	
218	सातपुर विभाग वा.क्र 49.मधील महात्मानगर ग्राउंड ते वैशपायन शाळेपर्यंत पाईप लाईन टाकणे.	
219	सातपुर विभाग वा.क्र 25 .मधील स्वामी विवेकानंद परिसर ,काळेनगर परिसर इ.भागातपाईप लाईन टाकणे	
220	पंचवटी वा.क्र 10.महाराणा प्रताप नगर येथे पाईप लाईन टाकुन नळ कनेक्शन करणे	
221	पंचवटी वा.क्र 3.दिंडोरी रोड ते ब्राम्हकुमारी ईश्वरीय विश्वविदयालय परिसरात पाईप लाईन टाकणे	
222	नाशिक पुर्व प्रभाग क्र 29.मध्ये छपरीची तालीम ते सोनंदागर गिरिणी पावेतोच्या अस्तित्वातील वितरण वाहिन्यांमध्ये सुधारणा करणे	
223	नाशिक रोड विभागातील वा.क्र 34.मधील बॅकबर्ड क्लास सोसायटी परिसरात पाणीपुरवठा सुधारणा करणे कामी 150 मीमी व्यासाची सीआय पाईप लाईन टाकणे	
224	नवीन नाशिक विभागामधील वा.क्र 105 .मध्ये सेक्टर एन-53, बी.एन.-53, बी.ए.2 व बी.बी. 2	

	मध्ये नवीन 4 इंची पाईप लाईन टाकणे	
225	सातपुर विभाग वा.क्र 54.पाप्या नर्सरी ते नालधारा सोसायटी साईमंदिरापर्यंत	
226	पंचवटी विभाग दिंडोरीनाका ते पेठफाटा रामवाडी पर्यंतचा जुना आगरारोड कॉक्रीट करणेपुर्वी पाणीपुरवठा पाईप लाईन मध्ये सुधारणा करणे.	
227	नाशिक मनपाचे जलशुद्धीकरण केंद्र ,मलनि:सारण केंद्र व जलतरण तलाव येथील पाणी निर्जंतुकीकरणासाठी क्लोरीन टनर्सचा पुरवठा करणे	
228	नाशिक मनपाचे जलशुद्धीकरण केंद्रावर टी.सी.एल .पावडरचा पुरवठा करणे	
229	वडाळा व शिवाजीवाडी येथील घरकुल योजनेतील इमारतीसाठी भुमिगत पाण्याच्या टाकीवर विदयुत पंप बसवुन पाणीपुरवठा सोय करणे	
230	नाशिक महानगरपालिकासाठी नविन रुग्णवाहिका/शववाहिका खरेदी करणे बाबत	
231	पंचवटी विभागात वा.क्र 5.साईनगर अयोध्यानगरीच्या उत्तरेस स.न 230.मध्ये 20 लक्ष लीटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे व पाईपलाईन टाकुन पंपिंग व्यवस्था करणे	
232	मिळकत विभागा मार्फत वाटप केलेल्या मिळकती/समाजमंदीर/व्यायामशाळा /अभ्यासिका/ वाचनालय/बालसंस्कार केंद्र व इतर बांधीव इमारती व खुल्या जागा याबाबत.	

पुर्नर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपिशल

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुर्नर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	ले.प.वर्ष	परिच्छेद क्रमांक	शेरा
1	2011-2012	3, 4, 5, 37, 39, 82, 85, 96, 110, 132, 142, 146, 156, 175, 176, 177, 179, 180, 200, 201, 210, 234	

Part II

भाग एक

गंभीर अनियमितता

कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

1 अर्थसंकल्प व महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवरील अभिप्राय.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 12

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ

मनपाचे अर्थसंकल्पीय अंदाज हे पारंपारीक पध्दतीने घेतलेले आहे. प्रत्यक्षात मागील 3 वर्षातील जमा रकमा खुप कमी आहेत त्या तुलनेत आयुक्तांनी अंदाज करतांना काही अंशी वाढ केलेली असून स्थायी समितीने व महासभेने त्यात मोठ्या प्रमाणात वाढ केलेली आहे. पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण नसून अर्थसंकल्पात त्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. मूळ अर्थसंकल्पामध्ये दर्शविण्यात आलेली अंदाजीत जमा रकमा या वास्तववादी न दर्शविता मोठ्या प्रमाणावर वाढ करुन दर्शविलेल्या आहेत व त्याआधारे अपेक्षित खर्च हा त्या प्रमाणात जादा दर्शविला गेला असल्याने महापालिकेच्या दायित्वात वाढ झालेली आहे. काही बाबतीत सुधारित अर्थसंकल्पात मंजूर तरतुदी पेक्षा जास्त खर्च करण्यात आलेला आहे. स्वउत्पन्नाशी बांधील खर्चाचे प्रमाण 64.57 टक्के इतके आहे. महिला व बाल विकास, अपंग कल्याण, मागासवर्गीय कल्याणकरी योजना, क्रीडा इत्यादी बाबींवर शासन निर्णयान्वये ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा कमी खर्च करण्यात आलेला आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तिय वर्षाच्या लेखापरीक्षणात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 96 व 100 नुसार सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला सन 2013-2014 या वर्षाचा मूळ अर्थसंकल्प, सुधारित अर्थसंकल्प व प्रत्यक्ष सन 2013 -2014 मधील जमा व खर्च याची तपासणी करता त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सन 2013 - 2014 च्या मूळ अर्थसंकल्पास मान्यता

1. स्थायी समिती ठराव क्र. 785, दि. 21.02.2013
2. सर्वसाधारण सभा ठराव क्र. 176, दि. 14.05.2013

सन 2013 - 2014 जमा व खर्चा बाबत केलेली तरतुद व प्रत्यक्ष झालेली जमा व खर्चाची आकडेवारी

(रु. लाखात)

जमा तरतूद (सु.शिल्लक	प्रत्यक्ष जमा	खर्च तरतूद (अ.शिल्लक	प्रत्यक्ष खर्च

वगळून)			वगळून)		
मूळ	सुधारित		मूळ	सुधारित	
275382.51	126793.23	87893.18	275375.58	130239.48	85905.44

अर्थसंकल्पीय रकमा, प्रत्यक्ष जमा व खर्च खालीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.

सन 2013 – 2014

(रु. लाखात)

अंदाजपत्रक	मा.आयुक्तांनी शिफारस केलेले अंदाज	मा.स्थायी समितीने शिफारस केलेले अंदाज	मा. महासभेचे मूळ अंदाजपत्रक	सुधारीत अंदाजपत्रक	प्रत्यक्ष जमा व खर्च
अ) जमा					
प्रारंभिची शिल्लक	207.93	207.93	207.93	3563.59	3563.59
अंदाजपत्रक अ	139398.13	218913.13	256008.13	107678.18	73283.61
अंदाजपत्रक क	9367.38	10167.38	12667.38	10321.55	6885.86
अंदाजपत्रक प	324.00	324.00	324.00	214	164.36
एकूण	149089.51	229404.51	268999.51	118213.73	80333.83
इतर उचल परत जमा	6383.00	6383.00	6383.00	8579.50	7559.35
एकूण एकंदर जमा	155472.51	235787.51	275382.51	126793.23	87893.18
प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा	155680.44	235995.44	275590.44	130356.82	91456.77
ब) खर्च (महसुली)					
अंदाजपत्रक अ	63661.98	66368.98	70053.98	49818.53	37385.85
अंदाजपत्रक क	11335.00	13535.00	13570.00	9337.54	7169.15
अंदाजपत्रक प	8624.60	9235.60	9935.60	5907.67	5132.16

भांडवली खर्च अ,क,प					
एकूण	63958.00	137736.00	172881.00	58846.37	31623.94
इतर उचल जमा	7985.00	8935.00	8935.00	6329.37	4594.34
एकुण एकंदर खर्च	155564.58	235840.58	275375.58	130239.48	85905.44
अखेर शिल्लक	115.86	154.86	214.86	117.34	5591.33
एकुण एकंदर	155680.44	235995.44	275590.44	130356.82	91456.77

मागील तीन वर्षातील मा.आयुक्त, मा.स्थायी समिती, मा.महासभा यांचे अंदाज् तसेच प्रत्यक्ष जमा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रु.कोटीमध्ये)

वर्ष	मा.आयुक्त	मा.स्थायी समिती	मा.महासभा	प्रत्यक्ष जमा	प्रत्यक्ष खर्च
2010-11	783.69	923.94	1181.86	715.75	665.65
2011-12	1030.85	1030.85	1244.64	835.96	788.28
2012-13	1170.85	1810.82	2030.82	1004.20	968.56
एकूण	2985.39	3765.61	4457.32	2555.91	2422.49
सरासरी	995.13	1255.20	1485.77	851.97	807.50

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. मनपाचे अर्थसंकल्पीय अंदाज हे पारंपारीक पध्दतीने घेतलेले आहेत.अर्थसंकल्प वास्तववादी होण्यासाठी मागील तिन वर्षाच्या प्रत्यक्ष जमा रकमा व त्यावर आधारीत चालु अर्थसंकल्पात जमा गृहीत धरली पाहिजे. परंतु उपरोक्त तक्त्यावरुन दिसुन येते की, मागील 3 वर्षातील प्रत्यक्ष जमा रकमा खुप कमी आहेत. त्या तुलनेत आयुक्तांनी अंदाज करतांना काही अंशी वाढ केलेली दिसते. मात्र स्थायी समितीने व महासभेने त्यात त्यांचे अधिकारात भरमसाठ वाढ केलेली आहे. मागील तीन वर्षाची जमेची सरासरी 851.97 असतांना सन 2013 - 2014 या वित्तीय वर्षात मूळ अंदाजपत्रका नुसार रु 2755.90 कोटी एवढी जमा रक्कम अंदाजित केलेली होती. तथापि प्रत्यक्ष रुपये 914.56 कोटी जमा झाली आहे. तसेच मागील तीन वर्षांची खर्चाची सरासरी 807.50 असतांना मूळ अंदाजपत्रका नुसार खर्च रुपये 2753.75 कोटी अंदाजीत केलेला होता. प्रत्यक्षात रुपये

859.05 प्रत्यक्ष खर्च केला आहे. म्हणजेच अंदाजपत्रकातील रकमा या वास्तववादी नसल्याचे दिसून येते. अर्थसंकल्पीय रकमा व प्रत्यक्ष रकमा यात मोठी तफावत असल्याचे दिसून येते.

2. सन 2013 - 2014 मध्ये मालमत्ता कराची अंदाजीत जमा रुपये 127 कोटी इतकी मूळ अर्थसंकल्पात व सुधारीत अर्थसंकल्पात 45.00 कोटी रुपये दर्शविण्यात आली आहे. प्रत्यक्षात जमा मात्र 34.08 कोटी रुपये एवढी झालेली आहे. सन 2010-11 ते 2012-13 ची सरासरी जमा (26.68+31.55+31.02) = 29.75 कोटी एवढी आहे .विकास शुल्काची अंदाजित रक्कम रु.100 कोटी असतांना प्रत्यक्ष जमा 34.29 कोटी आहे. याप्रमाणेच इतर जमा रकमांचे अंदाजात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आलेली आहे. म्हणजे मूळ अंदाजपत्रकामध्ये जमा रकमांचे अंदाज अवास्तव प्रमाणावर वाढवुन दर्शविले आहेत.

3. मूळ अर्थसंकल्पामध्ये दर्शविण्यात आलेली अंदाजीत जमा रकमा या वास्तववादी न दर्शविता मोठ्या प्रमाणावर वाढ करुन दर्शविलेल्या आहेत व त्याआधारे अपेक्षित खर्च हा त्या प्रमाणात जादा दर्शविला गेला आहे. परंतु प्रत्यक्षात त्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त न झाल्यामुळे अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या कामांना निधी उपलब्ध होत नाही व पर्यायाने कामे अपूर्ण राहून मोठ्या प्रमाणावर दायित्व (स्पिल ओव्हर) निर्माण झाले आहे. सन 2013 - 2014 च्या मूळ मंजूर अर्थसंकल्पासोबतच्या याद्यांनुसार अशा स्पिल ओव्हर कामांचे रुपये 738 कोटी एवढे दायित्व दर्शविले आहे. सदरचे दायित्व हे महानगरपालिकेच्या सन 2013 - 2014 मधील प्रत्यक्ष उत्पन्नाच्या (रुपये 914.56 कोटी) च्या 80.69% आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीय नियंत्रणाचा अभाव असल्याचे दिसून येते.

4. सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक 1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारीत अर्थसंकल्पापेक्षा वेगवेगळ्या लेखाशिर्षाअंतर्गत एकूण रक्कम रुपये 44773.46 लक्ष एवढी कमी व रक्कम रुपये 268.10 लक्ष एवढा जास्त खर्च केलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 86 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 28 नुसार अर्थसंकल्पीय शीर्षकाखाली तरतूद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च अनुज्ञेय नाही. सबब अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा जादा केलेला खर्च रुपये 268.10 लक्ष हा नियमबाह्य ठरतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 101 ते 104 नुसार, सदर कमी व जादा खर्चास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

5. सन 2013 - 2014 मध्ये महानगरपालिकेचे स्वत:चे उत्पन्न रु. 769.53 कोटी असून या वर्षाचा बांधील खर्च रु.496.87 कोटी आहे. स्वउत्पन्नाशी बांधील खर्चाचे प्रमाण 64.57 टक्के इतके असून हे प्रमाण कमी होण्यासाठी उपाययोजना होणे आवश्यक आहे.

6. विवरणपत्र क्रमांक 9 नुसार शासनास देय असलेली रक्कम सरकारी शिक्षण कर व रोजगार हमी कराची रक्कम रूपये 24,78,10,693/- एवढया रकमेची वसूली वसूली होणे आवश्यक असताना प्रत्यक्षात रक्कम रूपये 11,14,76,954/- रक्कम वसूल झालेली असून रक्क्म रू. 13,63,33,793/- एवढी रक्कम थकीत आहे. यामुळे थकीत रकमेची वसूली करून शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

7. विवरणपत्र क्रमांक 5 ब नुसार विभागांना कार्यालयीन कामासाठी प्रवासकामी प्रशिक्षण व मक्तेदारांना मागील शिल्लक 673. 38 लाख व सन 2013-2014 मध्ये 64.14 लाख एवढे अग्रीम देण्यात आले असून 737. 52 लाख अग्रीम थकीत आहे. तरी सदरील थकीत अग्रीम रकमेबाबत वसूली/समायोजन करण्याची कार्यवाही होणे

आवश्यक आहे.

6. मागील तीन वर्षातील पाणीपुरवठा योजनेतील एकूण सरासरी जमा रुपये 54.70 कोटी असताना सरासरी खर्च रुपये 91.18 कोटी एवढा झाला आहे. सन 2013-14 या वर्षी जलदाय व्यवस्थेची एकूण जमा रु. 68.85 कोटी असून खर्च रु.108.24 कोटी आहे. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2009/प्र.क्र.20/09/ न.वि.20 मंत्रालय, मुंबई दिनांक 2.8.2010 नुसार पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पात त्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.

7. शासन आदेशातील तरतुद

अ) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन - 1093/325 /प्र. क्र.24नवि-32,दि 17.04.93 व नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. जीईएन - 1093/1198/नवि-14, दि. 14.07.93 अन्वये महिला व बालविकास कल्याण यासाठी - 5%,

ब) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन - 1655/प्र. क्र.46/नवि - 33,दि. 14.02.2002 अन्वये अपंग कल्याणासाठी - 3%,

क) नगर विकास विभाग आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई 32 दि. 3 जुलै,1982 अन्वये मागासवर्गीय कल्याणकारी योजना - 5%

ड) नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. जीईएन 1098/प्र.क्र. 21/98/नवि-24/मंत्रालय, मुंबई 32, दि. 09/03/1998 अन्वये क्रीडा क्षेत्रासाठी 5% याप्रमाणे अर्थसंकल्पात तरतुद करणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013 - 2014 चे स्वत:चे उत्पन्न रु. 769.53 कोटि असून बांधील खर्च रु.496.87 कोटी आहे. उपरोक्त बाबींवर वेगवेगळ्या लेखाशिर्षांतर्गत खर्च केलेला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे दिसतो.

(आकडे : लाखात)

अ.क्र.	लेखाशिर्ष	सन 13-14 आवश्यक तरतुद	सन 13-14 केलेला प्रत्यक्ष खर्च
1	महिला व बाल कल्याण कार्यक्रम 5 टक्के	1363.28	22.67
2	अपंग पुनर्वसन 3 टक्के	817.97	0.02

3	मागासवर्ग कल्याण 5%	1363.28	58.05
4	क्रीडा 5%	1363.28	142.89

उपरोक्त बाबींवर महानगर पालिकेने प्रत्यक्ष खर्च कमी केलेला असल्याने शासन आदेशांचे पालन झालेले नसून संबंधित घटकांच्या कल्याणाचा उद्देश साध्य होत नाही.

8. महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 अन्वये झाडे तोडण्याचे नियमन करुन राज्याच्या नागरी क्षेत्रातील झाडांचे जतन करण्यासाठी अधिक चांगली तरतुद करण्यासाठी आणि त्या क्षेत्रात समुचित प्रमाणात नवीन झाडे लावण्याची तरतुद करणे अंर्तभुत करण्यात आलेले आहे. या अधिनियमातील कलम 2 (क) मध्ये झाडांचे जतन करणे म्हणजे केवळ नवीन झाडे लावणे आणि झाडे जिवंत राहण्यासाठी आणि त्यांच्या संख्येत वाढ होणे करिता इतर कामे करणे असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. तसेच प्रकरण सहा कलम 15 अन्वये एकूण जमा रकमेच्या ½ % रक्कमेची वृक्ष प्राधिकरण खाती तरतुद करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. तथापी वृक्ष निधी अंशदान खाती मूळ अंदाजपत्रकात रक्कम रु. 15.75 कोटी व सुधारीत अंदाजपत्रकात रु.1.22 कोटीची तरतुद केलेली असतांना प्रत्यक्षात अजिबात रक्कम वर्ग करण्यात आलेली नाही.

9. मूळ अंदाजपत्रकात भविष्य निर्वाह निधीला व्याजापोटी रक्कम देण्यासाठी रु. 1 कोटी, मलनिस्सारण शुल्कापोटी रक्कम वर्ग करण्यासाटी रु.7.40 कोटी, घनकचरा शुल्कापोटी रक्कम वर्ग करण्यासाटी रु.12.33 कोटी, जलदाय व्यवस्था शुल्कापोटी रक्कम वर्ग करण्यासाटी रु.10.51 कोटी याप्रमाणे तरतूद करण्यात आलेली होती प्रत्यक्षात अजिबात रक्कम वर्ग करण्यात आलेली नाही.

महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवरील अभिप्राय.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013 - 2014 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये अर्धसमास पत्र क्रमांक 13 दिनांक 05.01.2016 अन्वये विहित नमुन्यात महानगरपालिकेचे दिनांक 31.3.2014 अखेरचे मत्ता व दायित्व विवरणपत्राची मागणी करण्यात आली होती. तसेच वेळोवेळी तोंडी मागणी करुनही सदरचे विवरणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या दिनांक 31.3.2014 अखेर असणारी मत्ता व दायित्व यांची पडताळणी करता आलेली नाही.

तथापि सन 2013 - 2014 मधील प्रत्यक्ष जमा, गुंतवणूका, घेतलेली कर्जे, अग्रीम अनामत, इतर पडताळणी केलेल्या अभिलेखे इ.वरुन महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. नाशिक महानगरपालिकेस येणे असलेली सोबत जोडलेल्या विवरणपत्र क्र. 4 नुसार मालमत्ताकराची थकबाकी रक्कम रुपये 3385.03/- लक्ष तसेच पाणीपट्टी कराची थकबाकी रक्कम रुपये 2767.09 /- लक्ष इ. रकमा पूर्णत: वसूल झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने मत्ता म्हणता येणार नाहीत. अर्थसंकल्पासोबत जोडलेल्या स्पिल ओव्हर कामांच्या यादी नुसार दि.31/03/2014 अखेर कार्यादेश दिलेल्या पण अपूर्ण असलेल्या कामांसाठी लागणारी रु. 661.55 /- कोटी तसेच थकीत बिलांच्या रकमा इत्यादीचा विचार करता प्राप्त उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत आहे.

2. घरकुल योजना व इतर शासन अनुदानीत योजनांमधून हाती घेतलेल्या कामांसाठी महानगरपालिका हिस्सा व जादा दराने निविदा स्वीकृत केल्याने करावयाचा अतिरिक्त खर्च यासाठी महानगरपालिकेस मोठया प्रमाणात तरतूद करावी लागणार आहे.

3. महानगरपालिकेस जमा असलेले सुरक्षा व इतर ठेवींची सोबत जोडलेल्या विवरणपत्र क्र. 6 नुसार रक्कम रुपये 7802.12 /- लक्ष असून ती रक्कम मागणीनुसार प्रदान करावी लागणार आहे.

4. नाशिक महानगरपालिकेने खालील नमुद केलेल्या रकमा अनुसुचीमध्ये नसलेल्या सहकारी बँकेत ठेव म्हणुन ठेवल्या आहेत व मनपाने वारंवार मागणी करुनही सदरच्या ठेवी बँकेच्या नाजुक आर्थिक परिस्थितीमुळे अदयाप पर्यंत परत मिळालेल्या नाही, त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	बँकेचे नाव	ठेवीचा प्रकार	मुळ रक्कम रुपये
1	श्रीराम को ऑपरेटीव्ह बँक,नाशिक	मुदत ठेव (सन 2001 पासुन)	8,68,90,098/-
2	श्रीराम को ऑपरेटीव्ह बँक,नाशिक	चालु खाते	2,65,35,362/-
3	बालाजी को ऑपरेटीव्ह बँक,नाशिक	मुदत ठेवी सन 1996-97 पासुन	40,00,000/-
		एकुण रक्कम रु.	11,74,25,460/-

वरील प्रमाणे रु.11,74,25,460/-एवढी रक्कम व त्यावरील व्याज बँकांना वारंवार पत्रव्यवहाराने मागणी करुनही परत मिळु शकलेली नाही.

श्रीराम सहकारी बँकेच्या बँकिंग परवाना रिझर्व्ह बँकेचे पत्र क्रमांक युबीडी/सीओ/ एनएसबी/ एलसी/91/12-22-357/2005/06 रद्द केला आहे व बँक अवसायनास घेण्यात आली असल्यामुळे बँकेस डीआयसीसी कायदा कलम 2182 व नियम 22 (अ) अन्वये डीआयसीजीसी यांनी बँकेस क्लेम पोटी दिलेली रक्कम संपुर्ण परत केल्याशिवाय ठेवीदारांना रक्कम परत देता येणार नसल्याचे कळविले आहे. तसेच बालाजी को ऑपरेटीव्ह बँकेची आर्थिक स्थिरता सन 2000 मध्ये डबघाईस आल्याने राज्य शासनाने सदर बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन त्या ठिकाणी प्रशासकीय मंडळाची नियुक्ती केली आहे. बँकेची आर्थिक स्थिती नाजुक असल्यामुळे सन 1996-97 पासुनची ठेवींची रक्कम वारंवार मागणी करुन मनपास मिळालेली नाही. वरील वस्तुस्थिती पाहता मनपाचे रु.11,74,25,460/- एवढी रक्कम पुस्तकी शिल्लक म्हणून दिसत असली, तरी जोपर्यंत प्रत्यक्षात सदरहू रक्कम प्राप्त होत नाही तोपर्यंत म.न.पा.स वापरण्यास उपलब्ध होणार नाही.

उपरोक्त बाबी विचारात घेता महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ही असमाधानकारक असल्याचे दिसून येते.

महानगरपालिकेने आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी खालील उपाययोजना अत्यंत तातडीने करण्याची आवश्यकता आहे.

1. अनुत्पादक व भांडवली खर्चात काटकसर करणे.

2. प्रशासकीय खर्च कमी करणे, आस्थापना खर्चात काटकसर करणे.

3. मालमत्ताकर रक्कम रुपये 3385.03/- लक्ष तसेच पाणीपट्टी कराची रक्कम रुपये 2767.09/- लक्ष एवढी सन 2013 - 2014 अखेर थकबाकी असून ती वसूल करणे आवश्यक आहे.

4. महानगरपालिका आकारु शकते असे सर्व कर आकारणी करुन वसूल करणे, त्यासाठी करदात्या नागरीकांचा असंतोष होवू नये, म्हणून दिल्या जाणाऱ्या सर्व सुविधांचा दर्जा अत्यंत समाधानकारक होईल, यादृष्टीने प्रशासनात कार्यक्षमता व व्यावयायिकता निर्माण करणे.

5. भांडवली स्वरुपाच्या विकास योजना राबविण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या विविध नागरी विकास कार्यक्रमांमध्ये पुरेपूर सहभाग घेणे.

6. मालमत्ता कर आकारणी करताना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267(अ) नुसार अवैध बांधकामांवर मालमत्ता कराची दुप्पट एवढी शास्ती आकारण्यात यावी.

7. मालमत्ता कराची आकारणी भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केल्यांनतर त्वरीत करणे आवश्यक असून अशी आकारणी भोगवटा प्रमाणपत्राच्या दिनांकापासून करणे आवश्यक आहे.

8. पाणीपुरवठा योजनेमध्ये पाण्याचा अपव्यय टाळावा. पाण्याची गळती, चोरी न होईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण होणाऱ्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात.

9. स्थानिक संस्था कराअंतर्गत व्यापारांनी भरणा केलेल्या करांचे सहामाही व वार्षिक निर्धारण विहित मुदतीत करावी व स्थानिक संस्था करांची वसूली परिणामकारक होईल, यादृष्टीने उपाययोजना करावी.

10. वाहनाचा वापर व प्रवास काटकसरीने करावा. अतितातडीच्या प्रसंगी विमान प्रवासाचा अवलंब करावा.

11. म.न.पा.चे मालमत्तेपासून मिळणाऱ्या उत्पन्नाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

2 वार्षिक लेखे प्रमाणिकरणाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ

शासन निर्णय दिनांक 6 जुलै 2005 नुसार नाशिक महानगरपालिकेने राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिकेवर आधारित व्दीनोंद लेखा पध्दती नुसार सन 2013-2014 चे ताळेबंद इ. वार्षिक लेखे तयार करून त्यास स्थायी समितीची

मान्यता प्राप्त केलेली नसल्याने प्रमाणीकरण करता येवू शकले नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 94 नुसार म.आयुक्त यांनी प्रत्येक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील वर्षातील वार्षिक लेखे मान्यतेसाठी स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण विभागाकडून प्राप्त माहितीनुसार स्थायी समितीने एकेरी नोंद पध्दतीवर आधारीत सन 2013-14 या आर्थिक वर्षातील वार्षिक लेख्यांच्या (जमा-खर्च पत्रक) तपासणी अहवालास ठराव क्र. 667 दि.14/01/16 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.लेखास-102004/71 प्र.क्र. 5/04/ नावि-31, दिनांक 6 जुलै, 2005 नुसार सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उपार्जित तत्वावरील दुहेरी नोंद लेखा पध्दती लागु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिकेवर आधारित व्दीनोंद लेखा पध्दती नुसार सन 2013-2014 चे ताळेबंद इ. वार्षिक लेखे तयार करून त्यास स्थायी समितीची मान्यता प्राप्त केलेली नाही. सबब, नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 च्या वार्षिक लेख्यांचे प्रमाणिकरण करता येवु शकले नाही.

DATDTBM7001 (Ref No : 137, Hmm No : 178)

3 उपार्जित तत्वावर आधारित - दुहेरी नोंद पद्धतीची अंमलबजावणीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ

नाशिक महानगरपालिकेने दिनांक 06/07/2005 च्या शासन निर्णयाप्रमाणे रोज किर्द, खतावणी इत्यादी वित्तीय लेखे राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिका प्रकरण 5 मधील नमुन्यात ठेवलेले नाहीत. महानगरपालिका निधीचे लेखे एकेरी नोंद पध्दतीने हस्तलिखित तसे दुहेरी नोंद पध्दतीने टॅली स्फॉटवेअर मध्ये ठेवलेले आहेत. तसेच इतर सर्व निधी व शासन अनुदानाचे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने टॅली स्फॉटवेअर मध्ये ठेवलेले आहेत. दि.31/03/2014 अखेरचा ताळेबंद तयार करून त्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असतांना लेखापरीक्षण कालावधी पर्यंत अशी कार्यवाही केलेली नाही.

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.लेखासं--10/2004/71 प्र.क्र.-5/04 निवि-3 दिनांक 06/07/2005 नुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिनांक 01/04/2005 पासुन उपर्जित पध्दतीवर आधारीत

व्दीनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करावयाची आहे.

अर्धसमास पत्र क्र.2 दिनांक 05/01/2016 नुसार व्दीनोंद पध्दतीने तयार केलेले वार्षिक लेखे उपलब्ध करून देण्याबाबत मागणी करण्यात आली असता, महानगरपालिका निधीचे लेखे एकेरी नोंद पध्दतीने हस्तलिखित तसे दुहेरी नोंद पध्दतीने टॅली स्फॉटवेअर मध्ये ठेवलेले आहेत. तसेच इतर सर्व निधी व शासन अनुदानाचे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने टॅली स्फॉटवेअर मध्ये ठेवलेले आहेत. उपलब्ध करून देण्यात आलेल्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) दिनांक 06/07/2005 च्या शासन निर्णयान्वये राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार होईपर्यंत राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिकेचा (National Municipal Account Mannual) उपयोग करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिका प्रकरण 5 मध्ये रोज किर्द, खतावणी इत्यादी वित्तीय पुस्तकांचे नमुने विहित करण्यात आलेले आहेत. नाशिक महानगरपालिकेने रोज किर्द, खतावणी इ. वित्तीय लेखे टॅली स्फॉटवेअर च्या नमुन्यात ठेवलेले आहेत.

2) दिनांक 06/07/2005 च्या शासन निर्णयातील सुचनेनुसार सर्व नागरी स्वराज्य संस्थांनी पुर्वीची रोख तत्वावर लेखे ठेवण्याची पध्दत व दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे ठेवण्याची पध्दती या दोन्ही समांतर लेख्यात स्वतंत्र ठेवावयाचे आहेत. व सदरची दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे व्यवस्थीत ठेवणे शक्य आहे. अशी महानगरपालिकेची खात्री झाल्यास ती पध्दत मा.आयुक्त तथा संचालक, नगर विकास संचालनालय यांचे सहमतीने पुर्ण पणे कार्यान्वित करावयाची आहे. अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. नाशिक महानगरपालिकेने नियमित स्वरूपात उपार्जित तत्वावर सर्व व्यवहारांच्या नोंदी दुहेरी नोंद लेखा पध्दतीने ठेवुन या पध्दतीची पुर्णपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

3) दि. 31/03/2014 अखेरचा ताळेबंद, आप-व्यय पत्रक, रोख प्रवाह (Cash-Flow) पत्रक लेख्यावरील टिपण्णी इ. वित्तिय लेखे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत.

4) नाशिक महानगरपालिकेत उपार्जित तत्वावरील व्दीनोंद लेखा पध्दतीवर आधारीत दि.31/03/2014 अखेरचा ताळेबंद तयार करून त्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असतांना लेखापरीक्षण कालावधी पर्यंत अशी कार्यवाही केलेली नाही.

4 नाशिक महानगरपालिकेने पदाधिकारी व अधिकारी यांना वाहन भाडे प्रतीपुर्ती भत्ता योजनेचा लाभ देवुन केलेल्या खर्चा बाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 5

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 7754612.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7754612.00/-

आयुक्त आदेश क्र. 118 दिनांक 12/02/2007 मधील अटींनुसार अधिकाऱ्यांच्या वाहन लॉगबुक, फिरतीबाबतचा दाखला, दैनंदिन्या इ.लेख्यां अभावि, प्रदान केलेला वाहन प्रतिपूर्ती योग्य असल्या बाबत पडताळणी करता आली नाही. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वाहन 1/12/प्र.क्र.1/2012/विनियन दिनांक 29 फेब्रुवारी 2012 अन्वये शासनाने खाजगी वाहन शासकीय कामकाजासाठी वापरण्याची योजना पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय असतांना उपरोक्त शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. बंद केलेली योजना चालु ठेवण्याचा धोरणात्मक बाब म्हणुन राज्य शासनाची मंजुरी घेतलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 19-अ.(मानधन, फी किंवा भत्ते) (1) अन्वये राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने अधिकारी/ पदाधिकारी यानां वाहन भाडे प्रतीपुर्ती योजने अंतर्गत महानगरपालिका प्रशासनाने शासनाची परवानगी घेतली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे वाहन/यांत्रिकी विभागाचे लेखापरीक्षणात वाहन वपराबाबत प्रतिपुर्ती भत्ता धोरणात्मक निर्णय उपलब्ध संचिकांचे लेखापरीक्षण केले असता नाशिक महानगरपालिकेने पदाधिकारी व अधिकारी यांना वाहन भाडे प्रतीपुर्ती योजनेचा लाभ खालील विवरणपत्रात नमूद तपशिलानुसार देण्यात आलेला आहे..

अ.क्र	.मनपाचे वाहना ऐवजी स्वतःचे वाहन वापरणाऱ्या पदाधिकारी / अधिकारी	वाहन वापरण्यास परवानगी दिल्याचा दिनांक व मंजुरी आदेश क्रमांक	प्रतीम हा दिलेला वाहनभाडे रक्कम व वर्षभरातील एकुण रक्कम
1	सन 2013-2014 मधील पदाधिकारी यांना वाहनप्रतिपुर्ती भत्ता अदा केले बाबत	मा . महासभा ठराव क्र .540 दि . 21/06/2010 अन्वये आयुक्त आदेश क्र.978 दि.25/08/2010 नुसार ज्या पदाधिकारी यांनी वाहन जमा करून स्वत:चे वाहन मनपा कार्यालयीन कामकाजासाठी वापरतील त्यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता देण्यास मान्यता देण्यात आली आहे.	उप महापौर व इतर पदाधिकारी यांना दर महा रू.40000/- प्रमाणे वर्षभरात एकूण रक्कम रू.480000/- व इतर पदाधिकारी यांना रू.30000/- प्रती महा प्रमाणे वर्षभरात एकूण रक्कम रू.360000/- प्रदान करण्यात आलेली आहे.
1	खाते प्रमुख व वर्ग -1 व त्यावरील अधिकारी यांचे करीता	मा . महासभा ठराव क्र .540 दि . 21/06/2010 अन्वये आयुक्त आदेश क्र.978	खाते प्रमुखांना रक्कम रू. 20000/- प्रती महा प्रमाणे x 8 (महिने) =

		दि.25/08/2010 व स्थायी समिती ठराव क.576 दि.16/11/2013 मान्यतेने आयुक्त आदेश क्र.1212 दि.02/12/2013 नुसार वाहन प्रतीपुर्ती भत्त्या केलेली वाढी नुसार प्रदान झालेली एकूण रक्कम	160000/- व वाढीव दरानुसार रू.30000/- प्रमाणे x 4 (महिने)= 120000/- = अशी वर्षभरात ए कूण रक्कम रू.280000/- प्रमाणे व वर्ग -1 व त्यावरील अधिकारी यांचे करीता) रक्कम रू.20000/- प्रती महा प्रमाणे x 8 (महिने) =रू.160000/- व वाढीव दरानुसार रू.25000/- प्रती महा प्रमाणे x 4 (महिने)=रू.100000/- = अशी वर्षभरात ए कूण रक्कम रू.260000/- प्रमाणे प्रदान करण्यात आलेली आहे.
2	वर्ग -2 व त्यावरील अधिकारी यांचे करीता	मा . महासभा ठराव क्र .540 दि . 21/06/2010 व स्थायी समिती ठराव क.576 दि.16/11/2013 मान्यतेने आयुक्त आदेश क्र.1212 दि.02/12/2013 नुसार वाहन प्रतीपुर्ती भत्त्या केलेली वाढी नुसार प्रदान झालेली एकूण रक्कम	वर्ग -2 व त्यावरील अधिकारी यांना रू.12500/- प्रती महा प्रमाणे x 8 (महिने) =100000/- रू.17500/- प्रती महा प्रमाणे x 4 (महिने)= रू.70000/- = ए कूण रक्कम रू.170000/- प्रमाणे वर्षभरात प्रदान करण्यात आलेली आहे.

उपरोक्त कामाची संचिका/नस्ती ई. उपलब्ध अभिलेख्यांची पडताळणी केली असता, शासन निर्णय वित्त विभाग क्र.वाहन-1000/प्र.क्र.65/2001 विनियम, दिनांक 10/09/2001 आधार घेऊन महानगरपालिका नाशिक स्थायी समिती ठराव क्रमांक 1217 दिनांक 11/12/2006 व त्यास महासभा ठराव क्र. 158 दिनांक 19/05/2007 अन्वये वाहनप्रतिपूर्ती योजनेस मान्यता घेतली. शासन निर्णय दिनांक 25 मे 2005, 31 जुलै 2008 अन्वये शासकीय / निमशासकीय कार्यालयामध्ये शासकीय वाहनांचे वापरा व्यतिरिक्त स्वतःचे खाजगी वाहन वापरण्यास परवानगी देवुन त्यापोटी अधिकाऱ्यांना वाहन प्रतीपुर्ती योजना लागु करण्यात आली आहे. महासभा ठराव क्र. 540 दि.21/06/2010 अन्वये मा.आयुक्त आदेश क्र. 978 दि.25/08/2010 अन्वये सदर वर्ग-1 च्या अधिकाऱ्यांना प्रतिमाह रु.20000/- हजार व वर्ग-2 च्या अधिकाऱ्यांना प्रतिमाह रु.12500/- वाहन प्रतीपुर्ती पोटी आर्थिक लाभ दिलेला आहे.

परंतु सदर योजना शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वाहन 1/12/प्र.क्र.1/2012/विनियन दिनांक 29 फेब्रुवारी 2012 अन्वये दिनांक 1 एप्रिल 2012 पासुन पूर्णपणे बंद केलेली आहे. त्यानुसार सदरची योजना मा. आयुक्त यांचे आदेश क्र.193 दि.31/03/2012 अन्वये सदर वाहन प्रतिपूर्ती योजना बंद केली होती.

शासन निर्णया अन्वये बंद केलेली योजना चालु ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय घेतांना मनपाने महानगरपालिका महासभा ठराव क्र. 540 दि.21/06/2010 अन्वये पारीत केलेल्या ठरवानुसारच पुन्हा आदेश क्र. 5 दिनांक 13/04/2012 अन्वये पूर्वीचे

मूळ आयुक्त आदेश क्र. 978 दि.25/08/2010 नुसार देय वाहन प्रतिपूर्ती भत्ता देण्यास मान्यता देउन सदरची योजना पून्हा चालु केली आहे.

त्यानंतर तसेच स्थायी समिती ठराव क्र. 576 दि.16/11/2013 व मा.आयुक्त आदेश क्र. 1212 दि.02/12/2013 च्या आदेशानुसार दि.01/12/2013 पासून सदर प्रतिपूर्ती भत्त्यात वाढ करून खाते प्रमुखांना रू.20,000/- वरून रू.30,000/- प्रती महा व वर्ग-1 व त्यावरील अधिका-यांना प्रती महा रू.20,000/- वरून रू.25,000/- व वर्ग -2 व त्यावरील अधिका-यांना प्रती महा रू.12,500/- वरून रू.17,500/- इतका प्रतिपुर्ती भत्त्यात वाढ करून त्याची अंमलबजावणी दि.01/12/2013 पासून करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार लेखा विभागाकडील माहीतीनुसार सन 2013-2014 मधील वाहनप्रतीपूर्वीसाठी (पदाधिकारी यांच्या सह)झालेला खर्च रू.77,54,612/-बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) लेखा विभागाकडील माहीती नुसार सदर अधिका-यांना सन 2013-14 मध्ये एकूण रक्कम रू.77,54,612/- प्रदान करण्यात आलेली आहे. मा. आयुक्त यांचे आदेश क्र. 118 दिनांक 12/02/2007 मध्ये नमुद केल्याप्रमाणे वाहन प्रतीपुर्ती मिळणे बाबत संबंधीत अधिकाऱ्यांनसाठी पुढील प्रमाणे अटी नमूद आहेत.

(1) कामाची डायरी व वाहन वापराबाबतचे लॉगबुक ठेवणे.

(2) बिलासोबत ठराविक नमुन्यात फिरतीबाबत दाखला खातेप्रमुख/विभागप्रमुखांनी दरमाह दयावा

(3) मुख्यलेखाधिकारी यांनी प्रत्येक देयाकाबरोबर दैनंदिनीची तपासणी करणेत यावी.

(4) एखादया महिन्यात संबंधीत अधिकारी सलग 10 दिवस किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रजेवर राहिल्यास किंवा संपूर्ण महिन्यात एकूण 10 दिवस किंवा त्यापेक्षा जास्त सर्व प्रकारची रजा झाल्यास त्या प्रमाणात मासिक प्रतिपूतीच्या रकमेतून रक्कम कमी करणेत येईल.

(5) संबंधीत अधिका-याचे वाहन कोणत्याही कारणामुळे नादुरूस्त असल्यास व त्याने त्या कालावधीत शासकीय वाहन वापरल्यास त्यांचे कडून प्रवासासाठी रू.8/- प्रति कि.मी. रक्कम वसुल करण्यात येईल.

(6) वाहन अपघातग्रस्त झाल्यास वा नादुरूस्त ते सुस्थितीत ठेवणे, विमा, कर भरणे, इत्यादी प्रकारची जबाबदारी संबंधित वाहनधारक अधिका-यांची राहील.

(7) संबंधित अधिकारी कार्यालयीन कामकाजासाठी प्रवास करीत असतांना टोल भरावा लागल्यास त्याची प्रतिपुर्ती करण्यात यावी.

उपरोक्त अटींनुसार केलेली कार्यवाहीबाबत अधिकाऱ्यांच्या वाहन लॉगबुक, फिरतीबाबतचा दाखला, दैनंदिन्या लेखापरीक्षणात पहावयास न मिळाल्यामुळे प्रदान केलेला वाहन प्रतिपूर्ती योग्य असल्याबाबत लेख्याआधारे तपासता आले नाही. तसेच मनपामधील काही विभाग प्रमुखांना सदर योजनेचा लाभ दिला परंतु मनपाचे वाहन त्या विभागासाठी वापरात आहे किंवा कसे याबाबतची माहीती उपलब्ध न झाल्याने सदर अधिकाऱ्यानी दुहेरी फायदा घेतला नसल्याची पडताळणी करता आली नाही.

2. सदर योजना शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वाहन 1/12/प्र.क्र.1/2012/विनियन दिनांक 29 फेब्रुवारी 2012 अन्वये

शासनाने खाजगी वाहन शासकीय कामकाजासाठी वापरण्याची योजना पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. जे अधिकारी या योजनेचा सध्या लाभ घेत आहेत, त्यांना दिनांक 1 एप्रिल 2012 पासुन खाजगी वाहन शासकीय कामाकरिता वापराबाबतच्या धोरणाच्या अनुषंगाने कोणतीही प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहणार नाही. असे असतांना मात्र मनपाने उपरोक्त शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. शासन निर्णया अन्वये बंद केलेली योजना चालु ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय घेतांना मनपाने महानगरपालिका महासभा ठराव क्र. 540 दि.21/06/2010 अन्वये पारीत केलेल्या ठरवानुसारच सदरची योजना मा.आयुक्त यांचे आदेश क्र.193 दि.31/03/2012 अन्वये सदर वाहन प्रतिपूर्ती योजना बंद केली व पुन्हा आदेश क्र. 5 दिनांक 13/04/2012 अन्वये चालु केली. परंतु सदर योजना पुन्हा चालु करतांना धोरणात्मक बाब म्हणुन राज्य शासनाची मंजुरी घेणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 19-एक-अ अन्वये सभागृह नेत्याला व 19-एक-अअ-(2) विरोधीपक्ष नेत्याला महापालिकेने केलेल्या विनिमाव्दारे तरतुद केल्यानुसार मानधन ,भत्ते व इतर सुविधा देण्याबात संदर्भात तरतुद आहे. उक्त अधिनियमातील कलम 19-अ.(मानधन, फी किंवा भत्ते) (1) अन्वये राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने महानगरपालिकेस या कलमान्वये, महानगरपालिकेने केलेल्या नियामाव्दारे विहित करेल असे मानधन फी किंवा अन्य भत्ते देण्या संदर्भात तरतुद आहे. प्रत्यक्षात महानगरपालिकेने उपरोक्त अधिकारी / पदाधिकारी यानां वाहन भाडे प्रतीपुर्ती योजने अंतर्गत महानगरपालिका प्रशासनाने शासनाची परवानगी न घेता पदाधिकारी यांना वाहन प्रतीपुर्ती दिला. लेखा विभागाकडील माहीतीच्या आधारे सन 2013-14 मध्ये पदाधिकारी यांना वाहन प्रतीपुर्ती साठी एकूण रक्कम रु.20,61,990/- प्रदान केले असल्याने तेवढया रकमेचा महानगरपालिकेस आर्थिक भार सहन करावा लागत आहे. सदरची योजना 1 एप्रिल 2012 पासुन बंद झालेली असतांना पुढे चालु ठेवण्याचे असल्यास शासनाची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक होती.

4. यांत्रिकी विभागाने मनपा अधिकारी व पदाधिकारी यांना कार्यालयीन कामाकरीता मनपा मार्फत वापरण्यास दिलेल्या वाहनांची माहीती सादर करतांना ती सन 2013-14 व 2014-15 या कालावधीची वर्ष निहाय दिलेली नसल्याने लेखापरीक्षण कालावधी मध्ये अधिकारी व पदाधिकारी यांना मनपाचे वाहन पुरविण्यात आले असतांना त्यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता देखील प्रदान केला जातो किंवा कसे याबाबत पडताळणी करता आलेली नाही. तरी याबाबत विभागाने आपल्या स्तरावर योग्य ती पडताळणी करणे आवश्यक आहे.

5. सन 2012-2013 च्या लेखापरीक्षणात याबाबत परीच्छेद क्रमांक 20 अन्वये आक्षेप नोंदविण्यात आला असतांना देखील सन 2013-2014 मध्ये रक्कम रू.77,54,612/- खर्च नोंदविण्यात आला आहे.

5 इंटिग्रेटेड ॲप्लीकेशन पध्दतीच्या संगणक कार्यप्रणाली पूर्णपणे कार्यान्वित करण्यातील विलंबाबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 8

शासकीय/मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 65556400.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 65556400.00/-

अदयाप पर्यंत कार्यप्रणाली कार्यान्वीत होण्यास झालेल्या विलंबाबाबतची कारणे नमूद करून मक्तेदाराकडून विलंब झाला असल्यास करारनाम्यातील अटी शर्ती नुसार कार्यवाही करणे अपेक्षित होते परंतू, मनपाने त्याबाबत निविदेमधील अटी व शर्तीनूसार दंडात्मक कार्यवाही करणेत आलेली नाही, बायोमेट्रीक आज्ञावलीचा पूर्ण क्षमतेनूसार वापर होत नसल्याचे निदर्शनास येते, बायोमेट्रीक मशीन खरेदी करतांना दरकरारापेक्षा जास्त खर्च झाल्याचे दिसून येते, दि.2.1.1992 च्या शासन निर्णयानूसार नियमांचे पालन न करता निविदा प्रक्रिया अंतिम केल्याचे दिसून येते, सिक्यूरीटी ऑडीट करणेत आल्याचे दिसून आले नाही, सदर कामाला तांत्रिक मान्यता प्राप्त नसल्याचे दिसून येते, महानगरपालिकेने वेळीच प्रकल्प पूर्ण न केल्याने महानगरपालिकेला राज्य व केंद्र शासनाकडून प्राप्त होवून शकणा-या अनुदानापासून वंचित रहावे लागले.

जवाहरलाल नेहरु पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत नाशिक महानगरपालिकेस ई-गव्हर्नसमध्ये बंधनकारक सुधारणा करण्यासाठी आस्थापना विषयक बाबी, मटेरियल मॅनेजमेंट (भांडार) यांचा लेखा विभागाशी संलग्नता करणे या तीन मोड्यूल्सचे संगणकीकरण करण्यासाठी इंटिग्रेटेड ॲप्लीकेशन कार्यप्रणाली विकसित करण्यासाठी जाहिर ई-निविदा मागविण्यात आली असून याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1	कामाचे नाव	Designing, development, implementation of Bilingural web base software as per detailed scope of work i) multiuser accounting software u 1 no. ii) multiuser application software u 1 no. iii) multiuser application software for inventory management u 1 no. iv) Data entry for double entry v) Facility management, service book, inventory
2	प्रशासकीय मंजूरी	महासभा ठराव क्रमांक 302, दिनांक 26.6.2007 मास्टर प्लॅन रुपये 8.53 कोटी
3	स्थायी समिती मंजूरी	स्थायी समिती ठराव क्रमांक 1225 दि.28.12.2010
4	निविदा विक्री	दिनांक 6.9.2010 ते 15.9.2010 अंतिम स्विकृतीची तारीख 12.10.2010 निविदा पूर्व बैठक दिनांक 21.9.2010
5	प्राप्त निविदा	1) मे. सि.एम.सी. लि. मुंबई 2) मे. झेंसार टेक्नॉलॉजी, पुणे 3) मे. टाटा कन्सल्टेन्सी सर्व्हिसेस, मुंबई
6	पात्र निविदाकार व दिलेला दर	1) मे. झेंसार टेक्नॉलॉजी, पुणे रुपये 6,55,56,400/- 2) मे. सी.एम.सी. लि. मुंबई रुपये 7,94,49,263/-

<table>
<tr><td>7</td><td>न्युनतम दर</td><td>1) मे. झेंसार टेक्नॉलॉजी, पुणे
Part A
i) Designing, development, implementation of Bilingural web base software as per details scope of work
<table><tr><td>Multiple accounting 1 no.</td><td>Rs.10253800</td></tr><tr><td>Application software for H.R. Department 1 no.</td><td>Rs.10253800</td></tr><tr><td>Application software for inventory management u 1 no.</td><td>Rs.10253800</td></tr><tr><td>Data entry for double entry, Employee Record, Service book, Asset Details, Stock Inventory 1 no.</td><td>Rs.10253800</td></tr></table>Part B
Facility management period appoint 6 expert on daily basis
216 man x 87,500 = 1,89,00,000</td></tr>
<tr><td></td><td></td><td>Part C
<table><tr><td>Blade server as per detail specification 1 no.</td><td>1800000</td></tr><tr><td>Network enabled bio-metric devices with all the accessories 100 no.
100 x 60000/-</td><td>6000000</td></tr><tr><td>Thermal printed smart cards along with photograph of employee 10000 no. 10000 x 150</td><td>1500000</td></tr><tr><td>Inbuilt double battery backup 100 no.
100 x 5700/-</td><td>570000</td></tr><tr><td>Sql server 2008 enterprise edition single processor 1 no.
1 x 1100000/-</td><td>1100000</td></tr><tr><td>Total</td><td>65556400</td></tr></table></td></tr>
<tr><td>8</td><td>मंजूर दर</td><td>वाटाघाटी करुन रुपये 64956400/- सुधारीत ठेकेदारास मंजूरी प्राप्त
कामाचा आदेश no./NMC/C-Cell/21/2010 Dt.30.12.2010 कार्यकारी अभियंता (नियोजन) यांचे स्वाक्षरीने</td></tr>
<tr><td>9</td><td>प्रदान केलेली रक्कम</td><td>5th R.A.bill Rs. 1,70,43,959/- (26%)</td></tr>
<tr><td>10</td><td>लेखाशिर्ष</td><td>संगणकीकरण</td></tr>
</table>

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मक्तेदाराशी केलेला करारनामा व कामाच्या आदेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे संगणकीकरणाचे काम पूर्ण करावे, असे नमुद केले आहे.

Part I - Design, Development Implementation & Data Entry Work u within 9 months from the date of work order.

Part II - Implementation of application module within 3 months after completion of part u I works

Part III - Maintainance & updation period copperation support & facility management 48

months after completion of part I & II

वरील नियोजित वेळापत्रकानुसार Part-I दिनांक 30.9.2011 व Part-II दिनांक 31.12.2011 रोजी पूर्ण होणे आवश्यक असतांना अद्यापपर्यंत Part-I व II मधील कामे पूर्ण झालेली नाहीत. काम नियोजित वेळेपेक्षा अडीच वर्षे मागे राहिले आहे. Part-I मधील कर्मचारी सेवा अभिलेखे, मालमत्ता विषयक अभिलेखे, भांडारातील स्टॉक रजिस्टर (Inventery), वैदयकीय विभागातील औषधी साठा नोंदवही लेखा विभागाकडील गुंतवणूक नोंदवही, अग्रीम नोंदवही, द्विनोंद उपार्जित अंतिम लेखे (Final Accounts), बांधकाम विभागाकडील अभिलेखे, रस्ता नोंदवही इत्त्यादिसाठी या संगणकीय प्रणालीचा वापर अदयाप पावेतो वापर सुरु झालेला नाही. सदर कार्यप्रणाली पूर्णपणे कार्यान्वित न झाल्यास JNNURM अंतर्गत समाविष्ट असलेल्या अन्य योजनांचे अनुदान महानगरपालिकेस प्राप्त होणार नाही. सदर संगणकीय कार्यप्रणाली कार्यान्वित होण्यास उशीर झाल्यास त्यासाठी झालेला खर्च व्यर्थ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अदयाप पर्यंत कार्यप्रणाली कार्यान्वीत होण्यास झालेल्या विलंबाबाबतची कारणे नमूद करून मक्तेदाराकडून विलंब झाला असल्यास करारनाम्यातील अटी शर्ती नुसार कार्यवाही करणे अपेक्षित होते परंतू, मनपाने त्याबाबत निविदेमधील अटी व शर्तीनूसार दंडात्मक कार्यवाही करणेत आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, शासकीय दर करार क्रमांक आरसी-डीआयटी- 2008/सीआर 60/39, दिनांक 16.6.2009 अन्वये बायोमॅट्रीक मशीनसाठी शासकीय दर करार दिनांक 30.9.2009 पर्यंत वैध होता. त्यामधील बाबीनूसार बायोमॅट्रीक मशीनसाठी रु. 30000/- प्रति मशिन असा दर देण्यात आलेला होता. मनपाने सदर मक्तेदारासोबत वाटाघाटी करतेवळी बायोमॅट्रीक मशीनसाठीचे निविदेमधील दर रु.60000/- प्रति मशिन वरुन रु.6000/- प्रति मशीन रक्कम कमी करून अंतिमत: रु. 54000/- प्रति बायोमॅट्रीक मशीनसाठी दर मंजूर करणेत आला.

तरी मनपाने दर अंतिम करतांना बाजारभावाशी / दरकराराशी तुलना न केल्याने रु. 24000/- प्रति बायोमॅट्रीक असे एकुण 100 मशीन करीता एकूण 24,00,000/- एवढी दरकरारापेक्षा जास्त खर्च झाल्याचे दिसून येते.

3) सदर योजनेअंर्गत बसविण्यात आलेल्या बायोमॅट्रीक मशीनचा दरमहा अधिकारी / कर्मचा-यांचा उपस्थितीबाबतचा अहवाल प्राप्त करून घेवून सदर आज्ञावलीमधून अधिकारी / कर्मचा-यांचे वेतन अदा होणे क्रमप्राप्त होते. परंतू, बायोमॅट्रीक मशीनमधून दरमहा अधिकारी / कर्मचा-यांचा उपस्थितीबाबतचा अहवाल प्राप्त होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर आज्ञावलीचा पूर्ण क्षमतेनूसार वापर होत नसल्याचे निदर्शनास येते.

4) निविदेमधील सर्वसाधारण शर्तीमधील अट क्रमांक 8 Liquidated Damages नूसार मनपाचे Engineer in charge हे मक्तेदाराचे काम हे अक्रियाशिल आणि असमाधानकारक असल्यास 10 दिवसाची कारणदर्शक सुचना मक्तेदारास बजावेल आणि त्यामध्ये सत्यता आढळल्यास मंजूर कामाच्या 10 टक्केपर्यंत रकमेचा दंड आकारू शकेल, असे नमूद असतांना मक्तदाराने सदर काम संथगतीने करून विहीत मुदतीत काम पूर्ण न केल्याने अक्रियाशिलता दर्शविली होती. परंतू मनपा स्तरावर त्याची दखल न घेवून मक्तेदारावर कोणतीही कार्यवाही केल्याचे उपलब्ध अभिलेख्यावरून दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र शासन निर्णय दि.2.1.1992 अन्वये प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वप्रथम लिफाफा क्रमांक 1 उघडण्यात यावा आणि जर त्यामधील सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाली असल्यास तरच दुसरा लिफाफा उघडण्यात यावा, असे नमुद आहे. परंतू, प्राप्त निविदाधारकांपैकी मे टाटा कन्सल्टन्सी, मुंबई यांनी काही अटींसह निविदा प्रकियेत भाग घेतल्याने ते निविदा प्रक्रियेमधून बाद ठरले. त्याअर्थी उर्वरीत दोन पुरवठारांमधे दरपत्रकांची तुलना करणे नियमोचीत नाही. दि.2.1.1992 च्या शासन निर्णयानूसार मंडळाने मुदतवाढ देणे / फेरनिविदा मागविणे आवश्यक होते. परंतू मनपाने तशी कार्यवाही न करता उर्वरीत दोन पुरवठादारांमध्ये दरांची तुलना करून निविदा प्रक्रिया अंतिम केल्याचे दिसून येते.

6) निविदेमधील अट क्रमांक 13 नूसार Quality Assurance Program / sample test एसटीक्यूसी, अंधेरी, मुंबई यांचेकडून स्वखर्चाने करून घेण्याबाबत नमूद केले आहे. परंतू, मनपाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानूसार सदरच्या चाचणी बाबतचा अहवाल दिसून आला नाही तसेच त्याबाबत टिपणीमध्येही याबाबत

उल्लेख आढळून आला नाही.

7) महानगरपालिकेने सदरची आज्ञावली विकसीत करणेपूर्वी कोणत्या प्रकारचा सर्वेक्षण केले, त्याचा तपशिल / नोंद अभिलेख्यामध्ये आढळून आले नाहीत. तसेच आज्ञावली विकसीत करणेपूर्वी शासन मान्यता प्राप्त नॅशनल इन्फोमेशन सेंटर, मुंबई किंवा सी-डॅक पुणे यांचेकडे चौकशी केल्याचे किंवा त्यांचे अभिप्राय मागविल्याचे उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यावरून दिसून आले नाही. वास्तविक पाहता रु. 650.00 लक्ष पेक्षा अधिक कामाचे तांत्रीक मान्यता कोठून प्राप्त केल्यात, याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही. सबब सदर कामाला तांत्रिक मान्यता प्राप्त नसल्याचे दिसून येते.

8) सदरच्या आज्ञावलीचे महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक डीआयटी-2012/प्रक्र.1880/39 दि.1.2.2012 अन्वये सिक्यूरीटी ऑडीट करणेत आले किंवा कसे? याबाबत माहिती नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

9) सदरची आज्ञावली विकसीत करणे हे काम "जेएनएनयुआरएम अंतर्गत करावयाच्या वैकल्पीक तसेच बंधनात्मक सुधारणांची पूर्तता करणेकामी इंटिग्रेटेड पध्दतीची संगणकीय कार्यप्रणाली विकसीत करणे", असे दिनांक 25.10.2010 च्या कायार्लयीन टिपणीत तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक 225 दि 28.2.10 मध्ये तसेच बहूतांशी कार्यालयीन टिपणीमध्ये नमूद आहे. परंतू प्रत्यक्षात जेएनएनयुआरएम यांचा मंजूर आराखडा तपासणीस्तव उपलब्ध करून देण्यात आला नाही.

10) सदर कामाला दिनांक 5.3.2016 च्या कार्यालयीन टिपणीनूसार दिनांक 1.4.2019 पर्यंत मुदतवाढ दिली असल्याचे मा. आयुक्त् नाशिक मनपा यांनी मान्य केले आहे. परंतू सदरच्या विषयास महासभेची मान्यता प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

11) तसेच जेएनएनयुआरएम- नॅशनल मिशन मोड ऑन ई गव्हर्नन्स इन म्यूनिसिपल ऑफिस मधील मुद्दा क्रमांक 5.1 नूसार ज्या महानगरपालिकांची निवड करणेत आली आहे, त्यांना सदर कामासाठी खालीलप्रमाणे अनूदान प्राप्त होणार आहे -

केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा :	महानगरपालिका हिस्सा
50 टक्के	20 टक्के	30 टक्के

वरील प्रमाणे मंजूर कामाच्या एकूण रकमेची विभागणी केली असता ती खालीलप्रमाणे येते -

केंद्र हिस्सा 50 टक्के	राज्य हिस्सा : 20 टक्के	महानगरपालिका हिस्सा 30 टक्के
324.50 लक्ष	129.80 लक्ष	194.70 लक्ष

महानगरपालिकेने वेळीच प्रकल्प पूर्ण न केल्याने महानगरपालिकेला वर नमुद केल्याप्रमाणे राज्य व केंद्र शासनाकडून प्राप्त होवून शकणा-या अनुदान रक्कम रुपये 454.30 लक्ष पासून वंचित राहवे लागले आहे.

आक्षेपाधिन रक्कम
रु. 65556400.00

CCFNKKM8401 (Ref No : 80, Hmm No : 135)

6 नाशिक महानगरपालिकेसाठी डेटा सेंटर रिकव्हरीकामी क्लाउड सेवा उपलब्ध करून घेणेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 08

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4972500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4972500.00/-

दरकरार असूनही स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबवून संबंधित पुरवठादाराला मक्ता दिलेला आहे, शासन निर्णय दि:2.1.1992 नूसार नियमांचे पालन न करता निविदा अंतिम करणेत आलेली आहे, काम पुर्णत्वाचा प्रमाणपत्र/ दाखला- नस्तीमध्ये दिसून आला नाही, अभिलेख्यानूसार सदरच्या चाचणी बाबतचा अहवाल दिसून आला नाही, सदर कामाची मुदत ही 5 वर्षाकरीता असल्याने मनपा स्तरावर सदर किती वेळा डेटा रिकव्हर केला किंवा किती वेळा मक्तेदाराने मनपाला डेटा उपलब्ध करून दिला याची माहिती नस्तीमध्ये आढळून आली नाही, सिक्यूरीटी ऑडीट करणेत आलेबाबतची माहिती उपलब्ध नाही, निविदेसोबत Payment of Schedule जोडण्यात आलेले नाही.

नाशिक महानगरपालिकेचे वापरात असलेल्या संगणकामधील माहिती “Data centre for Disaster Recovery and Hosting the online app of NMC on Cloude” या कामासाठी प्रथम निविदा प्रसिध्द केली असता, 3 पुरवठादारांनी निविदा भरल्या होत्या परंतू त्यापैकी फक्त एकच पुरवठादार पात्र ठरल्याने दुबार निविदा प्रसिध्द करणेत आली परंतू, त्यामध्ये सुध्दा एकच पुरवठादार पात्र ठरल्याने मे.इएसडीएस सॉफटवेअर सोल्यूशन्स लि नाशिक यांना सदरचा मक्ता देण्यात आला.

या कामाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-

1	प्रशासकीय मंजूरी	महासभा ठराव क्रमांक 618, दि.5.12.2013
2	अर्थसंकल्पीय तरतूद	नमूद नाही
3	निविदा कालावधी	1- 7.6.2013 ते 16.6.2013 2- 31.7.2013 ते 12.8.2013
4	कामाचा कालावधी	5 वर्षे
5	मक्तेदार	मे आर डी डेटा सिस्टीम नाशिक
6	कार्यादेश क्रमांक	18, दि.13.1.2014
7	निविदा रक्कम	रु.49,72,500/-
8	तांत्रीक मंजूरी	घेण्यात आलेली नाही

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे-

1) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक मातंस-1088/2512/उद्योग-6, दि.2.1.1992 मधील मुद्दा क्रमांक 8.3 (ब) अन्वये प्रसिध्द केलेलया निविदेला कमी / अत्यल्प प्रतिसाद मिळाल्यास दोन वेळा मुदतवाढ देणे आवश्यक होत. परंतू महानगरपालिकेने तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, माहिती व तंत्रज्ञान विभाग, यांचेकडील पत्र क्रमांक डीआयटी-8/71/39 दि.25.12.2012 अन्वये महाऑनलाईन यांचेसोबत Cloud Service चा पुरवठा करणेसंबंधी दर करार

केला असून, महानगरपालिकेने सदर दरकरार असूनही स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबवून संबंधित पुरवठादाराला मक्ता दिलेला आहे.

3) निविदेमधील Special Condition of Contract या भागातील अट क्रमांक 9 - Method for Carryout the work नूसार Officer In Charge हा मक्तेदाराला कामाबाबतचे schedule तयार करून देईल, त्यानंतर मक्तेदाराने सदरचे काम करणे आवश्यक राहील, असे नमुद आहे. परंतू नस्तीमध्ये Officer In Charge ने मक्तेदाराला कामाबाबतचे schedule तयार दिल्याबाबतचे पत्र / आदेश दिसून आले नाही.

4) काम पुर्णत्वाचा प्रमाणपत्र / दाखला- नस्तीमध्ये दिसून आला नाही.

5) निविदेमधील अट क्रमांक 13 नूसार Quality Assurance Program / sample test त्रयस्थ संस्थेकडून स्वखर्चाने करून घेण्याबाबत नमूद केले आहे. परंतू, मनपाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानूसार सदरच्या चाचणी बाबतचा अहवाल दिसून आला नाही तसेच त्याबाबत टिपणीमध्येही याबाबत उल्लेख आढळून आला नाही.

6) निविदेमधील सर्वसाधारण शर्तीमधील अट क्रमांक 8 Liquidated Damages नूसार मनपाचे Engineer in charge हे मक्तेदाराचे काम हे अक्रियाशिल आणि असमाधानकारक असल्यास 10 दिवसाची कारणदर्शक सुचना मक्तेदारास बजावेल आणि त्यामध्ये सत्यता आढळल्यास मंजूर कामाच्या 10 टक्केपर्यंत रकमेचा दंड आकारू शकेल, असे नमूद आहे. सदर कामाची मुदत ही 5 वर्षाकरीता असल्याने मनपा स्तरावर सदर किती वेळा डेटा रिकव्हर केला किंवा किती वेळा मक्तेदाराने मनपाला डेटा उपलब्ध करून दिला याची माहिती नस्तीमध्ये आढळून आली नाही.

7) सदरच्या आज्ञावलीचे महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक डीआयटी-2012/प्रक्र.188/39 दि.1.2.2012 अन्वये सिक्यूरीटी ऑडीट करणेत आले किंवा कसे? याबाबत माहिती नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

8) सदर निविदेसोबत Payment of Schedule जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे मक्तेदाराला कशाच्या आधारे कधी अदायगी करणेत आली, हे समजू शकले नाही.

CCFNKKM8401 (Ref No : 82, Hmm No : 134)

7 सन 2013-2014 या कालावधीत माहिती व जनसंपर्क विभागाने सभा/सभारंभासाठी केलेल्या खर्चावरील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 436659.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 427609.00/-

वार्षिक सभा/सभारंभ प्रित्यर्थ मनपा मार्फत 5,00,000/- एवढा खर्च करणे आवश्यक असताना माहिती व जनसंपर्क विभागाने सभा/सभारंभासाठी रक्कम रूपये 4,36,659/- खर्च केला आहे व नगर सचिव विभागाने याच प्रयोजनासाठी आकस्मिक खर्चातून रक्कम रूपये 4,90,950/- खर्च केला आहे यामुळे सभा/सभरंभाकरिता रक्कम रू4,27,609/- एवढा जादा खर्च केलेला आहे. निविदा न मागविता सदरचा खर्च करण्यात आलेला आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे माहिती व जनसंपर्क विभागातील सभा/सभारंभ खर्चाच्या नस्तीच्या निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण करण्यात आले असता माहिती व जनसंपर्क विभागाने सभा/सभांरभासाठी रक्कम रूपये 4,36,659/- एवढी रक्कम सभा/सभारंभाच्या विविध बाबींसाठी खर्च केली आहे.

अ.क्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	रक्कम रूपये
1	आदेश क्र.124, दिनांक 11/7/2013	पुष्पगुच्छ	20150
2	आदेश क्र.123 दिनांक 11/7/2013	शाल व इतर खर्च	6857
3	आदेश क्र. 121 दिनांक 10/7/2013	हार, पुष्पगुच्छ	19475
4	आदेश क्र. 125 दिनांक 11/7/2013	शैलेंद्र साळी यांचे फोटोग्राफर बील	17612
5	आदेश क्र.126 दिनांक 11/7/2013	शहनाईवादन केल्याचे बील	5000
6	आदेश क्र. 130 दिनांक 25/7/2013	हार, पुष्पगुच्छ	22000
7	आदेश क्र.132, दिनांक 16/8/2013	सदिच्छा भेट खर्च	16950
8	आदेश क्र.133, दिनांक 27/8/2013	पुष्पगुच्छ	20725
9	आदेश क्र.135, दिनांक 27/8/2013	सदिच्छा भेट खर्च	9320
10	आदेश क्र.139, दिनांक 4/10/2013	पुष्पगुच्छ व इतर साहित्य	13810
11	आदेश क्र.138 दिनांक 4/10/2013	शहनाईवादन केल्याचे बील	7500
12	आदेश क्र.143 दिनांक 19/10/2013	मे.सोज्वल कलज फोटोज	17200
13	आदेश क्र. 125 दिनांक 11/7/2013	फोटोग्राफर बील	24300

14	आदेश क्र. 1816 दिनांक 3/3/2013	महाराष्ट विधान मंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समिती दौरा नास्ता व इतर खर्च	152525
15	आदेश क्र. 11 दिनांक 10/7/2013	हार, पुष्पगुच्छ	23900
17	आदेश क्र.3/दिनांक 16/11/2013	निवडणूकीच्या वेळी छायाचित्रे व शुटींगचे देयक	17360
18	आदेश क्र.19 /दिनांक 9/12/2013	सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक स्मृतीचिन्ह	36975
19	आदेश क्र.10/दिनांक 5/3/2014	26 जानेवारी रोजी शहनाईवादन केल्याचे बील	5000
	एकूण		**436659**

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात आहेत.

1)शासन अधिसुचना क्र.1007/प्र.क्र.376/नवि-26, दिनांक 22/02/2008 नुसार व महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमामधील कलम क्रमांक 66(41) अन्वये महानगरपालिकेतर्फे करण्यात येणा-या वार्षिक समारंभ प्रित्यर्थ खर्चाची वार्षिक रक्कम रू. 5,00,000/- इतकी करण्यात आली आहे. परंतू माहिती व जनसंपर्क विभागाने सभा/सभारंभासाठी रक्कम रूपये 4,36,659/- खर्च केला आहे व नगरसचिव विभागाने याच प्रयोजनाकरीता आकस्मिक खर्चातून रक्कम रूपये 4,90,950/- खर्च केला आहे. सदर बाब विचारात घेता नाशिक महानगरपालिकेने सन 2013-2014 या कालावधीत एकाच प्रयोजनाकरिता एकूण रक्कम रू.9,27,609/- एवढा खर्च केला आहे. नाशिक महानगरपालिकेने सदर शासन अधिसूचनेची अंमलबजावणी न केल्यामुळे सभा/सभरंभाकरिता रक्कम रू.4,27,609/- एवढा जादा खर्च केलेला आहे.

2)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सुधारणा 2013 मधील अनुसूची "ड" प्रकरण 5 (2) नुसार महानगरपालिकेने कुठलेही माल किंवा सामुग्री खरेदी करण्यासाठी 7 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहीराती नोटीस देऊन अशा खरेदीसाठी निविदा मागविणे आवश्यक असतांना विना निविदा व दरपत्रके न मागविता वरील खरेदी केलेली आहे. तसेच कोणतेही काम शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/2512/उघोग-6 दिनांक 02.01.1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 (फ) अन्वये प्रत्येक बाबीसाठी वर्षभरात रू 50,000/- पेक्षा जास्त असल्यास त्यासाठी जाहिर निविदा प्राप्त करून त्यानंतरच खर्च करणे आवश्यक आहे. परंतू जनसंपर्क विभागाने कोणतीही निविदा न मागविता सदरचा खर्च केला आहे, निविदा प्रक्रिया न राबविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ नाशिक महानगरपालिकेस झालेला नाही. परिणामी विशिष्ठ पुरवठादाराकडुन हार, पुष्पगुच्छ, शाली खरेदी तसेच इतर खर्च जादा झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3)मा.आयुक्त यांचे आदेश क्रमांक 124, दिनांक 11/7/2013, आदेश क्र.125,दिनांक 11/7/2013, आदेश क्र.130,दिनांक 25/7/2013 ही देयके सन 2012-2013 या कालावधीतील असून सदरचा खर्च हा सन 2013-2014

मध्ये करण्यात आला आहे.

4) नस्ती सोबत संबंधित पुरवठादाराची बीले असणे आवश्यक आहे परंतू काही नस्ती मध्ये सदरची बीले आढळून आलेली नाहीत. संबंधित पुरवठादाराकडून देयके प्राप्त करून घेणे आवश्यक आहेत तदनंतरच संबंधित पुरवठादारास रकमा अदा करणे अपेक्षित आहे. यामुळे आदेशात नमूद वस्तु प्राप्त झाल्या आहेत किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आलेली नाही तसेच सदरच्या रकमा अदा करण्यापूर्वी या साहित्याचा वापर कोणकोणत्या अभ्यांगतांसाठी केला याबाबतच्या कुठल्याही नोंदी ठेवलेल्या नाहीत.

वरील उविणांवरून असे दिसून येते की, मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

8 सन 2013-2014 या कालावधीत नाशिक महानगरपालिकेने जाहिरातीकरिता केलेल्या खर्चाबाबतची अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 3873066.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3873066.00/-

महानगरपालिकेने जाहिराती या शासन दरापेक्षा जास्त व्यापारी दराने जाहिराती दिल्यामुळे रक्कम रू 37,41,723/- एवढया रकमेचे नुकसान झाले आहे. महानगरपालिकेला जाहिरात या अभिकरणामार्फत देता येत नसल्यामुळे अभिकरणाला सेवाकर देण्याचे प्रयोजन नसताना रक्कम रू1,31,343/- एवढी रक्कम नाशिक जाहिरात अभिकरणाला सेवाकर रूपाने प्रदान केली आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे माहिती व जनसंपर्क विभागाने उपलब्ध करून दिलेल्या जाहिरात खर्चाच्या नस्तीच्या निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण करण्यात आले असता मे. नाशिक ॲडव्हटायझींग या जाहिरात अभिकरणाला (एजन्सीला) जाहिरातीकरीच्या रकमा अदा केलेल्या आहेत.

प्रशासकीय मान्याता :- मा. स्थायी समिती ठराव क्र.245 दिनांक 04/06/2005 सभा क्र. 15 विषय क्र.245 अन्वये

(1) मे. नाशिक जाहिरात एजन्सी नाशिक.

(2) मे.पियुष जाहिरात एजन्सी नाशिक.

(3) मे.राका जाहिरात एजन्सी नाशिक.

(4) मे.ऑस्ट्रेल जाहिरात एजन्सी नाशिक.

उपरोक्त जाहिरात एजन्सी यांनी मनपाकडे जाहिरात मिळण्यासाठी अर्ज केले होते त्याअनुषंगाने उपरोक्त ठरावात नमुद केल्याप्रमाणे नाशिक महानगरपालिका सध्यस्थितीत जाहिरात प्रसिद्धीस देतांना जाहिरात एजन्सी मार्फत जाहिरातीचे आकारमान संगणकावर कमीत कमी आकारात सारखे प्रमाणात टाईप करून वृत्तपत्रांना देत असल्यामुळे कॉलम सेंटीमीटर मध्ये बचत होऊन मनपाचा आर्थिक फायदा होतो. तसेच राज्यस्तरीय वृत्तपत्रांना थेट जाहिरात देणे सोपे होते. त्यावर स्थायी समितीने मे.नाशिक जाहिरात एजन्सी व पियुष जाहिरात एजन्सी यांना व शहरात कार्यरत असलेल्या गोविंदा, साईकृपा ॲड सी-न्युज, वेध, नजर या इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या मार्फत चक्रीय पध्दतीने देण्यास मंजुरी दिली.

तदनंतर मा.स्थायी समिती ठराव क्र.502 दिनांक 17/10/2013 सभा क्र.23 विषय क्र.502 अन्वये नाशिक महानगरपालिकेच्या विविध वृत्तपत्रांना दिल्या जाणा-या जाहिराती या मे.नाशिक ॲडव्हटायझींग अन्वये प्रसिध्द केल्यास त्यांचे मार्फत जाहिरात हया कमीत कमी साईजमध्ये बिनचुक व बरोबर प्रसिध्द होत असतात, त्यामुळे नाशिक महानगरपालिकेचा वेळ, पैसा व मनुष्यबाळाची बचत होते, तरी मनपाच्या विविध वृत्तपत्रांना दिल्या जाणा-या जाहिराती या मे.नाशिक ॲडव्हटायझींग यांचेमार्फत नियमानुसार प्रसिध्द करणेबाबत मंजूरी दिली आहे.

सदर बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. मा. स्थायी समिती ठराव क्र.245 दिनांक 04/06/2005 देण्यात आलेल्या मंजुरीत कालमर्यादा नमुद नसल्यामुळे सन 2005 पासून मे. नाशिक जाहिरात एजन्सीला जाहिरात देणे चालू आहे. धोरणात्मक बाब म्हणून मा. महासभेची प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक होती. प्रत्यक्षात मनपाने अशी मंजुरी घेतलेली नाही.

2. 'वृत्तपत्रात व नियतकालिकांच्या जाहिरात विषयक धोरणात तसेच जाहिरातीच्या दरात सुधारणा करण्यासाठी नेमलेल्या मा. अनिल देशमुख समितीचा अहवाल' महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पीयुबी-1000/प्र.क्र.73/2000/34 दिनांक 1 मे,2001. यातील जोडपत्र-अ मधील नियम-6 अन्वये शासनाची विविध मंडळे, महामंडळे, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपरिषदा, शासन पुरस्कृत सहकारी संस्था आदी स्वायत्त संस्थाच्या वर्गीकृत जाहिराती तसेच दर्शनी जाहिराती शासन धोरणाप्रमाणे वृत्तपत्रांना परस्पर वितरीत करण्याचे अधिकार या संस्थाना आहेत, तथापी त्यांनी आपल्या जाहिरातीच्या वितरणासाठी शासन मान्य वृत्तपत्रांच्या यादीचा तसेच शासनमान्य दराचा अंगीकार करून शासन धोरणाप्रमाणे त्या त्या वर्गातील वृत्तपत्रामध्ये करावयाच्या समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा कटाक्षाने अंमल करावा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क सर्व सबंधीतांना अंमलबजावणी प्रक्रिया व नियमावली निश्चित करून देतील, असे नमुद असतांना नाशिक महानगरपालिकेने उक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3. 'शासकीय जाहिरात वितरण धोरणात सुधारणा करण्याबाबत' महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दिनांक 31 ऑगस्ट,2009.मधील अनु.क्र.(9) अन्वये शासनाच्या कोणत्याही विभागांनी शासकीय जाहिरात अभिकरणामार्फत (एजन्सीमार्फत) देऊ नयेत. शासनाच्या सर्व जाहिरातींचे वितरण चक्रीय

पध्दतीने (रोटेशन) करणे सर्व विभागांवर बंधनकारक राहील . फक्त जाहिरात तयार करण्याकरिताच (क्रिएटिव्ह) अभिकरणांची (एजन्सीची) मदत घेता येईल मात्र अशा अभिकरणाची यादी (एजन्सीचे पॅनल) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत तयार करण्यात यावे. असे नमूद असताना सुध्दा महानगरपालिकेने उपरोक्त् स्थायी समितीच्या ठरावानुसार मे. नाशिक ॲडव्हर्रटायझींग एजन्सीला विववरणपत्र अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे शासन दरापेक्षा जास्त व्यापारी दराने जाहिराती दिल्या आहेत. उक्त शासन निर्णयानुसार जाहिराती या जाहिरात अभिकरणांमार्फत देणे बंद करावे व आवश्यक असल्यास फक्त जाहिरात तयार करण्याकरिता अभिकरणाची मदत घेता येईल. परंतू काही प्रकरणांमध्ये मे.नाशिक ॲडव्हर्रटायझींग या जाहिरात अभिकरणाने व्यापारी दराने जाहिरात रकमेची आकारणी केल्यामुळे मनपा निधीचे विविरणपत्र अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंदाजे रक्कम रू. 37,41,723/- एवढया रकमेचे नुकसान झाले आहे.

4. शासन निर्णय क्र. जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दिनांक 31 ऑगस्ट,2009.अनु क्र.(11) प्रमाणे शासनाची विविध मंडळे, महामंडळे,जिल्हा परिषदा,महानगरपालिका,नगरपरिषदा,शासन पुरस्कृत सहकारी संस्था, आदी स्वायत्त संस्थाना वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देण्यासंदर्भात शासनाच्या धोरणानुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्याबाबत महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांनी अंमलबजावणी प्रक्रिया व नियमावली निश्चित करून दिलेली आहे. तथापी सदर मंडळे, महामंडळे, स्वायत्त संस्था त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देण्यासंदर्भात, शासनाच्या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करीत नाहीत असे निदर्शनास आले आहे. म्हणून पुन्हा निदेश देण्यात येत आहेत की, मंडळे , महामंडळे स्थानीक स्वराज्य संस्था, इत्यादी स्वायत्त संस्था यांनी त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देतांना शासकीय धोरणाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी व त्यांनी त्यांच्या जाहिराती शासनाच्या जाहिरात वितरण धोरणानुसारच देण्यात आल्या असल्याबाबत संबंधीतांसमोर स्पष्ट करावे असे नमुद केले आहे परंतू महानगरपालिका नाशिकने उपरोक्त स्थायी समितीच्या ठरावानुसार नाशिक जाहिरात एजन्सीला जाहिरात अभिकरण (एजन्सी) ला कामकाज दिले तसेच सदर रकमेवर सेवाकराचे कोणतेही प्रयोजन नसताना विवरणपत्र ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंदाजे रक्कम रु..1,31,343/- मे.नाशिक ॲडव्हटायझींग या अभिकरणाला सेवाकर रूपाने प्रदान केले आहे, प्रत्यक्षात नाशिक महानगरपालिका, मे.नाशिक ॲडव्हटायझींग एजन्सीला वृत्तपत्रात जाहिरात देण्यासाठी कोणतेच कमीशन देत नाही. सदर एजन्सीला वृत्तपत्रे त्यांच्या तर्फे 15% कमीशन देतात. सदर कमीशन वर 12.36% दराने सेवाकर स्वतः एजन्सीने उपरोक्त प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे. { सेवाकर कायदा 1996 व त्यातील सुधारणा, (वित्तीय कायदा 2006 , नोटिफिकेशन-1-5-2006) मधील 7.3.4 (ii) , चाप्टर 75 }

सोबतच्या विवरणपत्रात नमूद रकमा या 2013-2014 या कालावधीलतील उदाहरणादाखल असून विभागाने जाहिरातीच्य सर्व नस्त्याची पडताळणी करून वसूली करणे आवश्यक आहे.

विवरणपत्र अ

विवरणपत्र अ

सन 2013-2014 या कालावधीतील उदाहरणादाखल व्यापारी दराने जाहिरात दिल्याने जादा प्रदान रकमेचे विवरणपत्र

अ.क्र.	मा.आयुक्त मंजूरी आदेश व दिनांक	रक्कमेच तपशील			दैनिकाचे नाव	विभागाचे नाव	जाहिरात आकार स्के.सेमी	दैनिकाचा व्यापारी दर चौसेमी	अदा रक्कम	दैनिकाचा शासकीय दर	देय रक्कम	जादा प्रदान फरक
		जाहिरात रक्कम	सेवाकर	एकूण रक्कम								

1	24,दिनांक 4/4/2013	357105	6620	363725	दै.लोकसत्ता	यांत्रिकी विभाग	180	1361.25	245025	40	7200	237825
2	179,दिनांक 6/5/2013	257664	4775	262439	दै.महाराष्ट्र टा.	झोपडपटटी सु.वि	128	1120	143360	50	6400	136960
3	181,दिनांक6/5/2013	136476	2529	139005	दै.महाराष्ट्र टा.	झोपडपटटी सु.वि	32	1120	35840	50	1600	34240
4	213,दिनांक 9/5/2013	370560	6870	377430	दै.महाराष्ट्र टा.	सार्व.बां.वि.	320	1120	358400	50	16000	342400
5	214,दिनांक 9/5/2013	214200	3971	218171	इंडियन एक्सप्रेस	नगरसचिव वि	56	2533	141848	24	1344	140504
6	212,दिनांक 9/5/2013	53408	990	54398	दै.नवभारत,महा	आपत्ती व्यवस्थापक	136	97	13192	58	7888	5304
7	372,दिनांक 14/6/2013	129592	2404	131996	दै.नवभारत,महा	यांत्रिकी विभाग	97	156	15132	58	5626	9506
8	372,दिनांक 14/6/2013				फ्री प्रेस	यांत्रिकी विभाग	156	61	9516	23	3588	5928
9	411,दिनांक 24/6/2013	283334	5253	288587	दै.महाराष्ट्र टा.	सार्व.बां.वि.	168	1120	188160	50	8400	179760
10	412,दिनांक 24/6/2013	254800	4724	259524	इंडियन एक्सप्रेस	आरोग्य विभाग	88	2533	222904	24	2112	220792
11	486,दिनांक 3/7/2013	335384	6218	341602	टाईम्स ऑफ इंडिया	नमूद नाही	80	2725	218000	95	7600	210400
12	481,दिनांक 3/7/2013	179248	3323	182571	दै.महाराष्ट्र टा.	नौका विहार खाजगी ठेका	136	1120	152320	50	6800	145520
13	485,दिनांक 3/7/2013	300416	5570	305986	दै.महाराष्ट्र टा.	पाणीपुरवठा व मलनिसारण	128	1120	143360	50	6400	136960
14	485,दिनांक 3/7/2013			0	इंडियन एक्सप्रेस	पाणीपुरवठा व मलनिसारण	128	1200	153600	24	3072	150528
15	564,दिनांक 17/7/2013	424320	7867	432187	इंडियन एक्सप्रेस	भुयारी गटार योजना	104	1200	124800	24	2496	122304
16	564,दिनांक 17/7/2013			0	हिंदुस्थान टा.	मेकेनिकल	64	4500	288000	36	2304	285696

						डि.						
17	565,दिनांक 10/7/2013	143764	2665	146429	दै.नवभारत,महा	यांत्रिकी विभाग	180	97	17460	58	10440	7020
	565,दिनांक 10/7/2013				दै.नवभारत,महा	घरपटटी	348	97	33756	58	20184	13572
18	584,दिनांक 23/7/2013	674190	12499	686689	टाईम्स ऑफ इंडिया	आरोग्य विभाग	88	6245	549560	95	8360	541200
19	584,दिनांक 23/7/2013			0	लोकसत्ता	आरोग्य विभाग	88	1361.25	119790	40	3520	116270
20	1233,दिनांक 6/12/2013	252080	4673	256753	डी.एन.ए.	यांत्रिकी विभाग	48	3450	165600	42	2016	163584
21	1233,दिनांक 6/12/2013			0	महा टा.	यांत्रिकी विभाग	48	1120	53760	50	2400	51360
22	1233,दिनांक 6/12/2013			0	फ्री प्रेस	यांत्रिकी विभाग	48	61	2928	23	1104	1824
23	1237,दिनांक 6/12/2013	86228	1598	87826	दै.नवभारत,महा	डाटा सैंटर	72	97	6984	58	4176	2808
24	1232,दिनांक 6/12/2013	248722.48	5278	254000.48	दै.नवभारत,महा	विदयुत विभाग	888	213.21	189330.48	58	51504	137826.48
25	1236,दिनांक 6/12/2013	159867	2963	162830	दै.नवभारत,महा	विदयुत विभाग	152	213.21	32407.92	58	8816	23591.92
26	1236,दिनांक 6/12/2013				दै.नवभारत,महा	सार्व.बां.वि.	72	213.21	15351.12	58	4176	11175.12
27	1234,दिनांक 6/12/2013	95099	1762	96861	दै.नवभारत,महा	पाणीपुरवठा	168	213.21	35819.28	58	9744	26075.28
28	1235,दिनांक 6/12/2013	177186	3285	180471	दै.नवभारत,महा	यांत्रिकी विभाग	192	213.21	40936.32	58	11136	29800.32
	1235,दिनांक 6/12/2013				दै.नवभारत,महा	पाणीपरवठा	48	213.21	10234.08	58	2784	7450.08
29	1385,दिनांक 31/12/2013	221047.52	4096	225143.52	डी.एन.ए.	यांत्रिकी विभाग	24	3450	82800	42	1008	81792
30	1385,दिनांक 31/12/2013			0	महा टा.	यांत्रिकी विभाग	24	1120	26880	50	1200	25680
31	1385,दिनांक			0	दै.नवभारत,महा	सार्व.बां.वि.	112	213.21	23879.52	58	6496	17383.52

	31/12/2013											
32	1384,दिनांक 31/12/2013	183984	3411	187395	हिदुस्थान टाईम्स	मेकॅनिकल डिपार्टमट	24	4500	108000	36	864	107136
33	1384,दिनांक 31/12/2013			0	दै.नवभारत,महा	वैदयकीय वि	112	103	11536	58	6496	5040
34	1384,दिनांक 31/12/2013			0	दै.नवभारत,महा	कॉप्युटर सेल	48	103	4944	58	2784	2160
35	1386,दिनांक 31/12/2013	116591	2162	118753	दै.नवभारत,मुंबई	सार्व.बां.वि.	120	75.23	9027.6	39	4680	4347.6
												3741723.32

विवरणपत्र ब

विवरणपत्र ब						
सन 2013-2014 या कालावधीतील उदाहरणादाखल सेवाकर अदा केलेल्या रकमेचे विवरणपत्र						
जाहिरात कंपनीचे नाव मे. नाशिक ॲडव्हरटायंझिंग						
अनु क्र.	मा.आयुक्त मंजुरी आदेश क्र. दिनांक	रक्कमेच तपशील			प्रसिध्द जाहिरात संख्या	वसुलपात्र सेवाकर
		जाहिरात रक्कम	सेवाकर	एकूण रक्कम		
1	1698, दिनांक 30/3/2013	100740	1867	102607	16	1867
2	1699,दिनांक 30/3/2013	268904	4984	273888	33	4984
3	24, दिनांक 4/4/2013	357105	6620	363725	24	6620
4	179,दिनांक 6/5/2013	257664	4775	262439	32	4775
5	181, दिनांक 6/5/2013	136476	2529	139005	28	2529
6	180, दिनांक 6/5/2013	40712	754	41466	11	754
7	213, दिनांक 9/5/2013	370560	6870	377430	3	6870
8	214,दिनांक 9/5/2013	214200	3971	218171	17	3971

9	212, दिनांक 9/5/2013	53408	990	54398	7	990
10	348,दिनांक 5/6/2013	270600	5017	275617	14	5017
11	348,दिनांक 5/6/2013	72752	1349	74101	13	1349
12	372,दिनांक 14/6/2013	129592	2404	131996	21	2404
13	411,दिनांक 24/6/2013	283334	5253	288587	10	5253
14	412,दिनांक 24/6/2013	254800	4724	259524	8	4724
15	486,दिनांक 3/7/2013	335384	6218	341602	27	6218
16	483,दिनांक 3/7/2013	239064	4431	243495	31	4431
17	481,दिनांक 3/7/2013	179248	3323	182571	9	3323
18	482,दिनांक 3/7/2013	76708	1422	78130	23	1422
19	485,दिनांक 3/7/2013	300416	5570	305986	3	5570
20	564,दिनांक 17/7/2013	424320	7867	432187	7	7867
21	565,दिनांक 10/7/2013	143764	2665	146429	26	2665
22	561,दिनांक 17/7/2013	80288	1488	81776	17	1488
23	563,दिनांक 17/7/2013	70304	1303	71607	13	1303
24	562,दिनांक 17/7/2013	33064	613	33677	16	613
25	584,दिनांक 23/7/2013	674190	12499	686689	4	12499
26	1233,दिनांक 6/12/2013	252080	4673	256753	8	4673
27	1237,दिनांक 6/12/2013	86228	1598	87826	23	1598
28	1232,दिनांक 6/12/2013	284722	5278	290000	22	5278
29	1236,दिनांक 6/12/2013	159867	2963	162830	26	2963

30	1234,दिनांक 6/12/2013	95099	1762	96861	20	1762
31	1235,दिनांक 6/12/2013	177186	3285	180471	32	3285
32	1385,दिनांक 31/12/2013	221047	4096	225143	26	4096
33	1384,दिनांक 31/12/2013	183984	3411	187395	20	3411
34	1387,दिनांक 31/12/2013	140726	2609	143335	43	2609
35	1386,दिनांक 31/12/2013	116591	2162	118753	26	2162
	TOTAL					**131343**

DGPVJTM8301 (Ref No : 66, Hmm No : 118)

9 सन 2013-2014 मध्ये महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्याकरिता महसूली उत्पन्नाच्या 5 % तरतूद खर्च करण्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9अ

महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्याकरिता महसूली उत्पन्नाच्या 5 टक्के रक्कम महानगरपालिकेने राखून ठेवलेली नाही तसेच मनपाने राखून ठेवलेली रक्कम गरजू व पात्र महिलांना सक्षम करण्याकरिता खर्च केली नसल्यामुळे शासनाचा गरजू व पात्र महिलांना या योजनेमार्फत सक्षम करण्याचा मुळ हेतू साध्य झालेला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या कालावधीतील महिला व बालकल्याण विभागाचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आलेली आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये महिला व बालकल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र.जिईम 1793/1198/नवि-14, मंत्रालय मुंबई दिनांक 14 जुलै 1993 नुसार एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रकमेच्या 5% रक्कम राखून ठेवून समितीच्या मागणीनुसार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

त्यानुसार मनपाचे सन 2013-2014 या कालावधीत एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रक्कम 272 कोटी 65 लाख असून महिला व बालकल्याण विभागासाठी 5 टक्के रक्कम 13 कोटी 63 लाख राखून ठेवणे आावश्यक असताना मनपाने 12 कोटी 55 लाख एवढी तरतूद केली आहे. तसेच महिला व बालकल्याण विभागास देण्यात आलेल्या तरतूदीतून खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

(रक्कम रूपयांत)

अ.क्र.	तपशील	केलेली तरतूद	झालेला खर्च	खर्च न केलेली रक्कम
1	अंगणवाडी सकस आहार	22500000	5749976	16750024
2	महिला व बालकल्याण स्वयंरोजगार प्रशिक्षण व इतर कार्यक्रम	50000000	329488	49670512
3	अंगणवाडी फर्निचर व साहित्य खरेदी	1500000	0	1500000
4	आकस्मिक खर्च	1000000	20322	979678
5	अंगणवाडी मानधन बील	50000000	37464385	12535615
6	समुपदेशन केंद्र चालविणे	500000	0	500000
	एकूण	**125500000**	**43564171**	**81935829**

वरील तपशीलानुसार अंगणवाडी सकस आहार याकरीता 57 लाख 50 हजार व अंगणवाडी मानधन बील याकरीता 3 कोटी 75 लाख एवढा खर्च करण्यात आला आहे. परंतू महिला व बालकल्याण स्वयंरोजगार प्रशिक्षण व इतर कार्यक्रमाकरिता 5 कोटी एवढी तरतूद असताना केवळ 3 लाख 29 हजार एवढाच खर्च करण्यात आला आहे तसेच समुपदेशन केंद्र चालविण्यासाठी 5 लाख तरतूद असताना खर्च निरंक करण्यात आलेला आहे. शासन निर्णय नगरविकास विभाग क्रमांक संकिर्ण 2005/प्र.क्र. 255/05/नवि-20,मंत्रालय, मुंबई दिनांक 8/11/2010 नुसार मुलींना/महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे, महिलांसाठी समुपदेषक केंद्र चालविणे, हेल्पलाईन चालविणे, विधी केंद्र चालविणे, मुलींसाठी शाळेमध्ये क्रिडा स्पर्धा आयोजन करणे इत्यादी प्रकारच्या योजना हाती घेणे

आवश्यक असताना महानगरपालिकेने सदर योजना प्रभावीपणे राबविलेल्या नाहीत, यामुळे शासनाचा गरजू व पात्र महिलांना या योजनेमार्फत सक्षम करण्याचा मुळ हेतू साध्य झालेला नाही तसेच 5 टक्के विहित करण्यात आलेला निधी केवळ योजना न राबविल्यामुळे शिल्लक राहिल्याचे निदर्शनास येत आहे, तरी सदर योजना प्रत्येक वर्षात प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

DGPVJTM8301 (Ref No : 67, Hmm No : 127)

10 सन 2013-14 मध्ये क्रिडा क्षेत्रावर महसूली उत्पन्नाच्या 5 टक्के रक्कम खर्च न करण्याची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 0

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ

महानगरपालिकांनी आपल्या वार्षिक खर्चापैकी किमान 5 टक्के खर्च क्रिडाक्षेत्रासाठी करावे असे बंधनकारक असताना नाशिक महानगरपालिकेने क्रिडा विभागासाठी रक्कम रु.13,63,28,400/- राखून ठेवणे आवश्यक असताना रक्कम रु.1,80,00,000/- एवढीच तरतूद केलेली आहे व रक्कम रु.48,74,638/- एवढा खर्च केलेला आहे.

नगरविकास विभाग परिपत्रक क्र.जीईएन-1098/प्र.क्र.21/98/नवि-24, मंत्रालय, मुंबई दि.09/03/1998 अन्वये महानगरपालिकांनी आपल्या वार्षिक खर्चापैकी किमान 5 टक्के खर्च क्रिडाक्षेत्रासाठी करावे असे बंधनकारक आहे.

महानगरपालिकाचे सन 2013-14 या कालावधीत एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रक्कम रुपये 272,65,68,000/- असून क्रिडा विभागासाठी 5 टक्के रक्कम रु.13,63,28,400/- राखून ठेवणे आवश्यक असताना महानगरपालिकेने रक्कम रु.1,80,00,000/- एवढीच तरतूद केलेली आहे. तसेच क्रिडा विभागाने सदर कालावधीत रक्कम रु.48,74,638/- एवढाच खर्च केलेला आहे. नाशिक महानगरपालिकेने क्रिडा क्षेत्रासाठी विविध लेखा शिर्षामधून खालीलप्रमाणे खर्च केलेला आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	तरतूद रक्कम (रुपये)	झालेला खर्च (रुपये)	खर्च न केलेली रक्कम (रुपये)
1	महापौर चषक	5000000	3815109	1184891

2	क्रिडा साहीत्य व सांस्कृतिक कार्यक्रम / लोक शिक्षण व क्रिडा स्पर्धा	5000000	1059529	3940471
3	क्रिडांगणे दुरुस्ती	5000000	------	5000000
4	जॉगींग ट्रक दुरुस्ती	3000000	-----	3000000
5	कर्मचारी क्रिडा स्पर्धा	------	-----	-------
		18000000	4874638	13125362

उपरोक्त वर्षामध्ये 5 टक्के विहित करण्यात आलेला निधी केवळ योजना न राबविल्यामुळे शिल्लक राहिल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सदर योजना प्रत्येक वर्षात प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 77, Hmm No : 129)

11 माध्यमिक शाळेच्या विद्यार्थीनींसाठी (इयत्ता 8 ते 10 मधील) सायकल खरेदी करणेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 9

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

योजना राबविण्यापूर्वी तत्कालीन बाजार परिस्थीतीचा अभ्यास केला नाही, निविदा प्रसिध्द करून खरेदी केलेली नाही, मनपाने खरेदी प्रक्रिया राबवितांना ई-टेंडरींग पध्दतीचा अवलंब करणेत आलेला नाही, मनपाने रक्कम वर्ग करूनही 10 महिन्यांपेक्षा जास्त कालावधीनंतर प्रत्यक्ष खरेदी करणेत आलेली आहे, दरकरारामधील नमुद लेडीज सायकलचा दर हा मनपाच्या दरापेक्षा कमी असूनही मनपाने स्थानिक बाजारातून खरेदी आहे.

मनपाने सन 2013-14 या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकामध्ये रु.35.00 लक्ष रक्कमेची आणि सन 2014-15 मध्ये रु.60.00 लक्षची, मनपा संचालित माध्यमिक विद्यालयातील शाळेपासून लांब अंतरावरून (किमान 3 किमी) येणा-या विद्यार्थी ना मोफत सायकल पुरविण्याकामी तरतूद करणेत आलेली होती. त्याअनुषंगाने प्रति विद्यार्थीना रु.3150/-ची एक सायकल पुरविण्याबाबत मनपा आदेश क्रमांक 1582, दि.11.02.2014 अन्वये खर्चास मंजूरी प्रदान करून, खालील तक्यात नमुद केल्याप्रमाणे शाळेतील मुख्याध्यापकांना शाळेच्या खातेवर रक्कम वितरीत करणेत आलेली होती

अ.क्र.	विद्यालयाचे नांव	लाभार्थी विद्यार्थी	निश्चित दर	खर्च रक्कम
1	बी डी भालेकर	11	3150/-	34650/-

2	सिडको गणेश चौक	66	3150/-	207900/-
3	उर्दू बडीदर्गाह	09	3150/-	28350/-
4	उर्दू वडाळागांव	06	3150/-	18900/-
5	रायगड चौकसिडको	24	3150/-	75600/-
6	शिवाजीनगर सातपूर	153	3150/-	481950/-
7	नांदूरगांव नांदूर	58	3150/-	182700/-
8	कामटवाडे सिडको	21	3150/-	66150/-
9	अंबडगांव नाशिक	76	3150/-	239400/-
10	सातपूर कॉलनी नाशिक	62	3150/-	195300/-
11	पाथर्डी गांव नाशिक	12	3150/-	37800/-
12	म्हसरुळगांव नाशिक	5	3150/-	15750/-
13	चेहडीगाव नाशिक रोड	16	3150/-	50400/-
	एकुण	519		1634850/-

सदर प्ररकणी खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे-

1. सदरील योजनेसाठी निविदा प्रसिध्दी करणेपूर्वी सविस्तर अंदाजपत्रक तयार करून तांत्रीक मंजूरी घेणेत आलेली नाही. या कार्यक्रमाचा सविस्तर आराखडा / रुपरेषा तयार केल्याचे दिसून येत नाही. सदरची योजना राबविण्यापूर्वी तत्कालीन बाजार परिस्थीतीचा अभ्यास केल्याचे नस्तीमध्ये नमूद नाही. तसेच मनपाने सदर कामाकरीता प्रशासकीय मान्यता घेतली असल्याचे नस्तीमध्ये आढळून आले नाही.

2. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक भांखस/1088(251)/ उद्योग-6, दि.1.1.1992 अन्वये रु.50000/- पेक्षा जास्त खर्च असलेल्या सर्व कामांसाठी वृत्तपत्रामधे निविदा प्रसिध्द करून खरेदी करणे आवश्यक आहे. परंतू, मनपाने मध्यवर्ती भांडार विभाग यांचे कडून खरेदी दि.2.1.1992 च्या शासन निर्णयानूसार न करता, परस्पर स्थानिक पुरवठादारांकडून दर पत्रक मागवून दर निश्चिती केलेली आहे.

3. महाराष्ट्र शासन, साप्रवि, शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती-2012/39, दि.19.1.2013 अन्वये रुपये 10 लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त खर्चाच्या कामांना ई निविदा कार्यप्रणाली लागू करणेत आलेली होती, परंतू मनपाने खरेदी प्रक्रिया राबवितांना ई-टेंडरींग पध्दतीचा अवलंब करणेत आलेला नाही.

4. सन 2013-14 मध्ये आदेश क्रमांक 1582, दि.11.02.2014 रोजीच्या आदेशान्वये रक्कम शाळेच्या वेतनेत्तर बँक खाते वर वर्ग करणेत आली, आणि मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापनसमिती व शाळा विकाससमिती यांचे संयुक्त उपक्रम राबवून खरेदी प्रक्रिया राबवून, अटी व शर्ती नमुद करून कार्यालयीन आदेश निर्गमित करून, सायकल विद्यार्थ्यांना वाटप करावे, असे कळविले होते, परंतू प्रत्यक्षात खरेदी मात्र दरपत्रके / निविदाप्रसिध्दी न करता व शासन निर्णयान्वये विहीत केलेल्यापध्दतीचा अवलंब न करता, मुख्याध्यापक यांनी कार्यालयीन आदेश न काढता, मनपाने दर मंजूर केलेल्या पुरवठादारा कडून सायकली खरेदी केलेल्या आहेत. तसेच सायकलची प्रत्यक्षात खरेदी मात्र सन 2014-15 मध्ये माहे डिसेंबर मध्ये करणेत आलेली आहे (उदा.बीडी भालेकर शाळा). मनपाने रक्कम वर्ग करूनही 10 महिन्यांपेक्षा जास्त कालावधीनंतर प्रत्यक्ष खरेदी करणेत आलेली आहे.

सदरची बाब नियम बाहय आहे.
5. नस्तीमध्ये दर मंजूर केल्याबाबती टिप्पणी उपलब्ध झाली, परंतू मनपाने दर पत्रक मागविल्याबाबतची जाहीरात / आदेश उपलब्ध झालेला नाही. त्याचप्रमाणे मनपाने सायकलींसाठी निकष (specification) कसे ठरविले याबाबतची नोंद नस्तीमध्ये दिसून आलेली नाही.
6. नस्तीमध्ये मंजूर दरपत्रकाची प्रत आढळून आलेली नाही.
7. सदर सायकलींची खरेदी झालेनंतर त्याची नोंद नोंदवहीत घेतली किंवा कसे? याची पडताळणी उपलब्ध अभिलेख्यावरून करता आली नाही. तसेच नस्तीमध्ये मनपाने सायकलींची पोहच घेतल्याचे आढळून आलेले नाही.
8. उपलब्ध करून दिलेल्या नस्तीवरून वितरीत केलेल्या रकमेमधून रु.91350/- अनुदान अद्यापपर्यंत अखर्चित असल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.
9. महाराष्ट्र शासन, दर करार क्रमांक एसपीसी/आरटीसी/सायकल/13-14/327, दि.13.1.2014 उपलब्ध असूनही, तसेच दरकरारामधील नमुद लेडीज सायकलचा दर (रु.3060/-) हा मनपाच्या दरापेक्षा कमी असूनही मनपाने स्थानिक बाजारातून खरेदी आहे.

CCFNKKM8401 (Ref No : 114, Hmm No : 103)

12 माध्यमिक व उच्च माध्यमिक मधील कर्मचा-यांना / शिक्षकांना सेवानिवृत्ती उपदान व इतर लाभअदा करणेबाबतची अनियमितता

NA
लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 1

मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

जिल्हा परिषद यांचेकडून सेवानिवृत्ती संदर्भात सर्व लाभ प्रदान केलेले असतांना, मनपाने कोणत्या नियमाच्या / शासन निर्णयाच्या अनुषंगाने सेवानिवृत्ती संदर्भाचे लाभ पुन्हा प्रदान केलेत याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

लेखापरिक्षण कालावधीमधील सेवानिवृत्त कर्मचारी / शिक्षकांना नाशिक महानगरपालिकेने श्री बोडके प्रभाकर खंडेराव सेवानिवृत्त (कर्मचारी/शिक्षक) यांना प्रमाणक क्रमांक 243/27.1.2014 अन्वये खालीलप्रमाणे अदायगी केलेली आहे. :-

फरक उपदान - रु.61050/-

निवृत्ती वेतन फरक- रु.153328/-

अंशराशीकरण -रु.72763/-

अर्जित रजा रोखीकरण - रु.43070/-

एकुण - रु.330,211/-

सदर प्रकरणी श्री बोडके प्रभाकर खंडेराव सेवानिवृत्त आणि श्री.पवार दिनकर संपत से.नि. (प्र.क्र.244/27.1.2014) यांना जिल्हा परिषद यांचेकडून सेवानिवृत्ती संदर्भात सर्व लाभ प्रदान केलेले असतांना, मनपाने कोणत्या नियमाच्या / शासन निर्णयाच्या अनुषंगाने सेवानिवृत्ती संदर्भाचे लाभ पुन्हा प्रदान केलेत? याबाबत खुलासा, आदेश व अभिलेखे लेखापरिक्षणाकामी मागणी करूनही उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

CCFNKKM8401 (Ref No : 112, Hmm No : 98)

13 शिक्षण मंडळातील अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात येणा-या वैदयकीय भत्याबाबत.

NA
लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 1

मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

जिल्हा परिषद यांचेकडून सेवानिवृत्ती संदर्भात सर्व लाभ प्रदान केलेले असतांना, मनपाने कोणत्या नियमाच्या / शासन निर्णयाच्या अनुषंगाने सेवानिवृत्ती संदर्भाचे लाभ पुन्हा प्रदान केलेत याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

माध्यमिक शिक्षण विभाग नाशिक महानगरपालिका यांचे सन 2013-14मधील निवडक महिन्यांमधील वेतन देयके तपासले असता, त्यामध्ये रुपये 1000/- प्रतिमाह प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांना याप्रमाणे वैदयकीय भत्ता अदा केले असल्याचे दिसून येते.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे. :-

1.सदरचा वैद्यकीय भत्ता कोणत्या शासन निर्णय / नियमाच्या अनुषंगाने देण्यात येतो.

2. सदर प्रकरणासंबंधी केलेल्या ठरावाची प्रत मागणी करूनही लेखापरिक्षास सादर केली नाही.

3. सदर भत्त्यासाठी शासनाकडून अनूदान मागविण्यात येते काय किंवा अनूदान प्राप्त होते काय?

4. सदरचा वैद्यकिय भत्ता कधीपासून देण्यात येतो.

5. सदरचा वैद्यकिय भत्ता घेवूनसुध्दा किती कर्मचा-यांनी वैद्यकिय देयके सादर केलीत / किंवा मंडळाने देयके / अग्रीम अदा केले याबाबत माहिती उपलब्ध करून दिली नाही.

CCFNKKM8401 (Ref No : 113, Hmm No : 100)

14 माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान प्राप्त झालेबाबतची माहिती सादर करणेबाबत

NA
लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 1

मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

प्राप्त अनुदान आणि झालेला खर्च व त्यासंबंधिचे अभिलेखे लेखापरिक्षणाकामी सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतू सदरची माहिती व लेखे उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

नाशिक महानगरपालिका नाशिक चे सन 2013-14 मध्ये नाशिक शिक्षण मंडळातील अनुदानित शाळांना शासन निर्णय शालेय व क्रिडा विभाग, क्रमांक माशअ-2012/(86/12)माशि-1, दिनांक 19.01.2013 अन्वये दि.01.04.2008 रोजी वेतन अनुदानावर असलेल्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सन 2008 च्या 5 वे.आ. नूसार ज्या टप्प्यावर वेतन अनुज्ञेय होते, त्या टप्प्यावरील देय वेतन अनुदानास गोठवून त्याच्या 5 टक्के प्रमाणे वेतनेत्तर अनुदान दि.01.04.2013 पासून उपलब्ध देण्यात येते. त्यानूसार नाशिक महानगरपालिकेतील माध्यमिक शिक्षण विभागाला सन 2013-14 प्राप्त अनुदान आणि झालेला खर्च व त्यासंबंधिचे अभिलेखे लेखापरिक्षणाकामी सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतू सदरची माहिती व लेखे उपलब्ध

करून देण्यात आलेली नाही.

CCFNKKM8401 (Ref No : 116, Hmm No : 97)

15 फाळके स्मारक व महाकवी कालिदास कलामंदिर येथील खर्चाची देयके लेखापरीक्षणास सादर न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 0

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 8382300.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8382300.00/-

नाशिक महानगरपालिकेच्या फाळके स्मारक विभागातील वजावट नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता सन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये रक्कम रुपये 83,82,300/- ची देयके अदा केल्याचे दिसून आलेले आहे. सदर देयके लेखापरीक्षणासाठी मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत तसेच महाकवी कालिदास कलामंदिर येथील सन 2013-14 या आर्थिक वर्षातील खर्चासंबंधीची देयके व त्या संबंधित नस्त्या मागणी करुनही लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदर कालावधीचे खर्चाचे लेखापरीक्षण करता आलेले नाहीत.

अ) नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात फाळके स्मारक विभागाचे लेखापरीक्षण केले असता तेथील उपलब्ध वजावट नोंदवहीवरुन खालीलप्रमाणे देयके अदा केल्याचे दिसून आले आहेत.

अ.क्र.	देयक क्र. व दिनांक	देयकांचा तपशिल	रक्कम रुपये
1	01/12.04.13	नाशिक जिल्हा सुरक्षा बोर्ड - दि.13.12.11 ते 12.12.12	104793
2	02/12.04.13	नाशिक जिल्हा सुरक्षा बोर्ड - दि.13.12.12 ते 14.11.13	145320
3	03/12.04.13	मे.गोल्डन आर्ट - प्रोजेक्टर पुरविणे - दि.25.11.10 ते 10.12.10	46560
4	04/12.04.13	नेल इलेक्ट्रॉनिक्स स्वीपमैंटस कॉर्पोरेशन पुणे - संगीत कारंजेच्या	43837

		सोलोनाईड व्होल्व्हची दुरुस्ती.	
5	06/15.04.13	इम्प्रेस्टड मनी बील	10000
6	08/09.05.13	सुरक्षा कामाचे देयक - दि.01.02.13 ते 12.03.13	108544
7	10/15.06.13	मे.आर.के.प्लेनर्स ॲण्ड गार्डन मेंटेनन्स - साफसफाई व उदयान विषयक कामाचे देयक	1638128
8	11/25.06.13	मे.न्यु.गोल्डन आर्ट - फाळके स्मारक येथे संगीत कारंजासाठी ल्युमन्स प्रोजेक्टर पुरविणे.	40500
9	12/25.06.13	फाळके स्मारक व बुध्दविहारासाठी सुरक्षा व पर्यवेक्षक व सुरक्षा रक्षक पुरविणे.	277112
10	14/18.07.13	मे.विशाखा मजूर बांधकाम सहकारी संस्था नवीन नाशिक विभागातील बुध्द विहारास बाहेरील बाजूस रंगरंगोटी करणे.	599027
11	15/23.07.13	नाशिक जिल्हा सुरक्षा मंडळ - दि.13.06.13 ते 30.06.13	62552
12	17/28.08.13	मे.सुतेज इलेक्ट्रिकल्स - फाळके स्मारक येथे संगीत कारंजासाठी ल्युमन्स प्रोजेक्टर पुरविणे.	313632
13	20/19.09.13	मे.आर.के.प्लेनर्स ॲण्ड गार्डन मेंटेनन्स - साफसफाई व दुरुस्ती देखभाल देयक	1620128
14	21/20.09.13	नाशिक जिल्हा सुरक्षा मंडळ	232993
15	22/09.10.13	नालंदा एज्युकेशन ॲण्ड सोशिएल ट्रस्ट - बुध्द जयंतीनिमित्त बौध्द जयंतीनिमित्त बौध्द महोत्सवाचे आयोजनाचा खर्च.	400000
16	24/15.10.13	मे.न्यु.गोल्डन आर्ट - फाळके स्मारक येथे ल्युमन्स प्रोजेक्टर पुरविणे.	247950
17	26/01.12.13	नाशिक जिल्हा सुरक्षा मंडळ	49570
18	27/01.12.13	नाशिक जिल्हा सुरक्षा मंडळ	236067
19	29/13.12.13	आार.के.प्लेनर्स ॲण्ड गार्डन मेंटेनन्स - साफसफाई व उदयान देखभाल	1545128
20	32/17.02.14	नाशिक जिल्हा सुरक्षा मंडळ - दि.13.09.13 ते 31.12.13	448682
21	33/17.02.14	नाशिक जिल्हा सुरक्षा मंडळ - दि.01.01.14 ते 31.01.14	211777

		एकूण रक्कम रुपये	**8382300**

फाळके स्मारक येथील वरील देयके लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करुनही मूळ नस्ती व प्रमाणके लेखापरीक्षणासाठी सादर केली नाहीत त्यामुळे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक - 150 दिनांक - 27/09/2016 अन्वये विचारणा करण्यात आली असता त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

ब) नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात कालिदास कलामंदिर येथील लेखापरीक्षण केले असता विविध कामांवरील झालेल्या खर्चांसंबंधी देयक नोंदवही, देयके, प्रमाणके, खर्चासंबंधी मुळ नस्ती, वजावट नोंदवही व साठा नोंदवही इत्यादी दस्ताऐवजे व नोंदवहया वारंवार मागणी करुनही लेखापरीक्षण पथकास उपलब्ध न झाल्याने या कालावधीतील झालेल्या खर्चाबाबत कोणतीही खात्री लेखापरीक्षण पथकास करता आली नाही. त्यामुळे सन 2013-14 या कालावधीतील खर्चाचे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक - 149 दिनांक - 27/09/2016 अन्वये विचारणा करण्यात आली असता त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

FDSRKNM8201 (Ref No : 118, Hmm No : 150)

कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता,

निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक

निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

16 नाशिक महानगरपालीका हददीतील केरकचरा कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे विलंबाने काढणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 1

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 52970000.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 52970000.00/-

नाशिक महानगरपालीकेच्या हददीतील घरोघरचा व रस्त्याच्याकडेचा केरकचरा मनपा मालकीचे घंटागाडी वाहनाव्दारे वे ठेकेदारकडील आवश्यकतेनुसार नेमण्यात येणारी खाजगी वाहनाव्दारे सन 2012-13 मध्ये कामाचा ओदश दिल्यापासून पूढील दोन वर्षाकरीता संकलीत करुन मनपा प्रकल्पावर वाहतूक करणे करिताच्या कामाच्या अटी व शर्तीचा भंग झाल्याचे दिसून येत येते.

नाशिक महानगरपालीकेच्या हददीतील घरोघरचा व रस्त्याच्याकडेचा केरकचरा मनपा मालकीचे घंटागाडी वाहनाव्दारे वे ठेकेदारकडील आवश्यकतेनुसार नेमण्यात येणारी खाजगी वाहनाव्दारे सन 2012-13 मध्ये कामाचा ओदश दिल्यापासून पूढील दोन वर्षाकरीता संकलीत करुन मनपा प्रकल्पावर वाहतूक करणे करिताच्या कामाच्या अटी व शर्तीचा भंग झाल्याचे दिसून येत येते.

1	प्रशासकीय मंजूरी	महासभा ठराव क्र. 334 दि.14.12.2012 रु.11,00,00,000/-
2	वित्तीय मंजूरी	स्थायी समीती ठराव क्र.162 दि.10.06.2013 अन्वये 2013-14 व 2014-15 खर्चास मंजूरी देण्यात आली.
3	कामाचा कालावधी	दि.8.7.2013 ते 7.7.2015

ठेकेदार, विभाग, कामाचे आदेश क्रमांक व शासकीय विमानिधीकडे रकमेचा भरणा केल्याचा दि. खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	विभाग	ठेकेदाराचे नांव	कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	विमा काढल्याचा दिनांक
1	नाशिक पूर्व	सय्यद आसिफ अली, नाशिक	1173,दि. 4.7.2013	9.12.2015
2	पंचवटी	समिक्षा कन्स्ट्रक्शन्स, ठाणे	1172, दि. 4.7.2013	26.11.2015
3	नाशिक रोड	विशाल सर्विसेस नाशिक	1174,दि4.7.2013	11.11.2015
4	नाशिक (प)	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	1174,दि.4.7.2013	16.11.2015
5	सिडको	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	1176,दि.4.7.2013	24.11.2015
6	सातपूर	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	1177,दि 4.7.2013	16.11.2015

सदरील कामाच्या सर्वसाधारण अटी / शर्ती क्रमांक 13 नुसार कामाच्या आदेशानंतर 1 महिन्याच्या आत शासकिय विमा निधीकडे कामाचा विमा काढणे आवश्यक असून त्यांनंतर प्रति दिवस 10,000/- विलंब शुल्क आकारणी करण्यात येईल असे निवीदेच्या अटी / शर्ती करारनाम्यात नमूद आहे, तथापी ठेकेदाराने उपरोक्त विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे प्रदिर्घ कालावधीनंतर विमा काढलेला असून विलंबाच्या कालावधीत शुल्क आकारणी खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	विभाग	कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	विमा काढल्याचा दिनांक	विलंब कालावधी (दिवस	विलंब शुल्क रक्कम रुपये (प्रतीदिन रु.10000 प्रमाणे
1	नाशिक पूर्व	1173,दि.4.7.2013	9.12.2015	892	8920000
2	पंचवटी	1172,दि.4.7.2013	26.11.2015	889	8890000
3	नाशिक रोड	1175,दि4.7.2013	11.11.2015	874	8740000
4	नाशिक	1174,दि.4.7.2013	16.11.2015	878	8780000

	(प)				
5	सिडको	1176,दि.4.7.2013	24.11.2015	886	8860000
6	सातपूर	1177,दि 4.7.2013	16.11.2015	878	8878000
एकुण ंविलंब शुल्क सन 2013-14 व 2014-15					52970000

तरी ठेकेदाराकडून कामाच्या व करारनाम्याच्या अटी / शर्तीनुसार रु 5,29,70,000/- विलंब शुल्काची आकारणी करुन वसुली करण्यात आलेली नाही.

DATPDMM6101 (Ref No : 110, Hmm No : 139)

17 बांधकाम विभागाकडील सातपूर विभागांतर्गत सन 2013-14 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 16

लेखा शीर्ष : रस्ते बांधणे म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 76640556.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 74877679.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1762877.00/-

शासकीय विमा निधीकडील विमापत्र प्राप्त केले नाही व त्यासाठी ची 1 टक्के रक्कम कपात केली नाही. रॉयल्टी कपात केली नाही. रॉयल्टी रक्कमेवर निविदा जादा दराने प्रदान केले.500 घ.मी. पेक्षा जादा खोदकामा साठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना मानवी श्रमाने खोदकामाचे जादा दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. डांबर दर फरकाची रक्कम चुकीची परीगणित केल्याने मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. जकात बंद झाल्याने त्याची वसुली करतांना कमी आकारणी केली. आर.सी.सी. पाईप महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करणेसाठी राखुन ठेवलेला असल्याने मक्तेदाराने सदरचे पाईप महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक असतांना त्यांनी महामंडळाकडून पाईप खरेदी केल्याचे दिसून येत नाही. अंदाजपत्रकात चुकीचे स्पेसिफिकेशन नमूद केले. अंदाजपत्रकात केलेल्या दुरुस्त्या / उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असलेल्या कामांसाठी निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात सातपूर बांधकाम विभागाकडील खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामांवर रक्कम रु. 76640556/-इतका खर्च केला आहे.

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रु.	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम (रू.)
1	सातपूर प्र.क्र.18 अशोकनगर पोलीस चौकी ते मौले हॉल दरम्यान चा रस्ता रिसरफेसिंग करणे. रु.6294369/-	22/40/2013 दि.25/09/2013	मे.आकार कंन्स. 10.50% जादा दराने (चालू दरसूची नुसार 2.63% जादा)	1779	7534760
2	सातपूर विभाग नवीन प्रभाग क्र.17 (जुना वार्ड क्र.51)मधील शिवाजीनगर परिसरातील विविध रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे. रु20974600/-	01/42/2013 दि.03/04/2013	मे.आनंद कंन्सटूवेल 24.90 टक्के जादा दराने(चालू दरसूची नुसार 1.51% कमी)	2484	32481574
3	सातपूर नवीन प्र.क्र.18 व 19(जुना वार्ड क्र.53) मधील सावरकर नगर व अशोकनगर पाण्याची टाकी परिसरातील रस्त्याचे अस्तरीकारण करणे. रु.7873285/-	12/29/2013 दि.20/03/2013	मे.अशोक श्रवण सोनजे 8.90 टक्के जादा दराने (चालू दरसूची नुसार 2.78% जादा)	2844	10353845
4	सातपूर विभागातील नवीन प्र.क्र.21 (जुना वार्ड क्र.25)पाईप लाईन रोड ते व्हीसडम हायस्कूल 15.00मी. डी.[पी. रोड रुंदीकरण करून डांबरीकरण करणे. रु.10900390/-	06/21/2012 दि.22/11/2012	मे.अशोक श्रवण सोनजे 11.40 टक्के जादा दराने(चालू दरसूची नुसार 2.74% जादा)	2517	14425485
5	सातपूर नवीन प्र.क्र.16 (जुना वार्ड क्र.25) गंगापूर शिवारातील एच.ए.एल.कॉलनी परिसरातील	07/32/2013 दि.20/04/2013	मे.एम.जी.नायर 16.20 टक्के जादा दराने (चालू दरसूची	1551	5804937

	रस्ते डांबरीकरण करणे. रु. 4149846/-		नुसार 2.61% जादा)		
6	सातपूर विभागातील वार्ड क्र.49 मधील गुरुकुल कॉलनी समोरील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. रु.2122896/-	61/199/2012 दि.02/01/2012	मे.एम.टी.पाटील बिल्डर अॅड कॉन्ट्र. 12.30 टक्के जादा दराने(चालू दरसूची नुसार 2.70% जादा)	2731	2637031
7	सातपूर प्र.क्र.17(जुना वार्ड क्र.50) शिवाजीनगर येथील रस्ते रिसरफेसिंग करणे. रु.2396385/-	05/52/2013 दि.02/01/2012	मे.आनंद कंन्सटूवेल 9.50 टक्के जादा दराने(चालू दरसूची नुसार 2.82% जादा)	2855	3402924
				एकूण	76640556

उपरोक्त 1 ते 7 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.76640556/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत

1) नगरविकास विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक जी.ई.एन.1098/ 1357/प्र.क्र.166/ 98/ नवि-24 दिनांक 3.11.2003 कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा 1 टक्का रक्कम कपात करून विमानिधी कडे भरणा करणे आवश्यक आहे. तथापि तसे विमापत्र उपरोक्त अनुक्रमांक 3 वरील कामाचे नस्तीसोबत जोडलेले नाही. तसेच देयकातूनही त्यासाठीची 1 टक्का रक्कम कपात केलेली नाही. त्यामुळे कार्यादेश रक्कमेच्या 1 टक्का रक्कम रुपये 85740/- वसूल करुन विमा संचालनालयाकडे भरणा होणे आवश्यक आहे.

2) महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्या साठी रॉयल्टी ची रक्कम परीगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

अ.क्र.	कामाचे नांव	कामातील बाब	एकूण रॉयल्टी चे परिमाण	रॉयल्टी चा दर	रॉयल्टी ची वसूल करावयाची	निविदा दर %	रॉयल्टी वर निविदा

		क्रमांक	घन मी.		रक्कम रु.		दराने प्रदान रक्कमरु.
1	सातपूर प्र.क्र.18 अशोकनगर पोलीस चौकी ते मौले हॉल दरम्यान चा रस्ता रिसरफेसिंग करणे.	1 व 7	206.61	70.67	14601	(+) 7.70	1124
2	सातपूर विभाग नवीन प्रभाग क्र.17 (जुना वार्ड क्र.51)मधील शिवाजीनगर परिसरातील विविध रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे.	4,7,10,व 11	9376.16	70.67	662613	(+) 24.90	164991
3	सातपूर नवीन प्र.क्र.18 व 19(जुना वार्ड क्र.53) मधील सावरकर नगर व अशोकनगर पाण्याची टाकी परिसरातील रस्त्याचे अस्तरीकारण करणे.	5,9,12 व 14	603.38	70.67	42641	(+) 8.90	3795
4	सातपूर विभागातील नवीन प्र.क्र.21 (जुना वार्ड क्र.25)पाईप लाईन रोड ते व्हीसडम हायस्कूल 15.00मी. डी.[पी. रोड रुंदीकरण करून डांबरीकरण करणे.	4,7,10, 12,14, व 15	3995.14	70.67	282337	(+) 11.40	32186
5	सातपूर नवीन प्र.क्र.16 (जुना वार्ड क्र.25) गंगापूर शिवारातील एच.ए.एल.कॉलनी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे.	3,7, व 8	1030.98	70.67	72859	(+) 16.20	11803
6	सातपूर विभागातील वार्ड	4,7,10 व	843.70	70.67	59624	(+)	7334

	क्र.49 मधील गुरुकुल कॉलनी समोरील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे.	22				12.30	
	एकूण				1134675		221233

उपरोक्त 1 ते 6 वर नमूद कामाचे मक्तेदारांनी रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने सादर कलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. . सबब रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने 1 ते 6 कामासाठीची रॉयल्टी ची रक्कम रुपये 1134675/- वसूल करून "0853 गौण खनिज" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

3) सदर कामांसाठीचे अंदाजपत्रकांची पडताळणी केली असता अंदाजपत्रकासाठी चे बाबनिहाय दर निश्चित करतांना रॉयल्टी ची रक्कम समाविष्ट करून निश्चित केले आहेत. उपरोक्त कामांसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आलेल्या असून कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टी च्या रक्कमेसह एकूण रक्कमेवर निविदा जादादराची आकारणी केली आहे. त्यामुळे रॉयल्टी च्या रक्कमेवरही निविदा जादादराने प्रदान झालेले आहे. रॉयल्टी ची रक्कम शासनाने निश्चित केलेल्या ठराविक दरानेच भरणा करावयाची असल्याने तसेच मक्तेदाराने कामासाठी रॉयल्टी रक्कमेचा भरणा केल्याची खात्री करून तितकीच रक्कम मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक असल्याने त्यावर निविदा जादा दराने आकारणी करणे संयुक्तिक नाही. सबब मक्तेदारांना वर नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रु. 221233/- चे अनावश्यक जादा प्रदान झाले आहे.

4) बांधकाम विभाग नाशिक दरसूची मधील (General note) सर्वसाधारण सुचना मध्ये नमूद केल्यानुसार 500 घ.मी.पेक्षा जास्त खोदकामासाठी यांत्रिकी दराने आकारणी व प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि खालील तक्त्यात नमूद केल्या नुसार सदर कामातील खोदकामाचे परिमाण 500 घ.मी. पेक्षा जास्त असल्याने त्यासाठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना चुकीच्या व वाढीव मानवीश्रमाने खोदकामा चे दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास जादा प्रदान झालेले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	खोद-कामाचे एकूण परिमाण घ.मी.	प्रदान केल्याचा मानवी दर रु.प्र.घ.मी.	देय यांत्रिकी दर रु.प्र.घ.मी..	जादा प्रदान दर रु.	जादा प्रदान रक्कम रु	निविदा जादा/कमी दराने जादा/कमी प्रदान रक्कम रु	एकूण जादा प्रदान रक्कम रु..
2	सातपूर विभाग नवीन प्रभाग क्र.17(जुना वार्ड क्र.51)मधील शीवाजीनगर	6238.126	49.40	24.20	25.20	157201	(+) 24.90% 39143	196344

	परिसरातील विविध रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे.							
4	सातपूर विभागातील नवीन प्र.क्र.21 (जुना वार्ड क्र.25)पाईप लाईन रोड ते व्हीसडम हायस्कूल 15.00मी. डी.[पी. रोड रुंदीकरण करून डांबरीकरण करणे.	2467.01	54.90	26.90	28.00	69076	(+) 11.40% 7875	76951
6	सातपूर विभागातील वार्ड क्र.49 मधील गुरुकुल कॉलनी समोरील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे.	795.57	49.40	24.20	25.20	20048	(+) 12.30% 2466	22514
	एकूण							295809

उपरोक्त प्रमाणे अनुक्रमांक 2,4 व 6 वरील कामांसाठी रक्कम रु.295809/- चे चुकीचे व जादा प्रदान झालेले आहे.

5) उपरोक्त वर नमूद अनुक्रमांक 2 व अनुक्रमांक 7 चे कामासाठीचे अंदाजपत्रकातील डांबरी कामाचे दर निश्चित करतांना त्यात डांबर मुळदर व रु.780 प्र.मे टन वाहतूक खर्च यांवर 4 टक्के दराने जकात कर समाविष्ट केला होता. दिनांक 23/05/2013 रोजी पासून जकात कर रदद झाल्याने त्यानंतर च्या कालावधी मध्ये केलेल्या डांबर कामासाठीचे प्रदान करतांना वापरलेल्या एकूण डांबरा साठी 4 टक्के दराने जकात रक्कम कपात करून घेण्यात आलेली आहे. तथापि तशी कपात करतांना डांबराच्या मूळ खरेदीदरात रु.780प्र.मे.टन दराने वाहतूक खर्च समाविष्ट न करताच जकातीची आकारणी केल्याचे दिसून यते सबब अनुक्रमांक 2 वरील कामासाठी 302.38मे.टन डांबरा साठी रु. 780 प्र.मे.टन प्रमाणे रक्कम रु. 235856/- वर 4 टक्के दराने रक्कम रु. 9434/- व अनुक्रमांक 7 वरील कामासाठी 38.51मे.टन डांबरा साठी रु. 780 प्र.मे.टन प्रमाणे रक्कम रु. 30038/- वर 4 टक्के दराने रक्कम रु. 1202/- असे एकूण रक्कम रु. 10636/- ची कमी कपात झालेली आहे.

6) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1,3 व 5 वरील कामासाठी डांबरसाहित्या साठी तारांकीत दर फरकाची रक्कम रुपये 3693102/- चे प्रदान केलेले आहे. सदर कामांच्या निविदेत तारांकित दर फरक प्रदाना बाबतच्या नमूद अटी व शर्ती नुसार मक्तेदाराने डांबर साहित्याचे वापरलेले परिमाण व खरेदी चे दर यांची खात्री करणे साठी , खरेदी बाबत पुरेसा पुरावा म्हणून खरेदीचे मूळ देयक ,चलन अथवा जकातीची पावती सादर करणे आवश्यक आहे. तथापि असा कोणताही पुरावा

प्राप्त केल्याचे दिसून येत नाही. सबब निविदा अटी चे पालन झालेले नाही.

अ.क्र.	कामाचे नांव	तारांकित दर फरकाची प्रदान रक्कम रु..
1	सातपूर प्र.क्र.18 अशोकनगर पोलीस चौकी ते मौले हॉल दरम्यान चा रस्ता रिसरफेसिंग करणे.	921922
3	सातपूर नवीन प्र.क्र.18 व 19(जुना वार्ड क्र.53) मधील सावरकर नगर व अशोकनगर पाण्याची टाकी परिसरातील रस्त्याचे अस्तरीकारण करणे.	1787074
5	सातपूर नवीन प्र.क्र.16 (जुना वार्ड क्र.25) गंगापूर शिवारातील एच.ए.एल.कॉलनी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे.	984106
	एकूण	3693102

7) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 7 वरील कामाचे चाचणी अहवाल दिनांक 20/11/2013मध्ये BM 2.5%, LBM 3.5% व AC 6.25% या बाबीचे नमुने दिनांक 29/10/2013 ते 31/10/2013 दरम्यान घेण्यात आल्याचे दिसून येते तथापि डांबर फरक 20.51मे.टन. साठी दिनांक 16/11/2013च्या रु 54718.65 प्र.मे.टन दराने परीगणित केला आहे. तो रु. 720.84 प्र. मे.टन जादा आहे. सबब मक्तेदारास 20.51 मे.टन साठी रक्कम रु. 14784/- तारांकित दर फरकाची जादा रक्कम प्रदान झालेली आहे.

8) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1 च्या कामाचे अंदाजपत्रकातील BM 2.5% व LBM 3.5% या डांबरी कामाचे स्पेसिफिकेशन मध्ये (including emulsion tack coat) असा तपशील नमूद केला प्रत्यक्षात त्यासाठी नमूद दर हे

(tack coat) वगळून आहेत व त्यानुसार tack coat साठी स्वतंत्र मापे नोंदवून प्रदान केले आहे. अंदाजपत्रकात चुकीचे स्पेसिफिकेशन नमूद केल्याने मक्तेदाराने उचित निविदा दर सादर केल्याची खात्री होत नाही.

9) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1, 2,3 व 4 वरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

10) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 6 वरील काम सिनाक 26/05/2012 रोजी पूर्ण झालेले असतांना त्याचे प्रदान दिनांक 03/02/2014 रोजी 1 वर्षा नंतर करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 168 नुसार मुदत बाह्य मागण्यासाठी आवश्यक मंजुरी घेण्यात आलेली नाही.

11) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळा कडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळा कडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळा मार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. उपरोक्त नमूद अनुक्रमांक 4 वरील कामासाठी वापरण्यात आलेले NP3 आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक असतांना त्यांनी महामंडळाकडून पाईप खरेदी केल्याचे दिसून येत नाही, सबब शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

12) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 6 चे कामाचे अंदाजपत्रकात केलेल्या दुरुस्त्या / उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत.

13) डांबर 80/100, 60/70 व 30/40 ग्रेड नुसार दर स्वतंत्र आहेत. उपरोक्त वरील नमूद कामातील डांबर कामासाठी 60/70 ग्रेड डांबराचे दराने अंदाजपत्रक तयार केलेले आहे. व त्या नुसार मक्तेदारास प्रदान केलेले आहे तथापि डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे वापरलेल्या डांबराची ग्रेड(60/70) असल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

14) मोजमाप पुस्तिकेत कामाच्या एकत्रित गोषवारा मध्ये कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी केल्याचे शेरे नोंदविले आहेत तथापि त्यांनी नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही.

15) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. उपरोक्त नमूद अनुक्रमांक 2व 4 वरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

16) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट 24 अनुक्रमांक 15 नुसार बिल संमत झाल्या बरोबर मोजमाप विषयक नोंदवहीतील नोंदी दुसऱ्या लाल शाईतील कर्णरेषेने खोडून टाकण्यात याव्यात व त्या प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाईने करण्यात यावे तथापि तसा तपशील नोद्विण्यात आलेला नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	1762877
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	74877679
एकूण	:-	रु.	76640556

18 बांधकाम पंचवटी विभागांतर्गत सन 2013-14 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 15

लेखा शीर्ष : रस्ते बांधणे म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 67267417.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 66568549.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 698868.00/-

शासकीय विमा निधीकडील विमापत्र प्राप्त केले नाही व त्यासाठी ची 1 टक्के रक्कम कपात केली नाही. रॉयल्टी कपात केली नाही. रॉयल्टी रक्कमेवर निविदा जादा दराने प्रदान केले.500 घ.मी. पेक्षा जादा खोदकामा साठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना मानवी श्रमाने खोदकामाचे जादा दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. कामासाठी मुदतवाढ मंजूर केलेली नसतांना डांबर दर फरकाची रक्कम प्रदान केली आहे. अंदाजपत्रकात केलेल्या दुरुस्त्या/ उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असलेल्या कामांसाठी निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही. बांधकाम साहित्याचे चाचणी अहवाल नस्ती सोबत जोडण्यात आलेले नाहीत. मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध केलेल्या नाहीत.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील नवीन नाशिक विभागांतर्गत खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामांवर रक्कम रु.9,29,44,746/- इतका खर्च केला आहे.

तक्ता क्र. 1

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रु.	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम (रू.)
1	नवीन नाशिक प्र.क्र. 52 मधील समर्थनगर व ज्ञानेश्वर नगर मधील 18 मी. रुंदीच्या डी.पी.रोडचे डांबरीकरण करणे. रुपये 1,78,79,602/-	38/55/2013 दि. 23/09/2013	पवार पाटकर कन्स्ट्रक्शन 7.00 टक्के जादा दराने रु. 18772751/- चालू दरसूची 2011-12 नुसार 2.79 टक्के जादा	क्र. 2972 (पृष्ठ क्र. 1 ते 35)	रुपये 2,05,67,307/- (तारांकित दर फरकासह)
2	नवीन नाशिक वॉर्ड.क्र. 103 मधील विजयनगर ते राणाप्रताप चौक पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरणासह रुंदीकरण व डांबरीकरण करुन विकसीत करणे. रुपये 1,43,06,974/-	106/121/2011 दि. 13/12/2011	मे.बी.एस.चोपडा 11.75 टक्के जादा दराने रु. 16152573/- चालू दरसूची 2010-11 नुसार 2.86 टक्के जादा	क्र. 26 (पृष्ठ क्र. 100 ते 137)	रुपये 1,89,62,977/- (तारांकित दर फरकासह)
3	नवीन नाशिक वॉर्ड.क्र. 85 मधील पावसाळी गटार योजनेंतर्गत तोडण्यात आलेल्या डांबरी रस्त्याची दुरुस्ती करणे. रुपये 84,85,041/-	128/161/2011 दि. 31/12/2011	सुप्रभा कन्स्ट्रक्शन 2.98 टक्के जादा दराने रु. 87,37,895/-	क्र. 1021 (पृष्ठ क्र. 99 ते 125)	रुपये 1,00,43,761/- (तारांकित दर फरकासह)

4	नवीन नाशिक विभागातील अंबड MIDC क्षेत्रातील मुख्य मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यावरील खड्डे बुजवणे व रस्ते दुरुस्ती करणे. रुपये 86,00,000/-	37/46/2013 दि. 23/09/2013	पवार पाटकर कन्स्ट्रक्शन 5.00 टक्के जादा दराने रु. 90,30,000/- चालू दरसूची 2012-13 नुसार 3.86 टक्के जादा	क्र. 2838 (पृष्ठ क्र. 112 ते 185)	रुपये 1,01,63,640/- (तारांकित दर फरकासह)
5	नवीन नाशिक वि.प्र.क्र. 42 मधील स्टेट बँक चौक ते लेखानगर पावेतोचा रस्ता अस्तरीकरण करणे. रुपये 88,65,496/-	51/50/2013 दि. 19/10/2013	मे. बी.एस.चोप्रा 6.60 टक्के जादा दराने रु. 92,35,977/- चालू दरसूची 2012-13 नुसार 2.69 टक्के जादा	क्र. 2822 (पृष्ठ क्र. 30 ते 46)	रुपये 1,04,54,678/- (तारांकित दर फरकासह)
6	नवीन नाशिक वि.प्र.क्र. 51 अंबड MIDC क्षेत्रातील मेल्ट्रॉन मधील स्टेट बँक चौक ते लेखानगर पावेतोचा रस्ता अस्तरीकरण करणे. रुपये 1,06,40,660/-	40/51/2013 दि. 25/09/2013	मे. गजानन कन्स्ट्रक्शन 7.25 टक्के जादा दराने रु. 1,11,55,142/- चालू दरसूची 2012-13 नुसार 2.49 टक्के जादा	क्र. 2822 (पृष्ठ क्र. 30 ते 46)	रुपये 1,27,13,343/- (तारांकित दर फरकासह)
7	नवीन नाशिक वि.प्र.क्र. 44 मधील पाथर्डी फाटा ते नम्रता पेट्रोल पंप पर्यंतचा रस्ता रिसरफेसिंग करणे. रुपये 47,99,930/-	34/49/2013 दि. 23/09/2013	मे. एम.टी.पाटील 8.30 टक्के जादा दराने रु. 50,78,294/- चालू दरसूची 2012-13 नुसार 2.56 टक्के जादा	क्र. 2968 (पृष्ठ क्र. 53 ते 61)	रुपये 58,14,038/- (तारांकित दर फरकासह)
8	नवीन नाशिक वि.प्र.क्र. 52 पाथर्डी शीवारा मधील गौळाणे फाटा ते पाथर्डी गांव डांबरी रस्त्याची दुरुस्ती करणे.	1/33/2013 दि. 05/04/2013	आकार कन्स्ट्रक्शन 10.25 टक्के जादा दराने रु. 34,53,420/- चालू दरसूची 2011-12	क्र. 2816 (पृष्ठ क्र. 47 ते 70)	रुपये 42,25,002/- (तारांकित दर फरकासह)

	रुपये 31,32,354/-		नुसार 2.76 टक्के जादा		

उपरोक्त 1 ते 8 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.9,29,44,746/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत

1) महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्या साठी रॉयल्टी ची रक्कम परीगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

अ. क्र.	कामाचे नांव	कामातील बाब क्रमांक	एकूण रॉयल्टी चे परिमाण घन मी.	रॉयल्टी चा दर	रॉयल्टी ची वसूल करावयाची रक्कम रु.	निविदा दर %	रॉयल्टी वर निविदा दराने प्रदान रक्कमरु.
1	नवीन नाशिक प्र.क्र. 52 मधील समर्थनगर व ज्ञानेश्वर नगर मधील 18 मी. रुंदीच्या डी.पी.रोडचे डांबरीकरण करणे. रुपये 1,78,79,602/-	5,9,12 , 13 व 19,20	8413.57	70.67	5,94,587/-	+7%	41,621/-
2	नवीन नाशिक वॉर्ड.क्र. 103 मधील विजयनगर ते राणाप्रताप चौक पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरणासह रुंदीकरण व डांबरीकरण करुन विकसीत करणे. रुपये 1,43,06,974/-	3,6,9, 10 व 17	2441.93	70.67	1,72,571/-	+11.75%	20,277/-
3	नवीन नाशिक वॉर्ड.क्र. 85 मधील पावसाळी गटार योजनेंतर्गत तोडण्यात आलेल्या डांबरी रस्त्याची	6,9,10, 16 व 17	2857.49	70.67	2,01,939/-	+2.98%	6,018/-

	दुरुस्ती करणे. रुपये 84,85,041/-						
4	नवीन नाशिक विभागातील अंबड MIDC क्षेत्रातील मुख्य मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यावरील खड्डे बुजवणे व रस्ते दुरुस्ती करणे. रुपये 86,00,000/-	2	1140.12	70.67	80,572/-	+5%	4,029/-
5	नवीन नाशिक वि.प्र.क्र. 42 मधील स्टेट बँक चौक ते लेखानगर पावेतोचा रस्ता अस्तरीकरण करणे. रुपये 88,65,496/-	5	558.32	70.67	46,523/-	+6.60%	3,071/-
6	नवीन नाशिक वि.प्र.क्र. 51 अंबड MIDC क्षेत्रातील मेल्ट्रॉन मधील स्टेट बँक चौक ते लेखानगर पावेतोचा रस्ता अस्तरीकरण करणे. रुपये 1,06,40,660/-	6,11	585.31	70.67	41,363/-	+7.25%	2,999/-
7	नवीन नाशिक वि.प्र.क्र. 44 मधील पाथर्डी फाटा ते नम्रता पेट्रोल पंप पर्यंतचा रस्ता रिसरफेसिंग करणे. रुपये 47,99,930/-	4	50.83	70.67	3,592/-	+8.30%	298/-
8	नवीन नाशिक वि.प्र.क्र. 52 पाथर्डी शीवारा मधील गौळाणे फाटा ते पाथर्डी गांव डांबरी रस्त्याची दुरुस्ती करणे.	3,14	339.87	70.67	24,018/-	+10.25%	2,462/-

	रुपये 31,32,354/-						
	एकूण				1165165/-		80775/-

उपरोक्त 1 ते 8 वर नमूद कामाचे मक्तेदारांनी रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने सादर कलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. सबब रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने 1 ते 8 कामासाठीची रॉयल्टी ची रक्कम रुपये 1165165/- वसूल करून "0853 गौण खनिज" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

2) सदर कामांसाठीचे अंदाजपत्रकांची पडताळणी केली असता अंदाजपत्रकासाठी चे बाबनिहाय दर निश्चित करतांना रॉयल्टी ची रक्कम समाविष्ट करून निश्चित केले आहेत. उपरोक्त कामांसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आलेल्या असून कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टी च्या रक्कमेसह एकूण रक्कमेवर निविदा जादादराची आकारणी केली आहे. त्यामुळे रॉयल्टी च्या रक्कमेवरही निविदा जादा दराने प्रदान झालेले आहे. रॉयल्टी ची रक्कम शासनाने निश्चित केलेल्या ठराविक दरानेच भरणा करावयाची असल्याने तसेच मक्तेदाराने कामासाठी रॉयल्टी रक्कमेचा भरणा केल्याची खात्री करून तितकीच रक्कम मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक असल्याने त्यावर निविदा जादा दराने आकारणी करणे संयुक्तिक नाही. सबब मक्तेदारांना वर नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रु. 80,775/- चे अनावश्यक जादा प्रदान झाले आहे.

3) बांधकाम विभाग नाशिक दरसूची मधील (General note) सर्वसाधारण सुचना मध्ये नमूद केल्यानुसार 500 घ.मी.पेक्षा जास्त खोदकामासाठी यांत्रिकी दराने आकारणी व प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि खालील तक्त्यात नमूद केल्या नुसार सदर कामातील खोदकामाचे परिमाण 500 घ.मी. पेक्षा जास्त असल्याने त्यासाठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना चुकीच्या व वाढीव मानवीश्रमाने खोदकामा चे दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास जादा प्रदान झालेले आहे.

अ. क्र.	कामाचे नांव	खोदकामाचे एकूण परिमाण घ.मी.	प्रदान केल्याचा मानवी दर रु.प्र.घ.मी.	देय यांत्रिकी दर रु.प्र.घ.मी..	जादा प्रदान दर रु.	जादा प्रदान रक्कम रु	निविदा जादा/कमी दराने जादा/कमी प्रदान रक्कम रु	एकूण जादा प्रदान रक्कम रु..
1	नवीन नाशिक प्र.क्र. 52 मधील समर्थनगर व ज्ञानेश्वर नगर मधील 18 मी. रुंदीच्या	1745.79	64.30	30	34.30	59,881/-	+7% 4,192/-	64073/-

	डी.पी.रोडचे डांबरीकरण करणे. रुपये 1,78,79,602/-							
2	नवीन नाशिक वॉर्ड.क्र. 103 मधील विजयनगर ते राणाप्रताप चौक पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरणासह रुंदीकरण व डांबरीकरण करुन विकसीत करणे. रुपये 1,43,06,974/-	2593.42	49.40	24.20	25.20	65,354/-	+11.75% 7,679/-	73033/-
3	नवीन नाशिक वॉर्ड.क्र. 85 मधील पावसाळी गटार योजनेंतर्गत तोडण्यात आलेल्या डांबरी रस्त्याची दुरुस्ती करणे. रुपये 84,85,041/-	1006.66	54.90	26.90	28	28,186/-	+2.98% 840/-	29026/-
	एकूण					153421/-	12711/-	166132

उपरोक्त प्रमाणे अनुक्रमांक 1 व 3 वरील कामांसाठी रक्कम रु.1,66,132/- चे चुकीचे व जादा प्रदान झालेले आहे.

4) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 1, 2 व 6 मध्ये नमुद कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

5)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1 ते 6 वरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

6) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 1 ते 3 मध्ये नमुद केलेल्या कामासाठी डांबर तारांकीत दर फरक अनुक्रमे रक्कम रुपये 17,96,805/-, रुपये 29,74,982/- व रुपये 13,07,772/- असे एकूण रक्कम रूपये 60,79,559/- चे प्रदान करण्यात आले आहेत. निविदा तारांकित दर फरक प्रदाना बाबतच्या अटी व शर्ती नुसार मक्तेदाराने डांबर खरेदी बाबत पुरेसा पुरावा म्हणून खरेदीचे मूळ देयक,चलन अथवा जकातीची पावती सादर करणे आवश्यक आहे. तथापि असा कोणताही पुरावा प्राप्त केल्याचे दिसून येत नाही. सबब निविदा अटीचे पालन झालेले नाही.

7) नगर विकास विभाग,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. जी.ई.एन.1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दिनाक 3/11/2003 कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 2 व 3 मध्ये नमुद केलेल्या कामासाठीचे विमापत्र नस्तीसोबत जोडलेले नाही तसेच देयकातूनही त्यासाठीची 1% रक्कम अनुक्रमे रु. 161526/- व रू.87379/- असे एकूण रक्कम रू.248905/- कपात केलेली नाही.

8) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 2 व 3 मध्ये नमुद केलेल्या कामासाठी वापरण्यात आलेल्या बांधकाम साहित्याचे चाचणी अहवाल नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही. .

9) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 2 व 3 मध्ये नमुद केलेल्या कामाची मुदत दि. 13/03/2013 रोजी संपुष्टात आलेली आहे. पुढील मुदतवाढ मंजूर केल्याचे दिसून येत नाही, काम अपूर्ण असल्याने उचित दंडनीय कार्यवाहीसह काम पूर्ण होणे आवश्यक असतांना, अ.क्र. 1 करीता दि. 1/5/2013 ते 15/5/2013 या कालावधीत डांबर तारांकीत दर फरक रक्कम रुपये 4,13,090/- चे प्रदान करण्यात आले तसेच अ.क्र. 3 करीता दि. 16/10/2012 ते 30/10/2012 या कालावधीत डांबर तारांकीत दर फरक रक्कम रुपये 16,669/- तसेच दि. 16/12/2012 ते 15/02/2013 या कालावधीत डांबर तारांकीत दर फरक रक्कम रुपये 10,82,684/- चे प्रदान करण्यात आले आहे सदरहु बाब अनियमित आहे.

10) डांबर 80/100, 60/70 व 30/40 ग्रेड नुसार दर स्वतंत्र आहेत. उपरोक्त वरील नमूद कामातील डांबर कामासाठी 60/70 ग्रेड डांबराचे दराने अंदाजपत्रक तयार केलेले आहे. व त्या नुसार मक्तेदारास प्रदान केलेले आहे तथापि डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे वापरलेल्या डांबराची ग्रेड (60/70) असल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

11) मोजमाप पुस्तिकेत कामाच्या एकत्रित गोषवारा मध्ये कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी केल्याचे शेरे नोंदविले आहेत तथापि त्यांनी नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही.

12) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट 24 अनुक्रमांक 15 नुसार बिल संमत झाल्या बरोबर मोजमापविषयक नोंदवहीतील नोंदी दुसऱ्यालाल शाईतील कर्णरेषेने खोडून टाकण्यात याव्यात व त्या प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाईने करण्यात यावे तथापि तसा तपशील नोद्विण्यात आलेला नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	1660977
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	91283769
एकूण	:-	रु.	92944746

IRRYLWM7701 (Ref No : 8, Hmm No : 41)

25 बांधकाम विभागाकडील नाशिकरोड विभागांतर्गत विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 13

लेखा शीर्ष : रस्ते बांधणे म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 54996319.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 53374322.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 1621997.00/-

रॉयल्टी कपात केली नाही. रॉयल्टी रक्कमेवर निविदा जादा दराने प्रदान केले. 500 घ.मी. पेक्षा जादा खोदकामा साठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना मानवी श्रमाने खोदकामाचे जादा दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. कमी रक्कमेच्या मुद्रांकावर करारनामा करण्यात आले आहे. मुदतवाढ मंजूर नसतांना अंतिम प्रदान केले तसेच डांबर दरफरकाची रक्कम प्रदान केली आहे. निविदा स्वीकृती नंतर तांत्रिक मान्यता देण्यात आली. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असलेल्या कामांसाठी निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून

येत नाही. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील नाशिक रोड विभागांतर्गत खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामांवर रक्कम रु.5,49,96,319/- इतका खर्च केला आहे.

तक्ता क्र. 1

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रु.	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम (रू.)
1	ना.रोड विभाग,नवीन प्र.क्र. 33 (जुना वॉर्ड क्र.33) जेलरोड ते सायट्रीक इंडीयागेट पर्यंत डी.पी.रोड रुंदीकरण करुन रिसरफेसींग करणे. रुपये 30,79,955/-	18/30/2012 दि. 29/12/2012	मे. सुप्रभा कन्स्ट्रक्शन 16.05 टक्के जादा दराने रु. 3574287/- चालू दरसूची 2011-12 नुसार 2.53 टक्के जादा	क्र. 1361 (पृष्ठ क्र. 169 ते 180)	39,86,923/- (तारांकित दर फरकासह)
2	ना.रोड विभाग, जुना वॉर्ड क्र.36 व 68 मधील कॅनाल रोड ते नारायण बापु चौकापर्यंतचा 12 मी. डी.पी. रोड रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. रुपये 2,13,93,993/-	162/279/2011 दि. 09/11/2011	बी.टी.कडलग कन्स्ट्रक्शन प्रा.लि. 3 टक्के जादा दराने 22035730/-	क्र. 1783 (पृष्ठ क्र. 96 ते 134, 162 ते 176)	2,55,72,486/- (तारांकित दर फरकासह)
3	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र.36 चंपानगरी व सप्तश्रृंगीनगर येथील रस्ते रुंदीकरण, खडीकरण, डांबरीकरण करुन पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये 1,11,01,400/-	143/284/2011 दि. 1/11/2011	मे. एम.टी.पाटील बिल्डर्स आणी कॉन्ट्रॅक्टर्स 4.90 टक्के जादा दराने 11645368/- चालू दरसूची 2010-11 नुसार 2.95 टक्के	क्र. 1763 (पृष्ठ क्र. 84) व क्र. 96 (पृष्ठ	1,26,41,436/- (तारांकित दर फरकासह)

			जादा	क्र. 124 ते 139, 146 ते 152)	
4	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र. 97 मधील रेल्वेलाईन लगत स.नं. 246 पासुन जाणा-या 18 मी. डी.पी. रस्ता खडीकरण करुन बी.बी.एम. करणे. रु. 71,58,440/-	234/464/2011 दि. 30/12/2011	मे. कैलास किसन बिन्नर 7.50 टक्के कमी दराने रु. 6621557/-	क्र. 867 (पृष्ठ क्र. 178 ते 186)	64,28,598/- (तारांकित दर फरकासह)
5	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र. 69 मधील गोरेवाडीतील रेल्वेगेट पासुन एकलहरे रेल्वे ट्रॅकपर्यतचा मुख्य रस्ता रुंदीकरण करुन रस्ता ट्रिमीक्स कॉंक्रीटचा करणे. रु. 86,49,862/-	222/88/2011 दि. 27/12/2011	यशश्री कन्स्ट्रक्शन 14.40 टक्के कमी दराने रु.74,04,281/-	क्र. 2789 (पृष्ठ क्र. 1 ते 35)	63,66,876/- (तारांकित दर फरकासह)

उपरोक्त 1 ते 5 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.5,49,96,319/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत

1) महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्या साठी रॉयल्टी ची रक्कम परीगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

अ. क्र.	कामाचे नांव	कामातील बाब क्रमांक	एकूण रॉयल्टी चे परिमाण घन मी.	रॉयल्टी चा दर	रॉयल्टी ची वसूल करावयाची रक्कम रु.	निविदा दर %	रॉयल्टी वर निविदा दराने प्रदान रक्कमरु.
1	ना.रोड विभाग,नवीन प्र.क्र. 33 (जुना वॉर्ड क्र.33)	3,6,9, 10 व	836.80	70.67	59,137/-	+16.05%	9,491/-

	जेलरोड ते सायट्रीक इंडीयागेट पर्यंत डी.पी.रोड रुंदीकरण करुन रिसरफेसींग करणे. रुपये 30,79,955/-	Part I 1					
2	ना.रोड विभाग, जुना वॉर्ड क्र.36 व 68 मधील कॅनाल रोड ते नारायण बापु चौकापर्यंतचा 12 मी. डी.पी. रोड रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. रुपये 2,13,93,993/-	11,12	1139.92	70.67	80,558/-	+3%	2,417/-
3	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र.36 चंपानगरी व सप्तश्रृंगीनगर येथील रस्ते रुंदीकरण, खडीकरण, डांबरीकरण करुन पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये 1,11,01,400/-	3,6,9, व 10	4795.54	70.67	3,38,901/-	+4.90%	16,606/-
4	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र. 97 मधील रेल्वेलाईन लगत स.नं. 246 पासुन जाणा-या 18 मी. डी.पी. रस्ता खडीकरण करुन बी.बी.एम. करणे. रु. 71,58,440/-	5,8,9 व 10	8959.89	70.67	6,33,217/-	-7.50%	
5	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र. 69 मधील गोरेवाडीतील रेल्वेगेट पासुन एकलहरे रेल्वे ट्रॅकपर्यंतचा मुख्य रस्ता रुंदीकरण करुन रस्ता ट्रिमीक्स कॉंक्रीटचा करणे.	17,20, 23,24, 28 व 29	1692.93	70.67	1,19,639/-	-14.40%	

	रु. 86,49,862/-						
	एकूण				1231452		28514

उपरोक्त 1 ते 5 वर नमूद कामाचे मक्तेदारांनी रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने सादर कलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. सबब रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने 1 ते 5 कामासाठीची रॉयल्टी ची रक्कम रुपये 1231452/- वसूल करून "0853 गौण खनिज" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

2) सदर कामांसाठीचे अंदाजपत्रकांची पडताळणी केली असता अंदाजपत्रकासाठी चे बाबनिहाय दर निश्चित करतांना रॉयल्टी ची रक्कम समाविष्ट करून निश्चित केले आहेत. उपरोक्त कामांसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आलेल्या असून कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टी च्या रक्कमेसह एकूण रक्कमेवर निविदा जादादराची आकारणी केली आहे. त्यामुळे रॉयल्टी च्या रक्कमेवरही निविदा जादादराने प्रदान झालेले आहे. रॉयल्टी ची रक्कम शासनाने निश्चित केलेल्या ठराविक दरानेच भरणा करावयाची असल्याने तसेच मक्तेदाराने कामासाठी रॉयल्टी रक्कमेचा भरणा केल्याची खात्री करून तितकीच रक्कम मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक असल्याने त्यावर निविदा जादा दराने आकारणी करणे संयुक्तिक नाही. सबब मक्तेदारांना वर नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रु. 28,514/- चे अनावश्यक जादा प्रदान झाले आहे.

3) बांधकाम विभाग नाशिक दरसूची मधील (General note) सर्वसाधारण सुचना मध्ये नमूद केल्यानुसार 500 घ.मी.पेक्षा जास्त खोदकामासाठी यांत्रिकी दराने आकारणी व प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि खालील तक्त्यात नमूद केल्या नुसार सदर कामातील खोदकामाचे परिमाण 500 घ.मी. पेक्षा जास्त असल्याने त्यासाठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना चुकीच्या व वाढीव मानवीश्रमाने खोदकामा चे दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास जादा प्रदान झालेले आहे.

अ. क्र.	कामाचे नांव	खोदकामाचे एकूण परिमाण घ.मी.	प्रदान केल्याचा मानवी दर रु.प्र.घ.मी.	देय यांत्रिकी दर रु.प्र.घ.मी..	जादा प्रदान दर रु.	जादा प्रदान रक्कम रु	निविदा जादा/कमी दराने जादा/कमी प्रदान रक्कम रु	एकूण जादा प्रदान रक्कम रु.
1	ना.रोड विभाग,नवीन प्र.क्र. 33 (जुना वॉर्ड क्र.33) जेलरोड ते	623.13	49.40	24.20	25.20	15,703/-	+16.05% 2,520/-	18223

	सायट्रीक इंडीयागेट पर्यंत डी.पी.रोड रुंदीकरण करुन रिसरफेसींग करणे. रुपये 30,79,955/-							
2	ना.रोड विभाग, जुना वॉर्ड क्र.36 व 68 मधील कॅनाल रोड ते नारायण बापु चौकापर्यंतचा 12 मी. डी.पी. रोड रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. रुपये 2,13,93,993/-	2243.26	54.90	26.90	28.00	62,811/-	+3% 1,884/-	64695
3	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र.36 चंपानगरी व सप्तश्रृंगीनगर येथील रस्ते रुंदीकरण, खडीकरण, डांबरीकरण करुन पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये	4718.21	49.40	24.20	25.20	1,18,899/-	+4.90% 5,826/-	124725

	1,11,01,400/-							
4	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र. 97 मधील रेल्वेलाईन लगत स.नं. 246 पासुन जाणा-या 18 मी. डी.पी. रस्ता खडीकरण करुन बी.बी.एम. करणे. रु. 71,58,440/-	3460.37	54.90	26.90	28.00	96,890/-	-7.50% -7,267/-	89623
5	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र. 69 मधील गोरेवाडीतील रेल्वेगेट पासुन एकलहरे रेल्वे ट्रॅकपर्यतचा मुख्य रस्ता रुंदीकरण करुन रस्ता ट्रिमीक्स कॉंक्रीटचा करणे. रु. 86,49,862/-	2040.91	49.40	24.20	25.20	51,431/-	-14.40% -7,406/-	44025
	एकूण					345734/-	-4443/-	341291

उपरोक्त प्रमाणे अनुक्रमांक 1 व 5 वरील कामांसाठी रक्कम रु.3,41,291/- चे चुकीचे व जादा प्रदान झालेले आहे.

3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 2 व 3 मध्ये नमुद कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

4) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि उपरोक्त नमूद अनुक्रमांक 2 ते 5 वरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

5) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 1, 3 व 4 मध्ये नमुद कामासाठी डांबर तारांकीत दर फरक अनुक्रमे रक्कम रुपये 5,48,801/-, रू.14,19,335/- व रू. 1,67,015/- असे एकूण रक्कम रू.21,35,151/- चे प्रदान करण्यात आले आहेत. निविदा तारांकित दर फरक प्रदाना बाबतच्या अटी व शर्ती नुसार मक्तेदाराने डांबर खरेदी बाबत पुरेसा पुरावा म्हणून खरेदीचे मूळ देयक,चलन अथवा जकातीची पावती सादर करणे आवश्यक आहे. तथापि असा कोणताही पुरावा प्राप्त केल्याचे दिसून येत नाही. सबब निविदा अटीचे पालन झालेले नाही

6) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 1 मध्ये नमुद केलेल्या कामासाठी तांत्रिक मान्यता शहर अभियंता यांचे पत्र क्र.776 दि. 29/10/2012 अन्वये देण्यात आलेली आहे तथापी सदरहु कामासाठीची निविदा दैनिक लोकमत दिनांक 04/09/2012 व दैनिक लोकसत्ता दिनांक 05/09/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्री कालावधी दिनांक दि.20/09/12 ते दि. 26/09/12 असा होता व निविदा सादर करण्यासाठी अंतिम मुदत दिनांक 10/10/2012 पर्यंत देण्यात आली होती म्हणजेच निविदा प्रसिध्दी, विक्री व स्वीकृती पश्चात तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

7) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 63 नुसार कार्यकंत्राट कामाचा करारनामा रुपये 10 लाखापर्यंत साठी रु. 100/- चे मुद्रांकावर व रु 10 लाखाचे वर असेल तर रु.100/- अधिक 10 लाखाचे पुढील प्रत्येक लाखासाठी रु.100/- अधिकतम रु.5 लक्ष च्या मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. त्या नुसार उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 2 मध्ये नमुद केलेल्या कामाचा करारनामा रक्कम रु. 21,200/- चे मुद्रांकावर करणे आवश्यक होते तथापि तो रु. 100/- चे मुदांकावर केल्याने रु. 21,100/- कमी मुद्रांक शुल्क वसूल करुन "0030 मुद्रांक व नोंदणी" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

8) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 2 मध्ये नमुद केलेल्या कामाचा निविदा स्वीकृतीबाबतचा स्थायी समितीचा ठराव नस्तीसोबत जोडण्यात आलेला नाही.

9) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 2 मध्ये नमुद केलेल्या कामाबाबत, काम पुर्ण करण्याची मुदत दि. 09/02/2013 आहे. कंत्राटदाराने त्याचे पत्र विनादिनांकीत पत्रान्वये 4 महिन्याची मुदतवाढ मागीतलेली होती. तथापी मुदतवाढ प्रदान केल्याचे आढळून आलेले नाही, असे असतांनाही कंत्राटदारास तिसरे धावते देयकानुसार रक्कम रु.41,27,085/- अधिक तारांकित दर फरक रु. 13,79,198/- एकूण रु. 55,06,283/- तसेच चौथे धावते

देयकानुसार रक्कम रु.3,06,140/- प्रदान करण्यात आलेले आहे.

कंत्राटदाराने तिस-या धावते देयकासोबत चलन क्र. 55, दि. 16/01/14 अन्वये 32.800 MT तसेच चलन क्र. 67, दि. 18/01/14 अन्वये 33.100 MT डांबर खरेदीच्या पावत्या जोडलेल्या आहेत. गुणनियंत्रण विभागाच्या कामाच्या गुणवत्तेविषयक प्रमाणपत्र क्र. 269/2/2014, दि. 4/2/2014 मध्ये कामाचा रेकॉर्डींग दिनांक 16/1/2014 ते 24/1/2014 नमुद केलेला आहे. वर नमुद केल्यानुसार कंत्राटदारास तिसरे धावते देयकानुसार तारांकित दर फरक रक्कम रु. 13,79,198/- प्रदान करण्यात आलेली आहे. तारांकीत दर फरक अटी व शर्तीनुसार मुदतीत केलेल्या कामासाठी तारांकीत दर देय होतो. सदरहु कामासाठीची मुदत दि. 09/02/2013 रोजी संपृष्टात आलेली असुन व पुढील मुदतवाढ मंजुर झाल्याचे दिसुन येत नाही. तथापी या कालावधीसाठी डांबर फरकाची रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे.

10) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 2 मध्ये नमुद केलेल्या कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत.

11) डांबर 80/100, 60/70 व 30/40 ग्रेड नुसार दर स्वतंत्र आहेत. उपरोक्त वरील नमूद कामातील डांबर कामासाठी 60/70 ग्रेड डांबराचे दराने अंदाजपत्रक तयार केलेले आहे. व त्या नुसार मक्तेदारास प्रदान केलेले आहे तथापि डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे वापरलेल्या डांबराची ग्रेड (60/70) असल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

12) मोजमाप पुस्तिकेत कामाच्या एकत्रित गोषवारा मध्ये कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी केल्याचे शेरे नोंदविले आहेत तथापि त्यांनी नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही.

13) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	1621997
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	53374322
एकूण	:-	रु.	54996319

IRRYLWM7701 (Ref No : 9, Hmm No : 42)

26 बांधकाम विभागाकडील नाशिक पुर्व विभागांतर्गत सन 2013-14 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 6

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 121276856.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 121173208.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 103648.00/-

महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्या साठी रॉयल्टी ची रक्कम परीगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही. सदर कामांसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आलेल्या असून कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टी च्या रक्कमेसह एकूण रक्कमेवर निविदा जादा दराची आकारणी केली आहे. त्यामुळे रॉयल्टीच्या रक्कमेवरही निविदा जादा दराने प्रदान झालेले आहे. डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे. वापरलेल्या डांबराची ग्रेड (60/70) असल्याचे नमूद केलेले नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील नाशिक पुर्व विभागांतर्गत खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामांवर रक्कम रु.12,12,76,856/- इतका खर्च केला आहे.

तक्ता क्र. 1

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रु.	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम (रू.)
1	नाशीक पुर्व प्र.क्र. 53 मधील 12 मी. डी.पी.रस्ता चार्वाक रस्ता ते 30 मी. डी.पी. रस्त्याचे खडीकरण रुंदीकरण व डांबरीकरण करणे.	72/159/2013 दि. 23/09/2013	बि.पि.सांगळे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लि. 6.70 टक्के जादा दराने रु. 9844652/- चालू दरसूची 2012-	क्र. 2626 (पृष्ठ क्र. 141 ते 169)	रुपये 1,11,38,446/- (तारांकित दर फरकासह)

	रुपये 94,37,024/-		13		
2	नाशीक पुर्व प्र.क्र. 30 मधील जाधव फार्म समोरील स.नं. 455 सिध्दाई बंगला ते अथर्व बंगल्यापर्यंत काँक्रीट रस्ता करणे. रुपये 4,22,012/-	मा आयुक्त यांचे आदेश क्र. 750, दि. 28/08/2013	मे. पटेल कन्स्ट्रक्शन 15.15 टक्के कमी दराने	क्र. 3012 (पृष्ठ क्र. 38 ते 41)	रुपये 3,58,077/-

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु. 1,14,96,523/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत

1) महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्या साठी रॉयल्टी ची रक्कम परीगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

अ.क्र.	कामाचे नांव	कामातील बाब क्रमांक	एकूण रॉयल्टी चे परिमाण घन मी.	रॉयल्टी चा दर	रॉयल्टी ची वसूल करावयाची रक्कम रु.	निविदा दर %	रॉयल्टी वर निविदा दराने प्रदान रक्कम रु.
1	नाशीक पुर्व प्र.क्र. 53 मधील 12 मी. डी.पी.रस्ता चार्वाक रस्ता ते 30 मी. डी.पी. रस्त्याचे खडीकरण रुंदीकरण व डांबरीकरण करणे. रुपये 94,37,024/-	5,9,12, 14,21	1342.24	70.67	94,856/-	6.70% above	6,355/-
2	नाशीक पुर्व प्र.क्र. 30 मधील जाधव फार्म समोरील स.नं. 455 सिध्दाई बंगला ते अथर्व बंगल्यापर्यंत काँक्रीट रस्ता करणे.	5	34.49	70.67	2,437/-	--	

	रुपये 4,22,012/-						
	एकूण				97293/-		6355/-

उपरोक्त वर नमूद कामाचे मक्तेदारांनी रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने सादर कलेली आहेत तथापि सदरची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. महसूल विभागाने प्रमाणित केलेले वाहतूक पास किंवा रॉयल्टी क्लिअरिंग प्रमाणपत्र असे अधिकृत अभिलेखे सादर केलेले नाहीत. सबब रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने कामासाठीची रॉयल्टी ची रक्कम रुपये 97293/- वसूल करून "0853 गौण खनिज" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

2) सदर कामांसाठीचे अंदाजपत्रकांची पडताळणी केली असता अंदाजपत्रकासाठी चे बाबनिहाय दर निश्चित करतांना रॉयल्टी ची रक्कम समाविष्ट करून निश्चित केले आहेत. उपरोक्त कामांसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आलेल्या असून कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टी च्या रक्कमेसह एकूण रक्कमेवर निविदा जादादराची आकारणी केली आहे. त्यामुळे रॉयल्टी च्या रक्कमेवरही निविदा जादादराने प्रदान झालेले आहे. रॉयल्टी ची रक्कम शासनाने निश्चित केलेल्या ठराविक दरानेच भरणा करावयाची असल्याने तसेच मक्तेदाराने कामासाठी रॉयल्टी रक्कमेचा भरणा केल्याची खात्री करून तितकीच रक्कम मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक असल्याने त्यावर निविदा जादा दराने आकारणी करणे संयुक्तिक नाही. सबब मक्तेदारांना वर नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रु. 6355/- चे अनावश्यक जादा प्रदान झाले आहे.

3) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 1,2 मध्ये नमुद केलेल्या कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत.

4) डांबर 80/100, 60/70 व 30/40 ग्रेड नुसार दर स्वतंत्र आहेत. उपरोक्त वरील नमूद कामातील डांबर कामासाठी 60/70 ग्रेड डांबराचे दराने अंदाजपत्रक तयार केलेले आहे. व त्या नुसार मक्तेदारास प्रदान केलेले आहे तथापि डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे वापरलेल्या डांबराची ग्रेड (60/70) असल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

5) मोजमाप पुस्तिकेत कामाच्या एकत्रित गोषवारा मध्ये कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी केल्याचे शेरे नोंदविले आहेत तथापि त्यांनी नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही.

6) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

27 सन 2013-14 या वित्तीय वर्षाच्या पंचवटी विभागांतर्गत पाणी पुरवठा विभागाचे विकास कामातील उनिवांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 15

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1782014.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1691998.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 90016.00/-

निविदा जाहिरातीची प्रत नस्ती सोबत जोडलेली नाही. नस्ती सोबत निविदा प्रकीयेतील प्राप्त निविदेसोबतचे लिफाफा क्र.1 व 2 मधील कागदपत्रे जोडण्यात आले नाहीत. बी-1 निविदा व त्यासोबत संलग्न शेडयुल वर आवश्यक त्याठिकाणी कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्ष-या नसून सदर बी-1 निविदा/शेडयुल पूर्णपणे भरून घेण्यात आलेले नाही. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार व महसूल व वन विभाग शासन अधिसूचना दि.11/02/2010 नुसार रिफिलिंग द ट्रेन्च या बाबीकरीता रु.70.67 प्र.घ.मी दराने रॉयल्टी वसूली केली नाही. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ नाशिक यांचे दरसूची सर्वसाधारण सूचना क्र.31 नुसार 100mm व त्यावरील व्यासाच्या पाणीपुरवठा पाईप लाईनसाठी केंद्रीय अबकारी कर माफ आहे. तथापि केंद्रीय अबकारी करासह दर निश्चित केल्याने ठेकेदारास जादा अदाई झाली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पाणी पुरवठा विभागाकडील पंचवटी विभागा अंतर्गत खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता, सदर कामांवर रक्कम रू. 17,82,014/- इतका खर्च केला आहे.

तक्ता क्र. 1

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रू.	प्रशासकीय मान्यता व लेखा शिर्ष	तांत्रिक मान्यता	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व निविदा स्वीकृत आदेश क्रमांक व दिनांक, स्विकृत निविदा दर	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम रू.
1	पंचवटी	महासभा ठराव	कार्यकारी	कार्यकारी अभियंता,	श्री.संजय व्ही	क्र.	785753

	विभागात प्रभाग क्रं.11 गणेशवाडी परफेक्ट सोसायटी ते पुनिता सोसायटी पर्यंत पाईप लाईन टाकणे.	क्रं.889 दि.18/03/2013 रु.8,52,799/- जलदाय व्यवस्था वितरण	अभियंता (पाणी पुरवठा) NMC/WSD/597 दि.19/01/2013 रु.8,52,799/- (दरसूची 2011-12)	मनपा/पापुवि/200/2013 दिनांक 21/09/2013	सुर्यवंशी, आयुक्त आदेश क्रमांक 833 दि. 07/09/2013, अंदाजपत्रकीय दराच्या 6.11% कमी दराने रक्कम रु.8,00,692/- चालू दरसूची सन 2012-13 नुसार15.47% कमी दराने	3169 (पा.क्र 1 ते 26)	
2	पंचवटी विभागात प्रभाग क्रमांक 07 मखमलाबादरोड वृदावन कॉलनी मध्ये पाईप लाईन टाकणे.	महासभा ठराव क्रं.702 दि.15/03/2013 रु.5,53,105/- नविन वितरिका टाकणे	कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) NMC/WSD/544 दि.05/12/2012 रु.5,53,105/- (दरसूची 2011-12)	कार्यकारी अभियंता,मनपा/पापुवि/180/2013 दिनांक 14/08/2013	पराग कंन्स्ट्रक्शन, आयुक्त आदेश क्रमांका 599 दि.25/07/2013 , अंदाजपत्रकीय दराच्या 5.20% कमी दराने रक्कम रु.5,24,343/- चालू दरसूची सन 2012-13 नुसार 14.50% कमी दराने	क्र. 1005 (पा.क्र 78 ते 100)	506548
3	पंचवटी विभागात प्रभाग क्रमांक 06 जुने वार्ड क्रमांक 7 नामदेव नगर मखमलाबादरो	महासभा ठराव क्रं.757 दि.18/03/2013 रु.5,12,657/-, जलदाय	कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) NMC/WSD/261 दि.19/11/2011 रु.5,12,657/- (	कार्यकारी अभियंता,मनपा/पापुवि/148/2013 दिनांक 06/08/2013	प्रदीप रमेश चौधरी, आयुक्त आदेश क्रमांका 600 दि.25/07/2013 ,	क्र. 909 (पा.क्र 178 ते 193)	489713

	ड स.नं.49/1 मध्ये पाईप लाईन टाकणे	व्यवस्था शुल्क (विकास निधी या निधीतून)	दरसूची 2010-11)		अंदाजपत्रकीय दराच्या 4.11% कमी दराने रक्कम रु.4,91,586/- चालू दरसूची सन 2012-13 नुसार 17.80% कमी दराने		
						एकूण	1782014

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.17,82,014/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामांसाठी दिलेल्या प्रथम व फेर निविदा जाहिरातीची प्रत नस्ती सोबत जोडण्यात आलेली नाही. त्यामुळे जाहिरात प्रक्रियेबाबत तपासणी करता आलेली नाही.

2. सदर कामांसाठी नस्ती सोबत निविदा प्रकीयेतील सहभागी मक्तेदारांच्या प्राप्त निविदेसोबत असलेले पाकीट क्र.1 व 2 मधील कागदपत्रे नस्ती सोबत जोडण्यात आले नसल्याने निविदा प्रकीया योग्य असले बाबत पडताळणी करता आली नाही.

3. वरील सर्व नस्तींसोबत जोडण्यात आलेला बी-1 शेडयुल वर आवश्यक त्याठिकाणी कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्ष-या नसून बी-1 शेडयुल मक्तेदाराकडून पूर्णपणे भरून घेण्यात आलेले नाहीत.

4. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. महसूल व वन विभाग शासन अधिसूचना दि.11/02/2010 नुसार रु. 70.67 प्र.घ.मी दराने रॉयल्टी आकारणी करून वसूली होणे आवश्यक आहे. खालील विवरणपत्रात नमुद रिफिलिंग द ट्रेन्च - एकूण 523.70 घ.मी. साठी रु. 70.67 प्र.घ.मी. दराने एकण रक्कम रु.37,009/-" 0853 गौण खनिज " या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

तक्ता 1 मधील अ.क्र.	कामाचे नांव	बाब क्र.	परिमाण	रॉयल्टीचा दर	एकूण वसुलपात्र रक्कम
1	पंचवटी विभागात प्रभाग क्रं.11 गणेशवाडी परफेक्ट सोसायटी ते पुनिता सोसायटी पर्यंत पाईप लाईन टाकणे.	बाब क्रमांक-17 रिफिलिंग द ट्रेन्च	177.01 घ.मी	रु. 70.67 प्र.घ.मी.	12509

2	पंचवटी विभागात प्रभाग क्रमांक 07 मखमलाबादरोड वृदावन कॉलनी मध्ये पाईप लाईन टाकणे.	बाब क्रमांक 16 -रिफिलिंग द ट्रेन्च	159.25 घ.मी	70.67 प्र.घ.मी.	11254
3	पंचवटी विभागात प्रभाग क्रमांक 06 जुने वार्ड क्रमांक 7 नामदेव नगर मखमलाबादरोड स.नं.49/1 मध्ये पाईप लाईन टाकणे	बाब क्रमांक 16 रिफिलिंग द ट्रेन्च रक्कम	187.44 घ.मी	70.67 प्र.घ.मी. दराने	13246
	एकूण	--	523.70	--	37009

5. अ.क्र. 1 मधील कामाचे बाब क्रमांक 7 ते 9 नुसार एकूण 183.26 घनमीटर खोदकाम झालेले आहे. तथापि बाब क्रमांक 17 नुसार 177.01 घ.मी. खोदकामातून निघालेले साहित्य रिफलींग केले. उर्वरीत 6.25 घ.मी.साहित्य उरले असतांना बाब क्र. 20 नुसार 10 घ.मी. साहित्य वाहून टाकण्यासाठी रू.237.50 प्रति घ.मी. प्रमाणे एकूण रक्कम रू.2375/- प्रदान केली आहे. म्हणजेच 3.75 घ.मी. जास्तीच्या परिमाणासाठी रू.237.50 प्रमाणे एकूण रक्कम रू.890/- जास्तीचे प्रदान झालेले असल्याने सदरची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

6. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ नाशिक यांचे दरसूची सन 2011-12 सर्वसाधारण सूचना क्र.31 नुसार 100mm व त्यावरील व्यासाच्या पाणीपुरवठा पाईप लाईनसाठी केंद्रीय अबकारी कर (Central Excise duty) माफ आहे. तथापि सदर कराचा पाईपच्या दरात समावेश असल्याने ठेकेदारास खालील तपशिला प्रमाणे रु.52126/- एवढी जादा अदाई झाली आहे.

तक्ता 1 मधील अ.क्र.	कामाचे नांव	बाब	केंद्रीय अबकारी करासह दर	केंद्रीय अबकारी कर वजाजाता दर	तफावत	परिमाण	रक्कम
1	पंचवटी विभागात प्रभाग क्रं.11 गणेशवाडी परफेक्ट सोसायटी ते पुनिता सोसायटी पर्यंत पाईप लाईन टाकणे.	100mm CI पाईप	983	939	44	313.5	13794
		150mm CI पाईप	1555	1483	72	120	8640
						एकूण	22434
2	पंचवटी विभागात प्रभाग क्रमांक 07 मखमलाबादरोड वृदावन कॉलनी मध्ये पाईप लाईन टाकणे.	100mm CI पाईप	983	939	44	240	10560
		150mm CI पाईप	1555	1483	72	50	3600
						एकूण	14160

3	पंचवटी विभागात प्रभाग क्रमांक 06 जुने वार्ड क्रमांक 7 नामदेव नगर मखमलाबादरोड स.नं.49/1 मध्ये पाईप लाईन टाकणे	100mm CI पाईप	983	939	44	353	15532
						एकूण	15532
						एकूण एकंदर	52126

7. अ.क्र. 1 मधील कामाचे आदेश दिनांक 21/09/2013 रोजी देण्यात आले होते. तथापि, नस्तीसोबत जोडण्यात आलेली जकात पावती दि.25/04/2011, दि.13/10/2011 व दि. 25/02/2013 रोजीच्या असल्याचे निदर्शनास आले.

8. अ.क्र. 2 मधील कामाचे आदेश दिनांक 14/08/2013 रोजी देण्यात आले होते. तथापि, नस्तीसोबत जोडण्यात आलेली जकात पावती दि.12/02/2013 रोजीची असल्याचे निदर्शनास आले.

9. अ.क्र. 3 मधील कामाचे आदेश दिनांक 06/08/2013 रोजी दिले होते. तथापि, नस्तीसोबत जोडण्यात आलेली जकात पावती दि.21/02/2013 रोजीची असल्याचे निदर्शनास आले.

10. अ.क्र. 2 मधील कामातील बाब क्र.5 - Sluice Valve चा पुरवठा मे.पी.आर.चौधरी यांचे कडून मे.पराग कन्स्ट्रक्शन यांनी दि.10/04/2013 रोजी केल्याचे नस्ती सोबतच्या हस्तलीखीत टॅक्स इन्व्हॉइस नं. 312 नुसार दिसते. मात्र Sluice Valve- purchase order मे.इंडियन व्हॉल्व प्रा.लि. यांना दि.23/08/2013 रोजी दिल्याचा आदेश नस्ती सोबत जोडलेला असून प्रत्यक्षात पुरवठा purchase order नुसार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

11. अ.क्र. 2 मधील नस्ती सोबत जोडण्यात आलेले ओरीएन्ट रबर प्रोडक्ट प्रा.लि.यांची प्रोफॉर्मा इनव्हॉइस नंबर 014/2013-2014, दि.20/08/2013, दिव्या सेल्स कॉर्पोरेशची पराग कन्स्ट्रक्शन यांना पुरवठा केलेली टॅक्स इन्हॉइस नं.04/DSC/DC/11-12,दि.07/07/2011 तसेच ओरीएन्ट ट्रेडींग कंपनी, नागपूर यांची इनव्हॉइस नंबर OTC/PC/Nashil/070698 Dtd.12/09/2007 नुसार बाब क्र. 2 -Tail Pieces-100mm, 150mm व 200mm बाब क्र.3- CI Mech. Coller बाब क्र-12 Flanged joints 100mm,150mm व 200mm, बाब क्र.13-Mechanical joints 100mm,150mm व 200mm इत्यादी साहीत्याचा पुरवठा झालेला आहे. परंतु सदरचे साहित्याची खरेदी कार्यादेश देण्यापूर्वीची असल्याचे निदर्शनास आले.

2. अ.क्र. 3 मधील कामाचे मोजमाप पुस्तक क्रमांक 909 मधील पृष्ठ क्रमांक 182 मधील नोंदी नुसार बाब क्र. 2 -Tail Pieces-100mm, 150mm चा नमूद डी.सी. नं.01/डीएससी/11-12 दि.07/07/2011 तसेच बाब क्र.3- CI Mech. Coller चा नमूद डी.सी. नं.01/डीएससी/11-12 दि.07/07/2011 या नोंदीमधील चलन क्रमांक व दिनांक यांची पडताळणी केली असता, नस्ती सोबत जोडण्यात आलेले चलने दिव्या सेल्स चे ऑर्डर कंन्फर्मेशन डीएस6/पीआरसी/नाशिक/12116 दि.16/01/2012 ची आहेत व त्यासोबत एसजीएसचे दि.11/07/2011ची आहेत. सदरचे चलने व टेस्टींग रिपोर्ट मोजमाप पुस्तकातील

नोंदीशी जुळत नाहीत.

13. अ.क्र. 1 मधील कामाचे आदेश दिनांक 21/09/2013 रोजी दिले आहेत व कामाची मुदत 04 महिने असतांना नस्ती सोबत जोडण्यात आलेल्या काम पूर्णत्वाचा दाखला दि.16/01/2013 रोजीचा असून त्यावर काम पूर्ण झाल्याची तारीख 16/01/2013 अशी नमूद आहे. त्यामुळे सदरचे काम पूर्ण कधी झाले याची पडताळणी करता आली नाही.

14. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 21 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह केल्याचे मोजमाप पुस्तीकेवरून दिसून आले नाही.

15. बांधकाम नियम पुस्तिका नियम 24 नुसार रक्कम प्रदान करताना मोजमाप पुस्तीकेतील नोंदी लाल शाईने फुली मारणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

अ.क्र.	तपशिल		रक्कम रु.
वसुलपात्र रक्कम			
1	रॉयल्टी	रु.	37890
2	केंद्रीय अबकारी कर	रु.	52126
एकूण वसुलपात्र रक्कम		रु.	90016

HCDMGGM7001 (Ref No : 10, Hmm No : 48)

28 सन 2013-14 या वित्तीय वर्षाच्या सातपुर विभागांतर्गत पाणी पुरवठा विभागाचे विकास कामातील उनिवांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 10

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 5795799.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5551102.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 244697.00/-

निविदा जाहिरातीची प्रत नस्ती सोबत जोडलेली नाही. नस्ती सोबत निविदा प्रकीयेतील प्राप्त निविदेसोबतचे लिफाफा क्र.1 व 2 मधील कागदपत्रे जोडण्यात आले नाहीत. बी-1 निविदा व त्यासोबत संलग्न शेडयुल वर आवश्यक त्याठिकाणी कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नसून सदर बी-1 निविदा/ शेडयुल पूर्णपणे भरून

घेण्यात आले नाहीत. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार व महसूल व वन विभाग शासन अधिसूचना दि.11/02/2010 नुसार रिफिलिंग द ट्रेन्च या बाबीकरीता रु.70.67 प्र.घ.मी दराने रॉयल्टी वसूली केली नाही. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ नाशिक यांचे दरसूची सर्वसाधारण सूचना क्र.31 नुसार 100mm व त्यावरील व्यासाच्या पाणीपुरवठा पाईप लाईनसाठी केंद्रीय अबकारी कर माफ आहे. तथापि केंद्रीय अबकारी करासह दर निश्चित केल्याने ठेकेदारास जादा अदाई झाली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पाणी पुरवठा विभागाकडील सातपुर विभागा अंतर्गत खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता, सदर कामांवर रक्कम रू. 57,95,799 इतका खर्च केला आहे.

तक्ता क्र. 1

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रू.	प्रशासकीय मान्यता व लेखा शिर्ष	तांत्रिक मान्यता	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व निविदा स्वीकृत आदेश क्रमांक व दिनांक, स्विकृत निविदा दर	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम रू.
1	सातपुर विभागातील प्रभाग क्रमांक 17 श्रमिक नगर परिसरात विविध ठिकाणी सीआय पाईप लाईन टाकणे.	महासभा ठराव क्रं.226 दि.18/10/2012 रु.48,60,026/-, जलदाय व्यवस्था वितरण	अधिक्षक अभियंता (पाणी पुरवठा) NMC/WSD/335 दि.17/04/2012 रु.48,60,026/- (दरसूची 2011-12)	कार्यकारी अभियंता,मनपा/पापुवि/169/2013 दिनांक 08/08/2013	मेघ कन्स्ट्रक्शन, स्थायी समिती ठराव क्रमांक 15 दि.03/05/2013 , अंदाजपत्रकीय दराच्या 10.03% कमी दराने रक्कम रु.43,72,565/- चालू दरसूची सन 2011-12	क्र. 3198 (पा.क्र 1 ते 43)	4341860

					नुसार 10.03% कमी दराने		
2	सातपूर विभागातील प्रभाग क्र.19 मधील महाराष्ट्र हौसिंग सोसायटी कॉलनी, समता नगर. सावरकर नगर या भागात पाईप लाईन टाकणे बाबत.	महासभा ठराव क्रं.731 दि.18/03/2013 रु.1544079/-, जलदाय व्यवस्था वितरण	कार्यकारी अभियंता क्रमांक 576 दिनांक 19/12/2012. रु.1544079/- दरसूची 2011-12	कार्यकारी अभियंता मनपा/पापुवि/135//2013 दिनांक 20/07/2013	मे. संजय गरबड सोनजे, आयुक्त आदेश क्रमांका 537 दि.16/07/2014 , प्राकलनाच्या 3.73 टक्के कमी दराने रक्कम रु.1486484/- चालू दरसूची 2012-13 नुसार 12.88 टक्के कमी दराची.	क्र. 776 (पा.क्र 199) व क्र. 2456 (पा.क्र 58 ते 75)	1453939
						एकूण	5795799

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.57,95,799 बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामांसाठी दिलेल्या प्रथम निविदा जाहिरातीची प्रत नस्ती सोबत जोडण्यात आलेली नाही. त्यामुळे जाहिरात प्रक्रियेबाबत तपासणी करता आलेली नाही.

2. नस्तींसोबत निविदा प्रकीयेतील सहभागी मक्तेदारांच्या प्राप्त निविदेसोबत असलेले पाकीट क्र.1 व 2 मधील कागदपत्रे नस्ती सोबत जोडण्यात आले नसल्याने निविदा प्रकीया योग्य असले बाबत पडताळणी करता आली नाही

3. अ.क्र. 1 मधील नस्ती सोबत जोडण्यात आलेल्या प्राप्त निविदांच्या तुलनात्मक तक्त्यावर कार्यकारी अभियंता यांचीच स्वाक्षरी असून इतर सदस्यांच्या स्वाक्ष-या न घेताच निविदा निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. सदरची बाब अनियमित आहे.

4. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. महसूल व वन विभाग शासन अधिसूचना दि.11/02/2010 नुसार रु. 70.67 प्र.घ.मी दराने रॉयल्टी आकारणी करून वसूली होणे आवश्यक आहे. खालील विवरणपत्रात नमुद रिफिलिंग द ट्रेन्च - एकूण 1737.13 घ.मी. साठी रु. 70.67

प्र.घ.मी. दराने एकण रक्कम रु.1,22,763/-" 0853 गौण खनिज " या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

तक्ता 1 मधील अ.क्र.	कामाचे नांव	बाब क्र.	परिमाण	रॉयल्टीचा दर रू.	एकूण वसुलपात्र रक्कम रू.
1	सातपुर विभागातील प्रभाग क्रमांक 17 श्रमिक नगर परिसरात विविध ठिकाणी सीआय पाईप लाईन टाकणे.	21- रिफिलिंग द ट्रेन्च	1351.50 घ.मी	70.67 प्र.घ.मी.	95511
2	सातपूर विभागातील प्रभाग क्र.19 मधील महाराष्ट्र हौसिंग सोसायटी कॉलनी, समता नगर. सावरकर नगर या भागात पाईप लाईन टाकणे बाबत.	15 रिफिलिंग द ट्रेन्च	385.63 घ.मी	70.67 प्र.घ.मी.	27252
	एकूण		1737.13	एकूण	122763

5. अ.क्र.2 मधील कामातील बाब क्रमांक 11 ते 14 नुसार एकूण 395.34 घनमीटर खोदकाम झालेले आहे. तथापि बाब क्रमांक 15 नुसार 385.63 घ.मी. खोदकामातून निघालेले साहित्य रिफलींग केले. उर्वरीत 9.71 घ.मी.साहित्य उरले असतांना सदर उरलेले साहित्य वाहून नेलेले नसल्याने उरलेले 9.71 घ.मी. साहित्याचा वापर केला असल्यास त्याचे रु.70.67 प्र.घ.मी. दराने रक्कम रु.686/-" 0853 गौण खनिज " या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

6. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ नाशिक यांचे दरसूची सन 2011-12 सर्वसाधारण सूचना क्र.31 नुसार 100mm व त्यावरील व्यासाच्या पाणीपुरवठा पाईप लाईनसाठी केंद्रीय अबकारी कर (Central Excise duty) माफ आहे.तथापि सदर कराचा पाईपच्या दरात समावेश असल्याने ठेकेदारास खालील तपशिला प्रमाणे रु.1,21,248/- एवढी जादा अदाई झाली आहे.

तक्ता 1 मधील अ.क्र.	कामाचे नांव	बाब	केंद्रीय अबकारी करासह दर	केंद्रीय अबकारी कर वजाजाता दर	तफावत	परिमाण	रक्कम
1	सातपुर विभागातील प्रभाग क्रमांक 17 श्रमिक नगर परिसरात विविध ठिकाणी सीआय पाईप लाईन टाकणे.	100mm CI पाईप	983	939	44	1210.0	53240
		150mm CI पाईप	1555	1483	72	535.0	38520

						एकूण	91760
2	सातपूर विभागातील प्रभाग क्र.19 मधील महाराष्ट्र हौसिंग सोसायटी कॉलनी, समता नगर. सावरकर नगर या भागात पाईप लाईन टाकणे बाबत.	100mm CI पाईप	983	939	44	500	22000
		150mm CI पाईप	1555	1483	72	104	7488
						एकूण	29488
						एकूण एकंदर	121248

7. उपरोक्त कामांच्या नस्ती सोबत जोडण्यात आलेला बी-1 शेडयुल वर आवश्यक त्याठिकाणी कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्ष-या नसून बी-1 शेडयुल मक्तेदाराकडून पूर्णपणे भरून घेण्यात आलेले नाहीत.

8. अ.क्र.1 च्या कामाचे आदेश दिनांक 08/08/2013 रोजी देण्यात आले. तथापि,, नस्तीसोबत जोडण्यात आलेली जकात पावत्या दि.17/09/2011, दि.12/02/2013, दि.01/03/2013 व दि.13/05/2013 रोजीच्या कार्यादेश देण्यापूर्वीचे असल्याचे निदर्शनास आले.

9. अ.क्र.1 मधील कामाची बांधकाम नियम पुस्तिकेतील, नियम 24 नुसार, रक्कम प्रदान करताना मोजमाप पुस्तीकेतील नोंदी लाल शाईने फुली मारणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

10. अ.क्र. 2 मधील कामाची मोजमापे, मोजमाप पुस्तिका क्रमांक 776 मधील पान क्रमांक पा.क्र 199 व मोजमाप पुस्तिका क्र.2456 पृष्ठ क्रमांक 58 ते 75 यावर नोंदविल्याचे नमूद आहे. तथापि सदरच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे त्यात नोंदविलेली मापे उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांनी केलेली विहित टक्केवारी तपासणी इ. बाबत पडताळणी करता आलेली नाही.

अ.क्र.	तपशिल		रक्कम रु.
वसुलपात्र रक्कम			
1	रॉयल्टी	रु.	123449
2	केंद्रीय अबकारी कर	रु.	121248

एकूण वसुलपात्र रक्कम	रु.	244697

29 सन 2013-14 या वित्तीय वर्षाच्या नाशिक पूर्व विभागांतर्गत पाणी पुरवठा विभागाचे विकास कामातील उनिवांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 13

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1766724.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1697330.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 69394.00/-

निविदा जाहिरातीची प्रत नस्ती सोबत जोडलेली नाही. नस्ती सोबत निविदा प्रकीयेतील प्राप्त निविदेसोबतचे लिफाफा क्र.1 व 2 मधील कागदपत्रे जोडण्यात आले नाहीत. बी-1 निविदा व त्यासोबत संलग्न शेडयुल वर आवश्यक त्याठिकाणी कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नसून सदर बी-1 निविदा/ शेडयुल पूर्णपणे भरून घेण्यात आले नाहीत. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार व महसूल व वन विभाग शासन अधिसूचना दि.11/02/2010 नुसार रिफिलिंग द ट्रेन्च या बाबीकरीता रु.70.67 प्र.घ.मी दराने रॉयल्टी वसूली केली नाही. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ नाशिक यांचे दरसूची सर्वसाधारण सूचना क्र.31 नुसार 100mm व त्यावरील व्यासाच्या पाणीपुरवठा पाईप लाईनसाठी केंद्रीय अबकारी कर माफ आहे. तथापि केंद्रीय अबकारी करासह दर निश्चित केल्याने ठेकेदारास जादा अदाई झाली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पाणी पुरवठा विभागाकडील नाशिक पूर्व विभागा अंतर्गत खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता, सदर कामांवर रक्कम रू 17,66,724/- इतका खर्च केला आहे.

तक्ता क्र. 1

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रू.	प्रशासकीय मान्यता व लेखा शिर्ष	तांत्रिक मान्यता	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व निविदा स्वीकृत आदेश क्रमांक व	मोजमाप पुस्तक	कामावर झालेला एकूण खर्च

					दिनांक, स्विकृत निविदा दर	क्रमांक	रक्कम रू.
1	नाशिकपूर्व प्रभाग क्र.38 मध्ये डी.जी.पी.नगर -1 रेणुकामाता मंदिर पाठीमागील परिसरातील पाईपलाईन टाकणे व जुनी पाईपलाईन काढणे.	महासभा ठराव क्रं.945 दि.18/03/2013 रु.1312614/-, जुन्या वितरिका बदलणे.	कार्यकारी अभियंता -(पाणी पुरवठा) NMC/WSD/547 दि.07/12/2012 रु1312614/- (MJPDSR दरसूची 2011-12)	कार्यकारी अभियंता,मनपा/पापुवि/149/2013 दिनांक 06/08/2013	प्रदिप रमेश चौधरी, नाशिक, आयुक्त आदेश क्रमांका 596 दि.25/07/2013 , अंदाजपत्रकीय दराच्या 3.25 टक्के कमी दराने रक्कम रु.1269954/- चालू दरसूची सन 2012-13 नुसार 13.98% कमी दराने	क्र. 2270 (पा.क्र 34 ते 35, 46 ते 53 व 57 ते 59)	1269954
2	नाशिक पूर्व वार्ड क्रमांक 38 मध्ये बजरंगवाडी बाराखोली जवळील परिसरात पाईप लाईन टाकणे बाबत.	प्रभाग समिती ठराव क्रमांक 234 दि.25/02/2013 रू.338649/-, जलदाय व्यवस्था वितरण	कार्यकारी अभियंता -(पाणी पुरवठा) NMC/WSD/572 दि.27/12/2012 रु.338649/- (MJPDSR दरसूची 2011-12)	कार्यकारी अभियंता मनपा/पापुवि/188//2013 दिनांक 03/08/2013	श्री. एस.ए.शेलार, नाशिक, आयुक्त आदेश क्रमांक 605 दि.25/07/2012 प्राकलनाच्या 8 टक्के कमी दराने रक्कम रु.311557/- चालू दरसूची 2012-13 नुसार 17.06 टक्के कमी दराने येते.	क्र. 2121 (पा.क्र 46 ते 50, 55 ते 57)	307629
3	नाशिक पूर्व पभाग क्रमांक	प्रभाग समिती ठराव क्रमांक	कार्यकारी अभियंता -(पाणी	कार्यकारी अभियंता मनपा/पापुवि/184//2013 दिनांक	श्री.एस.ए.शेलार , आयुक्त	क्र. 2121	189141

	30 मधील सावित्रीबाई फुले वसाहत माणेकशानगर येथे पाईप लाईन टाकणे बाबत.	190 दि.28/01/2013 रू.211032/-, जलदाय व्यवस्था वितरण	पुरवठा) NMC/WSD/381 दि.31/08/2012 रु.211032/- (MJPDSR दरसूची 2011-12)	17/08/2013	आदेश क्रमांक 643 दि.05/08/2013 , प्राकलनाच्या 8 टक्के कमी दराने रक्कम रु.194149/- चालू दरसूची 2012-13 नुसार 16.41 टक्के कमी दराने येते.	(पा.क्र 42 ते 45, 51 ते 54, 58 ते 59)	
							1766724

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.17,66,724/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. नस्ती सोबत निविदा प्रकीयेतील सहभागी मक्तेदारांच्या प्राप्त निविदेसोबत असलेले पाकीट क्र.1 व 2 मधील कागदपत्रे नस्ती सोबत जोडण्यात आले नसल्याने निविदा प्रक्रिया योग्य असले बाबत पडताळणी करता आली नाही.

2. अ.क्र. 2 व 3 मधील कामासाठी दिलेल्या निविदा जाहिरातीची प्रत नस्ती सोबत जोडण्यात आलेली नाही. त्यामुळे जाहिरात प्रक्रियेबाबत तपासणी करता आलेली नाही.

4	नाशिकरोड प्रभाग क्र.56 नवले चाळीकडे जाणा-या रस्त्यावर पथदिप सोय करणे	प्रभाग समिती ठराव क्रमांक क्र.9 दि.15/04/13 रु.199634/- नगरसेवक निधी.	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.199634/- दर सुची 2011-2012	जा.क्र मनपा/विदयुत/.17 दि.13/08/2013	मे. लोकमान्य एन्टरप्राईजेस,नाशिक, आयुक्त आदेश क्र.555 दि.16/7/13 5.5 टक्के कमी दरानुसार रू.188554/-	क्र. 3196 पृ.क्र. 6 ते 10	183927
5	नाशिकरोड प्रभाग क्र.33(ब) मधील जागृती नगर व	प्रभाग समिती ठराव क्रमांक क्र.21 दि.15/04/13 रु.166448/- मा.स्थायी समिती	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.166448	जा.क्र मनपा/विदयुत/.16 दि.13/08/2013	मे. लोकमान्य एन्टरप्राईजेस,नाशिक, आयुक्त आदेश क्र.531 दि.16/7/13, 4 टक्के कमी	क्र. 3196 पृ.क्र.1 ते 5	158209

	परीसरात पथदिप सोय करणे	सभापती निधी	/- दर सुची 2011-2012		दरानुसार रू.159790/-		
6	नाशिकरोड प्रभाग क्र.32 मधील नारायणबापू चौक ते सैलानी बाबा चौकापर्यंत पथदिप सोय करणे.	आयुक्त आदेश क्रमांक क्र.598 दि.21/09/12 रु.1504922/- पथदिप विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.1302746/- दर सुची 2011-2012	जा.क्र मनपा/विदयुत /.30 दि.20/03/2013	मे.अल्सन इलेक्ट्रीकल्स, नाशिक, आयुक्त आदेश क्र.1491 दि.6/3/13, 21.53 टक्के कमी दरानुसार रू.1022265/-	क्र. 2568 दि. 140 ते 151	1022265
7	नाशिकरोड प्र.क्र. 56 लोकमान्य टिळक उदयानात पथदिप सोय करणे	महासभा ठराव क्र.729 दि.18/3/2013रू.1889924/- नगरसेवक निधी	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.1889924/- दर सुची 2011-2012	जा.क्र मनपा/विदयुत /.26 दि.03/10/2013	मे. लोकमान्य एन्टरप्राईजेस,नाशिक, आयुक्त आदेश क्र.706 दि.13/8/13, 3.33 टक्के कमी दरानुसार रू.1826990/-	क्र. 3196, पृ.क्र. 19 ते 24	1758212
8	नाशिकरोड प्र.क्र.32(ब) मधील स्वामी समर्थ नगर व करंजकरनगर येथे पथदिप व्यवस्था	सदरचे काम दरपत्रके मागवून केले. पथदिप विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि.)दिनांक व क्रमांक निरंक. रू.49944/- दर सुची 2011-12	जा.क्र मनपा/विदयुत /.6 दि.6/6/13	मे.महात्मा एन्टरप्राईजेस, नाशिक. अधिक्षक अभियंता(वि.) आदेश क्र.16 दि.18/05/13, 3 टक्के कमी दरानुसार रू.48446/-	क्र.2084 दि.122 ते 125	47919

	करणे.						
9	नाशिकरोड प्र.क्र.32(ब) मधील वैशाली नगर येथील गणराया रो-हाऊस जवळ नविन पथदिप उभारणी बाबत.	सदरचे काम दरपत्रके मागवून केले. पथदिप विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि.)दिनांक व क्रमांक निरंक. रू.49691/- दर सुची 2011-12	जा.क्र मनपा/विदयुत /20 दि22/8/13	मे.महात्मा एन्टरप्राईजेस, नाशिक. अधिक्षक अभियंता(वि.) आदेश क्र.15 दि.3/04/13, 3 टक्के कमी दरानुसार रू.48200/-	क्र.2084 दि.126 ते 129	48069
						एकूण	6518320

उपरोक्त 1 ते 9 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.65,18,320/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त कामांसाठी निविदा सुचनेत नमूद केल्याप्रमाणे मक्तेदाराकडून बी-1 या विहीत नमुन्यातील करारनामा करून घेण्यात आलेला नाही.

2. उपरोक्त कामांसाठी दिलेल्या जाहिरातीची प्रत तक्ता क्रमांक 1 मधील अ.क्र.1 ते 3 व 6,8 मधील नस्ती सोबत जोडण्यात आलेली नाही त्यामुळे सदर संचिकांच्या जाहिरात प्रक्रियेबाबत तपासणी करता आलेली नाही

3. वरील सर्व कामाची तांत्रिक मान्यता देतांना कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करतांना क्रमांक व दिनांक नमूद केलेला नाही.

4. दरसूचीमध्ये नमूद केलेल्या स्टँडर्ड अँड स्पेसीफिकेशन मधील अटीनुसार Bureau of Energy Efficiency नुसार तीन स्टार किंवा त्यावरील दर्जा असलेले साहित्य वापरणे आवश्यक आहे.तथापि त्या नुसार साहित्य वापरल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही.

5. दरसूचीमध्ये नमूद स्टँडर्ड अँड स्पेसीफिकेशन नुसार मापन पुस्तकात कामाची मापे नमूद केल्यानंतर सदरील काम दरसूचीच्या स्पेसीफिकेशनप्रमाणे झाल्याचे प्रमाणपत्र नमूद केलेले नाही.

6. दरसूचीमधील सर्वसाधारण सूचना नुसार विद्युत कामांमध्ये वापरलेले साहित्य ERDA/CPRI किंवा केंद्र/राज्य शासनाच्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासणे आवश्यक आहे. तथापि संबधित प्रयोगशाळे कडून अशी तपासणी केलेली दिसून येत नाही.

7. तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 1,2 व 7 मधील काम हे नगर सेवक निधी मधून करण्यात आले आहेत. नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक AMC-14200/2264/प्र.क्र.144/न.वी./24 दिनांक 26/02/2009 नुसार नगरसेवक स्वेच्छा निधीतून घ्यावयाची कामाची अंदाजित रक्कम दोन लक्ष पेक्षा जास्त असता कामा नये. असे असतांना सदरचे कामे रक्कम रू.2.00 लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कामासाठी दिलेली मंजुरी अनियमित आहे.

8. तक्ता क्र.1 अ.क्र. 1 मधील कामातील बाब क्र.1 नुसार 7 मीटर ऑक्टोगोमल पोल डबलआर्म साठी रु.11054/-प्रति नगची तरतूद केली व त्या नुसार 16 नगासाठी रु.176864/-चे प्रदान केले आहे. नस्ती सोबत जोडण्यात आलेल्या कामपूर्ण स्थळ दर्शक नकाशानुसार प्रत्यक्षात 16 पोल पैकी पोल क्रमांक 15 व 16 नंबरचे पोल हे सिंगलआर्म बसविले असल्याने त्यानुसार प्रदान करणे आवश्यक होते तथापि तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

9. तक्ता क्र.1 अ.क्र. 1 मधील कामातील नस्ती सोबत बी.जे.इलेक्ट्रीक कं.चे बील क्र.61 दि.28/08/2013 नुसार 7 मी.जी.आय.पाईपसेट 25 नगा करीता प्रती नग रु.4800/- प्रमाणे (व्हॅटसह) एकूण रक्कम रू.120000/- चे उपप्रमाणक मक्तेदाराने जोडलेले आहे. अंदाजपत्रकानुसार बाब क्र.2 नुसार प्रती नग रू.7466/- प्रमाणे एकूण 40 नगाकरीता रक्कम रू.298640/- ची तरतुद केले होती. त्यानुसार प्रत्यक्षात मक्तेदारास देयकामध्ये नमूद केल्यानुसार 26 नगाकरीता रक्कम रू.194116/- चे प्रदान केलेले आहे. परंतु 7 मी.जी.आय.पाईपसेटचा दर हा सन 2011-12 च्या दरसुची मध्ये समाविष्ट नाही. अंदाजपत्रकातील दर व प्रत्यक्ष बाजारभाव मोठी तफावत असल्याचे दिसून येते. विभागाने बाजारभावाप्रमाणे दर वाजवी व सुसंगत असल्याची खात्री केलेली दिसून येत नाही. त्यामुळे मक्तेदाराने जोडलेल्या उपप्रमाणकानुसार प्रती नग 4800/- प्रमाणे एकूण 26 नगाकरीता रक्कम रू.124800/- इतकी रक्कम प्रदान होणे आवश्यक असतांना जादा प्रदान रक्कम (रू.194116 - रू.124800) रू.69316 त्यामधून 4.53 टक्के रक्कम रू.3140 वजा जाता एकूण रक्कम रू.66176 अनावश्यक प्रदान झाल्याचे दिसून येते.

10. तक्ता क्र.1 अ.क्र. 1 मधील कामातील अंदाजपत्रकानुसार बाब क्रमांक 1 नुसार 16 नग 7 मीटर ऑक्टोगोमल पोल व बाब क्र.2 नुसार 26 नग 7 मी जी.आय.पाईप असे एकूण नविन 42 पाईप बसविले असतांना त्याच प्रमाणात FRB बॉक्स बसविणे आवश्यक होते. परंतु बाब क्रमांक 9 नुसार 40 नग FRB बॉक्स करीता प्रती नग रू.519 प्रमाणे एकूण रक्कम रू.20760 ची तरतदु अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. प्रत्यक्षात 33 नग FRB बॉक्स बसवून काम पूर्ण केल्याने अंदाजपत्रक/कार्यादेशानुसार काम केल्याचे दिसून येत नाही.

11. तक्ता क्र.1 अ.क्र. 1 मधील कामातील अंदाजपत्रकानुसार बाब क्र.15 अन्वये 6 मी.चे 50 नग अस्तीत्वातील पोल काढावयाचे होते व त्याजागी बाब क्र.1 नुसार 7 मी.उंचीचे 16 नग पोल व बाब क.2 नुसार 40 नग 7 मी. जी.आय.पाईप असे एकूण 56 नग नवीन पोलची उभारण्याची तरतुद अंदाजपत्रकात केली असतांना प्रत्यक्षात बाब क्र.15 नुसार अस्तीत्वातील 50 पैकी 31 पोल काढण्यात आले असून (त्याची नोंद बुक क्र.196 पानं. 9 मध्ये घेतल्याबाबतचा शेरा नस्ती मध्ये आहे.) प्रत्यक्षात बाब क्र.1 नुसार नवीन 16 पोल व बाब क्र.2 नुसार 26 पोल असे एकूण 42 नग पोल बसविण्यात आले आहेत. अंदाजपत्रकात तरतुद केल्यानुसार जूने व नविन पोल यांचे प्रमाण विसंगत आहे.

12. तक्ता क्र.1 अ.क्र. 1 मधील कामातील बाब क्र.16 नुसार 50 नग जुनी फिटींग ब्रॅकेटसह जमा करण्याची तरतुद केली आहे. परंतु जुनी 113 फीटींग जमा करण्याबाबत प्रती नग रू.58 प्रमाणे एकूण रक्कम रू.6554 मक्तेदारास प्रदान केली आहे. परंतु सदरची फिटींग जमा केली बाबत नस्ती मध्ये नोंद नाही. तरी सदरची फिटींग भांडारात जमा केली किंवा कसे अथवा सदर फिटिंग दुसरीकडे वापरण्यात आली असल्यास तसे प्रमाणीत होणे आवश्यक आहे.

13. तक्ता क्र.1 अ.क्र. 2 मधील काम हे रक्कम रू.50 हजार रकमेपेक्षा जास्त रक्कम रू. 494616 एवढ्या रकमेचे असल्याने शासन निर्णय क्र.भाखंस-1088/2512/उदयोग-6, दि.02/01/1992 व शासन निर्णय उदयोग उर्जा व कामगार विभाग क्र.भाखंस-2002/2990/उदयोग-6 दि.04/02/2003 मधील तरतुदी नुसार जाहीर निवदेव्दारे करणे आवश्यक असतांना दरपत्रकानुसार केले आहे. सदरची बाब अनियमित आहे.

14. तक्ता क्र.1 अ.क्र. 2 मधील काम दि.13/06/2013 रोजी सूरू करण्याबाबत कार्यादेश क्रमांक 7 दि. 13/06/2013 देण्यात आला असतांना कामपुर्ण दाखल्यानूसार कामपूर्ण दि.15/06/2013 रोजी झाल्याचे दिसते. परंतु स्थायी समिती ठराव क्रमांक 93 दिनांक 23/05/2013 मध्ये नमुद केल्यानुसार सदरचे काम मे.एस.टी. कुंडरिया यांचेकडून करून घेण्यात आल्याने त्याकामी रक्कम रू.499612/- चे खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली आहे. काम जर दि.15/06/2013 रोजी पूर्ण झाले आहे तर कार्योत्तर मंजुरी ही दि.13/06/2013 नंतर घेणे आवश्यक होते. सदरची बाब अनियमित आहे.

15. तक्ता क्र.1 अ.क्र. 2 मधील अंदाजपत्रकातील बाब क्र. 7 नुसार FRB Box size 300 x 200 x 100 mm साठी चा दर 599/- प्रती नग प्रमाणे एकूण 48 नगाकरीता एकूण रक्कम रू.28752/- तरतुद करून ती प्रदान केली आहे. परंतु सन 2011-12 च्या दरसुचीमध्ये सदर बाबीकरीता रू.519 प्रती नग असा दर आहे. त्यामुळे रू.80 प्रतीनग जादा प्रदान झाल्याने 48 नगाकरीता एकूण रू.3840 त्यामधून 1 टक्का निविदा कमी दर रू.38 वजा जाता एकुण रक्कम रू. 3802 इतकी रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

16. तक्ता क्र.1 अ.क्र. 2 मधील अंदाजपत्रकातील बाब क्र.10 मीटर बॉक्सचा दर दरसुची सन 2011-12 मध्ये समाविष्ट नसल्याने सदरचा दर बाजारभावानुसार (मार्केट रेट) प्रती नग रू.18535/- आकारण्यात आलेला आहे. परंतु इतर कामांमध्ये (उदा. नाशिक पंचवटी प्र.क्र.3 स.न.172 हिरावाडी नाशिक, पथदिप उभारणी करणे या व इतर कामात) प्रतीनग रक्कम रू.17259 असा दर आकारण्यात आला आहे म्हणजेच रू.1276/- त्यामधून प्राकलनाच्या 1 टक्का कमी रक्कम रू.13/- वजा जाता एकूण रक्कम रू.1263/- इतकी रक्कम जादा प्रदान झाली आहे.ती वसुल होणे आवश्यक आहे. तसेच नस्ती मध्ये मीटर बॉक्सचे कोणतेही दरपृथकरण, टॅक्स इन्व्हाईस इ. तपशिल उपलब्ध नसल्याने सदरचा दर योग्य व वाजवी असल्याबाबत खात्री होत नाही.

17. तक्ता क्र.1 अ.क्र. 3 मधील कामाच्या नस्तीसोबत प्रभाग क्र. 32 चे नगरसेवकांचे दि.16/07/2012 रोजीच्या पत्रानुसार सदरचे काम रस्त्याच्या मधोमध डिव्हायडर सेंट्रल लाईन टाकून सेंट्रल लाईटची सोय करण्याबाबतचे आहे. तसा कामाचा आराखडा नस्तीसोबत जोडण्यात आलेला असून त्यानुसारच मा.आयुक्त आदेश क्रमांक 603 दि.24/09/2012 अन्वये सदरचे कामास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. परंतु दि.26/04/2013 नंतरच्या कार्यालयीन टिपणीतील बांधकाम विभागाच्या अभिप्रायानुसार बांधकाम विभागा मार्फत नाशिकरोड प्रभाग क्र.32 गोसावीमळा ते नारायणबापू नगर चौका पर्यंत बांधकाम विभागामार्फत डिव्हायडर टाकणेचे काम प्रस्तावित नाही असे कळविले आहे. म्हणजेच बांधकाम विभागाची दुभाजक टाकण्याच्या कामास मंजुरी देण्या अधीच सदरचे काम मंजुर केले आले आहे. मात्र रस्त्याच्या मधोमध दुभाजक टाकण्याचे काम केले नसतांना रस्त्याच्या कडेला सदरचे पोल बसवून काम पूर्ण केले आहे. त्यामुळे कामाची निकड नसतांना सदरचा खर्च केलेला दिसून येतो.

18. तक्ता क्र.1 अ.क्र. 3 मधील बाब क्रमांक 13 नुसार 30 नग जुने 6 मीटरचे पोलवरील फीटींग काढल्याबाबत रक्कम रू.58/- प्रतीनग प्रमाणे एकूण 30 नग फिटींग जमा केल्याबाबत एकूण रक्कम रू.1140/- प्रदान केलेली आहे. तथापि, सदर पोल वरील फिटींग भांडारात जमा केलेली नाही अथवा त्या इतर ठिकाणी बसविल्याची नोंद नमूदं नाही. तरी काढलेली

फिटींग भांडारात जमा केल्याबाबत प्रमाणित करावे.

19. तक्ता क्र.1 अ.क्र. 4,5 व 9 मधील अंदाजपत्रकात पोलच्या संख्ये इतके फाउंडेशन,ब्रॅकेट,अर्थिंग व एफआरपी बॉक्स ई. तरतूद केली आहे, तथापि सदर कामांच्या कामपुर्ण स्थळदर्शक नकाशानुसार प्रत्यक्षात उभारण्यात आलेल्या पोलकरीता खालील विवरणपत्रानुसार उपरोक्त बाबीसाठी जादा परिमाण नोंदविले असल्याने जादा खर्च झालेला दिसुन येतो.

तक्ता 1 मधील अ.क्र.	बाब क्र.	तपशील	आवश्यक परिमाण	प्रत्यक्ष परिमाण	जादा परिमाण	दर रु.	जादा खर्च रु.	स्विकृत निविदा दरा नुसार कमी/जास्त होणारी रक्कम	एकूण जादा प्रदान रक्कम
4	2	7 मी.पोल फाउंडेशन	8	10	2	1021	2042		
	3	पाईप टाईप अर्थिंग	8	10	2	788	1576		
	7	एफ.आर.पी.बॉक्स	8	10	2	519	1038		
					एकूण		4656	5.5 टकके कमी -256	4400
5	2	7 मी.पोल फाउंडेशन	7	8	1	1021	1021		
	3	पाईप टाईप अर्थिंग	7	8	1	788	788		
					एकूण		1809	4 टक्के कमी -73	1736
9	2	7 मी.पोल फाउंडेशन	3	2	1	1021	1021		
	3	पाईप टाईप अर्थिंग	3	2	1	788	788		

					एकूण		1809	3 टक्के टक्के कमी -54	1755
						एकूण	8274	-383	7891

उपरोक्त तक्त्यानुसार नवीन पोलसाठी त्याच प्रमाणात वरील नमूद साहित्य बसविणे आवश्यक होते. जादा परिमाण बसविल्याबाबत प्रमाणित होणे आवश्यक आहे. अथवा अ.क्र. 4,5 व 9 करीता एकूण रक्कम रु.8274/- मधून निविदा स्विकृती नुसार कमी/जास्त होणारी रक्कम रू.-383/- वजा जाता रू.7891/- वसूल होणे आवश्यक आहे.

20. तक्ता क्र.1 अ.क्र. 6 मधील नस्तीसोबत प्रभाग क्र.32(अ) चे नगरसेवकांचे दि.16/07/2012 रोजीच्या पत्रानुसार सदरचे काम रस्त्याच्या मधोमध डिव्हायडर सेंट्रल लाईन टाकून सेंट्रल लाईटची सोय करण्याबाबतचे आहे. तसा कामाचा आराखडा नस्तीसोबत जोडण्यात आलेला असून त्यानुसारच मा.आयुक्त आदेश क्रमांक 598 दि.21/09/2012 अन्वये सदरचे कामास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. परंतु दि.07/03/2013 नंतरच्या कार्यालयीन टिपणीतील बांधकाम विभागाच्या अभिप्रायानुसार बांधकाम विभागा मार्फत नाशिकरोड प्रभाग क्र.32 नारायणबापू चौक ते सैलानीबाबा चौकापर्यंत बांधकाम विभागामार्फत डिव्हायडर टाकणेचे काम प्रस्तावित नाही असे कळविले आहे. म्हणजेच बांधकाम विभागाची दुभाजक टाकण्याच्या कामास मंजुरी देण्याअधीच सदरचे काम मंजुर केले आले आहे. मात्र रस्त्याच्या मधोमध दुभाजक टाकण्याचे काम केले नसतांना रस्त्याच्या कडेला सदरचे पोल बसवून काम पूर्ण केले आहे. त्यामुळे कामाची निकड नसतांना सदरचा खर्च केलेला दिसून येतो.

21. तक्ता क्र.1 अ.क्र. 6 मधील नस्ती सोबत जोडलेल्या कार्यकारी अभिंयंता (वि.) यांचे पत्र क्रमांक 504 दि.05/09/2013 मध्ये नमूद केल्यानुसार सदस्यांच्या आग्रही मागणी नुसार ऑक्टोगोनल पोलची संख्या जरी 26 नग असली व त्यांचे सी.सी. फाऊंडेशन डिझाईन कास्टींग एम-20 आवश्यकतेनुसार 26 नग करण्याचे काम होते, तरी पण मागणी नुसार 10 नग जादा सी.सी.फाऊंडेशन करून घेणेत आले आहे असे नमूद आहे. परंतु काम पुर्ण नकाशात बाब क्रमांक 1 ची अंदाजपत्रकात तरतुद केल्याप्रमाणेच 9 मीटर उंचीचे 26 नग नवीन ऑक्टोगोनल पोल बसविल्याचे आढळून येते. त्यामध्ये 10 नग अतिरीक्त जास्तीचे पोल उभारणी केल्याचे आढळून आले नाही अथवा उभारणी करणे बाबत दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे अतिरीक्त 10 नग फाऊडेशनचे काम केले नसतांना मक्तेदारास दुसरे धावते व अंतिम देयकान्वये 36 नग C.C. foundation (कास्टींग M-20) चे कामा करीता प्रती नग रू.14439/- प्रमाणे एकूण रक्कम रू.519804/- इतकी रक्कम प्रदान केली आहे. मक्तेदारास 26 नग फाऊंडेशनच्या कामाचीच रक्कम प्रदान होणे आवश्यक होते. तरी अतिरीक्त 10 नग C.C. foundation ची उभारणी केल्याबाबत प्रमाणित करावे अन्यथा प्रदान केलेली रक्कम प्रति नग रू.14439/- प्रमाणे एकूण रक्कम रू.144390/- मधून 21.53 टक्के कमी या प्रमाणे रू.31087/- वजा जाता एकूण रक्कम रू.113303/- वसुल होणे आवश्यक आहे.

22. तक्ता क्र.1 अ.क्र. 6 मधील बाब क्रमांक 3 नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे Supplying & erecting pipe type earthing साठी 26 नगासाठी प्रती नग रू.788/- प्रमाणे एकूण रक्कम रू.20488/- ची तरतुदी नुसार व काम पूर्ण नकाशा नुसार 26 नग नवीन पोल बसविले असतांना 26 नगच earthing चे कामासाठीच रक्कम प्रदान होणे आवश्यक असतांना मक्तेदारास 36 नग earthing चे कामाकरीताची एकूण रक्कम रू.28368/- प्रदान केले आहेत. अतिरीक्त 10 नगासाठी अर्थिंग उभारणी

केल्याबाबतच प्रमाणित करावे अन्यथा प्रदान केलेली रू.788/- प्रती नगाची एकूण रक्कम 7880/- मधून 21.53 टक्के कमी या प्रमाणे रू. 1697/- वजा जाता एकूण रक्कम रू.6183/- वसुल होणे आवश्यक आहे.

23. तक्ता क्र.1 अ.क्र. 6 मधील बाब क्रमांक 4 नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे Providing & erecting sword type bracket with double arm 1000 mm करीता 26 नगासाठी प्रतीनग रू.3942/- प्रमाणे एकूण रक्कम रू.102492/- मक्तेदारास अदा केली आहे. परंतु काम पुर्ण नकाशानुसार 26 नग नवीन पोल रस्त्याच्या कडेला उभारलेले असल्याने त्यावर Singl arm 1000 mm bracket बसविले असल्याचे दिसून येत असल्याने दरसुची सन 2011-2012 मधील Singl arm 1000 mm चा दर प्रती नग रू.2135/- असा आहे. म्हणजेच (रू.3942 - रू.2135/-) रू.1807/- प्रतीनग प्रमाणे 26 नगासाठी एकूण रक्कम रू.46982/- यामधून 21.53 टक्के कमी येणारी रक्कम रू.10115/- वजा जाता एकूण रक्कम रू.36867/-इतकी रक्कम अतिप्रदान झाल्याचे दिसून येते.

24. तक्ता क्र.1 अ.क्र. 6 मधील बाब क्र.12 नुसार अंदाजपत्रकात नमूद केल्यानुसार 20 नग जूने पाईप (Dismantling the existing pole) काढून टाकायचे असतांना प्रत्यक्षात 19 नग जूने पाईप सातपुर विभागात जमा केल्याची नोंद नस्ती मध्ये केली आहे. तसेच बाब क्र.13 नुसार 20 नग Dismantling the existing WT Fluoracent fitting काढून टाकण्याची तरतुद केली होती. त्यापैकी 19 फिटींग काढून टाकण्यात आल्या आहेत. त्यासाठी प्रतीनग रू.58/-प्रमाणे एकूण 19 नगासाठी रक्कम रू.1102/- प्रदान केली आहे. परंतु त्याबाबत नस्तीमध्ये नोंद आढळून आली नसल्याने सदरची फीटींग वापरली किंवा कसे याबाबत प्रमाणित होणे आवश्यक आहे.

25. तक्ता क्र.1 अ.क्र. 6 मधील सदरचे काम दि.19/06/2013 रोजी मुदतीत पूर्ण झाल्या बाबत पूर्णत्वाचा दाखल्यात नमूद केल्यानुसार काम पूर्ण झाले आहे. परंतु नस्ती सोबत जोडण्यात आलेल्या दिनांक 05/09/2013 रोजीच्या कार्यकारी अभियंता (वि.) यांचे पत्रात 10 नग जादा सी.सी.फाऊंडेशन करून घेण्यात आले आहे. सदरच्या कामासाठी सातपुर विदयुत स्टोअर विभागाकडून बुक नंबर 4885 पान नं.44 अन्वये 10 नग ऑक्टोगोनल पोल मागवून उभे करण्याचे काम चालू आहे असे नमूद केले आहे म्हणजेच कार्यकारी अभियंता (वि.) यांचे दि.05/09/2013 रोजीच्या पत्राच्या तारखे पावेते काम पूर्ण झालेले नाही असे असतांना पूर्णत्वाच्या दाखल्यावर दि.19/06/2013 अशी तारीख नमूद करून सदरचा दाखला दि.25/10/2013 रोजी निर्गमित केलेला दिसून येतो. सदरची बाबत अनियमित आहे.

26. तक्ता क्र.1 अ.क्र. 7 मधील अंदाजपत्रकातील बाब क्र. 1 नुसार गार्डन लाईट पोल (BJPL 01-300) चा दर सन 2011-12 च्या दरसुचीत समाविष्ट नसल्याने मार्केट रेट नुसार रक्कम रू.30,859/- प्रती नग आकारण्यात आला असून त्यानुसार एकूण 33 नगासाठी एकूण रक्कम रू.10,18,347/- रक्कम प्रदान केली आहे. नस्ती मध्ये जोडण्यात आलेल्या बजाज इलेक्ट्रीकल्स लि. यांच्या टॅक्स इन्व्हॉईस नं.27308714 दि.19/08/2013, नं.27308711, दि.19/08/2013 व टॅक्स इन्हॉइस नं.27304257 दि.22/06/2013 यामध्ये गार्डन लाईट पोलचा(BJPL 01-300) चा दर रू.12,160/- त्यावर व्हॅट चार्जेस रू.1,520/- असा एकूण रक्कम रू.13,680/- प्रतीनग नुसार खरेदी केल्याचे दर्शविले आहे. अंदाजपत्रकातील दर व प्रत्यक्ष बाजारभाव/खरेदीदर यात मोठी तफावत असल्याचे दिसून येते. विभागाने बाजारभावाप्रमाणे दर वाजवी, योग्य व सुसंगत असल्याची खात्री केलेली दिसून येत नाही.

27. तक्ता क्र.1 अ.क्र. 7 मधील अंदाजपत्रकातील बाब क्र. 4 नुसार LED Walker Luminaries याचा दर सन 2011-12 च्या दरसूचीतील समाविष्ट नसल्याने सदरचा दर अंदाजपत्रकात मार्केट रेट नूसार प्रती नग रू.5509/- नुसार एकुण 33 नगासाठी एकूण रक्कम रू.1,52,144/- प्रदान केले आहे. परंतु सदर बाबीकरीता नस्ती सोबत पुरवठा केल्याबाबतचे

चलने,पावत्या इ. तपशिल आढळून आले नसल्याने सदरचे दरपृथकरण कशाच्या आधारे केले व ते बाजारभावाप्रमाणे, योग्य व सुसंगत असल्याची पडताळणी करता आली नाही.

28. तक्ता क्र.1 अ.क्र. 7 मधील अंदाजपत्रकातील बाब क्र. 10 नुसार पोस्टटाईप फिटींगचा दर सन 2011-12 च्या दरसुचीमध्ये समाविष्ट नसल्याने तो मार्केटरेट नुसार रू.7650/- प्रती नग आकारण्यात आला असून त्यानुसार अदाई केली आहे. परंतु सदर बाबीकरीता नस्ती सोबत पुरवठा केल्याबाबतचे चलने,पावत्या इ. तपशिल आढळून आला नसल्याने सदरचे दरपृथकरण कशाच्या आधारे केले व ते बाजारभावाप्रमाणे, योग्य व सुसंगत असल्याची पडताळणी करता आली नाही.

29. तक्ता क्र.1 अ.क्र. 3 व 6 मधील कामासाठी न्यूनतम मक्तेदार यांची अंदाजपत्रकीय दराच्या अनुक्रमे 19.66 टक्के व 21.53 टक्के कमी दराची निविदा स्विकारण्यात आली तथापि 10% पेक्षा कमी दराची निविदा स्विकृत करताना महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मुद्दा 187 (ए) टीप 6 नुसार कार्यकारी अभियंत्यांनी 10% पेक्षा कमी प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही.

30. उपरोक्त तक्ता क्र.1 मधील सर्व कामांच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत. मोजमाप नोंदवहीत नोंदविलेली मापे उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांनी केलेली विहित टक्के तपासणी तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 135 ते 138 नुसार कार्यवाही केली अथवा नाही या बाबतची पडताळणी करता आलेली नाही.

31. उपरोक्त सर्व कामांसाठी वापरण्यात आलेले साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्तकरून नस्तीबद्ध करण्यात आलेला नाही त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशा नुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

38 विदयुत विभागाकडील पश्चिम विभागा अंतर्गत सन 2013-2014 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 17

लेखा शीर्ष : पथदिप विदयुतीकरण म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 1090201.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1060515.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 29686.00/-

जाहिरातीची प्रत नस्ती सोबत जोडण्यात आलेली नाही, कामाची तांत्रिक मान्यता देतांना कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करतांना क्रमांक व दिनांक नमूद केलेला नाही. दरसूचीमध्ये नमूद केलेल्या स्टँडर्ड अँड

स्पेसीफिकेशन मधील अटीनुसार साहित्य वापरल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही. मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध केल्या नाहीत. ठेकेदाराने VAT नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर केलेले नाही. नगरसेवक निधीतून द्यावयाच्या कामाची अंदाजित किंमत रु. 2 लक्ष्य पेक्षा जास्त असता कामा नये अशा स्पष्ट सूचना असतांना सदर शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात विद्युत विभागाकडील पश्चिम विभागांतर्गत खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता, सदर कामांवर रक्कम रु.10,90,201/-इतका खर्च केला आहे.

तक्ता क्र. 1

अ. क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रू.	प्रशासकीय मान्यता व लेखा शिर्ष	तांत्रिक मान्यता	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व निविदा स्वीकृत आदेश क्रमांक व दिनांक, स्विकृत निविदा दर	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम रू.
1	नाशिक पश्चिम वा.क्र.22 मधील सहदेवनगर येथील उदयानातील जॉगींग ट्रॅकवर पथदिप व्यवस्था करणे.	महासभा ठराव क्र.338 दि.07/12/2011 रक्कम रू.198862/- (नगरसेवक निधी- इतर विकास निधी अंतर्गत)पथ दिप विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.247987/- दर सुची 2009-2010	जा.क्र मनपा/विदयुत/.02 दि.12/04/2013	मे. गौरव इलेक्ट्रोमेख,नाशिक, आयुक्त आदेश क्र.02 दि.12/04/13 9 टक्के जादा दरानुसार रू.216760/- चालू दरसुची 2011-12 नुसार 9.25 टक्के कमी दराने	क्र. 2156 पृ.क्र. 19 ते 24	188661
2	नाशिक पश्चिम प्र.क्र.15 मधील	महासभा ठराव क्र.1169 दि.17/11/20	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक	जा.क्र मनपा/विदयुत/.10 दि.22/07/2013	मे. अविनाश इलेक्ट्रीकल्स ,नाशिक, आयुक्त आदेश क्र.255 दि.18/05/13 7 टक्के	क्र. 2647 पृ.क्र. 45 ते	717359

	सागरस्वीटस समोरील ओपन स्पेस येथील अभ्यासिकेत प्रकाश व्यवस्था करणे.	11 रक्कम रू.775289/- (नगरसेवक निधी- इतर विकास निधी अंतर्गत)	निरंक रू.775289/- दर सुची 2009-2010		कमी दरानुसार रू.721019/-	49	
3	राजीवगांधी भवन EPABX साठी स्पेअर खरेदी करणे	अधिक्षक अभियंता यांचा दि.02/01/2013 रोजीच्या टिपणी नुसार रक्कम रू.114786/- पोल हलविणे	कार्यकारी अभियंता यांची रक्कम रू.127540/- रकमेस मान्यता दिनांक व क्रमांक नमूद नाही.	कार्य.अभियंता यांचा आदेश क्र.11 दि.25/07/2013	युनिवर्सल कॅम्युनिकेशन्स,नाशिक, अधिक्षक अभियंता यांचा आदेश क्र.1 दि.15/7/2013	क्र.2711 पृ.क्र. 92	104741
4	नाशिक पश्चिम प्रभागातील शालीमार चौकातील हायमास्ट चा गिअर बॉक्स करणे बाबत.	कार्य.अभियंता यांची दि.08/02/2013 टिपणीनुसार रक्कम रू.50000/- विजेचे दिवे केबल सामुग्री खरेदी	कार्य.अभियंता यांची रक्कम रू.46000/- क्रमांक व तारीख नमूद नाही.	कार्य.अभियंता यांचा आदेश क्र.12 दि.05/08/2013	मे.मार्तंड एन्टरप्राईजेस,कार्य.अभियंता यांचा आदेश क्र.45 दि.05/07/2013,	क्र.2085, पा.क्र. 64	45540
5	मुख्यालय येथिल EPABX दूरूस्त	कार्य.अभियंता यांची दि.08/08/2013 ची	कार्य.अभियंता यांची रक्कम रू.33900/-	कार्य.अभियंता यांचा आदेश क्र.16	मे.युनिवर्सल कॅम्युनिकेशन्स, नाशिक कार्य.अभियंता यांचा आदेश क्र.16	क्र.2711, पा.क्र. 93	33900

	करणे	टिपणी नुसार रक्कम रू.33900/- विजेचे दिवे केबल व सामुग्री खरेदी	क्रमांक व तारीख नमूद नाही.	दि.12/08/2013	दि.03/08/2013,		
							1090201

उपरोक्त 1 ते 5 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.10,90,201/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त कामांसाठी निविदा सुचनेत नमूद केल्याप्रमाणे मक्तेदाराकडून बी-1 या विहीत नमुन्यातील करारनामा करून घेण्यात आलेला नाही.

2. उपरोक्त कामांसाठी दिलेल्या जाहिरातीची प्रत तक्ता क्रमांक 1 मधील अ.क्र.1,व 2 मधील नस्ती सोबत जोडण्यात आलेली नाही त्यामुळे सदर संचिकांच्या जाहिरात प्रक्रियेबाबत तपासणी करता आलेली नाही.

3. वरील सर्व कामाची तांत्रिक मान्यता देतांना कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करतांना क्रमांक व दिनांक नमूद केलेला नाही.

4. दरसूचीमध्ये नमूद केलेल्या स्टँडर्ड अँड स्पेसीफिकेशन मधील अटीनुसार Bureau of Energy Efficiency नुसार तीन स्टार किंवा त्यावरील दर्जा असलेले साहित्य वापरणे आवश्यक आहे.तथापि त्या नुसार साहित्य वापरल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही.

5. दरसूचीमध्ये नमूद स्टँडर्ड अँड स्पेसीफिकेशन नुसार मापन पुस्तकात कामाची मापे नमूद केल्यानंतर सदरील काम दरसूचीच्या स्पेसीफिकेशनप्रमाणे झाल्याचे प्रमाणपत्र नमूद केलेले नाही.

6. दरसूचीमधील सर्वसाधारण सूचनानुसार विद्युत कामांमध्ये वापरलेले साहित्य ERDA/CPRI किंवा केंद्र/राज्य शासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणे आवश्यक आहे. तथापि संबधित प्रयोगशाळे कडून अशी तपासणी केलेली दिसून येत नाही.

7. तक्ता -1 अ.क्र.1 मधील अंदाजपत्रकातील बाब क्र.2 सी.सी. फाऊंडेशन 15 नगाकरीता तरतुद केली होती. त्यानुसार कामपुर्ण स्थळ दर्शक नकाशा मध्ये 15 नविन पोलची उभारणी केली असल्याने 15 नग फाऊंडेशनवरच सदरची उभारणी केली असल्याने मक्तेदारास मात्र 16 नग सी.सी. फाऊंडेशन चे प्रती नग रू.974/- प्रमाणे एकूण रक्कम रू.15584/- रक्कम प्रदान केली आहे. 15 नगाची आवश्यक्ता असतांना 1 नगाची अतिरीक्त रक्कम रू.974/- अधिक 9 टक्के जादा रक्कम रू.88/- असे एकूण रक्कम रू.1062/- जादा रक्कम प्रदान झाली आहे.

8. तक्ता -1 अ.क्र.1 मधील अंदाजपत्रकातील बाब क्र.11 -Pipe type Earthing 15 नगाकरीता तरतुद केली होती. त्यानुसार

कामपुर्ण स्थळ दर्शक नकाशा मध्ये 15 नविन पोलची उभारणी केली असल्याने 15 नग Pipe type Earthing ची फिटींग केली असल्याने मक्तेदारास मात्र 16 नग Pipe type Earthing चे प्रती नग रू.742/- प्रमाणे एकूण रक्कम रू.11872/- रक्कम प्रदान केली आहे. 15 नगाची आवश्यक्ता असतांना 1 नगाची अतिरीक्त रक्कम रू.742/- अधिक 9 टक्के जादा रक्कम रू.67/- असे एकूण रक्कम रू.809/- जादा रक्कम प्रदान झाली आहे.

9. तक्ता-1 अ.क्र. 1 मधील नस्तीमधील काम दि.15/05/2013 रोजी पूर्ण झाले असतांना पुर्णत्वाचा दाखला मात्र दि.17/10/2013 रोजी निर्गमित केलेला आहे. म्हणजेच काम विहीत मुदतीत पूर्ण झालेले नसल्याचे दिसुन येते.

10. तक्ता क्र. 1- अ.क्र. 2 मधील काम हे नगर सेवक निधी मधून करण्यात आले आहेत. नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक AMC-14200/2264/प्र.क्र.144/न.वी./24 दिनांक 26/02/2009 नुसार नगरसेवक स्वेच्छा निधीतून घ्यावयाची कामाची अंदाजित रक्कम दोन लक्ष पेक्षा जास्त असता कामा नये. असे असतांना सदरचे कामे रक्कम रू.2.00 लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कामासाठी दिलेली मंजुरी अनियमित आहे.

11. तक्ता क्र.1 अ.क्र. 2 कामाची निविदा प्रकीया करतांना निविदा अटी शर्ती नुसार व महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमंक-भांखस/1094/ (2679)/उदयोग-6, दिनांक 30 मार्च, 1994 नुसार प्रथम लिफाफा (तांत्रिक) आवश्यक ती कागदपत्रे (व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड वगैरे) निविदाधारकाने सादर केलेली नसतांना त्यांचे लिफाफा क्रमांक दोन (दरा बाबत) उघडण्याची अनियमितता झाली आहे.

12. तक्ता क्र.1 अ.क्र. 2 ते 5 मधील मंजूर निविदाधारकाने निविदे सोबत व्हॅट प्रमाणपत्र सादर केलेले नाही. शासन अधिसूचना दि.04.04.2012 नुसार अनोंदणीकृत ठेकेदाराकडून कार्यकंत्राट कर 5 टक्के प्रमाणे रक्कम अनुक्रमे रू.35868/-, रू.5709/-, रू.2277/- व रू.1568/- वसुल होणे आवश्यक होते. परंतु त्यांच्या अंतिम देयकामधून 2 टक्के रक्कम कपात केली आहे. सदर ठेकेदाराचे VATनोंदणी प्रमाणपत्र दर्शवावे अन्यथा अनुक्रमे उर्वरित 3 टक्के रक्कम रु. 21521/-,3142/-,1366/- व रु.1017/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

13. तक्ता क्र.1 अ.क्र. 2 मधील अंदाजपत्रकातील बाब क्र1 नुसार दरसुची 2009-10 मधील Item No. 8-1-74 नुसार Decorative garden pole 15 नग प्रतिनग रू. 47392/- प्रमाणे एकूण रक्कम रू.710880/- मक्तेदारास प्रदान केली आहे. परंतु सन 2009-10 ची दरसुचीची पडताळणी केली असता, सदरच्या पोलच्या स्पेसीफिकेशन नुसार सदरचा पोलचे विवरण आढळून आले नाही. तसेच नस्तीसोबत पोलचे दरपृथकरण व पुरवठादाराच्या मुळ पावत्या व चलने जोडलेले नसल्याने ते बाजारभावाप्रमाणे, योग्य व सुसंगत असल्याची पडताळणी करता आली नाही.

14. तक्ता क्र.1 अ.क्र. 3 ते 5 मधील कामे हे दरपत्रकानुसार करण्यात आले. परंतु दरपत्रके मागविण्याबाबतचे अभिलेखे नस्तीमध्ये आढळून आले नाहीत.

15. तक्ता क्र.1 अ.क्र. 4 व 5 मधील कामातील मंजूर दरपत्रकधारकांनी महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विकास/1098/प्र.क्र./2889/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नुसार कामगारांचा कामाचा विमा काढलेला नसल्याने त्यांच्या अंतिम देयकातून 1 टक्का विमा रक्कम वसुल केलेली नाही. तरी 1 टक्का होणारी अनुक्रमे रक्कम रू.455/- व रू.314/- अशी एकूण रक्कम रू.769/- रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

16. उपरोक्त तक्ता क्र.1 मधील सर्व कामांची मोजमाप पुस्तिके लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. मोजमाप नोंदवहीत नोंदविलेली मापे उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांनी केलेली विहित टक्के तपासणी तसेच महाराष्ट्र

नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 135 ते 138 नुसार कार्यवाही केली अथवा नाही या बाबतची पडताळणी करता आलेली नाही.

17. उपरोक्त सर्व कामांसाठी वापरण्यात आलेले साहित्यांच्या मूळ पावत्या,चलने व चाचणी अहवाल प्राप्तकरून नस्तीबद्ध करण्यात आलेला नाही त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशा नुसार, मापदंडानुसार योग्य व बरोबर असल्याचे प्रमाणित होत नाही.

39 विदयुत विभागाकडील नविन नाशिक विभागा अंतर्गत सन 2013-2014 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 8

लेखा शीर्ष : पथदिप विदयुतीकरण म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 517056.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 496372.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 20684.00/-

दि.02/01/1992 च्या शासननिर्णयानुसार विदयुत साहित्य खरेदीकरतांना खरेदीच्या प्रचलित पद्धतीचा अवलंब केल्याचे दिसून येत नाही. मोजमाप पुस्तिक लेखापरीक्षणास उपलब्ध केल्या नाहीत. ठेकेदाराने VAT नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर केलेले नाही. विदयुत साहित्याचा चाचणी अहवाल नस्तीबद्ध करण्यात आलेला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात विद्युत विभागाकडील नविन नाशिक विभागांतर्गत खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता, सदर कामांवर रक्कम रु.5,17,056/- इतका खर्च केला आहे.

तक्ता क्र. 1

अ. क्र.	कामाचे नांव	मक्तेदाराचे नांव	कार्यादेश व वित्तीय मान्यता क्रमांक व	अंदाजपत्रकीय रक्कम	कामावरील झालेला एकूण	3 टक्के व्हॅट कपात न	1 टक्का कामगार विमा कपात	एकूण वसुलपात्र रक्कम

			दिनांक		खर्च	केलेली रक्कम	न केलेली रक्कम	
1	नविन नाशिक विभागात पथदिपकामी time swich खरेदी करणे	बी.जे.इलेक्ट्रीकल्स, नाशिक	25 दि.05/09/2013	47500	47500	1425	475	1900
2	नविन नाशिक प्र.क्र.41 मधील पांगरेमळा व इतर परिसरात जुने पोल वापरून पथदिप व्यवस्था करणे	आर.पी.एन्टरप्राइरजेस,	24 दि.11/09/2013 व 56 दि.08/10/2013	49986	47397	1422	474	1896
3	नविन नाशिक विभागातील प्र.क्र.41 मध्ये विविध ठिकाणी जुने पोल वापरून पथदिप व्यवस्था	मे.आर.पी.एन्टरप्राईजेस, नाशिक	23 दि.11/09/2013 व 57 दि.08/10/2013	49984	47420	1423	474	1897

	करणे							
4	नविन नाशिक प्र.क्र. 1 मधील जगतापनगर भागातील खराब बॉक्स बसविणे	आर.पी.एन्टरप्राईजेस.	18 दि.19/09/2013 व 58 दि.08/10/2013	49932	47435	1423	474	1897
5	नविन नाशिक मा.सभापती कार्यालयातील वॉल फॅन बदलणे तसेच विदयुत विषयक कामे करणे	श्रीपाद इलेक्ट्रीकल्स,	22 दि.30/08/2013 व 44 दि.02/09/2011	49787	47585	1428	476	1904
6	नविन नाशिक प्र.क्र.45 मधील विविध भागातील खराब बॉक्स बसविणे	श्रीपाद इलेक्ट्रीकल्स	15 दि.23/08/2013 व 39 दि.26/08/2013	49945	47981	1439	480	1919
7	नविन नाशिक प्र.क्र.52	मे.श्रीपाद इलेक्ट्रीकल्स	4 दि.25/07/2013 व 27	49851	47586	1428	476	1904

	मधील पिंपळगांव खांबघरपट्टी व दवाखाना इमारतीस विदयुतीकरण करणे		दि.30/07/2013					
8	नविन नाशिक प्र.क्र.51 अंबडगांव येथील सुलभ शौचालयास विदयुतीकरण करणे	मे.श्रीपाद इलेक्ट्रीकल्स	12 दि.31/07/2013 व 30 दि.05/085/2013	49584	47541	1426	475	1901
9	नविन नाशिक विभगातील स्वामी विवेकानंद तरणतलाव येथे टयुब व वाटरकुलर बसविणे	मे.श्रीपाद इलेक्ट्रीकल्स	10 दि.27/07/2013 व 29 दि.31/07/2013	49552	46989	1410	470	1880
10	नविन नाशिक प्र.क्र.49 मधील खुटवडनगर येथील आभ्यासिका इमारतीस	मे.श्रीपाद इलेक्ट्रीकल्स	19 दि.12/08/2013 व 34 दि.21/08/2013	49679	46633	1399	467	1866

	वायरींग करणे.							
11	नविन नाशिक विभागातील फायर स्टेशन कार्यालयाची रिवायरींग करणे	श्रीपाद इलेक्ट्रीकल्स	5 दि.25/07/2013 व 28 दि.30/07/2013	49721	42989	1290	430	1720
				एकूण	517056	15513	5171	20684

उपरोक्त 1 ते 11 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.5,17,056/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. वरील नमूद कामे हे दरपत्रकानुसार करण्यात आलेले आहेत. परंतु दरपत्रके मागविण्याबाबतचे विभागाचे अभिलेखे नस्तीमध्ये आढळून आलेले नाहीत.

2. वरील नमूद कामातील मंजूर निविदाधारकाने व्हॅट प्रमाणपत्र सादर केले नसतांना शासन अधिसूचना दि.04.04.2012 नुसार अनोंदणीकृत ठेकेदाराकडून कार्यकंत्राट कर 5 टक्के प्रमाणे रक्कम रू.25853/- वसुल होणे आवश्यक होते. परंतु त्यांच्या अंतिम देयकामधून 2 टक्के रक्कम कपात केली असल्याने उर्वरीत 3 टक्के होणारी एकूण रक्कम रू.15513/- संबधिताकडून वसुल होणे आवश्यक आहे.

3. वरील नमूद कामातील मंजूर दरपत्रकधारकांनी महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विकास/1098/प्र.क्र.

/2889/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नुसार कामगारांचा कामाचा विमा काढलेला नसल्याने त्यांच्या अंतिम देयकातून 1 टक्का विमा रक्कम वसुल केलेली नाही. तरी 1 टक्का होणारी एकूण रक्कम रू.5171/- वसुल होणे आवश्यक आहे.

4. उपरोक्त तक्ता क्र.1 मधील सर्व कामांच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत. मोजमाप नोंदवहीत नोंदविलेली मापे उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांनी केलेली विहित टक्के तपासणी तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 135 ते 138 नुसार कार्यवाही केली अथवा नाही या बाबतची पडताळणी करता आलेली नाही.

5. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भाखस-1088(2522)/उद्योग-6/दि. 2/1/1992 मधील परिच्छेद 10.6 व परिशिष्ट अकरा नुसार फल्युरोसंट टयुब्स,चोक्स,स्टार्टर, स्ट्रीट लाईट,फिक्चर,पीव्हीसी अँड व्ही आय आर केबल्स, स्ट्रीट लाईट फिटिंग्ज इ. साहित्य लघुउद्योगाकडून खरेदीसाठी राखुन ठेवण्यात आलेल्या आहेत. असे असुनही उपरोक्त विवरणपत्रातील खरेदी केलेले इलेक्ट्रीक साहित्य लघु उद्योगाकडुन खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

6. दि.02/01/1992 च्या शासननिर्णयानुसार वरील विवरणपत्रातील खरेदी केलेले विदयुत साहित्य खरेदीकरतांना खरेदीच्या प्रचलित पद्धतीचा अवलंब केल्याचे दिसून येत नाही.

7. उपरोक्त सर्व कामांसाठी वापरण्यात आलेले साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्तकरून नस्तीबद्ध करण्यात आलेला नाही त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशा नुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

8. तसेच बरेचशा कामात जुने साहित्य बदलेले असल्याने जुन्या साहित्यांची काय विल्हेवाट लावली अथवा ते परत स्टॉक रजिष्टरमध्ये जमा केले याची खात्री साठानोंदवही अभावी करता आली नाही.

40 विदयुत विभागाकडील पंचवटी विभागा अंतर्गत सन 2013-2014 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 35

लेखा शीर्ष : पथदिप विदयुतीकरण म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 8371027.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8286292.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 84735.00/-

जाहिरातीची प्रत नस्ती सोबत जोडण्यात आलेली नाही, कामाची तांत्रिक मान्यता देतांना कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करतांना क्रमांक व दिनांक नमूद केलेला नाही. महाराष्ट्र शासन, उदयोग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परी.क्र.8.3 (ब) मधील मार्गदर्शक सुचना नुसार निविदा चौकशीला, दोन मुदतवाढ न देता एकच मुदतवाढ घेऊन मक्तेदाराची निवड केली आहे. दरसूचीमध्ये नमूद केलेल्या स्टँडर्ड अँड स्पेसीफिकेशन मधील अटीनुसार साहित्य वापरल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही. ठेकेदाराने VAT नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर केलेले नाही. मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध केल्या नाहीत. नगरसेवक निधीतून द्यावयाच्या कामाची अंदाजित किंमत रु. 2 लक्ष्य पेक्षा जास्त असता कामा नये अशा स्पष्ट सूचना असतांना सदर शासन निर्देशाचे पालन झालेले नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मुद्दा 187 (ए) टीप 6 नुसार कार्यकारी अभियंत्यांनी 10% पेक्षा कमी प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात विद्युत विभागाकडील पंचवटी विभागांतर्गत खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता, सदर कामांवर रक्कम रु.83,71,027/- इतका

खर्च केला आहे.

तक्ता क्र. 1

अ. क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रू.	प्रशासकीय मान्यता व लेखा शिर्ष	तांत्रिक मान्यता	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व निविदा स्वीकृत आदेश क्रमांक व दिनांक, स्विकृत निविदा दर	मोज माप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम रू.
1	नाशिक पंचवटी प्र.क्र.2 दिगंबर सोसायटी रस्त्यावर पथदिप व्यवस्था करणे.	महासभा ठराव क्र. 565 दि.17/10/2013, रक्कम रू.1389988/- पथदिप विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.1389988/- दर सुची 2011-2012	जा.क्र मनपा/विदयुत/.11 दि.05/06/2013	मे.गौरव इलेक्ट्रोमेख,नाशिक, आयुक्त आदेश क्र.269 दि.18/15/135 टक्के कमी दरानुसार रू.1188581/-	क्र. 2545 पृ.क्र. 41 ते 45, 72 ते 79	1153237
2	नाशिक पंचवटी प्र.क्र.3 स.न.172 हिरावाडी नाशिक, पथदिप उभारणी करणे.	महासभा ठराव क्र. 553 दि.17/01/2013, रक्कम रू.610379/- पथदिप विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.704243/- दर सुची 2011-2012	जा.क्र मनपा/विदयुत/.27 दि.08/07/2013	मे.तिल्लोत्तमाइलेक्ट्रीकल ॲन्ड सर्व्हिस,नाशिक, आयुक्त आदेश क्र.27 दि.18/05/13 11.1 टक्के कमी दरानुसार रू.543176/-	क्र. 2583 पृ.क्र. 68 ते 77, व पुस्तक क्र.2677, पृ.क्र. 40 ते 45	543176
3	नाशिक पंचवटी प्र.क्र.10 मधील	महासभा ठराव क्र.	कार्यकारी अभियंता	जा.क्र मनपा/विदयुत	मे.एस.जी.ए. इलेक्ट्रीक कॉर्पोरेशन	क्र. 2552	1150740

	राहूलवाडी, वैशालीनगर,तेलंगवाडी मुख्य रस्त्यावर ऑक्टोगोनल पाले उभारणे बाबत.	287 दि.24/05/2011, रक्कम रू.1342559/- 5 टक्के राखीव निधी	(वि.) क्र. व दिनांक निरंक रू.1342559/- दर सुची 2009-2010	/.81 दि.15/12/2011	,नाशिक आयुक्त आदेश क्र.1910 दि.02/12/11 1 टक्के कमी दरानुसार रू.1329133/-	पृ.क्र. 30 ते 43	
4	नाशिक पंचवटी प्र.क्र.2 चारी क्र.7 हळदे वस्ती रस्त्यावर पथदिप व्यवस्था करणे.	महासभा ठराव क्र. 1048 दि.18/10/2013, रक्कम रू.1090039/- पथदिप विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.1090039/- दर सुची 2011-2012	जा.क्र मनपा/विदयुत /.25 दि.01/07/2013	मे.प्रविण एन्टरप्राईजेस,नाशिक, आयुक्त आदेश क्र.298 दि.27/05/13 13.99 टक्के कमी दरानुसार रू.842003/-	क्र. 2078 पृ.क्र. 148 ते 154	840883
5	नाशिक पंचवटी प्र.क्र.2 337/344/ 345/346/347 वृंदावन नगर व विविध ठिकाणी पथदिप व्यवस्था करणे.	महासभा ठराव क्र. 566 दि.17/1/2013, रक्कम रू.1351409/- पथदिप विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.1351409/- दर सुची 2011-2012	जा.क्र मनपा/विदयुत /.10 दि.03/06/2013	मे.एस.टी.कुंडारीया, नाशिक, आयुक्त आदेश क्र.279 दि.18/05/13 3 टक्के कमी दरानुसार रू.1176182/-	क्र. 2552 पृ.क्र. 52 ते 59	1173921
6	नाशिक पंचवटी प्र.क्र. 3 त्रिकोणी बंगला, सागरदेव रो-हाऊसेस ते स.नं. 234 रस्त्यावर व	महासभा ठराव क्र. 1053 दि.18/03/2013, रक्कम रू.710674/- नगरसेवक	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.710674/- दर सुची	जा.क्र मनपा/विदयुत /.18 दि.07/06/2013	मे.के.आर.इलेक्ट्रीकल्स, नाशिक, आयुक्त आदेश क्र.276 दि.18/05/13 5 टक्के कमी दरानुसार	क्र. 2545 पृ.क्र. 80 ते 51	572503

	विविध ठिकाणी पथदिप व्यवस्था करणे.	निधी.	2011-2012		रू.582254/-		
7	नाशिक पंचवटी प्र.क्र.2(ब) वृंदावन नगर ते लोकधारा सोसायटी 18 मी.डी.पी.रोडवर विविध ठिकाणी पथदिप व्यवस्था करणे.	महासभा ठराव क्र. 1049 दि.18/03/2013, रक्कम रू.1729518/- पथदिप विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.1729518/- दर सुची 2011-2012	जा.क्र मनपा/विदयुत/.15 दि.05/06/2013	मे.सुयोग इलेक्ट्रीकल्स को.ऑप.लेबर सोसायटी,नाशिक, आयुक्त आदेश क्र.280 दि.18/05/13 3 टक्के कमी दरानुसार रू.1468597/-	क्र. 2098 पृ.क्र. 131 ते 137	1467647
8	पंचवटी प्र.क्र.2 स.न. 275 ते 283 पाटाचा रस्ता व विविध ठिकाणी (दिगंबर सोसा.)पथदिप व्यवस्था करणे	महासभा ठराव क्र.1047 दि.18/03/2013, रक्कम रू.1095439/- पथदिप विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि) क्र. व दिनांक निरंक. रू.1095439/- दरसुची 2011-12	जा.क्र. मनपा/विदयुत/ 36 दि.24/08/2013	मे.ई.सोल्युशन्स, नाशिक, आयुक्त आदेश क्र.281 दि.18/05/2013,	क्र.2544 पृ.क्र.76 ते 82	984359
9	नाशिकृ पंचवटी प्र.क्र. 9 मायको हॉस्पीटलचे नवीन इमारतीचे इलेक्ट्रिफिकेशन करणे.	महासभा ठराव क्र. 282 दि.22/02/2013, रक्कम रू.499932/- इमारती विदयुतीकरण	कार्यकारी अभियंता (वि.) क्र. व दिनांक निरंक रू.499932/- दर सुची 2011-2012	जा.क्र मनपा/विदयुत/.16 दि.07/06/2013	मे.सुयोग इलेक्ट्रीकल्स को.ऑप.लेबर सोसायटी,नाशिक, आयुक्त आदेश क्र.280 दि.18/05/13 3 टक्के कमी दरानुसार रू.484934/-	क्र. 2676 पृ.क्र. 69 ते 79	484561
							83710

							27

उपरोक्त 1 ते 9 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.83,71,027/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त कामांसाठी निविदा सुचनेत नमूद केल्याप्रमाणे मक्तेदाराकडून बी-1 या विहीत नमुन्यातील करारनामा करून घेण्यात आलेला नाही.

2. उपरोक्त कामांसाठी दिलेल्या जाहिरातीची प्रती तक्ता क्रमांक 1 मधील अ.क्र. 4 च्या कामाव्यतिरीक्त इतर कामांमतध्ये नस्ती सोबत जोडण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर संचिकांच्या जाहिरात प्रक्रियेबाबत तपासणी करता आलेली नाही.

3. वरील सर्व कामाची तांत्रिक मान्यता देतांना कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करतांना क्रमांक व दिनांक नमूद केलेला नाही.

4. दरसूचीमध्ये नमूद केलेल्या स्टॅंडर्ड अॅंड स्पेसीफिकेशन मधील अटीनुसार Bureau of Energy Efficiency नुसार तीन स्टार किंवा त्यावरील दर्जा असलेले साहित्य वापरणे आवश्यक आहे.तथापि त्या नुसार साहित्य वापरल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही.

5. दरसूचीमध्ये नमूद स्टॅंडर्ड अॅंड स्पेसीफिकेशन नुसार मापन पुस्तकात कामाची मापे नमूद केल्यानंतर सदरील काम दरसूचीच्या स्पेसीफिकेशनप्रमाणे झाल्याचे प्रमाणपत्र नमूद केलेले नाही.

6. दरसूचीमधील सर्वसाधारण सूचनानुसार विद्युत कामांमध्ये वापरलेले साहित्य ERDA/CPRI किंवा केंद्र/राज्य शासनाच्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासणे आवश्यक आहे. तथापि संबधित प्रयोगशाळे कडून अशी तपासणी केलेली दिसून येत नाही.

7. तक्ता क्र.1 अ.क्र. 1 मधील मंजूर निविदाधारकाने निविदेसोबत सादर केलेल्या व्हॅट प्रमाणपत्रावर फर्मचे नांव नसल्याने त्यांना प्रदान केलेल्या रकमेतून कार्यकंत्राट 5 टक्के रक्कम अनुक्रमे रू.57662/- वसुल होणे आवश्यक होते. परंतु त्यांच्या अंतिम देयकामधून 2 टक्के रक्कम कपात केली आहे.संबधिताचे व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र लेखापरीक्षणास दर्शवावे अन्यथा उर्वरीत 3 टक्के होणारी रक्कम रू.34597 संबधिताकडून वसुल होणे आवश्यक आहे.

8. तक्ता क्र.1 -अ.क्र.1 मधील कामातील अंदाजपत्रकातील बाब क्र.2 नुसार C.C. Foundation ची उभारणी कामपूर्ण स्थळदर्शक नकाशानुसार 55 नग नवीन पोलसाठी केले असतांना मक्तेदारास मात्र 56 नगासाठीची रू.1021/- प्रतीनगा प्रमाणे एकूण रक्कम रू.57176/- प्रदान केली आहे. 1 नगाची जादा रक्कम प्रदान झाल्याने रू.1021/- मधून प्राकलनाच्या 5 टक्के कमी रक्कम रू.51/- वजा जाता एकूण रक्कम रू.970/- अनावश्यक प्रदान झाले आहे.

9. तक्ता क्र.1 -अ.क्र.1 मधील कामातील अंदाजपत्रकातील बाब क्र.3 नुसार Street light Bracket ची उभारणी कामपूर्ण स्थळदर्शक नकाशानुसार 55 नग नवीन पोलसाठी केले असतांना मक्तेदारास मात्र 56 नगासाठीची रू.509/- प्रतीनगा प्रमाणे एकूण रक्कम रू.28504/- प्रदान केली आहे. 1 नगाची जादा रक्कम प्रदान झाल्याने रू.509/- मधून प्राकलनाच्या 5 टक्के कमी रक्कम रू.25/- वजा जाता एकूण रक्कम रू.484/- अनावश्यक प्रदान झाले आहे.

10.तक्ता क्र.1 -अ.क्र.1 मधील कामातील अंदाजपत्रकातील बाब क्र.4 नुसार Pipe type Earthing ची उभारणी कामपूर्ण

स्थळदर्शक नकाशानुसार 55 नग नवीन पोलसाठी केले असतांना मक्तेदारास मात्र 56 नगासाठीची रू.788/- प्रतीनगा प्रमाणे एकूण रक्कम रू.44128/- प्रदान केली आहे. 1 नगाची जादा रक्कम प्रदान झाल्याने रू.788/- मधून प्राकलनाच्या 5 टक्के कमी रक्कम रू.39/- वजा जाता एकूण रक्कम रू.749/- अनावश्यक प्रदान झाले आहे.

11. तक्ता क्र.1 -अ.क्र.1 मधील कामातील अंदाजपत्रकातील बाब क्र.10 नुसार FRP Box ची उभारणी कामपूर्ण स्थळदर्शक नकाशानुसार 55 नग नवीन पोलसाठी केले असतांना मक्तेदारास मात्र 59 नगासाठीची रू.599/- प्रतीनगा प्रमाणे एकूण रक्कम रू.35341/- प्रदान केली आहे. 4 नगाची जादा रक्कम प्रदान झाल्याने रू.2396/- मधून प्राकलनाच्या 5 टक्के कमी रक्कम रू.120/- वजा जाता एकूण रक्कम रू.2276/- अनावश्यक प्रदान झाले आहे.

12. तक्ता 1- अ.क्र. 1 मधील कामातील अंदाजपत्रकातील बाब क्रं.8 व 9 नुसार 6 मीटरचे 40 जुने पाईप व त्यावरील फीटींग काढणेसाठी तरतुद केली होती. पैकी 34 नगच जुने पाईप व त्यावरील फिटींग काढणेसाठी अनुक्रमे रक्कम रू.375/- प्रतीनगा प्रमाणे रू.12750/- व 58/- प्रतीनगा प्रमाणे एकूण रक्कम रू.1972/- इतकी रक्कम प्रदान केली आहे. मात्र सदरचे काढलेले जुने पोल व त्यावरील फिटींग परत स्टोर मध्ये जमा केल्याबाबतची नोंद केलेली नसल्याने सदरचे पोल व त्यावरील फिटींगचा वापर इतरत्र केला असल्यास तसे प्रमणित करावे.

13. तक्ता 1- अ.क्र. 1 मधील कामाचा कामपुर्ण दाखला नस्तीमध्ये जोडलेला नसल्याने सदरचे काम मुदतीत पूर्ण झाल्याची पडताळणी करता आली नाही.

14. तक्ता क्र.1 -अ.क्र.2 मधील कामातील अंदाजपत्रकातील बाब क्र.2 नुसार C.C. Foundation ची उभारणी अंदाजपत्रकात तरतुद केल्याप्रमाणे व कामपूर्ण स्थळदर्शक नकाशानुसार 24 नग नवीन पोलसाठी केले असतांना मक्तेदारास मात्र 30 नगासाठीची रू.1021/- प्रतीनगा प्रमाणे एकूण रक्कम रू.30630/- प्रदान केली आहे. 6 नगाची जादा रक्कम प्रदान झाल्याने रू.6126/- मधून प्राकलनाच्या 11.01 टक्के कमी रक्कम रू.674/- वजा जाता एकूण रक्कम रू.5452/- अनावश्यक प्रदान झाले आहे.

15. तक्ता क्र.1 -अ.क्र.2 मधील कामातील अंदाजपत्रकातील बाब क्र.3 नुसार Street light Bracket ची उभारणी अंदाजपत्रकात तरतुद केल्याप्रमाणे व कामपूर्ण स्थळदर्शक नकाशानुसार 24 नग नवीन पोलसाठी केले असतांना मक्तेदारास मात्र 30 नगासाठीची रू.509/- प्रतीनगा प्रमाणे एकूण रक्कम रू.15270/- प्रदान केली आहे. 6 नगाची जादा रक्कम प्रदान झाल्याने रू.3054/- मधून प्राकलनाच्या 11.01 टक्के कमी रक्कम रू.336/- वजा जाता एकूण रक्कम रू.2718/- अनावश्यक प्रदान झाले आहे.

16. तक्ता क्र.1 -अ.क्र.2 मधील कामातील अंदाजपत्रकातील बाब क्र.4 नुसार Pipe type Earthing ची उभारणी अंदाजपत्रकात तरतुदीप्रमाणे व कामपूर्ण स्थळदर्शक नकाशानुसार 24 नग नवीन पोलसाठी केले असतांना मक्तेदारास मात्र 30 नगासाठीची रू.788/- प्रतीनगा प्रमाणे एकूण रक्कम रू.4728/- प्रदान केली आहे. 6 नगाची जादा रक्कम प्रदान झाल्याने रू.788/- मधून प्राकलनाच्या 11.01 टक्के कमी रक्कम रू.521/- वजा जाता एकूण रक्कम रू.4207/- अनावश्यक प्रदान झाले आहे.

17. तक्ता क्र.1 -अ.क्र.2 मधील कामातील अंदाजपत्रकातील बाब क्र.8 नुसार FRP Box ची उभारणी अंदाजपत्रकात तरतुदीप्रमाणे व कामपूर्ण स्थळदर्शक नकाशानुसार 24 नग नवीन पोलसाठी केले असतांना मक्तेदारास मात्र 30 नगासाठीची रू.599/- प्रतीनगा प्रमाणे एकूण रक्कम रू.17970/- प्रदान केली आहे. 6 नगाची जादा रक्कम प्रदान झाल्याने

रू.3594/- मधून प्राकलनाच्या 11.01 टक्के कमी रक्कम रू.396/- वजा जाता एकूण रक्कम रू.3198/- अनावश्यक प्रदान झाले आहे.

18. तक्ता क्र.1 अ.क्र. 2,4,7 व 8 मधील कामात बाब क्र.10 अ.क्र.5,6 मधील कामात बाब क्र. 12 नुसार Meter Box - प्रतीनग रू.17259/- प्रमाणे प्रदान केली आहे. परंतु सदर Meter Box चे दर दरसुची मध्ये नमूद नसल्याने मार्केट रेट नुसार आकारण्यात आलेला आहे. त्याबाबतचे दरपृथकरण व पुरवठादाराचे चलन,पावत्या इ. नस्तीमध्ये आढळून आले नसल्याने सदरचे दर बाजारभावानुसार योग्य व वाजवी असल्याची पडताळणी करता आली नाही.

19. तक्ता 1- अ.क्र. 2 मधील कामाचा कामपुर्ण दाखल्यावर दाखला निर्गमित केल्याची तारीख नमूद नसल्याने प्रत्यक्ष काम कधी पूर्ण झाले याची पडताळणी करता आली नाही.

20. तक्ता 1- अ.क्र. 3 मधील कामाची निविदा महाराष्ट्र शासन, उदयोग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परी.क्र.8.3 (ब) मधील मार्गदर्शक सुचना नुसार एखादया निविदेतुन कमी प्रतीसाद मिळाल्यास निविदा चौकशीला, दोन मुदतवाढ देने आवश्यक आहे. तथापि, एकच मुदतवाढ घेऊन उपलब्ध एकच प्राप्त निविदेतूनच मक्तेदाराची निवड करण्यात आली आहे त्यामुळे ख-या अर्थाने स्पर्धात्मक दरांचा लाभ सदर कामाबाबत महानगरपालिकेस होऊ शकलेला नाही.

21. तक्ता क्र.1 अ.क्र. 3 मधील कामाचे पहिल्या धावत्या देयकातून 0.25 टक्के स्था.सं.कराची रक्कम रू.2063/- कपात केली नाही.

22. तक्ता क्र.1 अ.क्र. 3 मधील बाब क्र.10 व 11 नुसार 6 मीटरचे 22 जुने पोल व त्यावरील फिटींग काढून टाकण्यात आली असून त्यासाठी मक्तेदारास अनुक्रमे रक्कम रू.8580/- व 946/- प्रदान केली आहे. परंतु सदरचे जूने पोल व त्यावरील फिटींग भांडारात जमा केल्याबाबतची नोंद नस्तीमध्ये आढळून आली नाही.

23. तक्ता क्र.1 अ.क्र. 4 मधील कामात बाब क्र. 1 नुसार 7 Mtr long GI tubular pole कामपूर्ण स्थळदर्शक नकाशानुसार 39 नग बसविल्याचे दर्शविते व 3 नग Old existing pole व 1 नग एमएसईबी पोल असल्याने एकूण 43 नग पोल उभारले आहेत. परंतु अंतिम देयकात मात्र 42 नग नविन पोल (7 Mtr long GI tubular pole) प्रतीपोल रू.9213/- प्रमाणे एकूण रक्कम रू.386946/- प्रदान केली आहे. कामपूर्ण स्थळदर्शक नकाशानुसार 39 नग नवीन पोल उभारले असतांना 3 नगाचे एकूण रक्कम रू.27639/- अतिरीक्त रक्कम प्रदान झाली आहे. सदरच्या रकमेतून प्राकलनाच्या 13.99 टक्के रक्कम रू.3297/- वजा जाता एकूण रक्कम रू.24342/- अनावश्यक प्रदान झाले आहे.

24. तक्ता क्र.1 अ.क्र. 4 मधील कामात कामपूर्ण स्थळदर्शक नकाशात 43 नगापैकी 1 नग पोल हा एमएसईबीचा असल्याने बाब क्र. 2,3,4,8 नुसार 42 नग पोलच्या प्रमाणातच C.C.foundation, Street light bracket, Pipe type earthing व FRP Box बसविणे आवश्यक होते. परंतु मक्तेदारास 43 पोलच्या प्रमाणात C.C.foundation, Street light bracket, Pipe type earthing व FRP Box बसविल्याचे रक्कम प्रदान केली आहे. 1 नग पोल हा एमएसईबीचा असल्याने त्यावरील उभारण्यात आलेले वरील साहित्याचा खर्च एमएसईबी मार्फत करणे आवश्यक होते. तरी वरील प्रमाणे अतिरीक्त 1 नगाचे C.C.foundation करीता रक्कम रू.1021/-, Street light bracket करीता रू.509/-, Pipe type earthing करीता रू.788/- व FRP Box करीता रू.599/- असे एकूण रक्कम रू.2917/- प्राकलनाच्या 13.99 नुसार होणारी रक्कम रू.408/- वजा जाता एकूण रक्कम रू.2509/- अनावश्यक प्रदान झाले आहे.

25. तक्ता क्र1 अ.क्र. 4 मधील कामात एकूण 43 नग पोल पैकी 3 नग पोल हे जूने पोल असल्याचे दर्शविल्याने 3 नग जूने पोल भांडारातून कमी केल्याबाबतची नोंद नस्ती मध्ये कोठेही आढळून आलेली नाही. तरी याबाबत योग्य ती खात्री होणे आवश्यक आहे.

26. तक्ता क्र.1 अ.क्र. 4 मधील काम दि.27/09/2013 रोजी पूर्ण झाले असून taken over on 15/10/2013 असे नमूद केले आहे. तसेच दाखला निर्गमित केल्याची तारीख नमूद केलेली नाही.

27.तक्ता क्र.1 अ.क्र. 5 मधील सदर कामाचे बाब क्रमांक 10 नुसार अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीप्रमाणे व कामपूर्ण स्थळदर्शक नकाशानुसार 50 नग नवीन पोल उभारण्यात आले असतांना 50 नगच FRP Box बसविणे आवश्यक होते. परंतु मोजमाप पुस्तकातील नोंदी नुसार 8 जुने पोलवरील FRP Box Replacement केल्याचे दर्शविले आहे. जुने FRP Box भांडारात जमा केल्याबाबतची नोंद नस्तीमध्ये आढळून आली नाही. सदरचे जुने FRP Box भांडारात जमा होणे आवश्यक आहे.

28. तक्ता 1- अ.क्र. 5 मधील कामातील अंदाजपत्रकातील बाब क्रं.8 व 9 नुसार 6 मीटरचे 10 जुने पाईप व त्यावरील फीटींग काढणेसाठी तरतुद केली होती. पैकी 34 नगच जुने पाईप व त्यावरील फिटींग काढणेसाठी अनुक्रमे रक्कम रू.375/- प्रतीनगा प्रमाणे रू.3750/- व 58/- प्रतीनगा प्रमाणे एकूण रक्कम रू.580/- इतकी रक्कम प्रदान केली आहे. मात्र सदरचे काढलेले जुने पोल व त्यावरील फिटींग स्टोर मध्ये जमा केल्याबाबतची नोंद केलेली नसल्याने सदरचे पोल व त्यावरील फिटींगचा वापर इतरत्र केला असल्यास तसे प्रमणित करावे.

29. तक्ता क्र. 1- अ.क्र. 6 मधील काम हे नगर सेवक निधी मधून करण्यात आले आहेत. नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक AMC-14200/2264/प्र.क्र.144/न.वी./24 दिनांक 26/02/2009 नुसार नगरसेवक स्वेच्छा निधीतून घ्यावयाची कामाची अंदाजित रक्कम दोन लक्ष पेक्षा जास्त असता कामा नये. असे असतांना सदरचे कामासाठी दिलेली मंजुरी अनियमित आहे.

30. तक्ता क्र.1 अ.क्र. 5 मधील कामात मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 63 नुसार कार्यकंत्राट कामाचा करारनामा रू.10 लाखा पर्यंतसाठी रू.100/- चे मुद्रांकावर व 10 लाखाचे वर असेल तर रू.100/- अधिक 10 लाखाचे पुढील प्रत्येक लाखासाठी रू.100/- अधिकत्तम रू.5 लक्ष च्या मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. त्यानुसार कामातील एकूण रक्कम रू.11,76,182/- इतक्या रकमेची मंजूर निविदेनुसार करारनामा रू.300/- इतक्या रकमेच्या मुद्रांकावर करणे आवश्यक असतांना रू.100/- च्या मुद्रांकावर केल्याने रू.200/- चा कमी मुद्रांक शुल्क वसुल करून "0030" मुद्रांक व नोंदणी या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

31. तक्ता क्र.1 अ.क्र. 3, 5,6 व 8 मधील कामे पूर्ण झाले बाबत पुर्णत्वाच्या दाखल्यावर अनुक्रमे दि.13/02/2012, दि.27/09/2013, दि.02/08/2013 व दि.08/08/2013 हया तारखा नमूद आहेत. मात्र पुर्णत्वाचा दाखला अनुक्रमे दि.16/08/2013, दि.17/10/2013, दि.29/08/2013 व दि.10/10/2013 रोजी विलंबाने निर्गमित केलेले आहेत.

32. तक्ता क्र.1 अ.क्र. 9 मधील बाब क्र.28 - water cooler 230/250 Volts 50 (80 ltr.) करीता दरसुची सन 2011-12 Item No.3-3-3 नुसार रू.42082/- या दराप्रमाणे रक्कम प्रदान केली आहे. परंतु दरसुची सन 2011-12 नुसार , Item No.3-3-3 साठी रू.41082/- या प्रमाणे दर असल्याने रू.1000/- जादा प्रदान झाले आहेत. तरी सदरची रक्कम प्राकलनाच्या 3 टक्के रू.30/- वजा जाता एकूण रू.970/- वसुल होणे आवश्यक आहे.

33. तक्ता क्र.1 अ.क्र. 2 व 4 मधील कामासाठी न्यूनतम मक्तेदार यांची अंदाजपत्रकीय दराच्या अनुक्रमे 11.01 टक्के व 13.99 टक्के कमी दराची निविदा स्विकारण्यात आली तथापि 10% पेक्षा कमी दराची निविदा स्विकृत करताना महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मुद्दा 187 (ए) टीप 6 नुसार कार्यकारी अभियंत्यांनी 10% पेक्षा कमी प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक होते. तथापि तशी कार्यवाही केलेली नाही.

34. उपरोक्त तक्ता क्र.1 मधील अ.क्र.1,2,6 च्या कामांची मोजमाप पुस्तिके लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही मोजमाप नोंदवहीत नोंदविलेली मापे उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांनी केलेली विहित टक्के तपासणी तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 135 ते 138 नुसार कार्यवाही केली अथवा नाही या बाबतची पडताळणी करता आलेली नाही.

35. उपरोक्त सर्व कामांसाठी वापरण्यात आलेले साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्तकरून नस्तीबद्ध करण्यात आलेला नाही त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशा नुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

41 विदयुत विभागाकडील पंचवटी विभागा अंतर्गत सन 2013-2014 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 7

27	श्री.नितीन नंदु परमार	आडगांव ट्रक टर्मिनल, सुविधा गाळा क्र.7	128800
28	श्री.नंदकुमार गोविंद सकपाळ	आडगांव ट्रक टर्मिनल, सुविधा गाळा क्र.8	131600
29	श्री.चौधरी	आडगांव ट्रक टर्मिनल, सुविधा गाळा क्र. B-6	83700
30	श्री.राजकुमार रामेश्वरदास शर्मा	आडगांव ट्रक टर्मिनल, सुविधा गाळा क्र. B-19	54000
31	श्री.रतनलाल दगडूराम शर्मा	गाळा क्रमांक - C/8	65700
32	श्री. सुर्यवंशी	गाळा क्रमांक - C/11	78300
33	श्री.किशोर बबनराव ठाकरे	गाळा क्रमांक - C/13	78300
	<u>मागील सिंहस्थ काळातील वाहनतळ व स्टॉल्सची थकबाकी</u>		
34	श्री. विनोद काशीनाथ गाडे	पेठरोड स.नं.22, एस.टी.वर्कशॉप, पंचवटी येथील वाहनतळ	50000
35	श्री.अरुण दामू शिंदे	औरंगाबाद रोड स.नं.277, वाहनतळ	143300
	<u>इलेक्ट्रीक पोलवरील जाहीरात फलक</u>		
36	श्री.कीरण नवले	जाहीरात फलक	508528
	<u>वस्त्रांतरगृह</u>		

37	श्री.गोपालभाई मुरलीधर मेहता	वस्त्रांतरगृह	97428
<u>वाहनतळ सर्व्हीस टॅक्स थकबाकीदार</u>			
38	श्री.शेखर शिवाजी देवरे	वाहनतळ	57349
39	श्री.अंबादास शंकर शेजवळ	वाहनतळ	158084
<u>इलेक्ट्रीक पोलवरील जाहीरात फलक सर्व्हीस टॅक्स थकबाकीदार</u>			
40	श्री.किरण नवले	इलेक्ट्रीक पोलवरील जाहीरात फलक	62680
सर्व्हीस टॅक्स कर			268929
सरकारी शिक्षण कर			418934
रोजगार हमी कर			104393
एकूण			**17171896**

थकबाकीदारांची रक्कम एवढया मोठया प्रमाणात थकीत असताना देखील विभागीय कार्यालयाने सन 2013-2014 या वर्षात थोडया प्रमाणात रकमेची वसूली केली आहे. यामुळे वर्षानुवर्षाची थकबाकीत वाढ होत आहे. यामुळे महानगर पालिकेस मोठया प्रमाणात प्राप्त होवू शकणाऱ्या उत्पन्नापासून महानगरपालिका वंचित राहत आहे. सदर थकीत रकमेमुळे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. थकीत रकमा वसुलीबाबत प्रभावी उपाययोजना केल्याचे दिसून येत नाही. याबाबत ठोस उपाययोजना करुन प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 61, Hmm No : 83)

62 घरपट्टी कर व पाणीपट्टी कर वसूलीचे धनादेश न वटल्याबाबतची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 04

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 647189.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 647189.00/-

महानगरपालिकेच्या पुर्व विभागीय कार्यालयातील 41 मालमत्ता धारकांनी घरपट्टी कर / पाणीपट्टी कराची रक्कम रुपये 6,47,189/- धनादेशाद्वारे महानगपालिकेस भरणा केलेले आहेत. मात्र सदर धनादेश वटलेले नसताना मालमत्ताधारकांना वसुलीची पावती देण्यात आलेली आहे.

नाशिक महानगर पालिकेच्या पूर्व विभागीय कार्यालयातील सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील घरपट्टी कर / पाणीपट्टी कर वसुली रकमांच्या निवडक प्रकरणांची पडताळणी केली असता लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिलेल्या पावती पुस्तक, भरणा किर्द, न वटलेले धनादेश नोंदवही इत्यादी अभिलेख्याचे लेखापरीक्षणाअंती सन 2013-2014 या कालावधीत न वटलेले धनादेश नोंदवहीवरून सोबत जोडलेल्या यादीतील 41 मालमत्ता / पाणीपट्टी धारकांनी मालमत्ता व पाणीपट्टीची वसूली एकूण रक्कम रू 6,47,189/- धनादेशाद्वारे महानगपालिकेस भरणा केलेले आहेत. मात्र सदर धनादेश संबंधित बॅकेत सादर केल्यानंतर मालमत्ताधारकांच्या बॅक खाती पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने अथवा इतर कारणास्तव धनादेश वटलेले नाहीत परंतू सदर धनादेश प्राप्त होताच मालमत्ता / पाणीपट्टी धारकांना त्याच दिवशी वसूलीची पावती देण्यात आलेली आहे.

CHEQUE BOUNCE LIST 2013-2014

अ.क्र	इंडेक्स क्रमांक	धनादेश क्र.	दिनांक	बँकेचे नाव	रक्कम
1	2	3	4	5	6
1	82105632	285329	26/4/2013	CORPORATION BANK	11431
2	80702925	77	28/6/2013	BANK OF INDIA	20793
3	80906437	98684	23/07/2013	HDFC BANK	97478
4	80702052	256734	6/8/2013	BANK OF MAHARASHTRA	17014
5	8070053	256735	6/8/2013	BANK OF MAHARASHTRA	18710
6	80103734	550259	6/8/2013	NAMCO BANK	38820
7	30907270	372942	12/9/2013	HDFC BANK	580
8	82106686	166117	17/9/2013	COSMOS BANK	1517
9	82100587	156476	17/9/2013	STATE BANK OF INDIA	31947
10	30306221	71125	23/9/2013	STATE BANK OF INDIA	14062
11	82100631	347421	5/10/2013	STATE BANK OF INDIA	10998
12	80800258	534305	9/10/2013	BANK OF MAHARASHTRA	10568

13	80602137	278115	18/10/2013	RAJLAXMI BANK	7613
14	80900056	48753	21/10/2013	IDBI BANK	2410
15	80900025	48752	21/10/2013	IDBI BANK	151
16	80602906	23	28/11/2013	BANK OF MAHARASHTRA	1829
17	82105063	492699	28/09/2013	NAMCO BANK	68527
18	80102857	177386	19/2/2014	NAMCO BANK	7023
19	80701134	655	16/2/2014	VISHWAS BANK	11495
20	83100496	118782	7/2/2014	IDBI BANK	4840
21	83107876	100027	10/2/2014	KALYAN SAHAKARI BANK	2763
22	83107855	621196	10/2/2014	AANDHRA BANK	5684
23	80103738 AND 39	373060	28/2/2014	NAMCO BANK	15866
24	80103265	294185	29/2/2014	UCO BANK	4488
25	80101950	855568	27/2/2014	NAMCO BANK	9992
26	81900347	787124	18/2/2014	NAMCO BANK	6414
27	81902709	859854	21/2/2014	BANK OF INDIA	1622
28	80103611	963505	18/2/2014	CANARA BANK	10000
29	82100614	424111	24/2/2014	NAMCO BANK	7586
30	80701500	1001	13/3/2014	CITI UNION BANK	6095
31	80400514	268	13/3/2014	BANK OF BARODA	2827
32	80600122	80626	16/3/2014	SHRIPR PEOPLE BANK	3000
33	80102082	19393	12/3/2014	VIJAYA BANK	5000
34	80101662	182943	24/3/2014	GODAVARI BANK	50000
35	80800869	8864	26/3/2014	GODAVARI BANK	4391
36	80801420	967437	25/3/2014	STATE BANK OF INDIA	2000
37	80701857	138865	28/3/2014	FEDERAL BANK	27275
38	80701014	138864	25/3/2014	FEDERAL BANK	27062
39	80102724	182944	28/3/2014	GODAVARI BANK	58058
40	8090178	252173	21/02/2014	IDBI BANK	5000

41	80602111 AND 2112	257578	31/3/2014	IDBI BANK	14260
	TOTAL				**647189**

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदरचे धनादेश न वटल्याने सोबत जोडलेल्या यादीतील नमूद रक्कम प्रत्यक्षात मालमत्ता / पाणीपट्टी धारकांकडून वसूल करण्यात आली किंवा कसे? याबाबत लेखा परिक्षणास पडताळणी करता आलेली नाही.

2) सदर रक्कम वसूल न झाल्यास पुन्हा मागणीमध्ये वाढ करण्यात आल्याबाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाही.

3) सदर रक्कम मालमत्ता / पाणीपट्टी धारकांनी विलंबाने भरणा केली असल्यास नियमानुसार शास्तीची रक्कम वसुली किंवा शास्तीची रक्कम मागणीमध्ये वाढविण्यात आल्याबाबतची तसेच दंडाची वसुली केल्याबाबतची माहिती उपलब्ध झालेली नाही.

4) न वटलेले धनादेशाबाबत संबंधित मालमत्ता / पाणीपट्टी धारकांवर बॅक नियमानुसार तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार न्यायिक अथवा दंडनीय कार्यवाही करण्यात आली किंवा कसे? याबाबतची माहिती सादर करण्याबाबत अर्धसमास पत्राद्वारे विचारणा केली असता माहिती अप्राप्त आहे.

याबाबत ठोस उपाययोजना करुन प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर
कार्यवाही करुन रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 62, Hmm No : 84)

63 पंचवटी विभागातील मालमत्ता कर आकारणीतील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 06

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब

पंचवटी विभागातील मालमत्ता धारकांचे मालमत्ता कर आकारणी करताना अर्ज दिलेल्या तारखेपासून किंवा बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळाल्या दिनांकापासून आकारणी करणे आवश्यक असताना 9 ते 10 महिने उशीराने कराची आकारणी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

नाशिक शहरातील मिळकतींवर कर आकारणी करणेसाठी महानगरपालिकेस कायदयाने अधिकार दिलेले आहेत या

करापासून मिळणारे उत्पन्नाचा विनियोग नागरी सेवा पुरविणेकरीता होतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 127 व कराधान नियम प्रकरण 8 मधील तरतुदीनुसार नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीतील बांधीव मिळकती व खुल्या जागांवर कर आकारणी करण्यात येते. नियम 7 मधील तरतुदीनुसार क्षेत्रफळाच्या मोजमापाप्रमाणे योग्य भाडेमुल्य निश्चित करण्यात येते. मिळकतीचे वापरात असलेले चटई क्षेत्र विचारात घेऊन क्षेत्रानुसार मनपाने निश्चित केलेले भाडेमुल्य विचारात घेऊन वार्षिक भाडेमुल्य काढण्यात येते.

नाशिक महानगर पालिकेच्या पंचवटी विभागीय कार्यालयाचे सन 2013-2014 चे मालमत्ता कर आकारणीचे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निवडक नस्तींचे लेखापरीक्षण केले असता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1) श्री.उन्मेश सुरेशचंद्र बेदमुथा यांनी मालमत्ता कर आकारणी करणेबाबतच्या अर्जावर दि.06/06/2011 पासून सदर मिळकतीवर राहात असून मालमत्ता कराची आकारणी उपरोक्त दिनांकापासून करण्याबाबत विनंती केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात दि.01/04/2013 पासून त्यांच्या मालमत्तेची कर आकारणी करण्यात आलेली आहे.

2) श्री.बाजीराव बाबुराव तांबे (Index No.30800527) यांनी मालमत्ता कर आकारणी करणेबाबतच्या अर्जामध्ये दि.01/01/2012 पासून मालमत्ता वापर करत असल्याने मालमत्ता कर आकारणीबाबत विनंती केलेली आहे परंतु प्रत्यक्षात दि.01/04/2013 पासून मालमत्तेची आकारणी करुन तशी वसुली करण्यात आलेली आहे.

3) सौ.सुरेखा केशव पाटील (गुंजाळ) (Index No.31510089)

4) सौ.मनीषा मधुकर चव्हाण (Index No.31510090)

5) श्री.बाळकृष्ण मुरलीधर दिघे (Index No.31510093)

6) श्रीमती कल्पना सुभाष पाटील (गुंजाळ) (Index No.31510091)

सदर मालमत्ता धारकांनी मालमत्ता कराची आकारणी करणेबाबतचा अर्ज दि.21/05/2012 रोजी विभागास दिला असून अर्ज सादर केलेल्या दिनांकापासून मालमत्ता कराची आकारणी करणेबाबत विनंती केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात आकारणी दि.19/03/2013 पासून केलेली आहे.

अर्ज दिलेल्या तारखेपासून किंवा बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळाल्या दिनांकापासून मालमत्ता कराची आकारणी करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त नागरीकांचे अर्ज केल्यापासून 9 ते 10 महिने उशीराने कराची आकारणी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे फेरआकारणी करुन मालमत्ता कराची वसुली करण्यात यावी.

FDSRKNM8201 (Ref No : 63, Hmm No : 89)

64 जन्म - मृत्यु फी च्या जमा रकमेतील तफावतीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 0

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

सन 2013-14 या कालावधीतील जन्म – मृत्यु विभागातील फी रकमांचा एकत्रित भरणा किर्द व लेखाविभागाकडील जमा खतावणीशी ताळमेळ घेतला असता रक्कम रुपये 1,04,187/- इतकी तफावत दिसून येत आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या पश्चिम विभागीय कार्यालयातील सन 2013-14 या कालावधीतील जन्म - मृत्यु विभागातील फी रकमांचा एकत्रित भरणा किर्द व लेखाविभागाकडील जमा खतावणीशी ताळमेळ घेतला असता , भरणा किर्दप्रमाणे प्रत्यक्ष वसुल रक्कम रुपये 2,92,810/- एवढी असून लेखा विभागाकडील प्रत्यक्ष जमा रक्कम (लेजरप्रमाणे) रुपये 1,88,623/- इतकी आहे. व रक्कम रुपये 1,04,187/- इतकी तफावत दिसून येत आहे.

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 51 नुसार लेखापालाने जमा पुस्तकात दर्शविलेली एकूण जमा रक्कमेशी मासिक लेखे बंद केल्यावर किं वा पुर्ण केल्यावर रकमांचा ताळमेळ पडताळून घेणे आवश्यक असून त्यात काही विसंगती आढळल्यास ती सत्वर दूर करणे आवश्यक आहे . जन्म - मृत्यु फी च्या जमा रकमांमध्ये तफावत असताना संबंधितांनी नियमातील तरतुदीप्रमाणे उचित कार्यवाही केली नसल्याने तफावत निर्माण होऊन ती कायम राहिली आहे.

तरी विसंगतीबाबत योग्य ताळमेळ घेण्यात यावेत तसेच जमा रकमांमधील तफावती नियमानुरुप सत्वर दूर होईल याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

FDSRKNM8201 (Ref No : 38, Hmm No : 73)

65 नविन नाशिक विभागातील वार्ड क्र.80 मधिल कामठवाडे शिवारातील लेंडीनाल्यावर कामठवाडे स्मशानभूमी व धन्वंतरी मेडिकल कॉलेज जवळ बॉक्स कर्व्हट बांधणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष : पावसाळी गटार योजना मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 6241118.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5888119.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 352999.00/-

Providing earth work in embankment या बाबीसाठी रु.383 प्र.घ.मी.ऐवजी रु.444.50 प्र.घ.मी. ने अदाई केल्याने रु.134476 जादा अदाई झाली आहे. Standard specification for road work आर.डी. 12.10 "mode of mesurment for earthwork embackment नुसार एकूण परीमाणातून 5 टक्के दबाई घट वजा करणे

आवश्यक आहे. तथापि तशी 5 टक्के वजावट न केल्याने रक्कम रु. 48600 चे जादा प्रदान झालेले आहे. सदर कामाच्या दरपृथ: करणात रु.35.34 प्र.घ.मीटर प्रमाणे रॉयल्टीचा समावेश करण्यात आलेला आहे.त्यानुसार 2935.25 घ.मी.साठी रु.103732 एवढी रॉयल्टी देयकातून कपात करून शासन खाती भरणा आवश्यक असतांना तशी कपात देयकातून करण्यात आलेली नाही. दरपृथ: करणात रॉयल्टीचा समावेश केला असल्यामुळे 35.34 च्या 9.5% रु.3.36 दराने 2935.25 घ.मी.साठी रु.9862 ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. खोदकामातील कठीण मुरूम न वापरल्यामुळे ठेकेदारास 123.6 घ.मी. साठी रु.416.20 दराने त्यावर निविदा जादा दर रु.9.5% असे एकूण 455.74 दराने रु.56329 अनावश्यक प्रदान झाले आहे.

नाशिक महानगरपालिका नाशिक चे सन 2013-14 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात भूमिगत गटार विभागाकडील खालील नमूद तपशिलानुसार विकास कामांची संचिका तपासली. सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1	कामाचे नांव	नविन नाशिक विभागातील वार्ड क्र.80 मधिल कामठवाडे शिवारातील लेंडीनाल्यावर कामठवाडे स्मशानभूमी व धन्वंतरी मेडिकल कॉलेज जवळ बॉक्स कर्व्हट बांधणे.
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्र.1804 दिनांक- 18/03/2011
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	रक्कम रु.60 लक्ष
4	अंदाजपत्रकीय रक्कम	अधिक्षक अभियंता क्र.NMC/UGSD/TS-185 दिनांक- 25/02/2013 रु.5999950 दरसूची- 2009-10
5	लेखाशीर्ष	रुपये- 5999950
6	निविदा / दरपत्रक प्रकार	"पावसाळी गटार योजना"
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	बी-1
8	निविदा विक्री कालावधी	1. दै.देशदूत दि.23.03.2013
9	ई निविदा	2. दै.सामना दि.24.03.2013

10	निविदा उघडल्याचा दिनांक	दि.02.04.2013 ते 09.04.2013 मुदत-16.04.13
11	न्युनतम निविदा	निविदा क्र.02-2013 निविदा सूचना क्र.03-2013
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्र.111 दि.23.05.2013
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मे.प्रदीप एकनाथ तायडे 9.50% जादा दराने रु.6257065
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक	कार्यकारी अभियंता (भुगयो) क्र.03/2013 दिनांक-07.06.2013
15	कामाची मुदत	12 महिने दि.07.06.13 ते 06.06.2014
16	मुदतवाढ	---
17	काम पूर्ण दिनांक	31.12.2013
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक	क्र. 1690 पृ.क्र. 01 ते 48
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये-6241118
20	प्रदानाचा तपशिल	धावते देयक क्र.01 ते 03 रु. 6241118

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता एकूण 01 ते 03 धावत्या देयकांन्वये झालेला खर्च रक्कम रु. 6241118 बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामाच्या Part-A बाब क्र.26 व Part –B बाब क्र.23 नुसार Providing earth work in embankment या बाबीचे अनुक्रमे 639.10 घ.मी. व 1357.87 घ.मी.एवढे काम करून रु.444.50 दराने ठेकेदारास अदाई करण्यात आलेली आहे. अंदाजपत्रक/दरपृथ:करणात नमूद सदर बाबीचे स्पेशिफीकेशन साठी जिल्हा दरसूचीतील बाब क्र. 20/276 नुसार दरपृथ:करणासह रु.383 या दराने ठेकेदारास प्रदान करणे आवश्यक होते. तथापि या प्रमाणे अदाई न केल्याने रु.61.50 व त्यावर निविदा दर 9.50% जादा दर असे एकूण रु.67.34 दराने 1996.97 घ.मी.साठी रु.134476 जादा अदाई झाल्याचे दिसून येते.

2. उपरोक्त कामाचे Part-A बाब क्र.26 व Part –B बाब क्र.23 नुसार "Earth work embackment साठी" चे एकूण परिमाण 1996.97 घ.मी. साठी रु. 444.50 प्र.घ.मी. दराने रक्कम रु.887653 चे प्रदान केले आहे. Standard specification for road work आर.डी. 12.10 "mode of mesurment for earthwork embackment" नुसार एकूण परीमाणातून 5 टक्के दबाई घट वजा करणे आवश्यक आहे. तथापि तशी 5 टक्के वजावट न

करताच एकूण परिमाणासाठी प्रदान करण्यात आलेले आहे. सबब 5 टक्के दबाई घटाचे परिमाण 99.85 घ.मी.साठी रु.444.50 व त्यावर निविदा जादा दर 9.50 % असे एकूण रु.486.73 दराने रक्कम रु. 48600 चे जादा प्रदान झालेले आहे.

3. सदर कामाच्या दरपृथ:करणात रु.35.34 प्र.घ.मीटर प्रमाणे रॉयल्टीचा समावेश करण्यात आलेला आहे.त्यानुसार 2935.25 घ.मी.साठी रु.103732 एवढी रॉयल्टी देयकातून कपात करून शासन खाती भरणा आवश्यक असतांना तशी कपात देयकातून करण्यात आलेली नाही. संचिकेत रु.02 लक्ष दगड काढनेची रॉयल्टी भरल्याचे चलन संलग्न केले आहे.तथापि त्यावर कामाचे नाव व संबधित ठेकेदाराचे नाव नसल्याने सदर रॉयल्टी ह्याच कामाची असल्याबाबत सिध्द होत नाही.

4. महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2006 नुसार रुपये 35.34 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. तथापि दरपृथ:करणात रॉयल्टीचा समावेश केला असल्यामुळे 35.34 च्या 9.5% रु.3.36 दराने 2935.25 घ.मी.साठी रु.9862 ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे.

5. सदर कामाच्या Part A- बाब क्र.7 द्वारे 35.38 घ.मी. व Part B- बाब क्र.4 द्वारे 107.31 घ.मी.कठीण मुरूम खोदकाम केले आहे.तसेच Part A- बाब क्र.28 द्वारे 82.53 घ.मी. व Part B- बाब क्र.25 द्वारे 88.22 घ.मी.कठीण मुरूम पुरविल्याबाबत ठेकेदारास रु.416.20 दराने अदाई करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता खोदकामातील कठीण मुरूम वापरणे आवश्यक होते. तथापि तसा तो न वापरल्यामुळे ठेकेदारास 123.6 घ.मी. साठी रु.416.20 दराने त्यावर निविदा जादा दर रु.9.5% असे एकूण 455.74 दराने रु.56329 अनावश्यक प्रदान झाले आहे.

6. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. तथापि M-20 व्यतिरिक्त इतर साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

7. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

66 भूमिगत गटार विभागाकडील विकास कामांचे लेखापरीक्षणात आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 09

लेखा शीर्ष :भुगयो शासन निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 5726703.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5303562.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 423141.00/-

सदर कामांसाठी वापरलेल्या Rifilling trenches या बाबीची रॉयल्टीची रक्कम रु. 421347 वसूल केलेली नाही. तांत्रिक माण्यतेपुर्वी निविदा प्रसिध्द करणेत आली आहे. दर पृथकरण करतांना जकात कराचा समावेश करण्यात आल्याने रक्कम रु.1794 ठेकेदारास जादा प्रदान झाल्याचे दिसून येते. आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 187 (ए) टीप 6 (तीन) नुसार कार्यकारी अभियंत्यांनी कमी प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक आहे तथापि अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

नाशिक महानगरपालिका नाशिक चे सन 2013-14 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात भूमिगत गटार विभागाकडील खालील नमूद तपशिलानुसार विकास कामांच्या संचिका तपासल्या. सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	प्रशासकीय मान्यता क्र.दि. रक्कम	तांत्रिक मान्यता क्र.दि. रक्कम	कामावर झालेला खर्च	Rifilling चे परिमाण घ.मी.	Royalty चा दर प्र. घ.मी.	रक्कम
1	नविन नाशिक प्रभाग क्र.49 मधिल एकनाथ दातीर मळा (एक्सलो पोईंट) ते	महासभा ठराव क्र. 104 दिनांक- 15/06/2013 रक्कम रु. 4890585	कार्यकारी अभियंता क्र. NMC/UGSD/TS/528दिनांक 14/10/2013 रु. 4890585 दरसूची- 2012-13	3446776	3307.33	70.67	233729

	खान बंगल्या पर्यंत मुख्य मलवाहिनी टाकणे						
2	नविन नाशिक प्रभाग क्र.52 मधिल पाथर्डी गावातील उर्वरित भागात ड्रेनेज लाईन टाकणे	महासभा ठराव क्र.740 दिनांक- 18/03/2013 रक्कम रु. 2424905	कार्यकारी अभियंता क्र. NMC/UGSD/ दिनांक- 14/02/2013 रु.24 24905 दरसूची- 2011-12	1817235	1030.85	70.67	72850
3	नाशिक पूर्व प्रभाग क्र.54 मधिल मेहबूबनगर नविन मदरसा मागे संडास जवळ भूमिगत आर.सी.सी. गटार टाकणे	महासभा ठराव क्र. 438 दिनांक- 18/02/2014 रक्कम रु. 499989	कार्यकारी अभियंता क्र. NMC/ USG/ 14 दिनांक- 24/01/2014 रु. 499989 दरसूची- 2012-13	462692	273.39	70.67	19320
4	नाशिक पूर्व विभागातील टाकळीगाव ते मुंबई नाका पर्यंत नासर्डी नदी लगतच्या	महासभा ठराव क्र. 711 दिनांक- 15/03/2013 रक्कम रु. 3015895	अधिक्षक अभियंता क्र. NMC/UGSD/TS-102 दिनांक- 02/01/2013 रु. 3015895 दरसूची- 2011-12	अनुपलब्ध	1350.62	70.67	95448

	मुख्य मलवाहिक ेची वार्षिक देखभाल दुरुस्त ी करणे						
	एकूण			5726703	5962.19		421347

उपरोक्त अ.क्र. 01 ते 04 कामावर झालेल्या रु.5726703 खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख,दिनांक-15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे.तथापि उपरोक्त नमूद तपशिलानुसार सदर कामांसाठी वापरलेल्या Rifilling trenches या बाबीची रु.70.67 प्रति घन मीटर दराने रॉयल्टीची रक्कम रु. 421347 वसूल केलेली नाही तरी ती वसूल करून "853 गौण खनिज" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

2. उपरोक्त अ.क्र. 01 येथील कामास तांत्रिक मान्यता दिनांक-14.10.2013 रोजी दिली असतांना निविदा प्रसिध्दी दिनांक-13.07.2013 रोजी केली आहे. तांत्रिक माण्यतेपुर्वी निविदा प्रसिध्द करणे अनियमित आहे.

3. उपरोक्त अ.क्र. 01 येथील मलवाहिका टाकणेसाठी एकूण 4311.47 घ.मी.खोदकाम केले आहे. मलवाहिका बुजवण्यासाठी (Refilling) खोदकामातील 3307.33 घ.मी.साहित्य वापरण्यात आले आहे. उर्वरित 1004.14 घ.मी.पैकी 568.23 घ.मी.साहित्य वाहून (Conveying) दुसरीकडे टाकले आहे. शिल्लक 435.91 घ.मी.साहित्याच्या विल्हेवाट बाबत मोजमाप पुस्तिकेत नोंद घेतल्याचे दिसून येत नाही.

4. उपरोक्त अ.क्र. 02 येथील कामात बाब क्र. 07 खोदकामासाठी (Excavation for pipe trenches in unfissured hard rock) रु.1641 (0 ते 1.5 मीटर) व रु. 1684.80 (1.5 ते 03 मीटर) या दराने प्रदान केले आहे. सदर बाबीचे स्पेसिफीकेशन नुसार महाराष्ट्र जिवन प्राधिकरण दरसूची बाब क्र. 11 नुसार अनुक्रमे रु.800.80 व रु.825 प्र.घ.मीटर दराने अदाई करणे आवश्यक होते. संचिकेत संलग्न खोदकामाच्या अभिलेख्यानुसार (फोटो वगैरे) सदर ठिकाणी कुठेही unfissured hard rock असल्याचे दिसून येत नाही. खोदाकामाच्या ठीकानी दलदलीची/चिखलाची (Muddy land) जमीन असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यानुसार खोदकामाचे दर अंदाजपत्रकात अंतर्भूत करून अदाई करणे आवश्यक होते.

5. उपरोक्त अ.क्र. 04 येथील कामात दर पृथकरण करतांना जकात कराचा समावेश करण्यात आलेला आहे. माहे मे 2013 मध्ये जकात बंद झाल्याने खालील तपशिलानुसार रक्कम रु.1794 ठेकेदारास जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

अ.क्र.	बाब	जकातीचा दर	परिमाण	रक्कम
1	P/L dry rubble soling	13.13	4.05	53
2	P/C B.B.masonary manhole	1394.70	1.00	1395
3	Construction additional depth for manhole	288.66	1.20	346
	एकूण			1794

6. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/ उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळाकडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळामार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. उपरोक्त अ.क्र. 01 व 03 कामासाठी वापरण्यात आलेले 200mm 300mm आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

7. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 187 (ए) टीप 6 (तीन) नुसार कार्यकारी अभियंत्यांनी कमी प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक आहे तथापि अ.क्र. 01,02 व 04 वरील प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8. मोजमाप पुस्तिकेत कामाच्या एकत्रित गोषवारा मध्ये कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी केल्याचे शेरे नोंदविले आहेत तथापि त्यांनी नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही.

9. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

67 नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजनेसंबंधी लेखे न ठेवलेबाबतची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब

शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक सीपीएस/1007/18/एसईआर 04 दि. 07/07/2007 अन्वये दिनांक 1 नोव्हेंबर 2005 नंतर शासकीय सेवेत रुजू होणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना (DCPS) लागू करणेत आली असून सदर शासन निर्णयानुसार कर्मचा-यांचे लेखे ठेवण्यात ओलेले नाहीत.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक सीपीएस/1007/18/एसईआर 04 दि.07/07/2007 अन्वये दिनांक 1 नोव्हेंबर 2005 नंतर शासकीय सेवेत रुजू होणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना (DCPS) लागू करणेत आलेली आहे. सन 2013-2014 या वित्तीय वर्षात DCPS योजना लागू असलेल्या कर्मचा-यांची एकूण संख्या त्यांचे ब्रॉडशिट, लेजर लेखे तयार केलेले नाहीत. DCPS कपात केलेली रक्कम कर्मचाऱ्यांचे खाती जमा होवून मनपाने जमा केलेले समतुल्य अंशदान मिळून जमा झालेल्या रकमेवर व्याजाची आकारणी करून ते व्याज कर्मचा-यांचे खाती जमा केलेबाबतचा अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध झालेला नाही. शासन निर्णयात नमूद DCPS लागू असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची (FORM 1 मध्ये भरणेत आलेली) माहिती तसेच DCPS लागू असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचा DCPS खाते क्रमांकाचा दिलेला नाही व (FORM R3) चे वाटप करणेत आलेले नाही. वित्तीय वर्षामध्ये प्राप्त झालेल्या निधीची गुंतवणूक केल्याबाबतचा अभिलेख उपलब्ध झालेला नाही. सदरची नवीन परिभाषीत अंशदान योजना पालिकेमध्ये कधीपासून लागू करणेत आली आहे, त्याचा संवर्गनिहाय कर्मचा-यांचा गोषवारा तयार केलेला नाही तसेच सदर योजना उशीरा लागू केली असल्यास थकबाकीची रक्कम संबंधिताच्या खात्यावर जमा केली असल्याबाबतचे लेखे तयार केलेले नाहीत.

DGPVJTM8301 (Ref No : 56, Hmm No : 30)

68 सन 2013-2014 या कालावधीत नगरसचिव विभागातील अल्पोपहार बाबींवरील आकस्मित खर्च या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या अनियमितते बाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 5141252.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5141252.00/-

महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमामधील कलम क्रमांक 63 ते 66 खाली ज्या खर्चाच्या बाबीसाठी खर्चाचे अधिकार दिले आहे त्यामध्ये अल्पोपहार व चहापान खर्चाचा समावेश होत नसतांना सदर खर्च करण्यात आला. सदरचा खर्च करतांना विना निविदा व दर पत्रके न मागविता केलेला आहे. अल्पोपहार व चहापान इत्यादी खर्चासाठी कोणतेही कार्यादेश देण्यात आलेले संचिकेत दिसुन आलेले नाहीत. पुरवठादारांच्या उपप्रमाणकांवर प्रदानार्थ मंजुर व अदा करून रद्द केले असे शेरे नमूद करून स्वाक्ष-या केलेल्या नाहीत. बैठकीसाठी प्रती व्यक्ती रू50/- व शासनाच्या मंजुरीने जास्तीत जास्त प्रती व्यक्ती रू100/- या पेक्षा अधिक खर्च करण्याची तरतुद नसतांना विभागाने मात्र प्रती व्यक्ती रू50/- ते रू100/- पेक्षा जास्त खर्च केलेला आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे नगरसचिव विभागातील आकस्मिक खर्च नस्तीच्या निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण केले असता नगरसचिव विभागा अंतर्गत महापौर कार्यालय, महापौर निवासस्थान (रामायण बंगला), उपमहापौर कार्यालय येथे वेळोवेळी भेट देणारे पाहुणे, स्थायी समिती बैठक व महासभेच्या बैठकीसाठी होणा-या अल्पोपहार व चहापा़न यासाठी सन 2013-2014 या वित्तीय वर्षात खालील प्रमाणे एकूण अंदाजे रक्कम रू 51,41,252/- इतका खर्च केलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ)महापौर निवासस्थान व कार्यालयासाठी करण्यात आलेला खर्च

अक्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	पुरवठाकाराचे नांव	रक्कम रूपये
1	आदेश क्र. 215 दिनांक 9/5/2013	रामायण दुध खर्च	बिलाल खतीफ	12450
		रामयण अल्पोपहार व किरकोळ खर्च	एच.एस.कदम, नाशिक	39070
		रामायण अल्पोपहार खर्च	अनिलसिंग मदनसिंग परदेशी	484750
		इतर खर्च	अनिस शेख	1261
		चहा व कॉफी	राजेंद्र पांडूरंग माळेकर	27400

			एकूण	**5,64,931**
2	आदेश क्र 1021 दिनांक 22/10/2013	रामायण दुध खर्च	बिलाल खतीफ	30476
		रामयण अल्पोपहार व किरकोळ खर्च	एच.एस.कदम, नाशिक	90650
		रामायण अल्पोपहार खर्च	अनिलसिंग मदनसिंग परदेशी	957805
		चहा व कॉफी	राजेंद्र पांडूरंग माळेकर	59805
		अल्पोपहार व चहापान खर्च	सागर स्वीटस	264127
			एकूण	**1402863**
		एकूण (अ)		**1967794**

ब) उप महापौर कार्यालयासाठी अल्पोपहार व चहापान खर्च

अक्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	पुरवठाकाराचे नांव	रक्कम रूपये
1	आदेश क्र. 285 दिनांक 22/5/2013	चहा व कॉफी	राजेंद्र पांडूरंग माळेकर	31610
		अल्पोपहार खर्च	अनिलसिंग मदनसिंग परदेशी	256725
		अल्पोपहार व चहापान खर्च	सागर स्वीटस	264978
			एकूण	553313
2	आदेश क्र. 1020 दिनांक 22/10/2013	अल्पोपहार खर्च	अनिलसिंग मदनसिंग परदेशी	1214195
		चहा व कॉफी	राजेंद्र पांडूरंग माळेकर	46625
			एकूण	1260820
		एकूण (ब)		**1814133**

क)स्थायी समिती सभा करिता चहापान व अल्पोपहार खर्च

अक्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	पुरवठाकाराचे नांव	रक्कम रूपये
1	आदेश क्र. 1019 दिनांक 22/10/2013	अल्पोपहार खर्च	अनिलसिंग मदनसिंग परदेशी	161240
		चहा व कॉफी	राजेंद्र पांडूरंग माळेकर	34584
		इतर खर्च	अनिस शेख	1845
		एकूण (क)		**197669**

ड) महासभेकरिता चहापान व अल्पोपहार खर्च

अक्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	पुरवठाकाराचे नांव	रक्कम रूपये
1	आदेश क्र. 1022 दिनांक 22/10/2013	अल्पोपहार खर्च	अनिलसिंग मदनसिंग परदेशी	1161656
		एकूण (ड)		**1161656**
एकूण अंदाजे खर्च (अ+ब+क+ड)				**5141252**

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमामधील कलम क्रमांक 63 ते 66 खाली ज्या खर्चाच्या बाबीसाठी खर्चाचे अधिकार दिले आहे त्यामध्ये सदरच्या खर्चाचा समावेश होत नाही. तरी सदर खर्च कोणत्या प्राधिकारान्वये करण्यात आला. या बाबत विभागाने अभिप्राय देण्यात यावे.

2) अल्पोपहार व चहापानासाठी एकूण रु.51,41,252/- एवढा खर्च सन 2013-2014 मध्ये झालेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची "ड" प्रकरण 5 (2) नुसार महानगरपालिकेने कुठलाही माल किंवा सामुग्री खरेदी करण्यासाठी 7 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहीराती नोटीस देऊन अशा खरेदीसाठी निविदा मागविणे आवश्यक असतांना विना निविदाव दरप्रत्रके न मागविता वरील खरेदी केलेली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/2512/उघोग-6 दिनांक 02.01.1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 (फ) अन्वये प्रत्येक बाबीसाठी वर्षभरात रू 50,000/- पेक्षा ज्यादा खर्च असल्यास त्यासाठी जाहिर निविदा प्राप्त

करून त्यानंतरच खर्च करणे आवश्यक आहे. तथापि नाशिक महानगरपालिकेने मा. महासभा ठराव क्र 859 दिनांक 19.11.2005 अन्वये सदर खर्चाची मर्यादा शिथिल करून मा.स्थायी समिती ने ठराव क्रमांक 1174 दिनांक 20.10.2011 अन्वये कोणतीही दरपत्रके न मागविता खर्च करण्याचा ठराव पारित केलेला आहे. मात्र सदरील ठराव महानगरपालिकेच्या हिताचा नसून निविदा प्रक्रिया न राबविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ नाशिक महानगरपालिकेस झालेला नाही. परिणामी विशिष्ठ पुरवठादाराकडुन अल्पोपहार व चहापान करीता खरेदी केला असल्याने जादा खर्च झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अशा प्रकारच्या साहित्यांची वारंवार आवश्यकता भासत असल्यास निविदा काढून वार्षिक दर मंजूर शक्य असताना अशी कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही.

3) नाशिक महानगर पालिकेने स्थायी समिती व महासभेदरम्यान अल्पोपहार व चहापानासाठी अनुक्रमे रक्कम रूपये 1,97,669/- व रक्क्म रू. 11.61,656/- इतका खर्च केला आहे, शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक विअप्र-10.08/प्र.क्र.70/2008/विनियम, दिनांक 15 मे 2009 मधील (अ.क.10 नियम 31(अ) अन्वये) महाराष्ट्र आकस्मीक खर्च नियम 1965, नियम 31(अ),(1) व (2) नुसार बैठकीकरीता व जी बैठक दोन तासांपेक्षा अधिक कालावधीकरीता चालते त्याकरीता चहापानासाठी व अल्पोपहार खर्च अनुज्ञेय आहे. परंतु अशा बैठकीचे, सभेचे कामकाज बराच वेळ चालल्याचे अपेक्षित असावे. अशा वेळी चहा, कॉफी या सारखी सौम्य पेये देण्याचे अनुज्ञेय आहे. काही प्रसंगी बैठक तीन तासांपेक्षा जास्त काळ चालण्याची शक्यता असल्यास चहाबरोबर फराळाचे पदार्थही देता येतात. अशा प्रकरणात प्रती व्यक्ती रू.50/- व शासनाच्या मंजुरीने जास्तीत जास्त प्रती व्यक्ती रू.100/- या पेक्षा अधिक खर्च करण्याची तरतुद नसतांना विभागाने मात्र प्रती व्यक्ती रू.50/- ते रू.100/- पेक्षा जास्त खर्च केलेला आहे.

4) अल्पेपहार व चहापान इत्यादी खरेदीची उप प्रमाणके यांची तपासणी केली असता, संबंधित पुरवठादारांना सदरील खर्चासाठी कोणतेही कार्यादेश देण्यात आलेले संचिकेत दिसुन आलेले नाहीत. परिणामी पुरवठयाचे परिमाण, दर कोणकोणत्या बाबी पुरवठाकाराने पुरविणे आवश्यक आहे, याची कोणतीही तपासणी आणि पडताळणी न करता संबंधिताना रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत. संबंधित पुरवठाकारानी प्रत्यक्षात किती अल्पेपहार व चहापान इत्यादींचा पुरवठा केलेला आहे, याची कोणतीही माहीती/ अभिलेखे देण्यात आलेली नाही. परिणामी पुरवठाकारांना रक्कम अतिप्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच प्रदान करण्यापूर्वी आवश्यक ती तपासणी नमूद करून व पुरवठादारकांच्या उपप्रमाणकांवर प्रदानार्थ मंजुर, व अदा करून रद्द केले असे शेरे नमूद करून स्वाक्ष-या केलेल्या नाहीत.

5) देयकांच्या रकमा अदा करण्यापूर्वी अल्पोपहार व चहापान केल्याच्या खर्चाची तपशिल दर्शविणारी आकस्मीक खर्चाची नोंदवही व अल्पोपहार व चहापानावरील खर्च कोणकोणत्या अभ्यांगतांसाठी केला याबाबतच्या कुठल्याही नोंदी ठेवलेल्या नाहीत.

वरील उणिवांवरून असे दिसून येते की, मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

69 नगरसचिव विभागातील मा. महापौर यांचे स्वीय सचिव, मा.सभापती स्थायी समिती यांचे स्विय सचिव तसेच नगरसचिव विभागातील कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला (O.T) प्रदान करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 952969.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 952969.00/-

केंद्र तसेच राज्य शासनाने कार्यालयीन कामकाजासाठी फक्त वाहन चालक आणि शिपाई यांच्यासाठी त्यांच्या वेतनाच्या 50% च्या मर्यादेत अतिरीक्त कामाचा मोबदला अनुज्ञेय असतांना महानगरपालिकेने नगरसचिव विभागातील स्विय सचिव, लिपीक यांना मोठया प्रमाणात अतिरीक्त कामाचा मोदबला दिला आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे नगरसचिव विभागातील निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण करण्यात आले असता नगरसचिव विभागातील मा.महापौर यांचे स्वीय सचिव यांना 3,37,010/-, मा.सभापती स्थायी समिती यांचे स्वीय सचिव यांना 1,32,773/- नगरसचिव विभागातील वाहन चालक यांना 6,30,971/- व महानगरपालिकेतील इतर कर्मचारी यांना 3,21,998/- अशी एकूण 9,52,969/- इतक्या रकमेचा अतिरिक्त कामाचा मोबदला दिला आहे. सदर रक्कम ही सन 2013-2014 या कालावधीच्या नगरसचिव विभागाच्या स्थायी आस्थापना या लेखाशिर्षातील वजावट नोंदवहीच्या अनुषंगाने असून सदरची देयके लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाहीत , यास्वत सदर रकमेची गणना कशाप्रकारे केली , याबाबतची पडताळणी लेखापरिक्षणास करता आलेली नाही. सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय सादर करण्यात येत आहे.

1. नाशिक महानगरपालिकेने महासभा ठराव क्र.1823 दिनांक 18.3.2011 अन्वये वरील प्रमाणे अतिरिक्त कामाचा मोबदला अदा करण्यासाठी ठराव पारित केलेला आहे. त्याअनुषंगाने मा. आयुक्त यांनी आदेश क्र.888 दि. 25.10.2012 अन्वये मंजुरी आदेश निर्गमित केलेले आहेत. राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे सार्वजनिक सुट्टी दिवशी काम केल्यास त्यासाठी बदली रजा (compensatory holiday) संबंधितांना मंजुर करता येते मात्र अशा प्रकारे कार्यालयीन काम करण्यासाठी अतिरिक्त मोबदला अदा करण्याची कार्यवाही प्रचलित नाही.

2. मा. आयुक्त, नाशिक यांचे आदेश क्रमांक 888 दि.25.10.2012 मध्ये सुट्टीच्या दिवशी कर्मचाऱ्यांना कामावर बोलविण्यापुर्वी संबंधित विभागप्रमुखांनी मा.आयुक्त यांची पुर्व मंजुरी घेऊन आदेश निर्गमित केल्यानंतरच सदर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा मेहनताना अदा करण्याची कार्यवाही करावयाची आहे. मात्र अशा प्रकारे मा.आयुक्त यांची पुर्व मंजुरी आणि आदेश निर्गमित करून संबंधित कर्मचाऱ्यांना अतिरिक्त मेहनताना अदा केला

किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी खात्री करता आलेली नाही.

3. प्रचलित शासन आदेशानुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला (वाहनचालक आणि शिपाई केवळ यांच्यासाठी त्यांच्या वेतनाच्या 50% पेक्षा जास्त अनुज्ञेय नाही.) परंतू सदरचे लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्याने वाहन चालक व इतर कर्मचारी यांना अदा केलेल्या रकमेची पडताळणी करता आली नाही.

तसेच सदरील खर्च केंद्र तसेच राज्य शासनाने आपआपल्या आस्थापना मध्ये बंद केलेला असतांना असा खर्च कोणत्या प्राधिकारान्वये करण्यात आला याबातची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 60, Hmm No : 109)

70 छपाई खर्चाबाबत - पदाधिकारी, सदस्य यांचे लेटर हेड दिवाळी कार्ड, कार्यक्रम/निमंत्रण पत्रिका इ.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 673635.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 673635.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 673635.00/-

शासन निर्णय संकिर्ण – 2004/468/प्र.क्र. 84/4/नवि20, दिनांक 24/1/05 नुसार मानधनाच्या रकमेत दुरध्वनी, लेखनसामग्री व टपाल यांचा समावेश आहे. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2009/प्र.क्र.148/नवि-26, नगरविकास विभाग, मंत्रालय 32, दिनांक 22/01/2010 व मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 मधील निवड महिन्याच्या देयकांची पडताळणी करताना पदाधिकारी, सदस्य, यांचे लेटर हेड, दिवाळी कार्ड, कार्यक्रम/निमंत्रण पत्रिका, पाकिटे इत्यादी छपाईसाठी खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	मागणी पुस्तक क्र./पृष्ठ क्रमांक	दिनांक	पुरवठादार	छपाईचा तपशील	रूपये
1	247/05	9/4/13	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	महापौर, सभागृह नेता लेटर हेड व पाकिटे	21820

2	247/06	9/4/13	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	सभागृह नेता, पदाधिकारी व्हिजीटींग कार्ड, लेटर हेड	12225
3	247/22	27/5/13	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	महापौर मराठी इग्रजी लेटर हेड, पाकिटे	18310
4	247/23	27/5/13	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	महापौर, स्थायी सदस्य व्हिजीटींग कार्ड, लेटर हेड	9170
5	247/40	7/6/13	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	लेटर हेड पदाधिकारी	87100
6	247/43	19/6/13	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	स्थायी समिती सभापती लेटर हेड	17050
7	247/44	19/6/13	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	स्थायी समिती सभापती पाकिटे	21560
8	247/70	22/10/13	राका प्रिंटर्स, नाशिक	उप महापौर, सभागृह नेता पाकिटे	174800
9	247/71	22/10/13	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	महापौर, सभापती भेटकार्ड पाकिटे	250800
10	247/72	22/10/13	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	पदाधिकारी, विरोधी पक्ष नेता दिवाळी भेट कार्ड पाकिटे	60800
				एकूण	673635

उपरोक्त छपाईबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय संकिर्ण - 2004/468/प्र.क्र. 84/4/नवि20, दिनांक 24/1/05 नुसार मानधनाच्या रकमेत दुरध्वनी, लेखनसामग्री व टपाल यांचा समावेश आहे. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2009/प्र.क्र.148/नवि-26,नगरविकास विभाग, मंत्रालय 32, दिनांक 22/01/2010 अन्वये महानगरपालिका सदस्यांचे मानधन दर महा 7,500/- (अक्षरी सात हजार पाचशे) इतके झाले आहे.

2)मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

3)उपरोक्त प्रकरणी नोंदवहया, नस्त्या, प्रमाणपत्रे इ. पडताळणीवेळी झाल्या नाहीत, त्यामुळे दर निश्चिती खरेदी इत्यादीबाबत खात्री करता आली नाही.

71 सन 2013-2014 या कालावधीतील फाळके स्मारक येथील उपहारगृह, विश्रामगृह व फुड स्टॉलच्या मासिक भाडे व विदयुत थकबाकीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 05

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1056058.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1056058.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1056058.00/-

नाशिक महानगरपालिकेतील चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारक येथील 8 विश्रामगृह, उपहागृह व फुडस्टॉल ची माहे मार्च 2014 अखेर रक्कम रुपये 10,56,058/- इतकी थकबाकी असून सदर रकमा हया सन 2007 पासून आजतागायत मक्तेदारांकडे थकीत असल्यामुळे महानगरपालिकेला मिळणाऱ्या उत्पन्नापासून महानगरपालिका वंचित राहात आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या कालावधीतील चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारक येथील निवडक बाबींचे लेखापरीक्षण केले असता लेखापरीक्षणामध्ये व्यवस्थापक, नाटयगृह व फाळके स्मारक विभाग यांच्या दि.06/01/2014 च्या पत्रानुसार खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

अ.क्र.	सन	जागेचा तपशील	थकबाकीदारांचे नाव	भाडे व सेवाकर	वीजबील व सेवाकर
1	सन 2010 ते माहे डिसेंबर 2013	उपहारगृह व विश्रामगृह भाडे	श्री.प्रशांत भास्कर पवार	2,11,731/-	5,42,257/-
2	सन 2007 ते माहे मार्च 2012	फुडस्टॉल	श्री.सुर्यकांत बाहीकर	75,324/-	29,785/-
3	सन 2007 ते माहे मे 2012	फुडस्टॉल	श्री.हरीभाऊ पोखरकर	36,266/-	94,029/-

4	सन 2007 ते माहे मे 2012	फुडस्टॉल	श्री.संजय पांगारे	39,952/-	26,714/-
एकूण				3,63,273/-	6,92,785/-
एकूण थकबाकी				**10,56,058/-**	

चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारक येथील 8 विश्रामगृह व उपहागृह मासिक जागा लायसेंस फी दरमहा रक्कम रू.37,500/- या दराने चालविण्याबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 67, दिनांक 15/5/2010 अन्वये श्री. प्रशांत भास्कर पवार, प्लॉट नंबर 13 जी-1 फाल्गुन कॉलनी, राणाप्रताप चौक, सिडको, नाशिक यांना अटी व शर्तीच्या अधिन राहून दिनांक 01/11/2010 पासून सुरू करणे व या तारखेपासून ते पुढील पाच वर्ष कालावधीसाठी म्हणजेच दिनांक 31/3/2015 पावेत सुरू ठेवणेस परवानगी देण्याबाबतचा मक्ता देण्यात आला आहे. सदरचा करारनामा मक्तेदारासोबत दिनांक 27/4/2011 रोजी करण्यात आला आहे.

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) करारनाम्यातील अटी व शर्तीमधील मुददा क्रमांक 10 मध्ये प्रत्येक महिन्याचे भाडे हे मक्तेदारास आगाऊ स्वरूपात भरावे लागेल असे नमूद असताना मागणी नोंदवहीची पडताळणी केली असता मक्तेदाराने सदरचे भाडे आगाऊ स्वरूपात भरणा न केल्याने माहे मार्च 2014 अखेर भाडे व सेवाकराची रक्कम रू.2,11,731/- एवढी प्रचंड प्रमाणात थकबाकी शिल्लक असल्याचे दिसून येते.यामुळे महानगरपालिकेस प्राप्त होवू शकणाऱ्या उत्पन्नापासून महानगरपालिका वंचित राहत आहे.

2) करारनाम्यातील अटी व शर्तीमधील मुददा क्रमांक 2 मध्ये वीज / पाणी बिल हा खर्च मक्तेदाराने स्वत: सोसावयाचा आहे, परंतू मक्तेदाराने वीजेची माहे मार्च 2014 अखेर रक्कम रू 5,42,257/- एवढी थकीत ठेवलेली आहे. सदर रक्कम तात्काळ वसूल न केल्यास भविष्यात सदर थकबाकीबाबत महानगरपालिकेस अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) मा.आयुक्त यांनी दिनांक 03/06/2010 रोजी कार्योदेश दिला असता विहीत वेळेत करारनामा करणे आवश्यक होते परंतु सदर प्रकरणी दिनांक 27/04/2011 रोजी करारनामा केल्याचे उपलब्ध नस्तीवरुन दिसून येते.

4) वरीलपैकी करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास मक्तेदारास महानगरपालिकेमार्फत 15 दिवस अगोदर लेखी सूचना देऊन करार रदद केला जाईल व उपहारगृह व विश्रामगृहाची जागा ताब्यात घेऊन अनामत रक्कम सुध्दा जप्त करण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख करारनाम्यात करण्यात आलेला असून सुध्दा उपरोक्त मक्तेदारांवर काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) उपरोक्त रकमा हया सन 2007 पासून आजतागायत मक्तेदारांकडे थकीत असल्यामुळे महानगरपालिकेला मिळणाऱ्या उत्पन्नापासून महानगरपालिका वंचित राहात आहे त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

उपरोक्त प्रकरणी योग्य ती कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होईल याची दक्षता घेणे आवश्यक

आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 78, Hmm No : 141)

72 महाकवी कालिदास कलामंदिर येथील सराव हॉल आर.एम.ग्रुप नाशिक या संस्थेस कमी भाडेतत्वावर देण्यात आल्याने झालेली अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 03

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब

नाशिक महानगरपालिकेच्या महाकवी कालिदास कलामंदिर येथील सराव हॉल आर.एम.ग्रुप या संस्थेस एका वेळेस जास्तीत जास्त सात दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सरावासाठी आरक्षित करण्याची परवानगी देण्यात आली असताना सदर हॉल संपुर्ण वर्षभर नाममात्र रक्कम रु.10/- ने वापरण्यात आलेले आहे. सदर संस्थेकडून एका सत्राकरिता 100/- प्रमाणे आकारणी करणे अपेक्षित असताना सन 2006 सालापासून कमी रक्कम आकारणी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या कालावधीतील महाकवी कालिदास कलामंदिर येथील निवडक बाबींचे लेखापरीक्षण केले असता आर.एम.ग्रुप नाशिक या संस्थेस विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सरावासाठी महाकवी कालिदास कलामंदिर येथील सराव हॉल ज्यावेळी इतर संस्थेचे /व्यक्तींचे आरक्षण नसेल त्यावेळी रिकामा असेल अशा वेळेस फक्त सायंकाळी 6 ते रात्री 10 पर्यंत प्रतिदिन रू.10/- हया प्रमाणे भाडे व नियमाप्रमाणे सर्व्हिस टॅक्स आकारणी करून वापरण्यास मा.आयुक्त यांचे आदेश क्रमांक 9529, दिनांक 02/02/2006 अन्वये परवानगी देण्यात आली आहे तसेच सदर आदेशात सदर संस्थेस एकावेळी जास्तीत जास्त सात दिवस आरक्षण करता येईल तथापि महानगरपालिकेस ज्यावेळेस सदर हॉलची आवश्यकता राहिल त्यावेळेस सदर हॉल त्वरित खाली करून देणे सदर संस्थेवर बंधनकारक राहिल असे नमूद केले आहेत. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर हॉलचे आरक्षण हे एका वेळेस जास्तीत जास्त सात दिवस करण्याबाबत आदेशात नमूद केले आहे परंतु आर.एम.ग्रुप संस्थेने सदर सराव हॉलचा वापर पूर्ण वर्षभराकरीता केलेला आहे. यामुळे सदर सराव हॉल संपूर्ण वर्षात इतर संस्थेस / व्यक्तीस दिला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

2) सात दिवसांपेक्षा जास्त सराव हॉलचा वापर केल्यास सदर संस्थेकडून एका सत्राकरिता 100/- प्रमाणे आकारणी करणे अपेक्षित होते परंतू पुर्ण वर्षाकरिता एका सत्राकरीता 10/- रूपये एवढीच आकारणी केल्याने महानगरपालिकेस प्राप्त होवू

शकणाऱ्या उत्पन्नापासून महानगरपालिका वंचित राहिली आहे.

3) मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार सन 2006 पासून रक्कम रु.10/- एवढे नाममात्र शुल्क आकारण्यात येत आहे परंतु सन 2006 ते सन 2014 अखेरपर्यंत त्यात वाढ होणे अपेक्षित होते परंतु तसे न झाल्याने महानगरपालिकेस प्राप्त होवू शकणाऱ्या उत्पन्नापासून महानगरपालिका वंचित राहिली आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 117, Hmm No : 151)

73 नाशिक रोड विभागातील विविध ठीकाणांच्या खुल्या जागावर रस्ता दुर्तफा वृक्षारोपण करणे व देखभाल करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 27

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 3425000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3425000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 527017.00/-

तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास एकतर निविदा स्विकारण्याचा कालावधी वाढविणे आवश्यक होते, कालावधी वाढवूनही निविदा प्राप्त न झाल्यास पात्र पैकी एकाची निवड करून सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेसह प्रस्ताव स्थायी समितीपुढे मांडणे आवश्यक होते. अटी व शर्तीनुसार काम झालेले नाही. अटी व शर्ती पूर्ततेबाबत कोणतीही खात्री न करता देयकांच्या रकमांचे प्रदान झालेले आहे. अटी/शर्तीत नमूद केल्याप्रमाणे वेळोवेळी कामाचे अहवाल घेणे आवश्यक होते. त्यानुसार कार्यवाही झालेली नाही. पंजाब नॅशनल बॅकेची मूळ मुदत ठेव पावती मुदत संपाल्यानंतरही नस्तीस सलग्न आहेत.

नाशिकरोड विभागातील विविध ठीकाणांच्या खुल्या जागावर रस्ता दुर्तफा वृक्षारोपण करणे व देखभाल करणेबाबत जुन 2010 मध्ये महानगरपालिकेने जाहीरात देऊन निविदा मागविली त्यानुसार वृक्षसंरक्षकासह 4530 व गट रोपण पध्दतीने 1225 झाडांची लागवड करावयाची होती. सदर कामाची मुदत दि.01/02/2010 ते दि.01/02/2013 अशी 36 महिने व खर्च रक्कम रुपये 3004825/- निश्चित केला होता. या कामास वृक्षप्राधिकरण समितीची सभा क्रमांक 13 ठराव क्रमांक 128 दिनांक 04/06/2010 नुसार प्रशासकीय मंजुरी होती तर स्थायी समिती सभा क्रमांक 17 ठराव क्रमांक 375 दिनांक 29/07/2010 नुसार वित्तीय मंजुरी होती. उपरोक्त कामाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) जुन 2010 मधील जाहीरातीच्या अनुषंगाने या कामासाठी दोन मक्तेदारांच्या निविदा प्राप्त झाल्या. चेअरमन

अस्मिता मजुर बांधकाम सहाकारी संस्था मर्यादित नाशिक व मेसर्स रोहन सुभाष पाटील यांच्या अनुक्रमे 19% व 21% जादा दराच्या निविदा प्राप्त झाल्या. महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहीता परिशिष्ठ 3 (नियम 466[4])-28 नुसार तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास एकतर निविदा स्वीकारण्याचा कालावधी वाढविणे आवश्यक होते. कालावधी वाढवूनही निविदा प्राप्त न झाल्यास पात्रपैकी एकाची निवड करुन सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेसह प्रस्ताव स्थायी समितीपुढे मांडणे आवश्यक होते. परंतु नियमानुसार कार्यवाही या प्रकरणी झालेली दिसून येत नाही. निविदा प्रक्रीया जुन 2010 ची असून प्रत्यक्ष काम मे 2011 मध्ये सुरु झाले आहे. दरम्यानच्या कालावधीत सन 2010 चा पावसाळी हंगाम संपुन गेला. या कामात कोणतीही तातडी नसतानाही नियमानुसार कार्यवाही झालेली नाही. स्पर्धात्मक निविदा मागविणेबाबत नियमानुसार कार्यवाही न झाल्याने व जादा दराच्या प्राप्त निविदेपैकीच चेअरमन अस्मिता मजुर बांधकाम सहाकारी संस्था मर्यादित नाशिक यांचेकडून जादा दराने निविदा स्वीकृतीकरुन काम करुन घेण्यात आले त्यामुळे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झालेले आहे.

2) प्राप्त निविदांचे फक्त लिफाफे नस्तीस संलग्न असून निविदेसंबंधी मक्तेदाराकडून प्राप्त दस्ताऐवजे नस्तीस संलग्न नाहीत. त्यामुळे पात्रतेबाबत व दराबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

3) तुलनात्मक दरपत्रक नस्तीस संलग्न नाहीत.

4) गोषवारा, दर वर्गीकरण येथे उद्यान अधिक्षकांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. विविध 21 ठीकाणी वृक्ष संरक्षकासह व गटरोपण पध्दतीने लागवड करावयाचे यादीवर संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

5) निविदाप्रक्रीया जुन 2010 मधील असूनही डीएसआर दर सन 2007-08 चे धरुन प्राकलन का केले याबाबत कोणतीही स्पष्टता नाही तसेच चालू डीएसआर नुसार प्राकलन किती रकमेचे झाले असते याबाबतही कोणतीही माहिती नस्तीत उपलब्ध नाही. 14% जादा दराने निविदा मंजूर करण्यात आली आहे. याचे प्रयोजन कळत नाही.

6) चेअरमन अस्मिता मजुर बांधकाम सहाकारी संस्था मर्यादित नाशिक यांना दि.14/06/2010 रोजी वाटाघाटी करण्यासाठी बोलवणेबाबत दिनांक 13/07/2010 रोजी पत्र पाठविल्याचे निदर्शनास येते. पत्र पाठविल्यानंतर अल्पकालावधीत चर्चेचे नियोजन झाले असून झालेल्या चर्चेबाबत कोणतीही इतिवृत्त, माहिती नस्तीत नाही. तसेच दि.14/07/2010 चे पत्रान्वये चेअरमन अस्मिता मजुर बांधकाम सहाकारी संस्था मर्यादित नाशिक यांनी 15% जादा दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले.

7) उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाच्या सन 2010-11 ई-टेंडर निविदा सुचना क्र.2 मध्ये नमुद केल्याप्रमाणे शासकीय / निमशासकीय कामे केलेल्या अनुभवी मक्तेदाराकडून ई-टेंडर निविदा मागविण्यात आल्या होत्या. कृषि / उद्यान विदया / वनविभाग पदवीधारांसाठी अनुभव अट शिथिल होती. परंतु अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक होते. चेअरमन अस्मिता मजुर बांधकाम सहाकारी संस्था मर्यादित नाशिक यांची यापैकी कोणतीही दस्ताऐवजे नस्तीत नाहीत. त्यामुळे पात्रतेबाबत खात्री करता आली नाही.

8) प्राप्त निविदांची छाननी करुन पात्र व अपात्र माहितीसह, तुलनात्मक दरतक्ता करणे आवश्यक होते. परंतु असा तक्ता करण्यात आलेला नाही.

9) वृक्ष प्राधिकरण समितीची सभा क्रमांक 13 ठराव क्रमांक 128 दिनांक 04/06/2010 नुसार सदरील कामास प्रशासकीय मंजुरी होती या ठरावात आयुक्त यांचे आदेश क्रमांक 1319 दिनांक 29/10/2007 नुसार वृक्ष संरक्षकासह व गटरोपण पध्दतीने झाडांच्या लागवडीचे दर अनुक्रमे रुपये 530/- व रुपये 493/- मंजुर असल्याचे नमूद आहे. त्याची छायाप्रत नस्तीस संलग्न असून त्यावरुन असे दिसून येते की, दिनांक 24/05/2007 ची निविदा जाहीरातीच्या अनुषंगाने श्री.मगनलाल देवशंकर यांची कमी दराची निविदा (वृक्ष संरक्षकासह 1508 झाडे रक्कम रुपये 530/- व गटरोपण पध्दतीने 405 झाडे रक्कम रुपये 493/-) सभा क्रमांक 460 दिनांक 25/07/2007 नुसार प्रशासकीय मंजुरी होती याच कामाच्या एकूण खर्चास रक्कम रुपये 9,98,905/- आदेश क्रमांक 1319 नुसार मंजुरी दिलेली होती.

10) कामाचा आदेश क्रमांक 47 दिनांक ------ नुसार दि.01/04/2011 ते दि.30/04/2011 याप्रमाणे एक महिना लागवड व दि.01/05/2011 ते दि.31/03/2013 असे 23 महिने देखभाल करावयाची होती. परंतु प्रत्यक्षात कामाची सुरुवात दि.01/05/2011 रोजी होऊन दि.30/03/2013 रोजी काम समाप्त झाल्याचे दिसते. त्यामुळे कामाची सुरुवात विलंबाने झाली असून अटी व शर्ती क्रमांक 12 नुसार कार्यवाही झालेली नाही.

11) अटी व शर्ती क्रमांक 6 नुसार क्रमांक 22 मध्ये नमुद केल्याप्रमाणे झाडांची अपेक्षित वाढ झाल्यावरच कामाचा मोबदला दयावयाचा होता. परंतु तसे झाल्याचे दिसून येत नाही.

12) अटी व शर्ती क्रमांक 7 नुसार झाडांची उशिरा वाढ किंवा कामास विलंब झाल्यास त्याबाबत विलंबाचा आकार वजा करुन रक्कम दयावयाची होती. विलंबाबाबत कोणताही दर निश्चित केल्याचे दिसून येत नाही. मोघम स्वरुपात याबाबत फक्त नमूद केलेले आहे तसेच कामाची सुरुवात एक महिना विलंबाने होऊनही कोणतीही वजावट न करता देयक अदा केले आहे. प्रत्यक्षात 23 महिनेऐवजी 22 महिने ऐवढेच कालावधी मिळाल्याने एक महिना वाढीसाठी कमी होतात. त्यामुळे एक महिनाच्या कालावधीतील वाढ ही कमी झालेली आहे. त्याअनुषंगाने रक्कम प्रदान करताना कार्यवाही झालेली नाही. अटी व शर्तीत नमूद केल्याप्रमाणे झाडांच्या वाढीबाबत वेळोवेळी नोंदी घेणे आवश्यक होते परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

13) अटी व शर्ती क्रमांक 8 व 9 नुसार मृत झाडाच्या जागी 8 दिवसात नवीन झाडे स्वखर्चाने लावणे मक्तेदारावर बंधनकारक होते. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

14) अटी व शर्ती क्रमांक 10 नुसार गॅप फीलिंगच्या जागी दुसरे झाड न लावल्यास महानगरपालिकेचा झालेला खर्च व अदा केलेल्या रकमेस वसुलीबाबत मक्तेदाराची मान्यता होती परंतु अशी कार्यवाही केली गेलेली नाही.

15) अटी व शर्ती क्रमांक 11 नुसार 10% पेक्षा जास्त मर झाल्यास महानगरपालिका सांगेल ती नुकसानभरपाई देणे मक्तेदारावर बंधनकारक होते. नुकसानभरपाईबाबत कोणतीही ठोस तरतूद करण्यात आलेली नाही तसेच 1225 पैकी फक्त 664 झाडे लावली आहेत. उर्वरित 561 झाडे यांचे काम मक्तेदाराकडून पुर्ण झाले नाही किंवा रोपांची मर झाल्याचे दिसून येते त्या अनुषंगाने रक्कम रुपये 493/- दराने रुपये 2,76,573/- ची वसुली नुकसानभरपाईसह मक्तेदाराकडून करुन घेणे आवश्यक होते.परंतु अशी कोणतीही वसुली न करता मक्तेदारास देयकाची रक्कम अदा केली गेलेली आहे.

16) अटी व शर्ती क्रमांक 14 नुसार सर्व ट्री गार्ड मोजून महानगरपालिकेकडे देणे व पावती घेणे बंधनकारक होते

33 ट्री गार्ड ची वसुली रक्कम रुपये 1900/- प्रमाणे रु.62,700/- दुसऱ्या चालू देयकातून केल्याचे दिसते परंतु उर्वरित सर्व ट्री गार्ड प्राप्त होणे व त्याच्या नोंदी याबाबत काही माहिती उपलब्ध झाले नाही. तसेच नस्तीस पावतीची प्रतही संलग्न नाही. त्यामुळे सबंधित ट्री गार्ड मिळणेबाबत खात्री करता येत नाही.

17) अटी व शर्ती क्रमांक 17 नुसार माती, खते व रोपे सर्व उत्तम प्रतीचे देणे आवश्यक होते. परंतु या विषयी प्रतवारी / दर्जा यांची तपासणी केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे झाडांची संख्या कमी झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच झाडांची वाढ ही पुर्ण झाली नसल्याची दाट शक्यता आहे.

18) अटी व शर्ती क्रमांक 18 मध्ये झाडांच्या वाढीची विविध आठ टप्पे दिलेले होते. अटी व शर्ती क्रमांक 19 मध्ये क्रमांक 18 मधील सर्व टप्प्यांचा अहवाल देणे बंधनकारक होते. परंतु असा कोणताही अहवाल दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अटी व शर्ती क्रमांक 20 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असूनही तशी कार्यवाही केलेली नाही.

19) अटी व शर्ती क्रमांक 22 नुसार अ गटातील झाडांची किमान वाढ 450 से.मी. व ब गटातील झाडांची उंची 360 से.मी. वाढणे आवश्यक होते. परंतु काम विलंबाने सुरु केले त्यामुळे 23 महिन्याऐवजी 22 महिने इतका कालावधी वाढीस मिळाला. त्याप्रमाणात झाडांची वाढ कमी झाल्याची शक्यता असून देयकाची रक्कम प्रदान करताना याबाबत कार्यवाही झालेली नाही.

20) स्थायी समिती सभा क्रमांक 17 ठराव क्रमांक 375 दिनांक 29/07/2010 नुसार सध्याच्या पावसाळी हंगामात काम जलद गतीने होण्याच्या दृष्टिने चेअरमन अस्मिता मजुर बांधकाम सहाकारी संस्था मर्यादित नाशिक व मेसर्स रोहन सुभाष पाटील या दोन्ही मक्तेदाराकडून 14% जादा दराने करुन घेण्यास, निविदा दरास व खर्चास रक्कम रुपये 34,25,500/- मंजूरी देण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात सर्व काम चेअरमन अस्मिता मजुर बांधकाम सहाकारी संस्था मर्यादित नाशिक यांचेकडून करुन घेण्यात आलेले आहे.

21) देयकात नमूद झाडांची नोंद नोंदवहीत केल्याचे दिसून येत नाही. नियमानुसार वृक्ष गणनेच्या सर्व नोंदी होणेबाबत कार्यवाही केलेली नाही.

22) कराराची सर्व पृष्ठे स्टॅम्पला संलग्न करुन त्यातील सर्व पृष्ठांवर स्वाक्षरी करणे आवश्यक असूनही तशी कार्यवाही झालेली नाही.

23) विविध 21 ठीकाणी वृक्ष संरक्षकासह व गटरोपण पध्दतीने वृक्षांची लागवड करावयाची होती. त्यापैकी किती ठिकाणी वृक्षांची लागवड यशस्वी झाली याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे कोणतेही तपशिलवार अहवाल नस्तीत उपलब्ध नाही.

24) नस्तीमध्ये पंजाब नॅशनल बँकेची महात्मा नगर शाखेची रक्कम रुपये 30,050/- ची मुदत ठेव पावती असल्याचे निदर्शनास आले सदरील मुदत ठेव दि.26/06/2010 ची असून सहा महिने कालावधीची मुदत असून 5.50% व्याजदर असून मुदतीनंतरची रक्कम रुपये 30,882/- आहे. दिनांक 26/12/2010 रोजी मुदत संपलेली असूनही सदरील मुदतठेव पावती नस्तीत अद्यापही तशीच असून याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. सदरील पावतीवर बँकेचा शिक्का नाही. सदरील मुदतठेव पावतीही मेसर्स रोहन सुभाष पाटील यांच्या नावे

असून R.No.48400PR0000452 आहे.

25) दुसऱ्या चालू देयकातून वृक्ष संरक्षकासह व गट रोपन पध्दतीचे 53 वृक्षांची वसूली केल्याची दिसून येते. करारातील अटी व शर्तीप्रमाणे वृक्ष संरक्षकासह 162 वृक्ष x 530 रूपये = 85860 तर गट रोपन पध्दतीचे 508 वृक्ष X 493 रूपये = 250444 वसूलीबाबत कार्यवाही केलेली नाही.

26) वेळोवळी ना हरकत प्रमाणपत्र दिले त्यावर कामाबाबतचा कोणताही तपशील नमूद केलेला नाही.

27) निवड महिन्याच्या लेख्यांची तपासणी करताना सदरील निविदा व देयकाबाबत उपरोक्त बाबी निदर्शनास आल्या निविदेनुसार ही कामे महानगरपालिकेच्या सर्व सहा विभागात करावयाची होती. उर्वरित पाच विभागातील कामांमध्ये अशाच प्रकारच्या उणीवा असतील त्याबाबतही मनपा स्थरावर पडताळणी होवून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

MINVAJM6901 (Ref No : 85, Hmm No : 121)

74 वॉर्ड क्रमांक 80 कामाठवाडा शिवारातील सर्वे नंबर 10/7अ मधील मोकळया जागेवर उदयान विकसित करणे व लहान मुलांसाठी खेळणी बसविणे रूपये 4,99,286/- या कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 21

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 499286.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 499286.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2100.00/-

करारनामा अटी/शर्ती येथे दंडाच्या रकमेबाबत कोणतीही स्पष्टता नाही, तरी दंडाची रक्कम रूपये 2,497/- कशाच्या आधारे निश्चित केली हे कळत नाही. निविदेत, कार्यादेशात देखभाल करण्याबाबतच्या कामाचा समावेश नसताना सदर काम करून घेण्यात आले. उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे नस्तीस जोडलेले नाहीत. नस्त्यांना मूळ प्रती ऐवजी छायांकित प्रती जोडण्यात आल्या आहेत.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील लेखापरीक्षणावेळी उदयान विभागाअंतर्गत सर्वे नंबर 10/7अ मधील मोकळया जागेवर उदयान विकसित करणे व लहान मुलांसाठी खेळणी

बसविण्याकरिता खर्च केला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	देयक क्र / दिनांक	उदयानाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक/ पृष्ठ क्रमांक
1	323 / 04.03.14	वॉर्ड क्रमांक 80	श्री.एन. डी. भगत	सर्वे नंबर 10/7अ मधील मोकळया जागेवर उदयान विकसित करणे व लहान मुलांसाठी खेळणी बसविणे	499286	2754/ ----
एकूण					499286	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) कंत्राटदार काम करण्यास गेल्यावर तेथे पूर्वीपासूनच डिपीडीसी अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत पाथ वे व कंपाऊंड बनविण्याचे काम सुरू होते व त्यामुळे चार ते साडेचार महिने कंत्राटदाराला काम सुरू करता आले नाही, या झालेल्या विलंबा प्रकरणी प्राकलन रकमेच्या अर्धा टक्के दराने रूपये 2497/- दंडाची आकारणी करून मुदतवाढ देण्याबाबत नस्तीत नमूद केलेले आढळते, मात्र त्यावर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. डीपीडीसी अंतर्गत महानगरपालिकेच्या जागेवर काम सुरू असल्याचे विभागाला अवगत नसल्याचे म्हणणे उचित नाही. तसेच त्याच कामावर पुन्हा खर्च होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दंडाची रक्कम कशाच्या आधारावर निश्चित केली. करारनामा, अटी/शर्ती येथे याबाबत स्पष्टता नाही. कंत्राटदारास मुदतवाढ दिली किंवा कसे याचाही बोध होत नाही. डीपीडीसी अंतर्गत कामाची नोंदवही स्वतंत्ररित्या ठेवलेली नाही. याकामासाठी सर्व खर्च शासनाने केला किंवा कसे तसेच या रकमा येणे बाकी आहेत किंवा कसे याबाबत कोणतीही माहिती नस्तीस नाही.

2) ज्या जागांवर हे काम केलेले आहे, त्या जागा उदयानाच्या असल्याबाबत नस्तीस कोठेही उल्लेख नाही, त्यामुळे या जागा उदयानाच्या नसतील तर उदयानाच्या निधीतून त्यावर खर्च केल्याचे दिसून येते.

3) मक्तेदाराशी दिनांक 9.04.2012 रोजी दर कमी करण्याबाबत वाटाघाटी केली असली तरी त्याअनुषंगाने कोणतीही माहिती नस्तीस उपलब्ध नाही, तसेच कंत्राटदाराने 5 टक्के जादा दराने काम करण्याबाबत कळविलेल्या पत्रावर दिनांक नमूद केलेला नाही.

4) कार्यादेश दिनांक 24.07.2012 चा असून कामाची मुदत त्यानुसार 5 महिने होती, तर करारनामा क्रमांक 9 दिनांक 20.07.2012 रोजी केला आहे. करारनामा व जामिननामा येथे मुदत तीन महिने दर्शविली असून त्यावर संबंधितांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

5) मोजमाप पुस्तक क्रमांक 2754 लेखापरीक्षणावेळी उपब्ध न झाल्याने त्यात नमूद नोंदी विषयी खात्री करता

आलेली नाही.

6) देयकावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

7) निविदेत देखभाल करण्याबाबतच्या कामाचा समावेश नसतानाही तसेच कार्यादेशात याचा समावेश नसताना सदरचे काम करून घेण्यात आले. उदयान विकसित करण्याच्या कामाची निविदा 5 टक्के जादा दराने मंजूर होती, त्याच जादा दराने देखभालीचे काम करून घेण्यात आले आहे, त्यामुळे रूपये 2100/- चे अतिप्रदान कंत्राटदारास झाले आहे, त्याची वसूली करणे आवश्यक आहे.

8) काम पूर्ण झाल्याचे प्रतिवृत्तावर कमी जास्त साहित्य वापराबाबत स्पष्टीकरण दिलेले नाहीत व त्यात सक्षम अधिकाऱ्याची मंजूरी घेतलेली नाही. उदा. लॉन तयार करण्याचे अंदाजपत्रकातील परिमाण 707m असून प्रत्यक्ष वापर 383.07m झाला आहे. त्याचा दर 206 रूपये असल्याने रूपये 66729.58/- च्या रकमेने प्राकलनात वाढ झाली आहे.

9) दर निश्चिती बाबत कोणतीही माहिती नस्तीस नाही.

10) विलंबाने काम पूर्ण झाले असूनही मुदतवाढीबाबत काही नमूद नाही व दंडात्मक कार्यवाही सक्षम अधिकाऱ्याच्या मंजूरीने होणे आवश्यक आहे.

11) खेळणी बसविण्याच्या कामाबाबत दरनिश्चिती, डिलीव्हरी चलन, साठा नोंदवही इत्यादी दस्ताऐवजे / नोंदवहया लेखापरीक्षास उपलबध न झाल्याने या खर्चाबाबत खात्री करता आलेली नाही.

12) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

13) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

14) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

15) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

16) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

17) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

18) नस्तीला निविदे संबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

19) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

20) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

21) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 96, Hmm No : 152)

75 उदयान विभागातील विविध कामांवरील खर्चातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 13

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1114728.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1114728.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 11147.00/-

उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे नस्तीस जोडलेले नाहीत. नस्त्यांना मूळ प्रती ऐवजी छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. मूळ नस्तीस प्रस्ताव सादर न केले जाता नव्याने नस्ती केली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील लेखापरीक्षणावेळी उदयान

विभागाअंतर्गत विविध कामावर खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	देयक क्र / दिनांक	उदयानाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	विमा रक्कम रूपये	मोजमाप पुस्तक क्रमांक / पृष्ठ क्रमांक
1	163/ 15.10.2013	प्रमोद महाजन उदयानालगत	माणेकशा नगर मजूर बांधकाम सोसायटी	पार्कींगसाठी पेव्हर ब्लॉक बसविणे	191182	1912	2248/178
2	72/ 01.10.2013	सातपुर वार्ड क्रमांक - 52	श्री.एन.डी. भगत	नलिका फेनसिंगचे काम करणे	923546	9235	2260/--
				एकूण	**1114728**	**11147**	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक - जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक.03/11/2003 व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक - प्रीविनि-2305/ सहविमा /साव्हावि/फ-2,दिनांक- 12/09/2005 नुसार कंत्राटी कामाच्या कालावधीचा विमा उतरविणे आवश्यक आहे. कंत्राटदाराने कंत्राटीकामाचा विमा न उतरविल्यास कामाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्के रक्कम वसुल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक होते. परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. कार्योदेशात याबाबत नमूद केलेले असले तरी देयकाची रक्कम अदा करताना कंत्राटदाराने विमा रक्कम भरल्याचे खात्री केली जात नाही. विमा निधी रक्कम रूपये 11,147/- शासनाकडे भरणा करण्यात यावी.

2) देयक क्रमांक 163 - गुणवत्ता चाचणी अहवाल येथे क्रमांक व दिनांक नमूद केलेले नाहीत. ना-हरकत प्रमाणपत्र व दिनांकात फेरफार केलेल आहेत. साहीत्य वापर विवरणपत्रात कमी जादा साहीत्याबाबत स्पष्टीकरण दिलेले नाही.

3) देयक क्रमांक - 72 - लेखापरीक्षणास देयक, त्यासंबंधी नस्ती, दस्तऐवजे, नोंदवहया इत्यादी उपलब्ध न झाल्याने झालेल्या खर्चाबाबत, कामाबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

4) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या

खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

5) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

6) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

7) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

8) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

9) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

10) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

11) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

12) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

13) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

76 उदयान विभागाअंतर्गत कामाचा विमा न उतरविण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 18

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 2334901.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2334901.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 23363.00/-

कंत्राटी कामाच्या कालावधीचा विमा कंत्राटदाराने उतरविणे आवश्यक आहे. कंत्राटदाराने कामाचा विमा न उतरविल्यास अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्के रक्कम वसूल करून शासनाकडे जमा करणे आवश्यक होते.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणावेळी उदयान विभागात निवड महिन्यातील लेख्यांची पडताळणी करताना स्थापत्य विषयक खालील कामे केल्याचे निदर्शनास आले.

अ.क्र.	देयक क्र / दिनांक	कामाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	रक्कम रूपये.	एक टक्के दराने विम्याची रक्कम रुपये
1	83/ 04.10.2013	शिवराम नगर उदयानात सुशोभिकरणाची कामे	चे.आदीत्य मजूर सोयायटी	128437	1285
2	84/ 04.10.2013	स्वामी समर्थ नगर उदयानात सुशोभिकरणाची कामे	महाराष्ट्र मजूर सोसायटी	113638	1137
3	93/ 08.10.2013	वनसंपदा उदयानात सुशोभिकरणाची कामे	ज्योती मजूर बांधकाम सोसायटी	188699	1887
4	94/ 08.10.2013	वि.वा.शिरवाडकर उदयान - नुतणीकरण	चे.साईनाथ मजूर बांधकाम सोसायटी	199841	1999
5	123/ 15.10.2013	विविध चौकांमध्ये सुशोभिकरणाची कामे	नवनीत	617400	6174

6	128/ 15.10.2013	मारुती चौक ते राष्ट्रीय महामार्ग क्रमांक - 3 रस्त्यावरील सुशोभिकरणाची कामे	चे.महात्मा मजूर बांधकाम सोसायटी	112312	1124
7	146/ 15.10.2013	हॉटेल संस्कार समोरील उदयानातील पाथवेचे नुतणीकरण, अंतर्गत रिपेअरींग करणे	चे.सप्तर्षी मजूर बांधकाम सोसायटी	196642	1966
8	147/ 15.10.2013	लोखंडे मळा उदयानात कर्बींग, पाथ्वे दुरुस्ती, कंम्पांउड वॉल इ. कामे	चे.संघमित्र मजूर सोसायटी	189250	1893
9	149/ 15.10.2013	सिंगापूर उदयान दुरुस्ती व रंगरंगोटी	शुभम मजूर बांधकाम सोसायटी	199070	1991
10	163/ 15.10.2013	प्रभाग क्र.14 - पेंव्हींग ब्लॉक बसविणे	माणेकशा नगर मजूर बांधकाम सोसायटी	191182	1912
11	183/ 25.10.2013	प्रभाग क्रमांक - 25 उदयानाच्या कंम्पांउड वॉलची दुरुस्ती इ.कामे	अंजनी मजूर बांधकाम सोसायटी	199430	1995
		एकूण रक्कम रुपये		**2335901**	**23363**

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनी/2301/सहविमा/न.पा-1, दि.10/09/2001 नुसार कंत्राटी कामाचा विमा कार्योदेशापासून कामाच्या अंतिम तारखेच्या कालावधीमध्ये उतरविणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/न.वि.-24 दि.03/11/2003 व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.प्रीविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दि.12/09/2005 नुसार कंत्राटी कामाच्या कालावधीचा विमा उतरविणे आवश्यक आहे. कंत्राटदारानी कंत्राटी कामाचा विमा न उतरविल्यास अंदाजपत्रकीय रकमेच्या एक टक्के रक्कम वसूल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त देयकांच्या नस्त्यांची तपासणी करताना विम्याची रक्कम भरणेबाबत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही व त्यासंबंधी कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न नाहीत. सन 2013-14 मधील लेखापरीक्षण कालावधीतील अशा प्रकारच्या विमा न उतरविण्याचे प्रकरणे असू शकतील अशा प्रकरणांची पडताळणी करून विमा निधीची रक्कम शासकीय खजिन्यात भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

77 नाशिक पुर्व वार्ड क्रमांक 40 काटे गल्ली येथील खुल्या जागेत उदयान विकसित करण्याच्या कामातील अतिप्रदान रक्कम रु.23940/- व त्यातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 18

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 402956.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 402956.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 27970.00/-

उदयान विकसित करण्याची निविदा वाढीव दराने मंजूर झाली, त्यात नमूद नसतानाही देखभालीचे काम करून घेण्यात आले. देखभालीचे काम वाढीव दराने करण्यात आले असून त्यामुळे ठेकेदारास रक्कम अतिप्रदान झाली आहे. तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास एकतर निविदा स्विकारण्याचा कालावधी वाढविणे आवश्यक होते, कालावधी वाढवूनही निविदा प्राप्त न झाल्यास पात्र पैकी एकाची निवड करून सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेसह प्रस्ताव स्थायी समितीपुढे मांडणे आवश्यक होते.

कामाचे नाव- नाशिक पुर्व वार्ड क्रमांक 40 काटे गल्ली येथील खुल्या जागेत उदयान विकसित करणे.

कंत्राटदाराचे नाव - चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी नाशिक

प्राकलन रुपये - 3,38,619/-

निविदा जाहीरात - दिनांक - 11/12/2007

मंजूरी आदेश क्रमांक - 2508 दि.25/03/2008

सदरील कामाची निविदा जाहीरात दि.11/12/2007 रोजी प्रसिध्द करुन मंजुर निविदेनुसार 19 टक्के जादा दराने काम करुन घेण्यात आले याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) निविदा जाहीरात प्रसिध्द झाल्यावर चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी यांची निविदा प्राकलन दरापेक्षा 20 टक्के जादा दराची तर श्री. आर.के.खरात यांची निविदा प्राप्त दरापेक्षा 25 टक्के जादा दराची प्राप्त झाली आहे. तिसरी निविदा चे.साईनाथ मजूर बांधकाम सोसायटी यांची होती. परंतु बयाणा रक्कम न भरल्याने ती निविदा अप्राप्त ठरवून उघडण्यात आली नाही. तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास एकतर निविदा स्वीकारण्याचा कालावधी वाढविणे आवश्यक होते. कालावधी वाढवूनही निविदा प्राप्त न झाल्यास पात्रपैकी एकाची निवड करुन सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेसह प्रस्ताव स्थायी समितीपुढे मांडणे आवश्यक होते. परंतु नियमानुसार कार्यवाही

या प्रकरणी झालेली दिसून येत नाही. चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी यांच्याशी चर्चा करुन 19 टक्के जादा दराने रुपये 402956/- काम देण्यात आले.

2) निविदा जाहीरातीनुसार कामची मुदत तीन महिने होती तसेच त्यानुसार उदयान विकसित करण्याचे काम करावयाचे होते. परंतु कंत्राटदाराकडून तीन वर्षे उदयान देखभालीचे काम ही करुन घेण्यात आले. याबाबत मंजुरी नसताना काम करुन घेण्यात आलेले आहे. अयोग्य प्राधिकार देयकात नमूद करण्यात आले तसेच उदयान विकसित करण्याचे काम 19 टक्के वाढीव दराने मंजुर होते त्याच वाढीव दराने उदयान देखभालीचे काम करुन घेण्यात आले. 36 महिने प्रतिमाह रुपये 3500/- प्रमाणे रु.126000/- कंत्राटदारास अदा करण्याऐवजी 19 टक्के जादा दराने रु.149940/- कंत्राटदारास अदा करण्यात आले. त्यामुळे रु.23940/- चे अतिप्रदान झाले असून त्याची वसूली करणे आवश्यक आहे.

3) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक - जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक.03/11/2003 व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक - प्रीविनि-2305/ सहविमा /साव्हावि/फ-2,दिनांक- 12/09/2005 नुसार कंत्राटी कामाच्या कालावधीचा विमा उतरविणे आवश्यक आहे. कंत्राटदाराने कंत्राटीकामाचा विमा न उतरविल्यास कामाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्के रक्कम वसुल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक होते. परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. कार्योदेशात याबाबत नमूद केलेले असले तरी देयकाची रक्कम अदा करताना कंत्राटदाराने विमा रक्कम भरल्याचे खात्री केली जात नाही. विमा निधी रक्कम रूपये 4,030/- शासनाकडे भरणा करण्यात यावी

4) सदरील काम वेळेत पुर्ण झाल्याचे दिसून येत नाही याबाबत दंडात्मक कार्यवाही झालेली नाही.

5) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

6) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- टिपणी, करारनामा, मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

7) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

8) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाही.

9) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती

त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

10) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

11) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

12) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

13) प्रशासकीय, वित्तीय मंजुरी / खर्च मंजुरी आदेशात कालावधी, कंत्राटदार, संस्थेचे नाव इत्यादी नमूद केलेले नसल्याने त्या अनुषंगाने खात्री करता येत नाही. कार्योदेशावर दिनांक नमूद केलेले नाही.

14) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

15) कंत्राटदाराकडून करुन घेतलेले कामाच्या संदर्भात संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कोणतेही अहवाल वेळोवेळी घेतल्याचे दिसून येत नाहीत तसेच हजेरीसंदर्भात उदयानात नोंदवही ठेवली जात नाही असे दिसून येते.

16) उदयान देखभालीसाठी जुनेच दर सन 2002 मध्ये मंजुर केल्याचे नस्तीवरुन दिसते. त्यानुसार अर्धा एकर क्षेत्रासाठी रु.3500/- प्रति महिना तर एक एकर क्षेत्रासाठी रु.7000/- प्रति महिना दर मंजूर आहेत. त्या दरात दिनांक - 01/01/2013 पासून सुधारणा झाली असून ते अनुक्रमे 7000/- व 10000/- प्रति महिना इतके करण्यात आले असल्याचे दिसून येते तथापि सदरील दर कोणत्या आधारे निश्चित केले, या संबंधी शासनाच्या संबंधीत विभागाकडे पत्रव्यवहार केला होता का याविषयी कोणतेही दस्ताऐवजे माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाले नाहीत.

17) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यप्रणालीबाबत मा.आयुक्तांनी दिनांक - 26/01/2012 रोजी मंजुरी दिल्याचे नस्तीत नमूद असले तरी याविषयी कोणतीही माहिती, दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाहीत.

18) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

78 उदयान विभागाचे लेखापरीक्षणात देयके, मुळ नस्ती, प्रमाणके व इतर अनुषंगिक दस्तऐवजे उपलब्ध न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 0

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 9901537.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9901537.00/-

उदयान विभागांतर्गत विविध कामांवार झालेल्या खर्चाची देयके मूळ नस्ती, प्रमाणके व इतर अनुषंगिक दस्तऐवजे, मोजमाप पुस्तके, नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागाअंतर्गत विविध कामांवर झालेल्या खर्चाची देयके, खर्चाची मुळ नस्ती, प्रमाणके व इतर अनुषंगिक दस्तऐवजे, मोजमाप पुस्तके, नोंदवहया इत्यादी लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेल्या नाहीत त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

अक्र	देयक क्र / दिनांक	उदयानाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक / पृष्ठ क्रमांक
1	08/ 15.04.2013	विविध उदयाने	मे.सप्तश्रृंगी बोअरवेल्स नाशिक	विविध उदयानात विहीर घेऊन विदयुत पंप बसविणे	3590975	2675/88 ते 194
2	17/ 16.05.2013	नाशिक पुर्व वार्ड क्रमांक - 65	श्री.महेश व्ही.सावकार	सर्व्हे नं.32/1 मधील कंम्पाउंड वॉल करुन पाथवे तयार करणे	939100	2256/90 ते 102
3	30/ 24.06.2013	वार्ड क्र.93	नंदन सोसायटी	खेळणी बसविणे	492911	1380/172 ते 175
4	61/ 29.08.2013	अभ्युदय कॉलनी	स्वामी समर्थ मजूर बांधकाम संस्था	उदयानात पॅगोडा बांधणे	199946	2248/164 ते 172

5	78/ 07.09.2013	लोकमान्य नगर	श्री.एन.डी.भगत	नुतनीकरण व सुशोभिकरण	3559260	2926/22 ते 77
6	96/ 01.10.2013	वार्ड क्र.52	श्री.एन.डी.भगत	सर्व्हे नं.194 व्यायामशाळा येथील कंम्पाउंड वॉल बांधणे	923546	2260/50 ते 65
7	154/ 19.11.2013	विविध उदयाने	चे.अंजनी मजूर बांधकाम सोसायटी	विविध प्रकारची खेळणी दुरुस्ती व रंगरंगोटी करणे	195799	2112/84 ते 93
				एकूण	**9901537**	

उपरोक्त नमूद खर्चाची देयके, मुळ नस्ती, प्रमाणके, इतर अनुषंगिक दस्ताऐवजे, संबंधित नोंदवहया इत्यादी लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न झाल्याने झालेल्या कामांच्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता आली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेखे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

MINVAJM6901 (Ref No : 104, Hmm No : 161)

79 उदयान विकसित करण्याच्या कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 32

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 16038211.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 16038211.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 160385.00/-

मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नियमित कंत्राटदार यांना अनुक्रमे 33%, 33%, 34% कामे वाटप करणे आवश्यक होते, परंतू अशी कार्यवाही अवलंबिण्यात आली नाही. नस्त्यांना मूळ प्रती ऐवजी छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. कंत्राटदारास करार करण्याबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले नाही. उदयाने महानगरपालिकेच्या नावे असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे नस्तीस जोडलेले नाहीत. प्रस्ताव सादर करताना जागेच्या मालकीबाबत कोणतीही खात्री केली नाही तसेच या सबंधी नगररचना विभागाचे अभिप्राय घेतले नाहीत. त्याचप्रमाणे तरतूदी नसताना, तांत्रिक मंजूरी व खाते प्रमुखांची मंजुरी न

घेता प्राकलन प्रमाणित नसतानाही प्रस्ताव सादर केले आहेत.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील निवड महिन्यांचे लेखा परिक्षणाच्या वेळी नस्त्यांची तपासणी करताना उदयान विकसित करण्यासाठी झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	देयक क्रमांक / दिनांक	उदयान नाव	कंत्राटदार नाव	रक्कम रूपये	विमा रक्कम 1 टक्के	मोजमाप पुस्तक क्रमांक / पृष्ठ क्रमांक
1	86/05.10.13	वीडी कामगार नगर	श्री. डी. डी. चुंबळे	1410556	14106	2678/--
2	87/05.10.13	सिध्देश्वर नगर	श्री. एन. डी. भगत	1180380	11804	2678/--
3	90/07.10.13	वनश्री कॉलनी	चे.मयूर कन्स्ट्रक्शन	1641215	16413	1795/--
4	110/11.10.13	यशोमंदिर हौसिंग सोसायटी	श्री. पी. यु. चवरे	2387271	23873	1068/197
5	114/11.10.13	वसंत नगर	श्री. डी. डी. चुंबळे	1785339	17853	1068/189
6	115/11.10.13	धर्माजी कॉलनी	श्री. डी. डी. चुंबळे	257796	2578	1068/187
7	129/11.10.13	पोलार कॉलनी	श्री. एन. डी. भगत	1053840	10539	1801/130
8	133/11.10.13	काठे गल्ली	चे. वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	138600	1386	1801/141
9	164/11.10.13	सप्तश्रृंगी देवी मंदिर	श्री. आर. के. खरात	385875	3859	-------
10	88/05.10.13	मखमलाबाद - विदयानगर	श्री. डी. डी. चुंबळे	56525	565	2678/--
11	95/08.10.13	लोबो अपार्टमेंट समोर	श्री. प्रदिप डी. गायकवाड	402958	4030	1381/--
12	108/11.10.13	कलानगर	चे. विशाखा मजूर बांधकाम सोसायटी	55529	555	755/--
13	109/11.10.13	वृंदावन कॉलनी	श्री. पी. यु. चवरे	30030	300	1068/193

14	111/11.10.13	कामरवाडे शिवार	श्री. पी. यु. चवरे	23153	232	1068/183
15	112/11.10.13	दत्त नगर	श्री. पी. यु. चवरे	21928	219	1068/185
16	113/11.10.13	गुरूदत्त मंदिर	श्री. पी. यु. चवरे	41650	417	1068/179
17	116/11.10.13	राधाकृष्ण मंदिर	क्रांतीमजूर बांधकाम सोसायटी	41552	416	1068/181
18	122/11.10.13	हिरावाडी	श्री. एन. डी. भगत	136096	1361	1595/180
19	81/04.10.13	धनराज नगर	श्री.के.एस.मोरे	126000	1260	2487/--
20	130/11.10.13	सिहस्थ नगर	श्री. डी. डी. चुंबळे	56700	567	1801/140
21	164/11.10.13	सप्तश्रृंगी देवी मंदिर	श्री. अमित गजानन धरणे	479286	4793	------
22	169 अ /25.10.13	अवर टाकळी	श्री. रमाकांत विकास निरगुडे	2756427	27564	--------
23	184/28.10.13	लोकमान्य नगर	महालक्ष्मी महिला बचत गट	105000	1050	--------
24	25/18.06.13	स्वामी नारायण नगर, सावरकर स्मारक	श्री. आर. व्ही. बधन	580396	5804	960/123 ते 127
25	68/04.09.13	कल्पतरू नगर	श्री. एन. डी. भगत	404823	4048	942/162 ते 166
26	139/17.10.13	विजय नगर	अमित धामाणे	479286	4793	1072/149 ते 153
	एकूण रक्कम रूपये			**16038211**	**160385**	

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 संविदा 2 (1) नुसार काम करणे, सामुग्री किंवा माल पुरविणेसाठी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च होणार असेल तेंव्हा सात दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात नोटीस देऊन निविदा मागविणे किंवा दोन लाखापेक्षा कमी खर्च होणार असल्यास सुचना महानगरपालिकेच्या अधिकृत

संकेतस्थळावर दर्शविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन दिसून येत नाही.

2) उदयान विभागातील उदयान देखभाल, दुरुस्ती,वृक्ष प्राधिकरणाकडील कामे, उदयान विकास या लेखाशिर्षांतर्गत रुपये दोन लाखापर्यंतची कामे विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने देण्याबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 641 दिनांक.18/07/1996 नुसार नियुक्त केलेल्या कामकाजवाटप समितीला प्राधिकृत केल्याबाबत नस्तीवरुन दिसून येते. परंतु त्याबाबतचे दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाही. सन 2013-14 मध्ये आयुक्त यांनी स्थापन केलेल्या समितीमार्फत कामाचे वाटप केल्याचे दिसून येत नाही.

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी 07/06/प्र.क्र.94/इमारत, दिनांक 16/11/2006, मुंबई नुसार मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नियमित कंत्राटदार यांना अनुक्रमे 33 टक्के, 33 टक्के व 34 टक्के कामे दयावयाची आहेत. याबाबत कार्यपध्दती अवलंबण्यात आल्याची दिसून येत नाही. सक्षम अधिकाऱ्याकडून पात्र अधिकृत संस्थांच्या यादया घेणेबाबत कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक - जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक. 03/11/2003 व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक - प्रीविनि-2305 /सहविमा /साव्हावि /फ-2,दिनांक- 12/09/2005 नुसार कंत्राटी कामाच्या कालावधीचा विमा उतरविणे आवश्यक आहे. कंत्राटदाराने कंत्राटीकामाचा विमा न उतरविल्यास कामाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्के रक्कम रूपये 1,60,385/- वसुल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक होते. परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. कार्योदेशात याबाबत नमूद केलेले असले तरी देयकाची रक्कम अदा करताना कंत्राटदाराने विमा रक्कम भरल्याचे खात्री केली जात नाही. सन 2013-14 या कालावधीतील अशा सर्व प्रकरणी किती रक्कम भरावयाची बाकी आहे याची पडताळणी करून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

4) मोजमाप पुस्तक क्रमांक - 2487,2678,1795,1381,755 लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न झाल्याने त्यातील नोंदींबाबत खात्री करता आली नाही.

5) देयक क्रमांक - 86 - कार्योदेश क्रमांक - 89 दि.16/02/2010 नुसार कामाचा कालावधी दि.16/02/2010 ते 15/08/2010 असा सहा महिना होता प्रत्यक्ष काम पुर्ण झाल्याचा दाखला दि.15/08/2013 रोजी दिलेला आहे. म्हणजेच काम विलंबाने पुर्ण झाल्याचे दिसून येते. तथापि याबाबत कोणतीही दंडात्मक कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.

6) देयक क्रमांक - 87 निविदा तुलनात्मक तक्ता, कार्यादेश, मंजूरी आदेश, गुणवत्ता अहवाल, पूर्णत्व दाखला इत्यादी नस्तीस नसल्याने त्याबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही.

7) देयक क्रमांक -9 नस्तीस सर्व छायांकित प्रती असून फेरनिविदेबाबतची छायांकित प्रत अत्यंत अस्पष्ट आहे. नस्तीस मंजूरीची प्रत सलग्न नाही. उदयान कल्पक यांचे दिनांक 15/01/2008 चे अंदाजपत्र रूपये 1641215/- नस्तीस जोडलेले आहे. उदयान कल्पक यांची नियुक्ती केली किंवा त्यांना काम दिले या अनुषंगाने कोणतीही माहिती / दस्तएवजे नस्तीस नाही. सदरील कामाची मुदत आठ महिने होती, त्यात देखभालीचा समावेश नव्हता,

त्यामुळे प्रत्यक्षात काम 36 महिने चालू राहिल्याचे दिसते. देखभालीसंबधी अटी व शर्तीचा त्यात समावेश नव्हता. देखभालीबाबत मंजूरी, करारनामा, अटी व शर्ती येथे काहीही नमूद केलेले नाही. पहिल्या धावत्या देयकावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. देयकांना योग्य क्रमांक दिलेला आहे. पहिले धावते देयक, दुसरे व अंतिम देयक त्यानंतर पुन्हा पहिले, दुसरे देयक व तिसरे अंतिम देयक अशा प्रकारे देयकांना क्रमांक दिला असून देयके पारित झाले आहे. दुसरे व अंतिम देयकाच्या तांत्रिक तपासणी अहवालातील पूर्तता प्रमाणपत्रातील दिनांकात तफावत दिसून येते.

8) देयक क्रमांक - 110 कार्यादेश दिनांक 7/4/2010 नुसार कामाची मुदत आठ महिने (दिनांक 8/4/2010 ते दिनांक 7/12/2010) होती. प्रत्यक्षात काम 36 महिने चालू असल्याचे दिसून येते. देखभालीसंबधी अटी व शर्तीचा त्यात समावेश नव्हता. देखभालीबाबत मंजूरी, करारनामा, अटी व शर्ती येथे काहीही नमूद केलेले नाही. सहाव्या धावत्या देयकावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. स्थायी समिती ठराव क्रमांक 877 दिनांक 17/01/2008 ची अस्पष्ट छायांकित प्रत नस्तीस आहे.

9) देयक क्रमांक - 113 - कार्यादेश दिनांक 16/12/2011 नुसार खुल्या जागेत उदयान विकसित करण्याचे काम कंत्राटदारास दिले असून या कामास दिनांक 16/12/2011 ते दिनांक 15/10/2012 अशी 10 महिने मुदत होती. मंजूरी नसताना देखभालीचे काम करून घेण्यात आले आहे.

10) देयक क्रमांक - 114 - मे. उदयान कल्पक, नाशिक यांचेकडून उदयान आराखडा व त्यातील बदल अत्यंत कमी कालावधीत करून घेतल्याचे दिसून येते. त्यांना काम देण्याबाबत नस्तीत कोणतीही माहिती / दस्तएवजे नस्तीस नाही, या वेळी लेखापरीक्षणावेळी कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. एकूण रकमेच्या 1.74 टक्के सल्ला सेवा फी बाबत नस्तीस नमूद केल्याचे निदर्शनास आले, परंतू प्रत्यक्षात किती फी दिली याबाबत काही नमूद केलेली नाही. जिल्हा नियंत्रण सुची प्रमाणे दर न घेणे, बाब निहाय मोजमाप व पृथ:करण न करणे, मार्केट रेट, कोटेशन न जोडणे, इलेव्हेशन व क्रॉस सेक्शन न देणे, लोकेशन प्लान व सर्व मोजमापे नसणे, तांत्रिक दृष्टया अपूर्ण आराखडा इत्यादी कारणास्तव बदलाचा आराखडा केल्याचे दिसून येत नाही. प्राकलनात सर्वत्र दुरूस्ती/खाडाखोड केल्याचे दिसून येते. 7/12 उताऱ्यावर नाव लावणेबाबत दिनांक 03/07/1999 रोजी मिळकत व्यवयस्थापक यांना कळविल्याचे दिसून येते, परंतू याबाबत पुढे काही कार्यवाही झालेली नाही. वार्षिक देखभाल व विदयुत खर्च विचारात घेता उत्पनाची साधन उदयानातून मिळणे आवश्यक असेल त्यासाठी प्रवेश फी आकारण्याबाबत आयुक्तांनी दिनांक 05/08/2008 रोजी आदेश देवूनही त्याअनुषंगाने कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. कार्यादेश दिनांक 16/12/2009 उदयान विकसित करण्याचे काम करावयाचे होते, परंतू मंजूरी नसतानाही देखभालीचे काम करून घेण्यात आले.

11) देयक क्रमांक - 115, 116, 125 - कामाच्या आदेशानुसार उदयान विकसित करण्याचे काम कंत्राटदाराला दिले होते, त्याअनुषंगाने करार करण्यात आला परंतू मंजूरी नसतानाही तीन वर्ष देखभालीचे काम करून घेण्यात आले. देखभाली संबधी कोणत्याही अटी/शर्ती करारनाम्यात नव्हत्या. देयक क्रमांक 115 मधील सातव्या चालू देयकाची मूळ प्रत नस्तीस नाही.

12) देयक क्रमांक 125, 129 - पहिले चालू देयक व पहिले व अंतिम देयक यावर संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. देयक क्रमांक 125 संबधी नस्तीस 7/12 ची छायांकित प्रत नस्तीस असून त्यावर

महानगरपालिकेचे नाव इतर अधिकारात नमूद केल्याचे दिसते. प्राकलन मंजूरीबाबत, जागा मालकीबाबत व आरक्षणाबाबत संबधित विभागचे अभिप्राय घेतल्याचे दिसून येत नाही. देयक क्रमांक 129 मधील देयकांना अयोग्य क्रमांक देण्यात आलेले आहेत. प्रथम चालू देयक, प्रथक व अंतिम देयक, दुसरे चालू देयक, तिसरे चालू देयक, चौथे व अंतिम देयक याप्रमाणे देयकांना क्रमांक दिला असून अयोग्य प्राधिकारी देवून देयके पारित झाली आहेत.

13) 10 टक्के पेक्षा कमी अधिक दराची निविदा स्वीकृत करताना निविदाधारकाकडून दर पृथ:ककरण प्राप्त करुन त्याबाबत सक्षम तांत्रिक अधिकारी यांनी समर्थन नमूद करणे आवश्यक आहे परंतु तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

14) अ.क्र.10 ते 26 येथील देयके, मुळ खर्चाची नस्ती, प्रमाणके, अनुषंगिक दस्तऐवजे, संबंधित नोंदवहया, मोजमाप पुस्तके लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न झाल्याने झालेली कामे व खर्चाबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

15) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

16) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- टिपणी, करारनामा, मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

17) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

18) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

19) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

20) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

21) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

22) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

23) प्रशासकीय, वित्तीय मंजुरी / खर्च मंजुरी आदेशात कालावधी, कंत्राटदार, संस्थेचे नाव इत्यादी नमूद केलेले नसल्याने त्या अनुषंगाने खात्री करता येत नाही. कार्योदेशावर दिनांक नमूद केलेले नाही.

24) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

25) काम पुर्णत्वाचा दाखला दिल्यावर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने दिल्याचे बऱ्याच प्रकरणी दिसून येते. जर काम समाधानकारकरित्या पुर्ण केलेले असेल तर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने देण्याचे प्रयोजन कळत नाही.

26) प्रस्ताव सादर करताना जागेच्या मालकीबाबत कोणतीही खात्री केली जात नाही तसेच या सबंधी नगररचना विभागाचे अभिप्राय घेतले जात नाहीत असे दिसून येते. त्याचप्रमाणे तरतूदी नसताना, तांत्रिक मंजूरी व खाते प्रमुखांची मंजुरी न घेता प्राकलन प्रमाणित नसतानाही प्रस्ताव सादर केले जात असल्याचे निदर्शनास आले.

27) काही नस्त्यांना देयकाची प्रत सोडून सर्व दस्तऐवजे मूळ न जोडता छायाप्रती जोडलेल्या आहेत. याबाबत लेखापरीक्षणावेळी मूळ दस्तऐवजे उपलब्ध झाली नाहीत व कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

28) कंत्राटदाराकडून करुन घेतलेले कामाच्या संदर्भात संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कोणतेही अहवाल वेळोवेळी घेतल्याचे दिसून येत नाहीत तसेच हजेरीसंदर्भात उदयानात नोंदवही ठेवली जात नाही असे दिसून येते.

29) कंत्राटदाराने कामावर नियुक्त केलेले कामगार / सेवक यांना अनुज्ञेय रक्कम धनादेशाद्वारे तसेच त्यांचे ईएसआय, ईपीएफ, व्यवसाय कर, कामगार निधी इत्यादी रकमा संबंधित प्राधिकारणाकडे जमा केल्याबाबत विभागाकडून खात्री करणे आवश्यक होते परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजावरुन अशी कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

30) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यप्रणालीबाबत मा.आयुक्तांनी दिनांक - 26/01/2012 रोजी मंजुरी दिल्याचे नस्तीत नमूद असले तरी याविषयी कोणतीही माहिती, दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाहीत.

31) करारनाम्यातील अटी व शर्ती, कामाचे आदेशात नमूद बाबी, हजेरी पुस्तक या अनुषंगाने कोणतेही अहवाल संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे झालेल्या कामाबाबत व नुकसानीबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

32) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 105, Hmm No : 162)

80 उदयान विकसित करून देखभाल करताना रक्कम रू.5,20,380/- अतिप्रदान झाल्याबाबतची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 18

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 7825816.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7825816.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 520380.00/-

निविदा, जाहिरात, कामाचा आदेश हे सर्व उदयान विकसित करण्यासंबंधी होते. त्यात उदयान देखभालीचा कोठेही उल्लेख नव्हता, त्याच अनुषंगाने करारनामे केल्याचे व त्यातील अटी व शर्ती याही उदयान विकसित करण्यासंबंधी होत्या. उदयान देखभालीबाबत यात कोठेही उल्लेख नव्हता, तरीही उदयान देखभालीचे काम करण्यात आलेले आहे. उदयान विकसित करण्याची निविदा वाढीव दराने मंजूर झाली, त्याच वाढीव दराने उदयान देखभालीवरील खर्चाची रक्कम अदा करण्यात आली, त्यामुळे कंत्राटदारास अतिप्रदान झाले. उदयाने महानरगपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काची दस्तऐवजे नस्तीस जोडलेली नाहीत. नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

उदयान नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील निवड महिन्यांचे लेखा परिक्षणाच्या वेळी नस्त्यांची तपासणी करताना उदयान विकसित करून देखभाल करताना रक्कम रू.520380/- अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

भाग अ

अ.क्र.	देयक क्रमांक / दिनांक	उदयान नाव	कंत्राटदार नाव	वाढ दर	देय रूपये	अदा रूपये	अतिप्रदान रक्कम
1	86/05.10.13	वीडी कामगार नगर	श्री. डी. डी. चुंबळे	42%	252000	357840	105840

2	87/05.10.13	सिध्देश्वर नगर	श्री. एन. डी. भगत	47%	126000	185220	59220
3	90/07.10.13	वनश्री कॉलनी	चे.मयूर कन्स्ट्रक्शन	23%	252000	309960	57960
4	110/11.10.13	यशोमंदिर हौसिंग सोसायटी	श्री. पी. यु. चवरे	23.95%	126000	156177	30177
5	114/11.10.13	वसंत नगर	श्री. डी. डी. चुंबळे	25.40%	378000	474012	96012
6	115/11.10.13	धर्माजी कॉलनी	श्री. डी. डी. चुंबळे	11.60%	231000	257796	26796
7	129/11.10.13	पोलार कॉलनी	श्री. एन. डी. भगत	45%	252000	365400	113400
8	133/11.10.13	काठे गल्ली	चे. वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	10%	126000	138600	12600
9	164/11.10.13	सप्तश्रृंगी देवी मंदिर	श्री. आर. के. खरात	5%	367500	385875	18375
एकूण					2110500	2630880	520380

भाग ब

खालील नमूद केलेली देयके लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.

अ. क्र.	देयक क्रमांक / दिनांक	उदयान नाव	कंत्राटदार नाव	देयकाची रक्कम रूपये
1	88/05.10.13	मखमलाबाद-विदयानगर	श्री. डी. डी. चुंबळे	56525
2	95/08.10.13	लोबो अपार्टमेंट समोर	श्री. प्रदिप डी. गायकवाड	402958

3	108/11.10.13	कलानगर	चे. विशाखा मजूर बांधकाम सोसायटी	55529
4	109/11.10.13	वृंदावन कॉलनी	श्री. पी. यु. चवरे	30030
5	111/11.10.13	कामरवाडे शिवार	श्री. पी. यु. चवरे	23153
6	112/11.10.13	दत्त नगर	श्री. पी. यु. चवरे	21928
7	113/11.10.13	गुरूदत्त मंदिर	श्री. पी. यु. चवरे	41650
8	116/11.10.13	राधाकृष्ण मंदिर	क्रांतीमजूर बांधकाम सोसायटी	41552
9	122/11.10.13	हिरावाडी	श्री. एन. डी. भगत	136096
10	123/11.10.13	अनुसया नगर	चे. प्रसाद नर्सरी	43977
11	130/11.10.13	सिहस्थ नगर	श्री. डी. डी. चुंबळे	56700
12	164/11.10.13	सप्तश्रृंगी देवी मंदिर	श्री. अमित गजानन धरणे	479286
13	169 अ /25.10.13	अवर टाकळी	श्री. रमाकांत विकास निरगुडे	2477726 278701
14	184/28.10.13	लोकमान्य नगर	महालक्ष्मी महिला बचत गट	105000
15	25/18.06.13	स्वामी नारायण नगर, सावरकर स्मारक	श्री. आर. व्ही. बधन	580396
16	68/04.09.13	कल्पतरू नगर	श्री. एन. डी. भगत	404823
17	139/17.10.13	विजय नगर	अमित धामाणे	479286
एकूण				5715316

उपरोक्त विषयी खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) उपरोक्त कामे करताना निविदा, जाहिरात, कामाचा आदेश हे सर्व उदयान विकसित करण्यासंबंधी होते. त्यात उदयान देखभालीचा कोठेही उल्लेख नव्हता, त्याच अनुषंगाने करारनामे केल्याचे व त्यातील अटी व शर्ती याही उदयान विकसित करण्यासंबंधी असल्याचे निदर्शनास येते. उदयान देखभालीबाबत यात कोठेही उल्लेख नव्हता, तरीही कोणतीही मंजूरी नसतानाही उदयान देखभालीचे काम करण्यात आलेले आहे.

2) उदयान विकसित करण्याची निविदा वाढीव दराने मंजूर करण्यात आली, त्याच वाढीव दराने उदयान देखभाली वरील खर्चाची रक्कम ही अदा करण्यात आली आहे. वास्तविक उदयानाच्या देखाभालीसंबंधी जे दर निश्चित केले

आहेत त्यावर कोणतीही वाढ दयावयास नको होती, त्यामुळे उपरोक्त भाग अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रूपये 520380/- चे अतिप्रदान झाली असून त्याची वसूली होणे आवश्यक आहे.

3) उपरोक्त भाग ब मध्ये नमूद अनुक्रम 1 ते 17 देयके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत, त्यामध्ये अशा प्रकारचे अतिप्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच लेखा परीक्षण कालावधी सन 2013-2014 मधील उदयान विकसित करण्याच्या कामात अशा प्रकारचे अतिप्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा सर्व अतिप्रदान रकमांची माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात यावी. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

4) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

5) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- टिपणी, करारनामा, मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

6) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

7) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे. बऱ्याच प्रकरणी करारनामे रु.100 व काही करारनामे रु.120 च्या स्टॅम्पपेपरवर केलेले आहेत. त्यामुळे जेथे असे कमी रकमेचे स्टॅम्प लावलेले आहेत त्याची माहिती लेखापरीक्ष्ण पथकास उपलब्ध करुन दयावी व लेखापरीक्षण कालावधीतील सर्व प्रकरणे अशी सर्व रक्कम वसुल करुन “0030 मुद्रांक व नोंदणी” या शासन लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावे.

8) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

9) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

10) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

11) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

12) प्रशासकीय, वित्तीय मंजुरी / खर्च मंजुरी आदेशात कालावधी, कंत्राटदार, संस्थेचे नाव इत्यादी नमूद केलेले नसल्याने त्या अनुषंगाने खात्री करता येत नाही. कार्योदेशावर दिनांक नमूद केलेले नाही.

13) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक - जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक.03/11/2003 व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक - प्रीविनि-2305/सहविमा/ साव्हावि/फ-2,दिनांक- 12/09/2005 नुसार कंत्राटी कामाच्या कालावधीचा विमा उतरविणे आवश्यक आहे. कंत्राटदाराने कंत्राटीकामाचा विमा न उतरविल्यास कामाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्के रक्कम वसुल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक होते. परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. कार्योदेशात याबाबत नमूद केलेले असले तरी देयकाची रक्कम अदा करताना कंत्राटदाराने विमा रक्कम भरल्याचे खात्री केली जात नाही. सन 2013-14 या कालावधीतील अशा सर्व प्रकरणी किती रक्कम भरावयाची बाकी आहे याची माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दयावी व त्याचा भरणा शासनाकडे करण्यात यावा.

14) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

15) कंत्राटदाराकडून करुन घेतलेले कामाच्या संदर्भात संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कोणतेही अहवाल वेळोवेळी घेतल्याचे दिसून येत नाहीत तसेच हजेरीसंदर्भात उदयानात नोंदवही ठेवली जात नाही असे दिसून येते.

16) उदयान देखभालीसाठी जुनेच दर सन 2002 मध्ये मंजुर केल्याचे नस्तीवरुन दिसते. त्यानुसार अर्धा एकर क्षेत्रासाठी रु.3500/- प्रति महिना तर एक एकर क्षेत्रासाठी रु.7000/- प्रति महिना दर मंजूर आहेत. त्या दरात दिनांक - 01/01/2013 पासून सुधारणा झाली असून ते अनुक्रमे 7000/- व 10000/- प्रति महिना इतके करण्यात आले असल्याचे दिसून येते तथापि सदरील दर कोणत्या आधारे निश्चित केले या संबंधी शासनाच्या संबंधीत विभागाकडे पत्रव्यवहार केला होता का याविषयी कोणतेही दस्ताऐवजे माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाले नाहीत.

17) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यप्रणालीबाबत मा.आयुक्तांनी दिनांक - 26/01/2012 रोजी मंजुरी दिल्याचे नस्तीत नमूद असले तरी याविषयी कोणतीही माहिती, दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाहीत.

18) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशील / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता आली नाही.

81 औषधे खरेदी व उपकरणे देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षाशी संबंधित नसलेल्या बाबींवर केलेल्या खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 04

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 114434.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 114434.00/-

वैदयकीय विभागातील औषधे खरेदी व उपकरणे देखभाल दुरुस्ती हा लेखाशिर्ष विविध रुग्णालये, प्रसुती गृहे, फिरता दवाखाना, आरोग्य केंद्रे व मोफत रोगनिदान शिबीरे या ठीकाणी येणाऱ्या रुग्णांवर औषध उपचार करणेकामी औषधे खरेदी, उपकरणे खरेदी व देखभाल या कारणासाठी असताना मा.आयुक्त, नाशिक यांच्या कन्येच्या औषधोपचारासाठी रक्कम रुपये 1,14,434/- इतकी वैदकीय प्रतिपुर्तीची रक्कम या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात आलेली आहे. सदर वैदकीय प्रतिपुर्तीचे देयक आस्थापना विभागातून खर्ची टाकणे आवश्यक असताना वैदयकीय विभागातून खर्ची टाकण्यात आलेले आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या कालावधीतील वैदयकीय विभागाच्या निवडक महिन्यांच्या लेख्यांची पडताळणी करताना वजावट नोंदवहीमध्ये वैदकीय खर्चाची प्रतिपुर्ती केल्याचे निदर्शनास आले असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

मा.आयुक्त, नाशिक यांच्या कन्येच्या औषधोपचारासाठी देयक क्रमांक - 108 दिनांक - 23/09/2013 नुसार रक्कम रुपये 1,14,434/- इतकी वैदयकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी खर्च केले असून त्यासाठी औषधे खरेदी व उपकरणे देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षाचा निधी खर्ची टाकण्यात आलेला आहे. त्यानुसार वजावट नोंदवहीतही वजावट दर्शविलेली आहे. सदरील खर्चास आदेश क्र.920 दिनांक -20/09/2013 नुसार मंजुरी दिलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदरचे लेखाशिर्ष हे औषधे खरेदी व उपकरणे देखभाल दुरुस्ती यासाठी असून सदर लेखाशिर्षातून विविध रुग्णालये, प्रसुती गृहे, फिरता दवाखाना, आरोग्य केंद्रे व मोफत रोगनिदान शिबीरे या ठीकाणी येणाऱ्या रुग्णांवर औषध उपचार करणेकामी औषधे खरेदी व उपकरणे खरेदी व देखभाल या कारणांसाठीच या निधीतून खर्च करणे अपेक्षित आहे.

2) वैदयकीय प्रतिपुर्तीचा खर्च हा वेतन अनुदानातून करणे आवश्यक असताना वैदकीय विभागातून केल्याने अनियमितता झालेली आहे.

3) मुंबई वित्तीय नियमावली 1959 मधील नियम क्रमांक 58 नुसार वित्तीय औचित्त्याच्या सुत्राचे पालन झालेले दिसून येत नाही.

4) उपरोक्त देयक, संबंधित नस्ती व दस्तऐवजे हे लेखापरीक्षण कालावधीत लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेले नाहीत.

FDSRKNM8201 (Ref No : 120, Hmm No : 175)

82 सन 2013-2014 या कालावधीतील नाशिक महानगरपालिका हददीतील खाजगी व ट्रस्टच्या मालकीची शुश्रुषा गृहांची नोंदणी व नुतणीकरण न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 111500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 111500.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 111500.00/-

वैदयकीय विभागात त्यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्याच शुश्रुषा गृहांची संख्या उपलब्ध आहे पण अदयापपर्यंत ज्या शुश्रुषा गृहांची नोंदणीच महानगरपालिकेकडे केलेली नाही अशा शुश्रुषा गृहांवर नियमानुसार कार्यवाही केलेली नाही तसेच 525 नोंदणीकृत रूग्णालयांपैकी 216 रूग्णालयांचे नुतणीकरण न केल्याने रक्कम रूपये 1,11,500/- एवढी थकबाकी शिल्लक आहे.

मुंबई शुश्रुषा गृह नोंदणी अधिनियम 1949 नियम 5 व त्यातील तरतुदी (सुधारणा) अन्वये महानगरपालिका हददीमध्ये खाजगी व ट्रस्टच्या मालकीचे खाजगी शुश्रुषा गृहांची नोंदणी व नुतणीकरण करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदरची माहिती लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.166, दिनांक 7/11/2016 अन्वये विचारणा केली असता वैदयकीय विभागाने लेखापरीक्षणास त्यांचे पत्र क्रमांक 3571, दिनांक. 23/11/16 नुसार सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात प्रत्यक्षात एकूण किती शुश्रुषा गृहांची संख्या आहे याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही, वैदयकीय विभागाकडे फक्त त्यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या शुश्रुषा गृहांचीच संख्या उपलब्ध आहे, परंतु अदयापपर्यंत ज्या शुश्रुषा गृहांची नोंदणीच महानगरपालिकेकडे केलेली नाही,

अशा शुश्रुषा गृहांवर मुंबई शुश्रुषा गृह नोंदणी अधिनियम 1949 व त्यातील सुधारणा नियम 5 अन्वये महानगरपालिका हददीमध्ये येणाऱ्या खाजगी व ट्रस्टच्या मालकीच्या सर्व शुश्रुषा गृहांची (Nursing Home) नोंदणी करणे बंधनकारक असून अधिनियमाच्या परिच्छेद क्रमांक 6 अन्वये नोंदणी न करणाऱ्या शुश्रुषा गृहाच्या चालकास 6 महिने कारावास किंवा रूपये 10,000/- इतकी शिक्षा लादण्याची तरतूद आहे, परंतु नाशिक महानगरपालिकेने अशी कारवाई केल्याचे दिसून येत नाही. याकरीता नाशिक महानगरपालिकेमार्फत विशेष मोहिम राबवून सदरची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात 525 नोंदणीकृत रूग्णालय असून मार्च 2014 पर्यंत 309 रुग्णालयांचे नुतणीकरण झालेले आहे व उर्वरित 216 रूग्णालयांचे नुतणीकरण करणे अदयाप शिल्लक असल्याचे कळविले आहे, सदर रूग्णालयांचे नुतणीकरणाअभावी रक्क्म रूपये 1,11,500/- एवढी थकबाकी वसूल होणे बाकी आहे, यामुळे वेळेत वसूली न केल्यामुळे महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या उत्पन्नापासून महानगरपालिकेस वंचित रहावे लागत आहे.

DGPVJTM8301 (Ref No : 125, Hmm No : 167)

83 महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने शासन अधिसूचना दिनांक 6.08.2012 नुसार बांधकाम परवाना देताना स्थानिक संस्था कर रक्कम वसूलीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 04

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1702829.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1702829.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1702829.00/-

शासन अधिसूचना दिनांक 06.08.2012 नुसार बांधकाम परवाना देताना स्थानिक संस्था कर वसूलीची कार्यवाही केलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या आर्थिक वर्षाचे नगररचना विभागाचे व नाशिक रोड विभागीय कार्यालयाचे लेखापरीक्षण करताना निवडक प्रस्तावांची तपासणी करताना बांधकाम परवाने देताना स्थानिक संस्था कर वसूलीबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. शासन अधिसूचना दिनांक 6.08.2012 नुसार स्थानिक संस्था कर वसूली बांधकाम परवाना देताना वसूल करणे आवश्यक आहे. बांधकाम परवाना संबंधी नस्त्यांची तपासणी करताना स्थानिक संस्था कर भरणेबाबत संबंधितांनी हमीपत्र कंत्राटदारांनी दिलेले आहे, काही नस्त्यांना त्यांच्या मूळ प्रती जोडलेल्या नसून छायांकित प्रती

जोडलेल्या आहेत. आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी स्थानिक संस्था कर भरणेबाबत / रिटर्न फाईल करण्याबाबत हमी दिलेली असून सन 2013-2014 हे आर्थिक वर्ष संपल्यावर याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली दिसून येत नाही, याबाबत नस्तीस कोणताही तपशील उपलब्ध नाही. स्थानिक संस्था कराची पूर्ण वसूली झाल्याची खात्री करूनच बांधकाम पूर्णत्व दाखला देणे आवश्यक आहे.

2. मुंबई प्रांतिक महानगरपालिका 1949 (2012 नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम 2012 चे नियम 27 (ड) (4)) अन्वये महानगपालिकेच्या हददीत बांधकाम करण्याचे काम हाती घेणारा बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार, स्थानिक संस्था कर याखाली महानगपालिकेकडे स्वत:ची नोंदणी करेल आणि त्याला, शहराच्या हददीत बांधकामाकरिता किंवा वापराकरीता आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकत्र स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा पर्याय असेल किंवा खालील मानकांनुसार स्थानिक संस्था कराचे ठोक प्रदान करण्याचा पर्याय असेल.

अ) चौथ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उदवाहक नसेल तेथे) रू. 100 प्रती चौरस मीटर

ब) सातव्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उदवाहक असेल तेथे) रूपये 150 प्रती चौरस मीटर

क) उत्तुंग इमारतींचे बाधकाम (सात मजल्यांपेक्षा अधिक) रूपये 200 प्रती चौरस मीटर

3. जो कंत्राटदार ठोक कर प्रदानाचा पर्याय स्विकारेल तो प्रारंभ प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्यावर स्थानिक संस्था कराच्या अशा देय रक्कमेपैकी 50% आगाऊ रकमेचे प्रदान करू शकेल. तसेच महानगरपालिकेच्या हददीमध्ये काम हाती घेणाऱ्या कोणत्याही व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हददीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा किंवा त्याच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रकमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने उक्त् कर प्रदान करण्याचा पर्याय असेल. त्यानुसार प्रत्यक्षात कार्यवाही केली जात नाही असे दिसून येते.

4. महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने सन 2013-2014 या वित्तीय वर्षात दिलेल्या सर्व बांधकाम परवान्यासंदर्भात स्थानिक संस्था कराची आकारणी करणे आवश्यक आहे. काही निवडक प्रस्तावाची तपासणी करताना स्थानिक संस्था कर वसूली संदर्भात कार्यवाही केली नसल्याचे दिसून आले, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कंत्राटदाराचे नाव	स्थानिक संस्था कर नोंदणी क्रमांक	बांधकाम चौरस मिटर	रक्कम
1	सिध्दी कन्स्ट्रक्शन	-	444.49	44449
2	मानवी होल्डींग प्रा. लि.	-	8495.95	849595
3	भार्गवे वृंदा दत्तात्रय	-	395.22	39522

4	श्री सुनिल शंकरराव चिंचोरे	NSK 604569	455.71	45571
5	श्री अजित भालचंद्र आंबीकर	NSK 604668	605.29	60529
6	स्पेस डेव्हलपर्स	NSK 603858	528.68	52868
7	आनंद एस. बोहरा	NSK 604505	1388.86	138886
8	राजाराम खैरनार	-	17.36	1736
9	शोभा साळवी	-	18.23	1823
10	विठठल मुंढे	-	42.99	4299
11	जी. एस. डेव्हलपर्स	-	369.06	36906
12	चे. दक्षता को.ऑप.हौ. सोसायटी	-	3882.69	388269
13	श्री. एम. व्ही. तिवारी	-	383.76	38376
		एकूण रूपये		1702829

उपरोक्त् आकारणी किमान दर रूपये 100/- प्रती चौरस मीटर प्रमाणे दर्शविलेली असून अधिसूनचनेत नमूद केल्यानुसार आकरणी करून संबंधित व्यवसायिक/कंत्राटदार यांचेकडून वसूल करणे आवश्यक होते, अशी कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक् नुकसान झाले असून शासन आदेशाचे पालन झालेले नाही.

MINVAJM6901 (Ref No : 133, Hmm No : 189)

कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

---------- निरंक ----------

भाग दोन

सर्वसाधारण अनियमितता

कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

84 सन 2013-2014 मध्ये महिला व बालकल्याण विभागातर्फे आंगणवाडी बालकांना पूरक पोषण आहार देण्यातील उणीवाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

प्रशासकीय विलंबामुळे सन 2013-2014 या शैक्षणिक वर्षात दिनांक 17/6/2013 ते 9/10/2013 या कालावधीत अंगणवाडयातील सुमारे 15000 बालकांना सकस आहारापासून वंचित रहावे लागले आहे. शासननिर्णयाच्या तुलनेत आहाराचे प्रमाण कमी देण्यात आले असून दर मात्र शासननिर्णयापेक्षा जास्त अदा करण्यात आले आहेत. प्रकल्प अधिकारी, सहायक आयुक्त यांनी आंगणवाडयांना नियमित भेटी व तपासण्या केलेल्या नाहीत.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या कालावधीतील महिला व बालकल्याण विभागाचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आलेली आहे.

नाशिक महानगरपालिका, महिला व बालकल्याण कार्यालयाच्या अधिनिस्त एकूण 419 अंगणवाडया महानगरपालिकेच्या 6 विभागांतर्गत कार्यरत असून सदर अंगणवाडीत अंदाजे 15000 बालके शिक्षण घेत आहेत. शासन निर्णय क्र.एबावि 2008/प्र.क्र. 59/का-5, दिनांक 24/8/2009 च्या अनुषंगानने मा.महासभा ठराव क्र. 185/दिनांक 15/6/2013 तसेच स्थायी समिती ठराव क्र.449/दिनांक 26/9/2013 अन्वये प्रती लाभार्थी (बालकास) प्रति दिन रक्कम रू.6/- याप्रमाणे पुरक पोषण आहार देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

अंगणवाडी शाळेतील बालकांना सकस आहार देणेकामी मा.आहार तज्ञ, जिल्हा रूग्णालय, नाशिक यांचेकडून सन 2012-2013 पासून सकस आहाराची पाककृती व आठवडयाचा तक्ता बनवून घेण्यात आला असून खालील प्रमाणे सकस आहार सन 2013-2014 या वर्षाकरिता सुध्दा पुरविण्याबाबत नमूद केले आहे. सदर तक्ता खालील प्रमाणे आहे.

वार	पदार्थ	वजन(ग्रॅम)	उष्मांक	प्रथिने(ग्रॅम)
सोमवार	गुळ,शेंगदाणे लाडू	60	360	8.8
मंगळवार	केळी	100	116	1.2

बुधवार	मटकी,मोडाची उसळ	50	148.8	8.32
गुरुवार	गव्हाची लापशी	60	214	4.80
शुक्रवार	केळी	100	116	1.2
शनिवार	राजगिरा लाडू	50	71	1.4

सन 2013-2014 या शैक्षणिक वर्षाकरिता बालकांना सकस आहार पुरवणेकामी महिला संस्था/महिला मंडळ/बचत गट यांचेकडून अर्ज प्रस्ताव मागणी करणेकामी स्थानिक वृत्त पत्र दैनिक सकाळ व दैनिक गावकरी या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली असता 34 महिला संस्था/महिला मंडळ/बचत गट यांचेकडून अर्ज प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झाले सदर अर्ज/प्रस्तावाच्या अनुषंगाने सकस आहार पुरवठा करणेकामी अंगणवाडयांचे वाटप करून देणेबाबत मा.महासभा व मा.आयुक्त यांनी गठीत केलेल्या सकस आहार नियंत्रण समितीची बैठक दिनांक दिनांक 7/9/2013 रोजी मा.आयुक्त यांचे दालनात सकस आहार नियंत्रण समिती सदस्य, सचिवांच्या उपस्थितीत घेण्यात आली असता अंगणवाडयांचे प्रमाण बघता काही विभागात आलेले अर्ज/प्रस्तावांची संख्या कमी प्रमाणात असल्याने समितीने असा निर्णय घेतला की ज्या विभागात जास्त अर्ज/प्रस्ताव आले आहे त्या पुरवठादारांचे इतर विभागात सकस अहार पुरविण्याची इच्छा असल्यास त्यांना काम देण्यात यावे तसेच प्राप्त झालेल्या अर्ज/प्रस्ताव मधील पुरवठारांकडे अटी व शर्ती मध्ये आवश्यक त्या कागदपत्रांमध्ये शिथीलता देण्याबाबत नमूद केले आहे.

सदर बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.महासभा ठराव क्र. 185/दिनांक 15/6/2013 रोजी सकस आहार पुरवठा करण्याबाबत ठराव पारित करण्यात आला व तदनंतर मा.आयुक्त यांचे आदेश क्रमांक 979/दिनांक 01/10/2013 अन्वये 34 महिला संस्था/महिला मंडळ/बचत गट यांचेकडून सकस आहार पुरवठा करण्यातचे आदेश निर्गमित करण्यात आले व दिनांक 10/06/2013 पासून प्रत्यक्षात संस्था/महिला मंडळ/बचत गट यांच्याकडून आंगणवाडीत सकस आहार पुरविण्यात आला आहे. वरील बाबींवरून असे निदर्शनास येते की, केवळ प्रशासकीय विलंबामुळे दिनांक 17/6/2013 ते 9/10/2013 या कालावधीत अंगणवाडयातील सुमारे 15000 बालकांना सकस आहारापासून वंचित रहावे लागले आहे.

2. मा.महासभा ठराव क्र. 185/दिनांक 15/6/2013 तसेच स्थायी समिती ठराव क्र.449/दिनांक 26/9/2013 अन्वये प्रती लाभार्थी (बालकास) प्रति दिन रक्कम रू.6/- याप्रमाणे पुरक पोषण आहार देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक इबाबी 2008/प्र.क्र.59/का-5 दि.24/08/2009 मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे नागरी प्रकल्पातील सर्व अंगणवाडी केंद्रातील सर्वसाधारण क्षेत्रातील(जनरल) लाभार्थ्याकरिता 500 उष्मांक आणि 12 ते 15 ग्रॅम प्रथिने देणे आवश्यक आहे तसेच शासन निर्णय क्रमांक एबावि 2010/प्रक्र 113/का-5, दिनांक 26/09/2011 च्या सुधारित दराप्रमाणे खर्चाची मर्यादा प्रती दिन प्रती लाभार्थी रु.5.25/- एवढी निश्चित केली आहे. परंतू नाशिक महानगरलिकेने रु.5.25 ऐवजी रु.6 प्रती दिन /प्रती बालक असा वाढीव दर मंजूर केला असून वरिल तक्त्याप्रमाणे आठवडयाचा आहार दिला जातो. म्हणजे दर आठवडयाला 3000 उष्मांका ऐवजी 1025.80 उष्मांक व 72 ग्रॅम प्रथिने ऐवजी 25.72 ग्रॅम एवढाच आहार दिला आहे. परंतु दर रुपये पाच रूपये पंचवीस पैसे ऐवजी सहा रुपये देण्यात आला आहे. म्हणजेच उपरोक्त शासननिर्णयाच्या तुलनेत आहाराचे प्रमाण कमी असूनही दर मात्र शासननिर्णयापेक्षा जास्त दिल्याचे दिसून येते.

3. महिला बचत गटाकडून अंगणवाडयांना पुरविण्यात येणारा पूरक पोषण आहारचे परिमाण, उष्मांक व प्रथिने मोजून घेण्याची/तपासणी करण्याची कोणतीही यंत्रणा कार्यरत नाही. त्यामुळे पुरविलेला आहाराच्या दर्जाची खात्री केलेली दिसून येत नाही. महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि 2008/प्र.क्र.59/का-5 मंत्रालय मुंबई दि.24/08/2009 मधील परिच्छेद 3.10 प्रत्येक दिवसाचा आहाराचा नमुना 24 तासांसाठी जतन करून ठेवावा व संबंधित अधिकाऱ्यांनी 3 महिन्यातून एकदा अचानकपणे आहाराची तपासणी करावी. कमी पुरवठा, खंडित पुरवठा, निकषानुसार आहार नसणे इत्यादी बाबत दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत नमूद केले असून सदर बाबतची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4. सदर योजना पूर्ण वर्ष राबविली नसल्याने या उददीष्टाखाली 2 कोटी 25 लाख एवढी तरतूद असून फक्त 57.50 एवढाच खर्च करण्यात आला आहे.

5. सन 2013-2014 (माहे जून 2013 ते मे 2014) या शैक्षणिक वर्षाकरिता 34 महिला संस्था/महिला मंडळ/महिला बचत गट यांना सकस आहार नियंत्रण समितीने निवड केलेल्या पुरवठादारांपैकी 17 नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आल्या यापैकी यशस्वीनी महिला बचत गट यांनी आंगणवाडी एनपी 43 56 क्रमांक शाळेजवळ वडारवाडी पंचवटी प्रभाग क्रमांक 9 या आंगणवाडीने आहार साठा व वितरण नोंदवहीत नोंदी घेतल्याचे दिसून आले नाही.

6.प्रकल्प अधिकारी, सहायक आयुक्त यांनी आंगणवाडयांना नियमित भेटी व तपासण्या केल्याचे दिसून येत नाही.

7. राज्य शासनाच्या एकात्मिक बाल विकास योजनेमार्फत नाशिक शहरी विभागात देखील आंगणवाडयातील बालकांना पोषण आहार देण्याबाबतची योजना कार्यन्वीत आहे. यामुळे राज्य शासनामार्फत व नाशिक महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येणाऱ्या आंगणवडयाचे क्षेत्र वेगवेगळे आहे किंवा नाही याची पडताळणी होणे आवश्यक आहे. जेणेकरून एकाच लाभार्थ्यास सदर योजनेचा लाभ दुबार होणार नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 68, Hmm No : 128)

85 विद्युत विभागाकडील (नविन नाशिक) विकास कामांचे लेखापरीक्षणात आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 13

लेखा शीर्ष : पथदीप विद्युतीकरण म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

दोन्ही वृत्तपत्रात एकाच वेळी/दिनांकास निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असतांना वेगवेगळ्या दिनांकास निविदा प्रसिध्द केली आहे. मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध केल्या नाहीत. नगरसेवक निधीतून

द्यावयाच्या कामाची अंदाजित किंमत रु. 2 लक्ष्य पेक्षा जास्त असता कामा नये अशा स्पष्ट सूचना असतांना सदर शासन निर्देशाचे पालन झालेले नाही. अंदाजपत्रकीय तरतुदी व्यतिरिक्त केलेल्या बाबीस सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात आलेली नाही.ठेकेदाराने VAT नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर केलेले नाही.साहित्य BIS नुसार वापरल्याची खात्री करणे आवश्यक असतांना अशी खात्री केलेली दिसून येत नाही. देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात सिंहस्थ निधी अंतर्गत बांधकाम विभागाकडील नाशिक शहरातील विद्युत विभागाकडील (नविन नाशिक) विकास कामांची तपासणी केली असता सदर कामावर रक्कम रु 11017461/- इतका खर्च केला आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	प्रशासकीय मान्यता क्र. दि. रक्कम	तांत्रिक मान्यता क्र. दि.रक्कम	कामाचे आदेश क्र. दि.व मुदत	मंजूर निविदा दर	कामावर झालेला खर्च
1	प्रभाग क्र.42 मधिल शॉपिंग ते लेखानगर रस्त्यात अडथळा येणारी MSEB,HT/LT लाईन हलविने,भूमिगत करणे.	महासभा ठराव क्र. 782 दि. 18.03.13 रु. 4236921	अधिक्षक अभियंता क्र. निरंक दि. निरंक रु. 4236921	55/2013 दि.05.10.13 मुदत-05 महिने	5% कमी दराने	3995276
2	प्र.क्र.46 ब जेसी-4/जेसी-3 सेंटर रायगड चौक रस्त्यात अडथळा येणारे MSEB,LT पोल हलविणे व लाईन भूमिगत करणे.	महासभा ठराव क्र. 132 दि. 15.06.13 रु. 1499971	कार्यकारी अभियंता क्र. निरंक दि. निरंक रु. 1499971	66/2013 दि.18.11.13 मुदत-04 महिने	5% कमी दराने	1418357
3	प्र.क्र.46 मधील लोकमान्य नगर AB-1/ AB-2 सेक्टर परिसरात रस्त्यात अडथळा येणारे पोल हलविणे व पथदीप सोय करणे.	महासभा ठराव क्र. 1089 दि. 17.11.11 रु. 999493	कार्यकारी अभियंता क्र. निरंक दि. निरंक रु. 999493	30/2013 दि.15.02.13 मुदत-05 महिने	1% कमी दराने	999493
4	प्र.क्र.42 मधिल लेखानगर मोरे हॉस्पिटल ते औदुंबर स्टॉप ब्राम्हणी दुकानापर्यंत	महासभा ठराव क्र.788 दि. 18.03.13	कार्यकारी अभियंता क्र. निरंक दि.	54/2013 दि.05.10.13	2% कमी दराने	914545

	Actogonal पोल उभारून पथदीप सोय करणे.	1010789	निरंक रु. 933209			
5	प्र.क्र.45 मधील विविध भागातील खराब फिटिंग बदलाने	प्रभाग समिती ठराव क्र. 51/ 29.04.2011 499703	कार्यकारी अभियंता क्र. निरंक दि. निरंक रु. 499703	26/2013 02 महिने	5% जादा दराने	524688
6	प्र.क्र.44 मधिल विविध ठिकाणी पथदीप सोय करणे	महासभा ठराव क्र.783 दि. 18.03.13 रु. 999355	कार्यकारी अभियंता क्र./ दि. निरंक रु. 811627	60/2013 दि. 08.10.13 02 महिने	4% कमी दराने	779162
7	प्र.क्र.45 मधिल उत्तमनगर परिसर,राजरत्ननगर तसेच प्रभागातील खराब पोल/केबल्स बदलणे.	महासभा ठराव क्र.468 दि. 19.12.12 रु. 1499960	कार्यकारी अभियंता क्र./ दि. निरंक रु. 1323965	24/2013 दि.17.07.13 मुदत 03 महिने	4% कमी दराने	1240973
8	प्र.क्र.44 मधिल विविध भागांतील खराब फिटिंग बदलणे.	महासभा ठराव क्र.499 दि. 17.01.2013 रु. 1499995	कार्यकारी अभियंता क्र./ दि. निरंक रु. 717795	23/2013 दि.10.07.13 मुदत- 03 महिने	4% कमी दराने	689083
9	प्र.क्र.42 मधिल मोरे हॉस्पिटल ते लेखानगर पर्यंत पथदीप सोय करणे.	महासभा ठराव क्र.157 दि. 01.02.13 रु. 499509	कार्यकारी अभियंता क्र./ दि. निरंक रु. 466857	14/2013 दि.05.06.13 मुदत- 03 महिने	2% कमी दराने	455884
	एकूण					11017461

उपरोक्त कामाचे उपलब्ध अभिलेख्याची पडताळणी करून कामावर झालेला एकूण खर्च रक्कम रु. 11017461 बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त अ.क्र.01 या कामाची निविदा दै.भ्रमर या वृत्तपत्रात दि.29.07.13 रोजी व दै.सामना या वृत्तपत्रात दि.16.08.13 रोजी अशा वेगवेगळ्या दिनांकास प्रसिध्द केल्याची निदर्शनास आले.

2. उपरोक्त अ.क्र.01,04 व 06 या कामाचे मोजमापे अनुक्रमे मोजमाप पुस्तिका क्र.2709,1816, 1375 व 2557 मध्ये नोंदवली आहेत तथापि सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध केल्या नाहीत.

3. उपरोक्त अ.क्र.02 या कामाऐवजी सदर प्रभागात विविध ठिकाणच्या खराब फिटिंग बदलणे असा मूळ प्रस्ताव होता.तथापि मनपाच्या नवीन धोरणानुसार LED फिटिंग लावणे बाबतचा धोरणात्मक निर्णय झालेला असल्यामुळे मूळ प्रस्ताव रद्द करून रस्त्यात अडथळा येणारे MSEB,LT पोल हलविणे व लाईन भूमिगत करणे हे काम हाती घेण्यात आले आहे.

4. उपरोक्त विकास कामे नगरसेवक निधी मधून करण्यात आलेली आहेत.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग परिपत्रक दिनांक-26.02.2001 नुसार नगरसेवक निधीतून द्यावयाच्या कामाची अंदाजित किंमत रु. 2 लक्ष्य पेक्षा जास्त असता कामा नये अशा स्पष्ट सूचना असतांना सदर शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.

5. उपरोक्त अ.क्र.02 मध्ये रस्त्यात अडथळा येणारे LT पोल हलविणे व लाईन भूमिगत करणेचे असतांना अस्तित्वातील 06 मीटर वरील उंचीचे पोल हटविणे (Dismentling) या बाबीचे काम करण्यात आलेले नाही.

6. उपरोक्त अ.क्र.04 सदर कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र.8 Supplying & erecting sreet light fitting 18 नग व Supplying & erecting HPSV lamp 250 watt या बाबींचे काम करण्यात आलेले नाही.

7. उपरोक्त अ.क्र.05 व 09 येथील कामाच्या निविदे सोबत ठेकेदाराने VATनोंदणी प्रमाणपत्र सदर केलेले नसल्यामुळे 2% ऐवजी 5% VATदेयकातून कपात करणे आवश्यक होते. सदर ठेकेदाराचे VATनोंदणी प्रमाणपत्र दर्शवावे अन्यथा अनुक्रमे उर्वरित रक्कम रु. 15740 व रु.13676 वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

8. उपरोक्त अ.क्र.05 व 06 येथील विकास कामाचे काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र संचिकेत संलग्न केलेले नाही.

9. उपरोक्त अ.क्र.08 येथील कामाचे मूळ अंदाजपत्रक रु.1499995 एवढ्या रकमेचे होते.तथापि Supplying & erecting HPSV lamp,Time swich व 4 pole power coductor या बाबी (रु.857250) वगळून सुधारित रु.717795 चे अंदाजपत्रक तयार करून त्यानुसार काम प्रस्तावित करण्यात आले आहे. सुधारित अंदाजपत्रकात बाब क्र.17 Supplying & erecting Quartz ele.time swich व बाब क्र.18 Supplying & erecting 4 pole power coductor यांचा समावेश नसतांना सदर बाबींचे काम करण्यात आलेले आहे.त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच अंदाजपत्रकातील खाडाखोडी स्वाक्षांकित करण्यात आलेल्या नाहीत.

10. जिल्हा दरसुचीतील सर्वसाधारण सूचना नुसार Energy efficient & energy saving devices वापरणे आवश्यक आहे तथापि असे devices वापरल्या बाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.

11. जिल्हा दरसुचीतील Standard & specification नुसार मोजमाप पुस्तिकेत कामाची मापे नोंदविल्यानंतर "The above work has been carried out as per specification" असे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असतांना तसे प्रमाणपत्र नोंदविण्यात आलेले नाही.

12. जिल्हा दरसुचीतील Standard & specification नुसार ERDA,CPRT किंवा केंद्र/राज्याच्या Approved laboratory कडून साहित्य BIS नुसार वापरल्याची खात्री करणे आवश्यक असतांना अशी खात्री केलेली दिसून येत नाही.

13. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

86 स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापा-यांनी विवरणपत्रे दाखल न करणे किंवा उशीराने दाखल करणे या प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 1

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 29 मधील तरतुदी नुसार लेखापरिक्षण कालावधीपर्यंत सुमारे 3161 व्यापा-यांनी विवरणपत्र सादर केले नाही. या प्रकरणी स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 48 (6) नुसार दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे. सन 2013-14 या वित्तिय वर्षात 17509 प्राप्त विवरणपत्रांच्या तुलनेत स्थानिक संस्था कर प्रकरणांच्या निर्धारणाच्या संख्येचे प्रमाण अत्यंत कमी असुन निर्धारणाचे काम अधीक जलद गतीने होणे आवश्यक आहे.

नाशिक महापालिकेचे सन 2013-14 या वित्तिय वर्षाचे लेखापरिक्षणात स्थानिक संस्था कर विभागाकडील निवडक कर भरणा प्रकरणांची पडताळणी केली असता, त्यामध्ये खालीलप्रमाणे उणिवा आढळून आलेल्या आहेत.

स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 29 नुसार प्रत्येक व्यापा-याने सहामाही व वार्षीक विवरणपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. व्यापा-यांनी विवरणपत्रे दाखल न करणे किंवा उशीराने दाखल करणे या प्रकरणी स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 48 (6) नुसार व्यापारी किंवा व्यक्तीनुसार त्यांना त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर 5000/- पेक्षा अधीक नसेल इतक्या रक्कमेच्या दंडाची आकारणी करता येईल अशी तरतुद आहे.

नाशिक महापालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाकडील नोंदीत व्यापारी, सन 2013-14 मधील प्राप्त विवरणपत्रे व स्थानिक संस्था कर निर्धारणाची संख्या इ. तपशील खालील प्रमाणे आहे.

एकूण नोंदीत व्यापारी	सन 2013-14 मधील प्राप्त विवरणपत्रे	31/3/2014 पावेतो स्थानिक संस्था कर निर्धारणाची संख्या	निरंक विवरणपत्र सादर करणा-यांची संख्या
20670	17509	648	10861

तथापी लेखापरिक्षण कालावधीपर्यंत सुमारे 3161 व्यापा-यांनी विवरणपत्र सादर केल्याचे दिसून येत नाही. त्यांचेवर

उपरोक्त नियमानुसार दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच प्राप्त विवरणपत्रांपैकी 10861 व्यावसायीकांनी सन 2013-14 या वित्तीय वर्षात स्थानिक संस्था कराचा काहीच भरणा केलेला आढळून आलेला नाही. अशा प्रकरणातील सदोष प्रकरणांचा आढावा घेऊन अशा प्रकरणी योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

उपरोक्त तक्यात नमुद 17509 प्राप्त विवरणपत्रांच्या तुलनेत स्थानिक संस्था कर प्रकरणांच्या निर्धारणाच्या संख्येचे प्रमाण अत्यंत कमी असुन सदोष विवरणपत्रांवर वेळीच कार्यवाही होण्याच्या दृष्टीकोनातुन स्थानिक संस्था कर प्रकरणांच्या निर्धारणाचे काम अधीक जलद गतीने होणे आवश्यक आहे.

87 नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 चे मालमत्ता कर ची थकबाकी बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 1

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 350591000.00 /-

मार्च 2014 अखेर रक्कम रुपये 34,05,91,000/- एवढया मालमत्ता कराची थकबाकी वसूल न केल्यामुळे महापालिकेस अपेक्षीत उत्पन्न प्राप्त झालेले नाही. थकीत रकमा वसुली बाबत प्रभावी उपाय योजना व प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 चे लेखापरीक्षणांतर्गत कर आकारणी विभागाकडील अभीलेख्यांची पडताळणी केली असता, खालीलखाललखखस नमुद केल्याप्रमाणे माहे मार्च 2014 अखेर प्रभागनिहाय घरपट्टी करांची थकबाकी असल्याचे दिसून आलेले आहे.

(रक्कम रु. लाखात)

अ.क्र.	विभागिय कार्यालयाचे नांव	मिळकत संख्या	एकुण उद्दीष्ट	एकुण वसुली	एकूण थकबाकी	वसुलीचे शेकडा प्रमाण
1	नाशिक पुर्व	72035	2489.10	1457.21	1031.12	58.54%
2	नाशिक पश्चिम	34872	1968.40	1344.28	622.13	68.29%

3	पंचवटी	74113	2037.30	1186.70	849.16	58.25%
4	नाशिकरोड	63674	1492.40	1180.11	311.97	79.08%
5	सातपुर	39921	906.64	667.61	237.62	73.64%
6	नविन नाशिक	83003	1674.40	1318.26	353.91	78.73%
	एकूण	367618	10568.24	7154.17	3405.91	67.69%

मार्च 2014 अखेर वरीलप्रमाणे रुपये 34,05,91,000/- एवढया मालमत्ता कराची वसुली करण्यात आलेली नाही. सदर थकबाकी वसूल न केल्यामुळे महापालिकेस अपेक्षीत उत्पन्न प्राप्त झालेले नाही व त्यामूळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. सदर थकीत रकमा वसुली बाबत प्रभावी उपाय योजना केल्याचे दिसून येत नाही. याबाबत ठोस उपाययोजना करुन प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

IRRYLWM7701 (Ref No : 24, Hmm No : 68)

88 नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 चे पाणीपट्टी कराची थकबाकी बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 1

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 364563580.00 /-

मार्च 2014 अखेर रक्कम रुपये 36,45,63,580/- एवढया पाणीपट्टी कराची थकबाकी वसूल न केल्यामुळे महापालिकेस अपेक्षीत उत्पन्न प्राप्त झालेले नाही. थकीत रकमा वसुली बाबत प्रभावी उपाय योजना व प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 चे लेखापरीक्षणांतर्गत कर आकारणी विभागाकडील अभीलेख्यांची पडताळणी केली असता, खालीलखाललखखस नमुद केल्याप्रमाणे माहे मार्च 2014 अखेर प्रभागनिहाय पाणीपट्टी कराची थकबाकी असल्याचे दिसून आलेले आहे.

(रक्कम रु. लाखात)

अ.क्र.	विभागिय कार्यालयाचे नांव	नळ कनेक्शन संख्या	एकुण उद्दीष्ट	एकुण वसुली	एकूण थकबाकी	वसुलीचे शेकडा प्रमाण
1	नाशिक पुर्व	26595	119604880	52850493	66754387	44.19%
2	नाशिक पश्चिम	9796	82821884	58521076	24300808	70.66%
3	पंचवटी	33341	115953412	46585871	69367541	40.18%
4	नाशिकरोड	27473	121203268	71341613	49861655	58.86%
5	सातपुर	24252	106137225	38388571	67748654	36.17%
6	नविन नाशिक	55179	164378096	77847561	86530535	47.36%
	एकूण	176636	710098765	345535185	364563580	48.66%

मार्च 2014 अखेर वरीलप्रमाणे रुपये 36,45,63,580/- एवढया पाणीपट्टी कराची वसुली करण्यात आलेली नाही. सदर थकबाकी वसूल न केल्यामुळे महापालिकेस अपेक्षीत उत्पन्न प्राप्त झालेले नाही व त्यामूळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. सदर थकीत रकमा वसुली बाबत प्रभावी उपाय योजना केल्याचे दिसून येत नाही. याबाबत ठोस उपाययोजना करुन प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

IRRYLWM7701 (Ref No : 25, Hmm No : 69)

89 सर्वीस लेव्हल बेंच मार्कींग बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

13 व्या केंद्रीय वित्त आयोगाने सन 2010 मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार विशिष्ट कार्यक्षमतेच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देणेबाबत शिफारस करण्यात आलेली आहे. त्याबाबतचे निर्देशांक

(Indicators) व नाशिक महानगरपालिकेने त्यास अनुषंगुन ठरविलेले उद्दीष्ट व केलेली उद्दीष्ट पुर्ती याबाबतची माहिती संकलित केलेली नसल्याचे आढळून आलेले आहे.

13 व्या केंद्रीय वित्त आयोगाने सन 2010 मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार विशिष्ट्कार्यक्षमतेच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देणेबाबत शिफारस करण्यांत आलेली आहे.

त्यास अनुसरुन राज्य शासनाने पाणीपुरवठा, जलनि:सारण, मलनि:सारण, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन बाबत काढलेल्या अधीसूचनेनुसार गुणात्मक सेवा हे नागरी स्वराज्य संस्थेचे ध्येय असणेबाबत नमुद केलेले आहे. त्याबाबतचे निर्देशांक (Indicators) व नाशिक महापालिकेने त्यास अनुषंगुन ठरविलेले उद्दीष्ट व केलेली उद्दीष्ट पुर्ती याबाबतची माहिती मुल्य निर्धारण व कर संकलन विभागाकडून मागितली असता, सन 2013-14 करिता नाशिक महापालिकेस ठरवुन दिलेले निर्देशांक (Indicators), ठरविलेले उद्दीष्ट व केलेली उद्दीष्ट पुर्ती याबाबतची माहिती संकलीत केलेली नसल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेने केलेली उद्दीष्ट पूर्तीबबत पडताळणी करता आलेली नाही. उपरोक्त् उद्दीष्ट पुर्ती न केल्यास महानगरपालिकेस अनुदान वितरीत केले जाणार नसल्याने महानगरपालिकेस ठरवून दिलेले निर्देशांक (Indicators), ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 136, Hmm No : 177)

90 पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण नसलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

शासन निर्णय क्र. संकीर्ण-2009/प्र.क्र. 207/09/न.वि. 20, मंत्रालय, मुंबई, दि. 02/08/2010 अन्वये नागरी स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना व मलनिस्सारण योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे. तथापी, 2011-2012, 2012-2013, 2013-2014 या तीन वित्तिय वर्षातील जलदाय व्यवस्थेमुळे मिळालेल्या रक्कमा तसेच जलदाय वितरण व्यवस्था यांचा आढावा घेतला असता, जलदाय वितरण व्यवस्थेवर खर्च झालेल्या रक्कमेच्या तुलनेत वसुल रक्कमेची टक्केवारी अत्यंत कमी आहे. तसेच नागरी स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना व मलनिस्सारण योजना स्वयंपूर्ण होण्याचे दृष्टीने पाण्याचे व मलनिस्सारण दर ठरविणे व अनुषंगिक उपाययोजना करण्याबाबत विशद केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पुर्णत: पालन करण्यात आलेले

नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

शासन निर्णय क्र .संकीर्ण-2009/प्र.क्र .207/09/न.वि .20, मंत्रालय, मुंबई, दि .02/08/2010 अन्वये नागरी स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना व मलनिस्सारण योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे .तथापी, सन 2010-11, 2011-12, 2012-13 या तीन वित्तिय वर्षातील जलदाय व्यवस्थेमुळे मिळालेल्या रक्कमा तसेच जलदाय वितरण व्यवस्था यांचा आढावा घेतला असता, खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जलदाय वितरण व्यवस्थेवर खर्च झालेल्या रक्कमेच्या तुलनेत व पाणीपुरवठा योजनेचा मागील तीन वर्षातील जमा व खर्च खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशील	वर्षवार जमाखर्च रक्कम/ (रु(लाखात .			सरासरी
		2010-11	2011-12	2012-13	
1	जलदाय व्यवस्थेमुळे मिळालेल्या रक्कमा				
अ	महसुली जमा	3511.94	4467.39	4622.78	
ब	भांडवली जमा	531.30	1066.51	2210.13	
	एकूण	4043.24	5533.90	6832.91	5470.01
2	जलदाय वितरण व्यवस्था				
अ	महसुली खर्च	5150.90	6107.30	7052.52	
ब	भांडवली खर्च	2933.59	3735.33	3603.16	
	एकूण	8084.49	9842.63	10655.68	9527.60
	जलदाय वितरण व्यवस्थेवर खर्च झालेल्या रक्कमेच्या तुलनेत वसुल रक्कमेची टक्केवारी	50.01%	56.22%	64.12%	

मागील तीन वर्षातील पाणीपुरवठा योजनेतील एकूण सरासरी जमा रुपये 54.70 कोटी असताना सरासरी खर्च रुपये 91.18 कोटी एवढा झाला आहे. सन 2013-2014 या वर्षी जलदाय व्यवस्थेची एकूण जमा रु 68.85 कोटी असून खर्च रु 108.24.कोटी आहे .

शासन निर्णय क्र .संकीर्ण-2009/प्र.क्र. 207/09/न.वि .20, मंत्रालय, मुंबई, दि .02/08/2010 अन्वये नागरी स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना व मलनिस्सारण योजना स्वयंपूर्ण होण्याचे दृष्टीने पाण्याचे व मलनिस्सारण दर ठरविणे व अनुषंगिक उपाययोजना करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे विशद करण्यात आलेली आहे.

त्यात सार्वजनिक नळखांबे टप्प्याटप्प्याने कमी करुन काही वर्षात पूर्णपणे बंद करण्याची कार्यवाही करावी व त्याऐवजी गट नळजोडण्यांना प्रोत्साहन देण्यात यावे असे नमुद करण्यात आलेले आहे.

तथापी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे नाशिक महानगरपालिका हद्दीत एकूण 1708 नळ कनेक्शन सार्वजनिक/मनपा मालकीच्या जागेत असुन उपरोक्त शासन निर्णयाच्या दिनांकापासुन सार्वजनिक नळखांबे टप्प्याटप्प्याने कमी करुन आतापावेतो पूर्णपणे बंद करण्याची कार्यवाही होणे अपेक्षीत होते .तथापी तसे न केल्याने पालीकेस दरवर्षी नळ कनेक्शन साईज नुसार किमान दराने साधारणपणे रक्कम रु .3373440/- चे नुकसान सोसावे लागत आहे.

अ . क्र.	विभाग	नळ कनेक्शन साईज नुसार संख्या				वार्षिक मागणी साईज नुसार				एकूण
		½”	¾”	1”	इतर	½”	¾”	1”	इतर	
1	नाशिक)पुर्व(	324	38	43	6	388800	77520	175440	0	641760
2	नाशिक)पश्चिम(	112	3	7	0	134400	6120	28560	0	169080
3	पंचवटी	397	13	93	6	476400	26520	379440	0	882360
4	ना.रोड	192	36	43	2	230400	73440	175440	0	479280
5	नाशिक)सातपुर(	158	40	50	3	614800	88440	236440	25000	964680
6	नविन नाशिक	100	27	15	0	120000	55080	61200	0	236280
	एकूण	1283	157	251	17	1964800	327120	1056520	25000	3373440

शासन निर्णयातील (I) (4) (i) अन्वये उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रत्येक नागरी स्थानिक संस्थेने याकामी मोहीम राबवुन अनधिकृत नळ जोडण्या शोधून त्या खंडीत करुन घ्याव्यात किंवा धोरणानुरुप अधिकृत करुन घ्याव्यात असे नमुद केलेले आहे तथापी अनधिकृत नळ जोडण्या शोधण्याकरिता मोहीम राबविण्यात आलेली नाही.

शासन निर्णयातील (I) (4) (ii) अन्वये पाणी निर्मितीच्या खर्चात तसेच विद्युत खर्चात बचत करण्याच्या दृष्टीकोनातुन पाणी व उर्जा लेखापरीक्षण करावे असे नमुद केलेले आहे तथापी पाणी व उर्जा लेखापरीक्षण करण्यात आले नाही. तसेच पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातुन पाणी पुरवठा तसेच कर

आकारणी विभागाने उपरोक्त नमुद शासन निर्णयाच्या अनुषंगाने उपाययोजना करणे आवश्यक आहेत.

DATDTBM7001 (Ref No : 139, Hmm No : 182)

91 मनपा क्षेत्रातील शिवाजीनगर, बाराबंगला, गांधीनगर, नाशिकरोड, व पंचवटी जलशुध्दीकरण केंद्राकरीता तुरटी ग्रेड-3 चा पुरवठा करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 9

लेखा शीर्ष : केमीकल खरेदी म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

तुरटी खरेदी करण्यापूर्वी केंद्र/राज्य शासनाचा दर करारा बाबत खात्री केली नाही. निविदा प्रक्रियेद्वारे मंजूर केलेले दर हे बाजारभावाशी सुसंगत व वाजवी असल्याची पडताळणी केली नाही. विभागास मंजूर निविदाधारकाने वेळोवेळी व आवश्यकतेनुसार परिमाणासह केलेला पुरवठा केल्याचे मागणी पत्र नस्तीमध्ये आढळून आले नाही. साठा नोंदवही अभावि, जमा साहित्य व वाटप साहित्य यांचा ताळमेळ व साहित्य वापराचा दैनंदिन लेख्याची पडताळणी करता आली नाही. मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केले नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पाणी पुरवठा (यांत्रीकी) अंतर्गत मनपा क्षेत्रातील शिवाजीनगर, बाराबंगला, गांधीनगर, नाशिकरोड, व पंचवटी जलशुध्दीकरण केंद्राकरीता तुरटी ग्रेड-3 आयएस 299 जलशुध्दीकरण केंद्रावर रॉ-वॉटर पाण्याचा गढूळपणा कमी करणेसाठी पुरवठा करणे बाबतची संचिका पडताळली. जलशुध्दीकरण केंद्राकरीता ग्रेड-3 तुरटी खरेदीबाबतचा इतर तपशिल खालील प्रमाणे आहे.

1	प्रशासकीय मान्यता	महासभा ठराव क्रमांक 897 दि. 18.3.2013 रुपये 13762000
2	तांत्रिक मान्यता	अधिक्षक अभियंता (तांत्रिक) पा.पु. रक्कम रू.13762000/- क्रमांक व दिनांक नमूद नाही. Estimate prepared as Sanctioned Rates.
3	अंदाजपत्रकीय रक्कम	रू.13762000/-
4	लेखा शिर्ष	केमीकल खरेदी (संगणक कोड - 727)

5	निविदा / दरत्रक प्रकार	बी-1
6	जाहीरात प्रसिध्दी व निविदा कालावधी	नस्तीमध्ये वृत्तपत्रे आढळून आले नाहीत.
7	ई-निविदा	निविदा सुचना क्र.1 सन 2013-14 कालावधी 26/04/2013 ते 06/05/2013 मुदत दि.09/05/2013
8	निविदा उघडयाची दिनांक	निविदा दि.18/05/2013 प्राप्त निविदा 04 पैकी एक टेक्नीकली रद्द 3 पात्र
9	न्युनतम निविदा	1. मे. स्वानंद ट्रेडर्स प्रा.लि. लोणी खुर्द 70 टक्के पुरवठा प्राकलनाच्या 4.6 टक्के जादा दराने, 70 टक्के क्वाँटीटी म्हणजेच 1400 मे.टन xर.रू.7197.52 प्रति मे.टन.याप्रमाणे एकण रक्कम रू.10076528/- मंजुरी. 2. मे.रंग रसायण, पुणे 30 टक्के पुरवठा (म्हणजेच 600 मे.टन x र.रू.7197.52 प्रति मे.टन.याप्रमाणे एकण रक्कम रू.4318512/- मंजुरी.) निविदेतील अटी व शर्तीनुसार दोन पुरवठाधारकांची नियुक्ती करावयाची असल्याने मे.रंग रसायण यांच्या 4.6 टक्के जादा या मंजूर दराने पुरवठा आदेश दिला आहे.
10	स्थायी समिती ठराव क्र.	247 दि.18/07/2013
11	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	1) मे. स्वानंद ट्रेडर्स प्रा.लि. लोणी खुर्द 70 टक्के पुरवठा प्राकलनाच्या 4.6 टक्के जादा दराने, मंजुरी, पुरवठा आदेश क्रमांक NMC/WSD/130/13, Dt. 01/08/2013 रक्कम रू.10076528/- 2) मे.रंग रसायण, पुणे 30 टक्के पुरवठा मुंबई 30 टक्के पुरवठा प्राकलनाच्या 4.6 टक्के जादा दराने मंजुरी, पुरवठा आदेश क्रमांक NMC/WSD/131/13, Dt. 01/08/2013 रक्कम रू.4318512/-
12	कामाची मुदत	पुरवठा आदेश निर्गमित झालेपासून दि.01/08/2013 पासून वेळोवेळी मागणीनुसार दि.01/08/2014 पावेतो (12 महिने पावेतो)
13	मुदतवाढ	--.
14	काम पूर्ण दिनांक	--

15	देयकांचा तपशिल	स्वानंद ड्रेडर्स,प्रा.लि.लोणी पहिले धावते देयक र.रू.863199/- दुसरे धावते देयक र.रू.759626/- तीसरे धावते देयक र.रू.2062521/- चौथे व अंतिम देयक र.रू.6355374/- एकूण प्रदान रक्कम रू.10040720/-
		मे.रंगरसायण, पुणे पहिले धावते देयक र.रू.784458/- दुसरे धावते देयक र.रू.915884/- तीसरे धावते देयक र.रू.1184208/- चौथे व अंतिम देयक र.रू.1438856/- एकूण प्रदान रक्कम रू.4323406/-

वरीलप्रमाणे उपलबध अभिलेख्यानूसार स्वानंद ड्रेडर्स,प्रा.लि.लोणी, व मे.रंगरसायण, पुणे या पुरवठाधारकांस 1 ते 4 धावत्या देयकानुसार अनुक्रमे रक्कम रुपये 10040720/- व रू.4323406/- असे एकूण रक्कम रू.14364126/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. तुरटी (ग्रेड-3 आयएस 299) खरेदी करण्यापूर्वी केंद्र/राज्य शासनाचा दर करार अस्तित्वात असल्याबाबत खात्री केल्याचे दिसून येत नाही. दर करार अस्तित्वात असल्याबाबत खात्री न करता खुल्या बाजारातून निविदा मागवून खरेदी केली आहे. त्यामुळे शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भाखंस-1088/ 2522/उद्योग-6 दिनांक 2.1.1992 मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.

2. निविदा प्रक्रियेद्वारे मंजूर केलेले दर हे बाजारभावाशी सुसंगत व वाजवी असल्याची पडताळणी विभागाने केलेली दिसून येत नाही.

3. राज्यातील इतर महानगरपालिकेचे पुरवठा झालेल्या तुरटी ग्रेड-3 चे दर मागवून त्याची तुलना करणे आवश्यक होते. परंतु तशी तुलना केलेली नाही.

4. वरील प्रमाणे 1 ते 3 धावत्या देयकानुसार पुरवठादारकांना प्रदान झालेल्या रकमेचा पुरवठा झालेल्या तुरटीची पूरवठा चलने, बीले इ. तसेच त्यांचा तपासणी अहवाल नस्ती मध्ये आढळून आलेला नसल्याने सदरचा पुरवठा बरोबर व योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

5. चौथ्या धावत्या व अंतिम देयकानूसार मे.स्वानंद ड्रेडर्स प्रा.लि. व मे.रंग रसायण यांनी पुरवठा केलेला तुरटीचे डिलेव्हरी

चलनांनुसार पुरवठा झालेल्या साहित्याची नोंद साठा नोंदवहीत घेतल्याबाबतचा शेरा घेतलेला आढळून आलेली नाही.

6. विभागास मंजूर निविदाधारकाने वेळोवेळी व आवश्यकतेनुसार परिमाणासह केलेला पुरवठा कोणत्या मागणी पत्रानुसार केला ते मागणीपत्र नस्तीमध्ये आढळून आले नाही. त्यामुळे कार्यादेशात नमुद केलेला एकूण परीमाणाची प्रत्यक्ष पुरवठा झालेल्या परीमाणाचा ताळमेळ घेता आला नाही.

7. साठा नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्याने मागील शिल्लक साठा तसेच जमा साहित्य व वाटप साहित्य यांचा ताळमेळ व साहित्य वापराचा दैनंदिन लेख्याची पडताळणी करता आली नाही.

8. साहित्य खरेदी देयकाचा प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम इ. तपशील देण्यात आलेला नाही.

9. मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केले नाही.

92 मनपाचे जलशुध्दीकरण केंद्रासाठी टी.सी.एल पावडरचा पुरवठा करणे

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 10

लेखा शीर्ष : केमीकल खरेदी म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र शासन, उदयोग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परी.क्र.8.3 (ब) मधील मार्गदर्शक सुचना नुसार निविदेस दोन मुदतवाढ न घेता एकच मुदतवाढ देऊन पुरवठादाराची निवड केली आहे. विभागास मंजूर निविदाधारकाने वेळोवेळी व आवश्यकतेनुसार परिमाणासह केलेला पुरवठा केल्या बाबतचे मागणीपत्र नस्तीमध्ये जोडले नाही. स्टेबल ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा करणे बाबत मुदतवाढ देतांना दि.2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार 6 महिनेपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक असतांना एक वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. साठा नोंदवही अभावि, मागील शिल्लक साठा तसेच जमा साहित्य व वाटप साहित्य यांचा ताळमेळ बाबत पडताळणी करता आली नाही. तसेच मापन पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पाणी पुरवठा (यांत्रीकी) अंतर्गत मनपा क्षेत्रातील बाराबंगला,शिवाजीनगर, पंचवटी गांधीनगर व नाशिकरोड येथे जलशुध्दीकरण केंद्रातील व मनपाचे तरण तलावांसाठी पाणी निर्जंतुकीकरण करणेसाठी टी.सी.एल. पावडर खरेदी बाबतची संचिका पडताळली असता विभागाने

जिल्हा नियंत्रीत दरसुची सन 2009-10 नुसार टी.सी.एल. पावडरचे वार्षिक पुरवठा करणेसाठी रक्कम रू.16,06,800/- चे प्राकलन तयार केले असून सदरचा खर्च "केमीकल खरेदी" या सदरातुन जाहीर निविदा मागवून केला आहे. टी.सी.एल पावडर खरेदी बाबतचा इतर तपशिल खालील प्रमाणे आहे

1	प्रशासकीय मान्यता	महासभा ठराव क्रमांक 21 दि. 24.5.2011 रुपये 1606800/-
2	तांत्रिक मान्यता	अधिक्षक अभियंता (तांत्रिक) पा.पु. रक्कम रू.1606800/- क्रमांक 198/ 2010-11व दिनांक- निरंक. As per MJP DSR 2009-10 Rates.
3	अंदाजपत्रकीय रक्कम	रू.1606800/-
4	लेखा शिर्ष	केमीकल खरेदी (संगणक कोड - 727)
5	निविदा / दरत्रक प्रकार	बी-1
6	जाहीरात प्रसिध्दी व निविदा कालावधी	दै. सकाळ दि.09/06/2011, दै.नवभारत. फेर निविदा प्रसिध्दी दै.सकाळ व दै.देशदुत दि.30/06/2011
7	ई-निविदा	निविदा नं. निविदा- क 04(14/2011-12) कालावधी 16/06/2011 ते 22/06/2011 मुदत दि.27/06/2011 फेर निविदा क्र.34-2011 निविदा सुचना क्र.2 सन 2011-12 कालावधी दि.07/07/2011 ते 19/07/2011 मुदत दि.25/07/2011
8	निविदा उघडयाची दिनांक	निविदा दि.30/07/2011 प्राप्त निविदा 02 फेर निविदा दि.12/08/2011 प्राप्त निविदा 02
9	न्युनतम निविदा	1. मे. मंगल ब्लिच केम.कळवण प्राकलनाच्या 9 टक्के कमी दराने,(चालू दरसुची नुसार 4.87 टक्के जादा दराने) रक्कम रू.1462188/- मंजुरी.
10	स्थायी समिती ठराव क्र.	94 दि.01/06/2012 नूसार मे. मंगल ब्लिच केम.कळवण प्राकलनाच्या 9 टक्के कमी दरानुसार (चालू दरसुचीनुसार 4.87 टक्के जादा दराने), रक्कम रू.1462188/- मंजूरी
11	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	पुरवठा आदेश क्रमांक मनपा/पापु/59/12, Dt. 07/07/2012 रक्कम रू.1462188/- चे स्टेबल ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 आयएस 1065:1989 स्पेसिफिकेशन्स नुसार (80 मे.टन चा) पुरवठा वार्षिक मुदतीत.
12	कामाची मुदत	पुरवठा आदेश निर्गमित झालेपासून दि.07/07/2012 ते 06/07/2012

		पावेतो वेळोवेळी मागणीनुसार.
13	मुदतवाढ	07/07/2013 ते 06/07/2014 पावेतो शिल्लक 80 पैकी 50 मे.टन करीता दि.31/01/2014 रोजी कार्यालयीन टिपणीनुसार आयुक्तांनी दिलेली मंजुरीन्वये 100 टक्के मुदतवाढ दिलेली आहे.
14	काम पूर्ण दिनांक	05/07/2014
15	मोजमाप पुस्तक	क्रं.2982 पृ.क्र. 1 ते 3, 4 ते 7,8 ते 11 व 12 ते 15
15	देयकांचा तपशिल	पहिले धावते देयक र.रू.127941/- दुसरे धावते देयक र.रू.164497/- तीसरे धावते देयक र.रू.173834/- चौथे व अंतिम देयक र.रू.164496/-

वरीलप्रमाणे उपलबध अभिलेख्यानूसार मे. मंगल ब्लिच केम.कळवण या पुरवठाधारकास 1 ते 4 धावत्या देयकानुसार अनुक्रमे रक्कम रुपये 630768/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र शासन, उदयोग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परी.क्र.8.3 (ब) मधील मार्गदर्शक सुचना नुसार एखादया निविदेतुन कमी प्रतीसाद मिळाल्यास निविदा चौकशीला, दोन मुदतवाढ देने आवश्यक आहे. तथापि, एकच मुदतवाढ देऊन उपलब्ध दोन प्राप्त निविदेतूनच पुरवठादाराची निवड करण्यात आली आहे त्यामुळे ख-या अर्थाने स्पर्धात्मक दरांचा लाभ महानगरपालिकेस होऊ शकलेला नाही.

2. निविदा प्रक्रियेद्वारे मंजूर केलेले दर हे बाजारभावाशी सुसंगत व वाजवी असल्याची पडताळणी विभागाने केलेली दिसून येत नाही.

3. राज्यातील इतर महानगरपालिकेसाठी पुरवठा झालेल्या टी.सी.एल पावडरचे दर मागवून त्याची तुलना करणे आवश्यक होते. परंतु तशी तुलना केलेली दिसून येत नाही.

4. सन 2013-2014 मध्ये दुसरे धावते देयकानुसार टी.सी.एल पावडर पुरवठयासोबत शासकीय प्रयोगशाळे मार्फत चाचणी केल्याचा अहवाल सादर केलेला असून त्यामध्ये ब्रॅडचे नांव/ उत्पादक कंपनीचे नांव तसेच बॅच नंबर उत्पादन दिनांक इ. बाबी नमूद केलेल्या नसल्याने पुरवठा केलेले रसायण पुरवठा केलेल्या कंपनीचे असल्याची खात्री न करता सक्षम अधिका-यांनी देयकास मंजुरी देऊन रक्कम प्रदान केलेली आहे.

5. विभागास मंजूर निविदाधारकाने वेळोवेळी व आवश्यकतेनुसार परिमाणासह केलेला पुरवठा कोणत्या मागणी पत्रानुसार केला ते मागणीपत्र नस्तीमध्ये आढळून आले नाही. त्यामुळे कार्यादेशात नमुद केलेला एकूण परीमाणाची प्रत्यक्ष पुरवठा

झालेल्या परीमाणाचा ताळमेळ घेता आला नाही.

6. पुरवठा आदेशानुसार स्टेबल ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 चा 80 मे.टनचा पुरवठा वार्षिक मुदतीत पूर्ण करावयाचा होता. परंतु पुन्हा एक वर्षाची 100 टक्के मुदतवाढ दिलेली आहे. मुदतवाढ देतांना दि.2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार 6 महिनेपर्यंत मुदतवाढ देऊन फेर निविदा प्रकिया राबविणे आवश्यक होते. तशी कार्यवाही न करता एक वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. सदरची बाब अनियमित आहे.

7. दि. 07/07/2013 ते 06/07/2014 पावेतो एक वर्षाची मुदतवाढ घेऊन देखील एकूण दोन वर्षाच्या विहीत मुदतीत फक्त 34.5 मे.टनचा ब्लीचींग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा केलेला आहे. उर्वरीत 45.5 मे.टनचा पुरवठा बाकी असतांना कामपुर्ण दाखला दि.05/07/2014 रोजी निर्गमित केला आहे.

8. साहित्य खरेदी देयकांचे प्रमाणक क्रमांक / दिनांक यांचा तपशील देण्यात आलेला नाही.

9. साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने मागील शिल्लक साठा तसेच जमा साहित्य व वाटप साहित्य यांचा ताळमेळ व सदर साहित्याचा वापराचा दैनंदिन लेखा याची पडताळणी करता आलेली नाही.

10. मापन पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

HCDMGGM7001 (Ref No : 45, Hmm No : 87)

93 खत प्रकल्प पुर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित नसले बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 6

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

सन 2013-14 मध्ये खत प्रकल्पावर खर्चाच्या अनुषंगाने खत विक्रीचे प्रमाण अत्यंत अल्प प्रमाणात असल्याने खत प्रकल्प पूर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित केलेला नाही. त्यामुळे होणा-या खर्चामुळे महानगरपालिकेचा आर्थिक स्त्रोत वाढण्याऐवजी तो तोटयात असल्याने दिसून येते. खतप्रकल्पा अंतर्गत असलेली सर्व मशिनरी व जड वस्तु संग्रहाची जडसंग्रह नोंदवही (डेड स्टॉक रजिष्टर) अभावि, प्रकल्पा अंतर्गत असलेली चालू मशिनरी व ना-दुरूस्त बंद अवस्थेत असलेली मशिनरी या बाबतचा ताळमेळ व निर्लेखनाची कार्यवाही बाबत पडताळणी करता आलेला नाही.

नाशिक महानगरपालिका नाशिक अंतर्गत खत प्रकल्प कार्यान्वित असून त्यावर सन 2013-14 मध्ये खर्च व उत्पन्ना बाबतची माहीती मागविली असता, त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे

संगणक कोड	बाब	सन 2013-14 मध्ये झालेला खर्च रू. लाखात
717	स्थायी आस्थापना	221.46
718	विदयुत बिले	19.43
719	पाणी बिले	00.00
720	डिझेल	127.58
721	मशिनरी दुरूस्ती	73.26
722	कल्चर सॅनिट्रेट	4.31
723	प्लास्टिक पिशवी	4.99
724	रजि.इन्शु.फी.	11.00
725	रिफ्युझल विल्हेवाट	10.70
875	दैनंदिन देखभाल व दुरूस्ती	11.05
	एकुण एकंदर खर्च	483.78

सन 2013-14 मध्ये एकुण खत विक्री खालील प्रमाणे

अ.क्र.	माहे/वर्ष	सन 2013-14 मधील गोण मेट्रीक टन विक्री	सन 2013-14 मध्ये सुट्टे मेट्रीक टन विक्री	एकूण मेट्रीक टन विकी	सन 2013-14 मधील एकूण झालेली विक्री रक्कम रू.
1	एप्रिल 2013	33.970	9.420	43.390	116803
2	मे 2013	23.675	12.895	36.570	96689
3	जून 2013	40.985	9.520	50.575	141871
4	जुलै 2013	74.730	4.810	79.540	228266

5	ऑगस्ट 2013	137.010	27.965	164.975	464533
6	सप्टेंबर 2013	12.535	72.705	197.240	535665
7	ऑक्टोबर 2013	49.570	32.095	81.665	220783
8	नोव्हेंबर 2013	44.410	43.415	87.825	232990
9	डिसेंबर 2013	29.480	19.315	47.795	131853
10	जानेवारी 2014	31.995	7.075	39.070	109768
11	फेब्रुवारी 2014	24.560	8.640	33.200	91936
12	मार्च 2014	32.762	28.300	61.062	162929
		647.682	276.155	923.907	2534113

उपरोक्त प्राप्त माहीतीच्या आधारे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. विभागाने उपलब्ध केलेल्या माहीतीनुसार सन 2013-14 मध्ये खत प्रकल्पावर एकूण रक्कम रू.483.78 लक्ष इतका खर्च झालेला असून खत विक्री रक्कम रू.25,34,113/- इतक्या रकमेचा झालेला आहे. खर्चाच्या अनुषंगाने खत विक्रीचे प्रमाण अत्यंत अल्प प्रमाणात 5.24 टक्के आहे. यावरून खत प्रकल्प पूर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित केलेला नसल्याचे दिसते.

2. खतप्रकल्पावर होणा-या खर्चामुळे महानगरपालिकेचा आर्थिक स्त्रोत वाढण्याऐवजी तो तोटयात असल्याने दिसून येते. त्यामुळे सन 2013-14 मध्ये खत प्रकल्पावर एकूण रक्कम रू. 483.78 लक्ष इतक्या रकमेच्या खर्चामुळे महानगरपालिकेस मोठया प्रमाणात आर्थिक भार सहन करावा लागत आहे.

3. खत प्रकल्पाअंतर्गत सन 2013-14 मध्ये झालेली खतविक्री बाबतचे पावती पुस्तके व त्याअनुषंगिक जमा किर्द उपलब्ध न झाल्याने त्यांची पडताळणी करता आली नाही.

4. खतप्रकल्पा अंतर्गत असलेली सर्व मशिनरी व जड वस्तु संग्रहाची जडसंग्रह नोंदवही (डेड स्टॉक रजिष्टर) उपलब्ध न झाल्याने प्रकल्पा अंतर्गत असलेली चालू मशिनरी व ना-दुरूस्त बंद अवस्थेत असलेली मशिनरी या बाबतचा ताळमेळ घेता आलेला नाही. तसेच विना वापर पडुन असलेल्या मशिनरीची लेख्या अभावि पडताळणी करता आलेली नाही.

5. मुंबई वित्तीय नियम 1959 नुसार दरवर्षी जडसंग्रह साहित्याची वार्षिक पडताळणी व जडसंग्रह व्यतिरिक्त इतर साधनसामुग्री व कन्झ्युमेबल्स साहित्याची पडताळणी विभागप्रमुखाने करणे आवश्यक आहे. अशी पडताळणी विभागामध्ये करुन खत प्रकल्पातील साहित्य बरोबर असल्याची पडताळणी केल्या बाबत व तसे प्रमाणपत्र नोंदविलेले बाबत तसेच महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.266 ते 274 मधील तरतुदी प्रमाणे कार्यवाही केल्याबाबतची पडताळणी नोंदवही अभावी करता आली नाही.

6. खत प्रकल्पामध्ये पडुन असलेल्या निरुपयोगी भांडार साहित्याचा तपशिल तसेच निरुपयोगी साहित्या बाबत निर्लेखनाची कार्यवाही केली अथवा नाही याची नोंदवही अभावी, पडताळणी करता आली नाही.

94 पाणी लेखापरीक्षण / उर्जा लेखापरीक्षण केले नसलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेने सन 2013-2014 मधील अंदाजपत्रकात रू.25 लाख इतकी तरतुद केली असतांना पाणी लेखापरीक्षण, उर्जा लेखापरीक्षण व पुनर्वसन कार्यक्रम इत्यादी केले नसल्याचे दिसून येते.

राज्यातील नागरी पाणी पुरवठा योजनेतील हिशोबबाहय पाण्याचे प्रमाण कमी करणे तसेच पाणी पुरवठा योजनेतील उपांगे कार्यक्रम कार्यक्षम करून वीजेचा खर्च कमी करण्यासाठी पाणी पुरवठा योजनेचे पाणी लेखापरीक्षण, उर्जा लेखापरीक्षण व पुनर्वसन हा कार्यक्रम राबविणे नागरी संस्थांना शासन निर्णय पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्र.नापापु-2008 /प्र.क्र. 98/पापु 22 दिनांक 02/08/2008 नुसार बंधनकारक केले आहे.

या कार्यक्रमामुळे पाणी पुरवठा योजनांमधील हिशोबबाहय पाण्याचे प्रमाण कमी होवुन काही कालावधीसाठी नवीन / वाढीव योजनेची गरज पुढे ढकलता येते. अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनांचे पाणी लेखा परीक्षण, उर्जा लेखा परीक्षण व पुनर्वसन करून पाण्याची गळती कमी करणे, उर्जा उपांगे कार्यक्षम करणे इत्यादी असून त्यामुळे वीजेचा खर्च कमी करून शासनाच्या नवीन योजनांच्या अनुदानावरील भुर्दंड कमी होईल.

नाशिक महानगरपालिकेने सन 2013-2014 मधील मूळ अंदाजपत्रकात वॉटर ऑडीट साठी रू 325 लाख तर सुधारित अंदाजपत्रकात रू.25 लाख तरतुद यासाठी केली होती. तथापि यासाठी केलेला खर्च निरंक असुन लेखापरीक्षण केले नसल्याचे दिसून येते. महानगरपालिकेने वरील प्रमाणे लेखापरीक्षण व पुनर्वसन कार्यक्रम पूर्ण केला नाही तर, नवीन/वाढीव नागरी पाणी पुरवठा योजनेसाठी अनुदान मिळणार नाही. तरी महानगरपालिकेने अस्तित्वातील पाणी पूरवठा योजनेचे पाणी लेखा परीक्षण, उर्जा लेखापरीक्षण व पुनर्वसन कार्यक्रम राबविण्याबाबत उपरोक्त शासन निर्णयानुसार कारवाई करणे आवश्यक आहे.

95 निवृत्तीवेतन धारकांच्या संख्येबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 04

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

दरवर्षी माहे नोव्हेंबर महिन्यात हयातीचे दाखले विहित नमुन्यात घेणे आवश्यक असूनही तशी कार्यवाही केलेली नाही. आयकर पात्र निवृत्तीवेतन धारकांचे निवृत्तीवेतनातून आयकर कपातीची कार्यवाही केलेली नाही. कुटुंबनिवृत्तीवेतन, मर्यादित कालावधीचे निवृत्तीवेतन यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवलेली नाही.

निवृत्तीवेतन धारकांची संख्या, प्राप्त व अप्राप्त हयातीचे दाखले, मनी ऑर्डरदवारे निवृत्ती वेतन घेणारे निवृत्तीवेतन धारक, आयकर पात्र निवृत्तीवेतन धारक, मर्यादित कालावधीचे निवृत्तीवेतन प्रकरणे, पुनर्विवाह बाबत प्रमाणपत्र पात्र न झालेली प्रकरणे यांची दिनांक 31.03.2014 अखेरची संख्यात्मक माहिती अर्धसमास क्रमांक 51 दिनांक 23.05.2016 नुसार मागविली असता ती प्राप्त झालेली नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 136 (13) नुसार दरवर्षी माहे नोव्हेंबर महिन्यात नमुना 105 मध्ये हयातीचा दाखला घेणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2. निवृत्तीवेतन धारकांपैकी काही निवृत्तीवेतन धारकांचे निवृत्तीवेतन आयकर पात्र असल्याचे निवडक प्रकरणांची तपासणी करताना निदर्शनास आले, परंतू त्यांचे निवृत्तीवेतनातून आयकर कपातीची कार्यवाही केली जात नाही, असे दिसून आले. आयकर कायदा 1961, कलम 192 नुसार आयकर कपातीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3. मर्यादित कालावधी, कुटुंब निवृत्तीवेतन, पुनर्विवाह व पुनर्नियुक्ती प्रकरणे यांबाबत प्रत्येकी स्वंतत्ररित्या निवृत्तीवेतन नोंदवही ठेवलेली नाही, त्यामुळे निवृत्तीवेतन अतिप्रदान होण्याची शक्यता नाकरता येत नाही.

4. अदयापही काही निवृत्तीवेतन धारकांना मनी ऑर्डरदवारे निवृत्तीवेतन अदा केले जात आहे. सर्व निवृत्तीवेतन धारकांना बॅकेमार्फत निवृत्तीवेतन अदा करणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

MINVAJM6901 (Ref No : 40, Hmm No : 51)

96 बिंदुनामावली नोंदवहीमधील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 04

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

बिंदुनामावली नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता सरळसेवेची एकूण मंजूर पदे 3391 असून भरलेल्या पदांची संख्या 2628 आहे व रिक्त पदांची संख्या 763 आहे. बिंदुनामावली नोंदवहीचे शासन निर्देशानुसार दर तीन वर्षांनी तपासणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही. महानगरपालिकेतील 46 कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव व प्रस्ताव सादर न केलेले 198 कर्मचारी यांनी विहीत वेळेत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत. महानगरपालिकेमध्ये मंजूर पदापेक्षा अधिक पदांची भरती करण्यात आलेली आहे.

राज्यामध्ये आरक्षण कायदा सन - 2004 सालापासून लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या कालावधीचे आस्थापना विभागातील बिंदुनामावली नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता सरळसेवेची एकूण मंजूर पदे 3391 असून भरलेल्या पदांची संख्या 2628 आहे व रिक्त पदांची संख्या 763 आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-3 व वर्ग-4 ची संवर्ग निहाय बिंदुनामावली नोंदवही शासन निर्देशानुसार दर तीन वर्षांनी मा.सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडून तपासणी करुन घेणे गरजेचे असताना सन 2010 मध्ये तपासणी करुन घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे सन 2013-14 या कालावधीत तपासणी करणे आवश्यक असताना तशी तपासणी झाल्याचे उपलब्ध नस्तीवरुन दिसून येत नाही.

2) महानगरपालिकेतील जात प्रमाणपत्र पडताळणीकडे 46 कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव व प्रस्ताव सादर न केलेले 198 कर्मचारी यांनी विहीत वेळेत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याने त्यांच्यावर सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी.2012/प्र.क्र.332/12/16-ब दिनांक -18 मे 2013 नुसार कोणती कारवाई केली याबाबतचा अहवाल नस्तीत दिसून येत नाही.

3) नाशिक महानगरपालिकेत कनिष्ठ लिपिकाची 304 पदे मंजूर असताना 327 पदे भरण्यात आलेली आहेत. म्हणजेच 23 पदे अधिकची भरलेली आहेत. इलेक्ट्रीशिअनची 12 पदे मंजूर असताना 17 पदे भरण्यात आलेली आहेत. म्हणजेच 5 पदे अधिकची भरण्यात आलेली आहेत. ट्रेसरची 4 पदे मंजूर असून प्रत्यक्षात 9 पदे भरण्यात आलेली आहेत व वाहनचालकाची 92 पदे मंजूर असून प्रत्यक्षात 97 पदे भरण्यात आलेली आहेत. ही माहिती लक्षात घेता महानगरपालिकेमध्ये मंजूर पदापेक्षा अधिक पदांची भरती करण्यात आलेली आहे. सदर बाबत शासनाची पुर्व परवानगी घेण्यात आली होती किंवा कसे याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलबध करुन

देण्यात यावे.

4) सन 2013-14 ची बिंदुनामावली नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता सुमारे 81 संवर्ग असल्याचे दिसून येते या सर्व संवर्गाची तपासणी मा.सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडून केल्याची दिसून येत नाही.

FDSRKNM8201 (Ref No : 128, Hmm No : 193)

97 अग्नीशमन यंत्रणेकडुन अग्नीप्रतीबंधक उपाययोजना करून घेणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 4

मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 च्या तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय कार्यालय, हॉटेल, लॉजेस, रेस्टॉरंट व्यवसायीक इमारती, 15 मिटर उंचीवरील निवासी इमारती, समिश्र वापराच्या इमारती, दवाखाने प्रसुतीगृहे (नर्सिग होम), औदयोगिक इमारती गोदामे इत्यादी मध्ये आग प्रतीबंधक उपाययोजना करून सदरच्या उपाययोजना दुरूस्त व कार्यक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र वर्षातुन दोन वेळा मुख्य अग्नीशमन अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, नाशिक महानगरपालिके हद्दीमधील कोणत्या इमारती मालकांनी / भोगवटादारकांनी अश्या उपाययोजना केल्याबाबतची माहीती सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे प्रकरण 7 संकीर्ण महसूल (परवाना शुल्क) नियम 102 (2) नुसार वार्षिक फी मागणी व आकारणी नोंदवही अस्तित्वात असल्याबाबत आढळून आले नसल्याने, नाशिक महानगरपालिके हद्दीमध्ये आग प्रतीबंधक उपाययोजना करणे बंधनकारक असणा-या आस्थापनांची तपशिलवार बाब लेखा परीक्षणात पडताळता आलेली नाही.

महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक 06/01/2008 पासून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 हा लागु करण्यात आला आहे. उपरोक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय कार्यालय, हॉटेल, लॉजेस, रेस्टॉरंट व्यवसायीक इमारती, 15 मिटर उंचीवरील निवासी इमारती, समिश्र वापराच्या इमारती, दवाखाने प्रसुतीगृहे (नर्सिग होम), औदयोगिक इमारती गोदामे इत्यादी मध्ये आग प्रतीबंधक उपाययोजना करून सदरच्या उपाययोजना दुरूस्त व कार्यक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र वर्षातुन दोन वेळा मुख्य अग्नीशमन अधिकारी

यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे. कायदयातील तरतुदीनुसार इमारतीचे मालक/ भोगवटादार यांनी अग्नीशमन यंत्रणेकडुन फायर ऑडीट विहीत केलेले अग्नीशमन शुल्क भरुन करणे आवश्यक आहे.

अग्निशमन विभागाचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नाशिक महानगरपालिके हद्दीमध्ये अश्या उपाययोजना करणे बंधनकारक असणा-या इमारती, व्यावसायीक व औदयोगीक इमारती,हॉटेल व निवारा गृहे, असेम्बी हाऊस, दवाखाने व नर्सिंगहोम आहेत व त्यापैकी किती इमारत मालकांनी/ भोगवटादारकांनी आग प्रतीबंधक उपाय योजना केल्या आहेत याचा तपशिल अग्नीशमन विभागाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे कोणत्या इमारती मालकांनी / भोगवटादारकांनी अश्या उपाययोजना केलेल्या नाहीत याची माहीती सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही.

नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये उदयापही ब-याच दवाखाने, नर्सिग होम व्यावसायीक व अन्य भोगवटादारकांनी अश्या उपाययोजना केलेल्या दिसुन येत नाही. त्यांना या अधिनियमाच्या कलम 6,7,8 नुसार कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे प्रकरण 7 संकीर्ण महसूल (परवाना शुल्क) नियम 102 (2) नुसार आलेल्या रकमेची, नमुना क्र. 76 प्रमाणे असलेल्या अनुज्ञप्ती पुस्तकात नोंद घेतली पाहीजे. निरनिराळया अनुज्ञप्ती/परवान्यांसाठी वेगवेगळी पृष्ठे ठेवण्यात यावीत असे नमुद केले आहे. तसेच नियम 104 नुसार कर भरणा, संकलन आणी जमेवर नियंत्रण ठेवण्यासाठी असलेली पध्दती शुल्क वसुलीचे लेखा लेखनासाठी लागु राहील, असे नमुद केले आहे. तथापी, सन 2013-14 करीता तसेच त्यापुर्वीच्या कालावधीकरीता अग्निशामन विभागाकडून वार्षिक फी मागणी व आकारणी नोंदवही अस्तित्वात आल्याचे आढळून आले नाही. नियमोचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3) उपरोक्त प्रमाणे विभागाने मागणी व आकारणी नोंदवही परिरक्षित केली नसल्याने, नाशिक महानगरपालिके हद्दीमध्ये आग प्रतीबंधक उपाययोजना करणे बंधनकारक असणा-या इमारती, व्यावसायीक व औदयोगीक इमारती, हॉटेल व निवारा गृहे, असेम्बी हाऊस, दवाखाने व नर्सिंगहोम इ. आस्थापनांची तपशिलवार बाब लेखा परीक्षणात पडताळता आलेली नाही.

तरी वार्षिक फी/नुतनीकरण शुल्क विहीत दराने वसुलीबाबत तसेच नियमानुरुप वार्षिक तपासणी करुन अभिलेखे अद्यावत होणे आवश्यक आहे.

4) नाशिक महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीच्या इमारतीमध्ये उदा. विभागीय कार्यालये, मुख्य इमारत, दवाखाने इत्यादी मध्ये अदयापही आग प्रतीबंधक उपाययोजना परीपुर्ण केलेल्या दिसून येत नाही. अग्नीशमन उपाययोजना करणे ही नागरीकांच्या जीवीताशी निगडीत बाब असुन त्याबाबत तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे.

IRRYLWM7701 (Ref No : 51, Hmm No : 94)

98 सन 2013-2014 या कालावधीतील भविष्य निर्वाह निधी लेखयातील अनियमततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

माहे ऑक्टोबर 13 मध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांची मासिक वर्गणी जुलै 13 मध्ये बंद करून व्याजाची गणना माहे ऑगस्ट 13 पर्यत केलेली आहे. अग्रीमाचे किमान 12 हप्ते कपात होणे आवश्यक असतांना त्यापेक्षा कमी हप्ते कपातीनंतर देखील रकमा मंजुर करून त्यांना अदा केल्या आहेत. एकाच वर्षात 5 ते 6 वेळा एकाच कर्मचा-यांस अग्रीम अदा केले आहे. सदर प्रकरणी निधीतून रकमा वारंवार अदा केल्याने वर्गणीदाराच्या सेवानिवृत्ती नंतर भविष्य निर्वाह निधी बचतीचा मूळ उददेश सफल होणार नाही.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे भविष्य निर्वाह निधीचे 4900 वर्गणीदारांचे लेखे तपासणी कामी उपलब्ध करून देण्यात आले होते. निवडक ऑक्टोबर 2013 महिन्याचे लेखे तपासण्यात आले असता एकूण 508 अधिकारी/कर्मचा-यांना परतावा अग्रीम/नापरतावाच्या रकमा अदा करण्यात आल्या आहेत. यापैकी निवडक प्रकरणांची पडताळणी केली असता लेखा परिक्षणात खालीलबाबींची अनियमीतता दिसून आली आहे.

1) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम क्र 12 नुसार वर्गणीदारास त्याच्या खात्यावरील रक्कम देय होईल त्याच्या आगोदरच्या माहिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यतचे व्याज त्यास दिले जावे तसेच अशी रक्कम त्यास देण्यास विलंब लागला तर जास्तीत जास्त 6 महिन्यापर्यतचे व्याज त्यास मिळू शकते तसेच अपवादात्मक बाबतीतच एक वर्षाचे व्याज मिळू शकते. परंतू निवडक महिन्यातील माहे ऑक्टोबर 2013 मध्ये सेवानिववृत्त् झालेल्या 8 अधिकारी/कर्मचारी यांच्या अंतिम प्रदानाच्या नस्तीची तपासणी केली असता भविष्य निर्वाह निधीची मासिक वर्गणी माहे जुलै 2013 मध्ये बंद करण्यात आली आहे व त्यांच्या व्याजाची परिगणना ऑगस्ट 2013 पर्यतच केलेली आहे. नियमानुसार व्याजाची परिगणना केलेली नाही. तरी सेवानिवृत्त कर्मचारी श्रीमती मडके मोहनबाई मंगल/बिगारी खाते क्र 1591, थेटे विष्णू राधाकृष्ण/प्लबर खाते क्र 4351, थेटे लक्ष्मण पंढरी/वाहनचालक खाते क्र 3480, गाडे वंदाना माधव/हेड नर्स खाते क्र 4236, महाबळ अरुण अनंत/स्वीय साहायक खाते क्र 1909, निवाळकर उषा काशिनाथ/एनएनएम खाते क्र 4272, नागरे विजया रमेश/शिपाई खाते क्र 3741, भालेराव ललिता विजय/वलि खाते क्र 2315 यांना कमी व्याज प्रदान केले आहे.

2) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 13 नुसार भविष्य निर्वाह निधी खातेधारकांनी पूर्वी घेतलेल्या अग्रीमाची पूर्ण फेड अथवा किमान 12 हप्त्यांची परतफेड करेपर्यत विशेष कारण लेखी नोंदवून कोणत्याही वर्गणीदारांना पोटनियम (1) मध्ये घालून दिलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जादा अग्रीम मंजूर करता येणार नाही. परंतू खातेधारकांना त्यांनी पूर्वी घेतेलेल्या अग्रीमाची पूर्ण परतफेड किंवा किमान 12 हप्त्यांची परतफेड न होता फक्त तीन चार हप्ते कपात झाल्यांनतर परत दुसरे कमाल मर्यादेपेक्षा जादा अग्रीम मंजूर केलेले आहे.

उदाहरणादाखल खालील खातेधारकांना त्यांच्या नावाखाली दर्शविल्याप्रमाणे सन 2013-2014 मध्ये परतावा अग्रीम मंजूर करण्यात आले आहेत.

अग्रीम अदा केलेला महिना	यु.डी.राणे/बिगारी खाते क्र 1495, रक्कम रूपये	पी.एल.दौंदे /वर्कर खाते क्र 3945 रक्कम रूपये	के.डी.पवार/ स.कामगार खाते क्र 5652, रक्कम रूपये	एस.आर.जाधव/स.कामगार खाते क्र 6745 रक्कम रूपये	आर.डी.कंकरिया/बिगारी खाते क्र 7453, रक्कम रूपये	जे.भरवाल/ स.कामगार खाते क्र 6253 रक्कम रूपये
4/13	9930	20900	25000	20000	14460	16600
5/13						
6/13	19990	14100	19800	20800	14600	16900
7/13						
8/13	9980	17400	16000	20200	14100	19200
9/13						
10/13	14990		23800	18300	15500	19700
11/13						
12/13	12930	27000	20400	18900	15500	
1/14						17400
2/14		19800	20600	18200	13400	
3/14	24960	19580				11600

सर्वसाधारण परिस्थीतीत परतावा अग्रीम मंजूर करताना नियम 13(2) नुसार मुळ वेतनाच्या पट किंवा खात्यात जमा असलेली शिल्लक रकमेच्या निम्मी, दोन्ही पैकी जी कमी असेल तेवढी रक्कम मंजूर करता येते तसेच नियम क्र 13(3) नुसार खातेधारकाने मागील घेतलेले अग्रीमाचे किमान 12 मासिक हप्ते किंवा शेवटचा हप्ता यापैकी जो आधी असेल तो त्याची परतफेड करेपर्यत सर्वसाधारण परिस्थितीत कर्मचा-यास कमाल मर्यादेपेक्षा जादा अग्रीम मंजूर करता येत नाही.

तसेच ना परतावा अग्रीम काढण्याबाबत सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम क्रमांक 16 ते 20 मधील तरतुदीनुसार वर्गणीदाराच्या सहा महिन्याच्या वेतना एवढी रक्कम किंवा निधीतील शिल्लक रक्कमेच्या 50 टक्के यापैकी जी कमी असेल ती रक्कम किंवा वर्गणीदाराच्या खात्यात शिल्लक असणारी एकूण रक्कम व वर्गणीदाराच्या अग्रीमाचे प्रयोजन पहाता सक्षम प्राधिकारी त्यास शिल्लक रकमेच्या जास्तीत जास्त 75 टक्के एवढी रक्कम मंजूर करता येते.

परंतू वरिल तपशीलातील नमूद प्रकरणे पाहता परतावा/ना परतावा अग्रीम मंजूर करतांना कर्मचा-याच्या खातेवरील शिल्लक रक्कम किती आहे व त्यानुसार अग्रीम मंजूरीस किती पात्र आहे याबाबत शहानिशा न करता अग्रीम मंजूर करुन अदा केले असल्याचे दिसून येते.

3) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नुसार संबंधित वर्गणीदारांनी परतावा/ना परतावा अग्रीमाची मागणी विहित नमुन्यातील (परतावा व ना परतावा या करिता स्वतंत्र अर्ज नमुना 1 व नमुना 3 मध्ये सादर केलेले नाही.

4) विभागप्रमुखाने अर्जदाराने अग्रीम घेतल्यानंतर भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील तरतुदीनुसार खर्चाचे विनियोजन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ते घेतल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रामुख्याने कुटुंबाची व्याख्या, नाते इत्यादी महत्वपूर्ण बाबी खात्री होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी निधीतून रकमा वारंवार अदा केल्याने वर्गणीदाराच्या सेवा निवृत्ती नंतर भविष्य निर्वाह निधी बचतीचा मूळ उददेश सफल होणार नाही.

5) भविष्य निर्वाह निधी खात्याचे बृहतपत्रकाचे व लेजर याचे अवलोकन केले असता खालील कर्मचारी यांच्या वेतनाच्या वित्तलब्धीच्या कमीत कमी 6 टक्के इतकी वर्गणी कपात होणे आवश्यक असतांना त्यांच्या वेतनातून कोणतीच कपात करण्यात आलेली नाही.

अ. क्र.	खाते क्र.	अधिकारी कर्मचा-याचे नाव	मूळ वेतन + ग्रेड पे	कपात केलेली रक्कम	भनिनि मधील शिल्लक रक्कम रूपये
1	5246	एम.के.पवार/सफाई कामगार	840	0	289
2	5296	जी.एस.वानखेडे/बिगारी	6140+1800	0	27129
3	6020	एस.आर.हिरे/फायरमन	8520+1900	0	26295
4	6130	पी.बी.नाईकवडे/सफाई कामगार	3170	0	24451
5	6375	पी.एम.खाडे/बिगारी	8060+1900	0	147996
6	6594	आर.एस.गांगुर्डे	9330+1900	0	28826
7	7106	आर.वाय.नांद्रे/लिपिक	8840+2400	0	8838

8	7454	डी.एस.उनावणे/हेल्पर	5200+1800	0	40617
9	7992	पी.निमसे/सफाई कामगार	6300+1900	0	16868
10	8146	डी.के.जाधव/लिपिक	7630+2400	0	26654
11	8668	एस.डी.मोरे/कामाठी	7060+1800	0	86564
12	8871	ए.घुले/सफाई कामगार	6580+1800	0	63978

उदाहरणादाखल वरिल कर्मचारी हे महानगरपालिकेतील आस्थापनाअंतर्गत असल्याने त्यांची सेवा खंडीत झाली की, ते असाधारण रजेवर आहेत किंवा सेवा निवृत्त झाले आहेत याबाबत कोणताच तपशील बृहतपत्रक व लेजरवर नमूद नसल्याने त्यांची वर्गणी वसूल का झाली नाही, याबाबत तपासणी करता आलेली नाही. तरी अशा प्रकारच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील असलेल्या नोंदीबाबत विभागाने खात्री करून आवश्यक तेथे वर्गणी वसूलीबाबत कार्यवाही करावी.

DGPVJTM8301 (Ref No : 55, Hmm No : 23)

99 गुंतवणूक निधी व गुंतवणूकीच्या नोंदवहीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिकेच्या निधीत जमा असलेल्या शिलकी रकमांची गुंतवणूक शासन मान्य बँकेत करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे निधीनिहाय, बँकनिहाय, दिनांक निहाय गुंवणूकीच्या नोंदी दिसून येत नाही. गुंतवणुक नोंदवहीतील सर्व रकाने भरलेले नाहीत. मुदत पूर्ण झाल्यानंतर मूळ मुदत ठेव पावती बॅकेत जमा केल्यावर त्यांची छायांकित प्रत व रक्कम बँकेत जमा होण्यासंबंधात बँक स्क्रोलची प्रत नस्तीस संलग्न केलेली नाही.

राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता प्रकरण 20 मध्ये नमुना क्रमांक IN-(पृष्ठ क्रमांक 20.19) गुंतवणूक नोंदवहीचा नमुना विहित केलेला आहे. नाशिक महानगपालिकेतील लेखा विभागाने गुंतवणूक नोंदवही महाराष्ट्र लेखा संहिता 1971 मधील नियम 187 (नमुना क्रमांक 142) नुसार परीरक्षित केलेली आहे. सन 2013-2014

मधील गुंतवणूक नोंदवहीची तपासणी केली असता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

1) नोंदवहीतील सर्व रकान्यांमध्ये माहिती भरलेली नाही. पुनर्गुंतवणूक करण्यात आली असल्यास त्याबाबत कोणताही तपशिल नमूद केलेला नाही.

2) महानगरपालिकेकडे घसारा निधी, निवृत्ती वेतन निधी, वृक्ष निधी, विकास निधी, मनपा निधी, मनपा वेल्फेअर फंड, भविष्य निर्वाह निधी, इत्यादी विविध प्रकारचे निधी असतात, त्याप्रमाणे केंद्र / राज्य शासनाचे अनुदान प्राप्त झालेले असते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 92 (1) नुसार महानगरपालिकेच्या निधीत जमा असलेल्या शिलकी रकमांची गुंतवणूक शासन मान्य बँकेत करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे निधीनिहाय, बँकनिहाय, गुंवणूकीच्या नोंदी दिसून येत नाही. मार्च 2014 अखेर गुंतवणूकीसंदर्भात बँक निहाय, निधी निहाय, दिनांकानुसार तपशिल वेळोवेळी मागणी करूनही प्राप्त झालेला नाही. त्यामुळे निधीनुसार योग्य रितीने गुंणवणूक झाल्याची खात्री करता येत नाही.

3) नोंदवहीत मंजूरी प्राधिकार, व्याज इत्यादी नोंदी घेतलेल्या नाहीत व संबंधितांच्या स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत.

4) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता प्रकरण 20.30 नुसार विभाग प्रमुखाने प्रत्येक महिन्याच्या शेवटी गुंतवणूक नोंदवहीमध्ये गुंतवलेल्या रकमा व प्रत्यक्ष निधीच्या रकमा यांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे, परंतू अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

5) घसारा निधी, निवृत्ती वेतन निधी, भविष्य निर्वाह निधी, वृक्ष निधी, इत्यादी सर्व निधींचा स्वतंत्र लेखा ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे प्राप्त झालेल्या व्याजाच्या रकमा, गुंतवणूक यांच्या अचुकतेबाबत तपासणी करता आलेली नाही.

6) महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 2011 मधील नियम 221 नुसार सक्षम अधिकारी वित्तीय वर्ष सप्टेंबर अखेर व वर्षाअखेरीस गुंतवणूकांची प्रत्यक्ष पडताळणी करील. गुंतवणूक नोंदवहीमध्ये दर्शविलेले शिल्लक आणि खाते नोंदवहीतील शिल्लक यांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही केली जात नाही.

7) गुंतवणूक करताना बँकेत धनादेश दिल्यावर त्याची छायांकित प्रत नस्तीस जोडण्यात आलेली नाही.

8) मुदत पूर्ण झाल्यानंतर मूळ मुदत ठेव पावती बॅकेत जमा केल्यावर त्यांची छायांकित प्रत व रक्कम बँकेत जमा होण्यासंबंधात बँक स्क्रोलची प्रत नस्तीस संलग्न केलेली नाही.

FDSRKNM8201 (Ref No : 129, Hmm No : 192)

100 दिनांक 31.03.2014 अखेर अपूर्ण असलेल्या विकास कामांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

अपूर्ण कामांसाठी (spill over) साठी रुपये 6615.86 लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे. महापालिकेच्या उत्पन्नाचा विचार करता बांधील खर्च वजा जाता अपूर्ण कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होवु शकणार नाही. त्यामुळे नवीन कामे हाती घेताना योग्य ते आर्थिक नियोजन करणे क्रमप्राप्त आहे. कार्यादेश दिलेले अपूर्ण कामे प्रथम प्राधान्याने पूर्ण करणे आवश्यक आहे. अपूर्ण कामांवर यापूर्वी केलेला खर्च व्यर्थ ठरणार नाही, या दृष्टीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात सन 2013-14 या वित्तीय वर्षात किंवा त्यापूर्वी सुरु करण्यात आलेल्या तथापि दिनांक 31.3.2014 अखेर अपूर्ण असलेल्या विकास कामांची विभागनिहाय व लेखाशीर्षनिहाय सविस्तर माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 5 दिनांक 05.01.2016 अन्वये मागणी करण्यात आली होती. तथापि लेखापरीक्षण कालावधीत अपूर्ण विकास कामांच्या याद्या अर्धसमास ज्ञापनात नमूद केलेल्या नमुन्यात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत.

विवरणपत्र क्र. 7 नुसार अपूर्ण कामांची माहिती सादर करण्यात आलेली असून दिनांक 31.3.2014 अखेर अपूर्ण असलेले कामांची संख्या 219 व रक्कम रु. 174.51 कोटी नमूद करण्यात आली आहे. सर्वसाधारण सभा विषय क्रमांक 1337 अन्वये संमत केलेल्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाच्या सुधारीत व सन 2014-15 या वित्तीय वर्षाच्या मूळ अर्थसंकल्पासोबत जोडण्यात आलेल्या स्पिल ओव्हर कामांची यादी पाहता, विवरणपत्र क्र. 7 मधील माहितीत तफावत आहे. अर्थसंकल्पासोबत जोडण्यात आलेल्या स्पिल ओव्हर कामांची यादी नुसार खालीलप्रमाणे विकास कामे दिनांक 31.3.2014 अखेर अपूर्ण असल्याचे दिसून येते.

(रक्कम र. लाखात)

अ.क्र.	लेखाशिर्ष	संगणक कोड	अपूर्ण कामांची संख्या	रक्कम रुपये लाखात
1	पथदिप विद्युतीकरण	2576	28	341.15
2	इमारत विद्युतीकरण	2578	2	38.05
3	सिग्नल विद्युतीकरण	2579	2	12.07
4	नविन कारंजे बसविणे	2581	1	3.49
5	ले आऊट डिपॉझिट	2582	20	97.68

6	इमारत बांधणे	2584	25	2803.49
7	रस्ते बांधणे	2585	110	4437.82
8	संडास मुता-या बांधणे	2586	10	162.71
9	पुल व सांडवे बांधणे	2587	4	96.49
10	स्मशान सुधारणे	2589	11	364.53
11	क्रीडांगण तयार करणे	2590	4	69.08
12	गोदावरी परिसर सुधारणा	2591	1	24.61
13	पुतळे व स्मारके उभारणे	2593	10	217.59
14	विशेष अनुदान	2594	13	423.53
15	उद्यान विकास	2596	58	285.16
17	डी.पी.डी.सी. अनुदानातुन शहर विकास कामे	2599	6	34.39
18	संगणक कक्ष	2755	12	341.41
19	खुल्या जागा	2757	30	253.89
20	मागासवर्गीय वस्तीत कल्याणकारी विकास	2598	41	1263.80
21	सिंहस्थ कामे	2657	31	33838.35
22	वितरण व्यवस्था	2604	22	607.82
23	जलदाय व्यवस्था (प्रकल्प)	2605	9	1330.12
24	जलदाय व्यवस्था (यांत्रिकी)	2606	9	394.03
25	मलवाहीका	2608	113	379.55
26	मलनिस्सारण व्यवस्था (यांत्रिकी)	2610	2	61.97
27	गटारी बांधणे	2613	1	5.08
28	वृक्षारोपन करणे	4008	10	78.41
29	वित्त आयोगांतर्गत कामे	2890	2	309.01

30	पावसाळी गटार योजना जनरल निधी अंतर्गत	2749	5	231.52
31	भुयारी गटार योजना		1	388.17
32	भुयारी गटार योजना-पॅकेज 2		8	2327.78
33	गोदावरी नदीला घाट बांधणे (जे.एन.एन.यु.आर.एम)		2	150.00
34	शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे (जे.एन.एन.यु.आर.एम)		7	14270.83
35	शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे (जे.एन.एन.यु.आर.एम) मनपा 5% मधुन	2860	15	511.08
		एकूण	625	66154.86

उपरोक्त महानगरपालिका निधी व शासन अनुदान यामधून हाती घेण्यात आलेल्या तथा दिनांक 31.3.2014 रोजी अपूर्ण असलेल्या विकास कामांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महानगरपालिका निधीतून हाती घेण्यात आलेल्या एकूण 625 विकास कामे दिनांक 31.3.2014 अखेर अपूर्ण आहेत. त्यासाठी एकूण रक्कम रुपये 66154.86 /- लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे. विहित नमुन्यात अपुर्ण कामांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याने, अपूर्ण विकास कामांची संख्या, सदर कामांसाठी सन 2013-14 या वित्तीय वर्षाअखेर किती निधी खर्च करण्यात आलेला आहे तसेच किती कामांच्या मूळ मुदती संपूष्टात आलेल्या आहेत, इत्यादीबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आलेली नाही.

2. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता उपरोक्त अपूर्ण कामांसाठी (स्पिल ओव्हर)पुरेसा निधी उपलब्ध होणे अवघड असल्याने उपरोक्तपैकी कार्यादेश दिलेल्या तसेच यापूर्वी काही निधी खर्च केलेल्या विकास कामांना प्राधान्य देवून पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच अपूर्ण कामांवर यापूर्वी खर्च केलेला निधी व्यर्थ ठरणार नाही, यादृष्टीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3. केंद्रशासन व राज्यशासन पुरस्कृत शासन योजनेची दिनांक 31.3.2014 अखेर अपूर्ण असलेल्या बहुतांशी कामांच्या मूळ मुदती तसेच मंजूर केलेल्या वाढीव मुदती संपूष्टात येवूनही सदर कामे पूर्ण झालेली नाहीत.

4. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 181 व 182 नुसार नमुना क्रमांक 138 व 139 मधील नोंदवहीत सर्व बांधकामांचा हिशोब ठेवणे आवश्यक असल्याने सदर नोंदवहया अद्यावत करुन त्यानुसार दिनांक 31.3.2014 अखेर अपूर्ण विकास कामांची यादी निश्चित करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेची प्रत्यक्ष उत्त्पन्न पाहता पुढील आर्थिक वर्षात बांधील खर्च वजा जाता अपूर्ण कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होवु शकणार नाही. त्यामुळे नवीन कामे हाती घेताना योग्य ते आर्थिक नियोजन करणे

क्रमप्राप्त आहे.

तरी दिनांक 31.3.2014 अखेर अपूर्ण असलेल्या महानगरपालिका तसेच राज्यशासन व केंद्रशासन अनुदानातील विकासकामांची यादी निश्चित करुन सदरची विकासकामे प्राधान्याने पूर्ण करणे आवश्यक आहे

DATDTBM7001 (Ref No : 138, Hmm No : 179)

101 घसारा निधित पुरेशी तरतूद नसलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेने सन 2013-2014 या वित्तीय वर्षात रक्कम रू10 लक्ष इतकी रक्कम सर्व मालमत्तांची घसारा म्हणून घसारा निधीत वर्ग केली असुन ती कोणत्या मालमत्तेवर किती दराने परीगणित केलेली आहे. याचा तपशिल उपलब्ध झाला नाही. रु. 824.69 लक्ष इतकी रक्कम घसारा निधित शिल्लक असून नाशिक महानगरपालिकेच्या मालमत्तेचे स्वरूप बघता ती फार पुरेशी नसल्याचे दिसून येते. तरी महानगरपालिकेकडे असलेल्या एकूण मालमत्तेचे खरेदी मुल्य विचारात घेऊन घसारा तरतुद करणे आवश्यक आहे.

रस्ते, पुल, इमारती, वाहने, कार्यालयीन फर्निचर इत्यादीची नित्यनियमाने देखभाल दुरूस्तीसाठी दरवर्षी आर्थिक तरतुद करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आयुमर्यादा संपते त्यानंतर नवीन प्रकल्प उभारणेस किंवा मालमत्त विकत घेणेस निधी उपलब्ध नसतो. त्यासाठी दरवर्षी नियमाप्रमाणे घसारा निधी स्वतंत्रपणे तयार करून त्यामध्ये पुरेशी तरतुद करणे गरजेचे आहे. उदा. वाहन खरेदी नंतर ठराविक वर्षे किंव किलो मीटर फिरती झाल्यानंतर वाहन निर्लेखित करावे लागते. परंतु अशा वेळेस निधी उपलब्ध नसेल तर अडचण निर्माण होते. म्हणून मालमत्तेच्या खरेदी मुल्यांवर निश्चीत प्रतीशत घसा-याची तरतुद करून रक्कम घसारा निधी मध्ये आवश्यक आहे. मालमत्तेची किंमत, मालमत्तेचे आयुष्य, मालमत्तेच्या नुतणीकरणावर झालेला खर्च, निरोपयोगी ठरलेल्या मालमत्तेच्या लिलावा पासून मिळणारी विक्रीची रक्कम इत्यादीवर घसारा रक्कम अवलंबुन असून त्याच्या वेगवेगळयापध्दती अवलंबविण्यात येतात. उदा. स्थायी हप्ता पध्दती, -हासमान पध्दत, वार्षिक वृध्दी पध्दती इत्यादी.

नाशिक महानगरपालिकेने सन 2013-2014 या वित्तीय वर्षात रक्कम रू.10 लक्ष इतकी रक्कम सर्व

मालमत्तांची घसारा म्हणून घसारा निधीत वर्ग केली आहे. नाशिक महानगरपालिकेच्या मालमत्तेचे स्वरूप बघता ती फार पुरेशी नसल्याचे दिसून येते. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 नियम 415 प्रमाणे घसारा निधीत मध्ये खाली नमुद केलेल्या दरानुसार रक्कम जमा करणे आवश्यक आहे.

1) संयंत्र व यंत्र सामुग्री - यंत्राच्या प्रकारानुसार 10 ते 20 टक्के

2) हत्यारे - 20 टक्के

3) फर्निचर - 6 टक्के

4) वाहने - 15 टक्के

5) विदयुत मोटारी व संयंत्रे - 5 टक्के

घसारा निधीत मध्ये एकूण रू.824.69 /- लक्षएवढी रक्कम शिल्लक आहे.

तरी महानगरपालिकेकडे असलेल्या एकूण मालमत्तेचे खरेदी मुल्य विचारात घेऊन घसारा तरतुद करणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 140, Hmm No : 183)

102 इतर विकास निधी अंतर्गत तरतूद करून केलेल्या खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेने इतर विकास निधी या लेखाशिर्षा अंतर्गत स्वतंत्र नावाने वाढीव नगरसेवक निधी उपलब्ध केला असुन सदर निधी हा नियमानुसार 2 टक्के पेक्षा जादा असुन तो नियमबाहय आहे. इतर विकास निधी अंतर्गत नगरसेवक निधीतून 2 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय रक्कमेची कामे मंजुर करण्यात आलेली आहेत.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 च्या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात इतर विकास निधी अंतर्गत केलेल्या विविध विभागाकडील विकासकामांचे दर्शविलेल्या खर्चाची पडताळणी केली असता, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी सन 2013-2014 या वित्तीय वर्षाकरीता मुळ अर्थसंकल्पात इतर विकास निधी

या लेखाशिर्षा अंतर्गत महासभेने मंजूर केलेल्या मुळ अंदाजपत्रकात रू. 186.50 कोटी तरतुद केली,प्रत्यक्षात खर्च मात्र निरंक नोद्विण्यात आलेला आहे.

नाशिक महानगरपालिकेने इतर विकास निधी अंतर्गत नगरसेवक निधी म्हणून नगरसेवकांच्या शिफारशीनुसार विकास कामे मंजुर केलेली आहेत. त्याचा प्रत्यक्ष खर्च हा कामाच्या स्वरूपाशी निगडीत लेखाशिर्षात नोंदविण्यात आलेला आहे.

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एएमसी-14200/2264/प्र.क्र.144/नवि-24, मुंबई 32, दिनांक 01 जानेवारी, 2002 नुसार राज्यातील महानगरपालिकांच्या वार्षिक अंदाजपत्रकात राखून ठेवण्यात येणा-या नगरसेवक स्वेच्छा निधीची मर्यादा ठरविणेबाबतच्या तरतुदी नुसार नगरसेवक निधी हा महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या 2 टक्के इतका असून तो सर्व नगरसेवकांत समान वाटप करावयाचा आहे. तथापि, नाशिक महानगरपालिकेने इतर विकास निधी या लेखाशिर्षा अंतर्गत स्वतंत्र नावाने वाढीव नगरसेवक निधी उपलब्ध केला असुन सदर निधी हा नियमानुसार 2 टक्के पेक्षा जादा असुन तो नियमबाहय आहे.

2) तसेच महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांएएमसी14200/2264/प्र.क्र.144/नवि-24, मुंबई-32, दिनांक 26 फेब्रुवारी, 2001 नुसार नगरसेवक निधी अंतर्गत मंजूर निधीतून प्रत्येकी 2 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय रकमेची कामे मंजुर करता येत नाही तथापि, इतर विकास निधी अंतर्गत नगरसेवक निधीतून 2 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय रक्कमेची कामे मंजुर करण्यात आलेली आहेत.

DATDTBM7001 (Ref No : 142, Hmm No : 185)

103 नगरसचिव विभागातील सन 2013-2014 या कालावधीत हार, पुष्पगुच्छ व शाली इत्यादी बाबींवरील आकस्मित खर्च लेखाशिर्षांतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 490950.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 490950.00/-

सदरचा खर्च करतांना विना निविदा व दर पत्रके न मागविता केलेला आहे. शासन निर्णय दिनांक 2.1.1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3) फ) अन्वये प्रत्येक बाबीसाठी वर्षभरात रू 50,000/- पेक्षा जादा खर्च असल्यास

त्यासाठी जाहिर निविदा प्राप्त करून त्यानंतरच खर्च करणे आवश्यक आहे. पुष्पगुच्छ व शाल इत्यादी खर्चासाठी कोणतेही कार्यादेश देण्यात आलेले संचिकेत दिसुन आलेले नाहीत. पुरवठादारांच्या उपप्रमाणकांवर प्रदानार्थ मंजुर व अदा करून रद्द केले असे शेरे नमूद करून स्वाक्ष- या केलेल्या नाहीत.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे नगरसचिव विभागातील आकस्मिक खर्च नस्तीच्या निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण केले असता नगरसचिव विभागा मार्फत विविध कार्यक्रमांसाठी हार, पुष्पगुच्छ व शाली इत्यादी बाबींकरीता सन 2013-2014 या वित्तीय वर्षात आकस्मिक खर्च या लेखाशिर्षाखाली एकुण रक्कम रूपये 4,90,950/- इतका खर्च करण्यात आला असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	पुरवठाकाराचे नांव	रक्कम
1	आदेश क्र. 993 दिनांक 9/10/2013	हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	93220
		शाली	अशोक होजिअरी, नाशिक	13500
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	94980
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	96200
		हार, पुष्पगुच्छ	ग्रीन हाऊस, नाशिक	49300
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	48250
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	89700
		एकूण		**485150**
2	आदेश क्र. 30 दिनांक 14/3/2014	हार, पुष्पगुच्छ	ग्रीन हाऊस, नाशिक	5800
		एकूण		**5800**
			एकूण खर्च	**490950**

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) हार, पुष्पगुच्छ व शाली इत्यादीसाठी एकूण रु **4,90,950/-** एवढा खर्च सन 2013-2014 मध्ये वजावट

नोंदवहीनुसार झालेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सुधारणा 2013 मधील अनुसूची "ड" प्रकरण 5(2) नुसार महानगरपालिकेने कुठलेही माल किंवा सामुग्री खरेदी करण्यासाठी 7 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहीरात नोटीस देऊन अशा खरेदीसाठी निविदा मागविणे आवश्यक असतांना विना नि विदा व दरप्रत्रके न मागविता खरेदी केलेली आहे. तसेच कोणतेही काम शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/2512/उघोग-6 दिनांक 02.01.1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 (फ) अन्वये प्रत्येक बाबीसाठी वर्षभरात रू 50,000/- पेक्षा जादा खर्च असल्यास त्यासाठी जाहिर निविदा प्राप्त करून त्यानंतरच खर्च करणे आवश्यक आहे. तथापि नाशिक महानगरपालिकेने मा. महासभा ठराव क्र 859 दिनांक 19.11.2005 अन्वये सदर खर्चाची मर्यादा शिथिल करून मा.स्थायी समिती ने ठराव क्रमांक 1174 दिनांक 20.10.2011 अन्वये कोणतीही दरपत्रके न मागविता खर्च करण्याचा ठराव पारित केलेला आहे. मात्र सदरील ठराव महानगरपालिकेच्या हिताचा नसून निविदा प्रक्रिया न राबविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ नाशिक महानगरपालिकेस झालेला नाही. परिणामी विशिष्ठ पुरवठादाराकडुन हार, पुष्पगुच्छ व शाली खरेदी केलेल्या असल्याने जादा खर्च झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अशा प्रकारच्या साहित्यांची वारंवार आवश्यकता भासत असल्यास निविदा काढून वार्षिक दर मंजूर करणे शक्य असताना अशी कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही.

2) हार, पुष्पगुच्छ व शाल इत्यादी खरेदीच्या नस्तीची तपासणी केली असता, संबंधित पुरवठादारांना सदरील खर्चासाठी कोणतेही कार्यादेश देण्यात आलेले संचिकेत दिसुन आलेले नाहीत. परिणामी पुरवठयाचे परिमाण, दर कोणकोणत्या बाबी पुरवठाकाराने पुरविणे आवश्यक आहे, याची कोणतीही तपासणी आणि पडताळणी न करता संबंधिताना रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत. संबंधित पुरवठाकारानी प्रत्यक्षात किती हार, पुष्पगुच्छ व शाली इत्यादींचा पुरवठा केलेला आहे, याची कोणतीही माहीती/अभिलेखे देण्यात आलेले नाही. परिणामी पुरवठाकारांना अतिप्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच प्रदान करण्यापूर्वी आवश्यक ती तपासणी नमूद करून व पुरवठादारकांच्या उपप्रमाणकांवर प्रदानार्थ मंजुर, व अदा करून रद्द केले असे शेरे नमूद करून स्वाक्ष-या केलेल्या नाहीत.

3) सदरच्या देयकांच्या रकमा अदा करण्यापूर्वी या साहित्याचा वापर कोणकोणत्या अभ्यांगतांसाठी केला याबाबतच्या कुठल्याही नोंदी ठेवलेल्या नाहीत.

वरील उविणांवरून असे दिसून येते की, मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 57, Hmm No : 106)

104 नगरसचिव विभागातील दिवाळी 2013 ची भेट कार्ड (ग्रिटींग) कुरिअर ने वाटप करण्यासाठी आकस्मित खर्च लेखाशिर्षांतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 259128.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 259128.00/-

मानधनाची रक्कम ही दुरध्वनी, लेखनसामग्री व टपाल या बाबींवर खर्च करण्यासाठी अदा करण्यात येते परंतू मा.महापौर, मा.उप महापौर, मा.सभागृह नेता यांचे दिवाळी सण ग्रीटींग वाटपासाठी आकस्मिक खर्चातून रक्कम खर्च करण्यात आली आहे. दिवाळी ग्रिटींग कार्ड कोणास वाटप करण्यात आलेले आहेत याबाबतची कोणतीही नोंद ठेवण्यात आलेली नाही. विनानिवीदा व दरपत्रके मागवून सदरचा खर्च करण्यात आला आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे नगरसचिव विभागातील आकस्मिक खर्च नस्तीच्या निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण करण्यात आले असता नगरसचिव विभागा मार्फत दिवाळी 2013 मध्ये दिवाळी सणानिमित्त मा.महापौर, मा.उप महापौर, मा.सभागृह नेता यांनी मनपा सदस्य, विविध पक्षाचे पदाधीकारी, शहरातील मान्यवर, शासकीय/निमशासकीय कार्यालये, विविध पक्षाचे पदाधिकारी, वॉर्डातील नागरीक यांना शुभ संदेश पत्र (ग्रीटींग) मा.आयुक्त यांचे आदेश 1023, दिनांक 22/10/2013 अन्वये छपाई विभागाकडून तयार करण्यात आले होते. सदरचे शुभ संदेश पत्र (ग्रीटींग) वाटपासाठी सन 2013-14 या वित्तीय वर्षात आकस्मिक खर्च या लेखा शिर्षाखाली एकुण रक्कम रूपये 2,59,128/- इतका खर्च करण्यात आला असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	मा.आयुक्त् यांचे आदेश क्रमांक व दिनांक	मान्यवाराचे पदनाम	वाटप करणा-या ठेकेदाराचे नाव	रक्कम रूपये
1	1825, दिनांक 4/3/2014	मा.महापौर यांचे दिवाळी 2013 ची शुभेच्छा पत्र	वन टाईम कुरीअर	99593
2	1843,दिनांक 4/3/2014	मा.उपमहापौर यांचे दिवाळी 2013 ची शुभेच्छा पत्र	वन टाईम कुरीअर	105917
3	966,दिनांक 29/9/2013	मा.सभागृह नेता यांचे दिवाळी 2012 ची शुभेच्छा पत्र	वन टाईम कुरीअर	53618
एकूण				259128

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1)शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2009/प्र.क्र.148/नवि-26,नगरविकास विभाग, मंत्रालय 32, दिनांक 22/01/2010 अन्वये दुरध्वनी, लेखनसामग्री व टपाल या बाबींवर खर्च लक्षात घेवून महानगरपालिका सदस्यांचे मानधन दर महा 7,500/- (अक्षरी सात हजार पाचशे) इतका करण्याबाबत शासनाने मान्यता दिली आहे, त्याअनुषंगाने

महासभा ठराव क्रमांक 262/दिनांक 30/03/2010 व मा.आयुक्त यांचे आदेश क्रमांक जा.क्र./नस/वशि/74/2010,दिनांक 16/6/2010 अन्वये दिनांक 22/01/2010 पासून दरमहा मानधन रक्कम रू.7500/- अदा करण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. मानधनाची रक्कम ही दुरध्वनी, लेखनसामग्री व टपाल या बाबींवर खर्च लक्षात घेउन करण्याबाबत आदेशात स्पष्ट नमूद असताना देखील दिवाळी सण ग्रीटींग वाटपासाठी आकस्मिक निधीतून सन 2013-2014 मध्ये रक्कम रू.2,59,128./- एवढा खर्च करण्यात आला आहे. सदरची बाब नियमबाहय आहे.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सुधारणा 2013 मधील अनुसूची "ड" प्रकरण 5 (2) नुसार महानगरपालिकेने कुठलेही माल किंवा सामुग्री खरेदी करण्यासाठी 7 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहीराती नोटीस देऊन अशा खरेदीसाठी निविदा मागविणे आवश्यक असतांना विना निवीदा व दरप्रत्रके न मागविता परस्पर वन टाईम कुरीअर या ठेकेदारास दिवाळी शुभेच्छा ग्रीटींग वाटपासाठी देण्यात आले आहे. तसेच कोणतेही काम शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/2512/उद्योग-6 दिनांक 02.01.1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 (फ) अन्वये प्रत्येक बाबीसाठी वर्षभरात रू 50,000/- पेक्षा ज्यादा खर्च असल्यास जाहिर निविदा प्राप्त करून त्यानंतरच खर्च करणे आवश्यक आहे. तथापि नाशिक महानगरपालिकेने कोणतीही दरपत्रके न मागविता खर्च केलेला आहे. निविदा प्रक्रिया न राबविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ नाशिक महानगरपालिकेस झालेला नाही. परिणामी जादा खर्च झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही..

3) सदर खर्चासाठी कोणतेही कार्यादेश देण्यात आलेले संचिकेत दिसून आलेले नाहीत. सदर रक्कम ही आदेशात संबंधित ठेकेदारास देणे आवश्यक आहे, परंतू सदरची रक्कम आदेशात महागरपालीकेतील कर्मचा-यांच्या नावे अदा करण्याबाबत नमूद केले आहे, यास्वत सदरची रक्कम संबंधित कुरीअर कंपनीला प्राप्त झाल्याबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

4) दिवाळी ग्रीटींग मा.मनपा सदस्य, विविध पक्षाचे पदाधीकारी, शहरातील मान्यवर, शासकीय/निमशासकीय कार्यालये, विविध पक्षाचे पदाधिकारी, वॉर्डातील नागरिक यांना देण्याबाबात नमूद केले आहे, परंतू सदरचे ग्रिटींग कोणास देण्यात आले याबाबतची यादी नस्तीवर दिसून आलेली नाही तसेच वन टाईम कुरीअर कंपनीने सदरचे ग्रिटींग संबंधितास वाटप केल्याबाबतचा अभिलेख नस्तीसोबत दिसून आलेला नाही. यास्तव सदर ग्रिटींग संबंधिताना पोच झाल्याबाबतची पडताळणी केलेली नाही.

5) वरील तक्यातील अ.क्र. 3 मध्ये नमूद मा.सभागृह नेता यांचे दिवाळी सन 2012 चे ग्रिटींग वाटपाबाबत रक्कम अदा केल्याचे दिसून येते, परंतू सदरची रक्कम सन 2013-2014 या कालाधीच्या वजावट नोंदवहीतून अदा करण्यात आली आहे.

वरील उविणांवरून असे दिसून येते की, मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 58, Hmm No : 107)

105 नाशिक महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयातील विवाह मंडळाच्या नोंदणीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 00

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेतील विविध विभागातील विवाह मंडळाची नोंदणी/ नुतणीकरण फी आकारणी न केल्याने शासकीय महसूलाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याने त्याबाबतची वसुलीची योग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम, 1998 व महाराष्ट्र विवाह मंडळ विनियम व विवाह नोंदणी नियम, 1999 मधील नियम 3 नुसार कार्यक्षेत्रातील विवाह जुळविणारी वधू-वर सूचक मंडळाची नोंदणी निबंधकाकडे करणे अनिवार्य व कायद्याने बंधनकारक आहे. निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रातील कार्यरत विवाह मंडळे यांची नोंदणी निबंधकाकडे करणे आवश्यक आहे व रक्कम रूपये 5000/- प्रती प्रकरण या विहित दराने फी आकारून तसेच नोंदणी करण्यात आलेल्या तारखेपासून दर दोन वर्षांनी नुतणीकरणाची विहित फी आकारून सबंधित विवाह मंडळांना नमुना "अ" मध्ये नोंदणी प्रमाणपत्र देऊन नमुना "ह" नोंदवहीत संबंधित विवाह मंडळाची नोंद घेण्याचे स्पष्ट निर्देश आहेत.

दिनांक 01/05/2008 पासून विवाह नोंदणीचे कामकाज महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले आहे. उपरोक्त बाब पाहता सन 2013-2014 या आर्थिक वर्षात विभागात किती विवाह मंडळाची नोंदणी झाली किंवा नुतणीकरण झाले किंवा कसे याबाबतची माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्राद्वारे विचारणा केली असता ती अप्राप्त आहे. सदर कालावधीत विवाह मंडळाचे नोंदणी अथवा नुतणीकरणाचे काम न केल्याने शासकीय महसूलाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याने विभागीय कार्यालयाने नियमातील तरतूदीप्रमाणे आपल्या कार्यालयाक्षेत्रातील कार्यन्वीत विवाह मंडळे यांची नोंदणी/नुतणीकरण विहीत नमुन्यातील प्रपत्रात करून संबंधिताकडून पूर्वलक्षी प्रभावाने अनुज्ञेय होणारी विहीत दराने फी आकारणी करून रक्कम वसूलात आणून सत्वर शासकीय कोषागारात भरणा करण्याची नियमोचीत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 64, Hmm No : 90)

106 सन 2013-2014 या कालावधीतील पश्चिम विभागीय कार्यालयातील विवाह नोंदणी विभागातील उणिवांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

पश्चिम विभागीय कार्यालयाने विवाह नोंदणी पावती पुस्तकांच्या साठयांची नोंदवही ठेवलेली नाही. किर्द नोंदवहीत वार्षिक गोषवारा नमूद केलेला नाही तसेच प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी घेतलेल्या नाहीत. विवाह नोंदणी फी+शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरणा केल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा दिसून आलेल्या आहेत.

1) नाशिक महानगरपालिका पश्चिम विभागीय कार्यालयाने सन 2013-2014 या कालावधीतील उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्याची पडताळणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 7 नियम 80 मध्ये नमूद केल्याप्रमाणे पावती पुस्तकांच्या साठयांची नोंद नमुना 57 मध्ये घेण्यात येवून पावती पुस्तके देण्यासंबंधिच्या व पूर्ण झल्यानंतर त्या परत करण्यासंबंधिच्या तपशीलाची नोंद घेण्यात यावी पंरतू पश्चिम विभागीय कार्यालयातील विवाह नोंदणी कार्यालयाचे लेखे तपासले असता पावती पुस्तकांच्या साठयांची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही

2) दिवसअखेरचे लेखे बंद करतेवळी प्राधिकृत अधिका-याच्या स्वाक्षरीसह लेखे बंद करणे आवश्यक आहे तसेच वसुल झालेल्या रकमेचा मासिक व वार्षिक गोषवारे प्राधिकृत अधिका-याच्या स्वाक्षरीने तयार करणे आश्यक आहे, परंतू विवाह नोंदणी विभागाने प्रत्येक महिन्यात प्राप्त झालेल्या रकमेचा मासिक गोषवारा तसेच वार्षिक गोषवारा किर्द नोंदवहीत नमूद केलेला नाही तसेच प्राधिकृत अधिका -यांची स्वाक्षरी घेतल्याचे दिसून आले नाही.

3) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 मधील नियम 12 नुसार निबंधकाकडे आलेली सर्व फी आणि शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्याबाबत स्पष्ट निर्देश आहेत. पश्चिम विभागीय कार्यालयाने फॉर्म फी + विवाह नोंदणी फी+शास्तीची रक्कम सन 2013-2014 या कालावधीत रक्कम रू.82,350/- एवढी वसूल केली आहे. सदरची रक्कम नमूद नियमानुसार शासकीय कोषागारात भरणा केल्याची पडताळणी लेखापरीक्षणावेळी करता आली नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 146, Hmm No : 72)

107 भुसंपादन प्रकरणी आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

भुसंपादनाची प्रक्रिया झाल्यानंतर 7/12 उता-यास महानगरपालिकेचे नाव लावण्याबाबत व उतार प्राप्त करून घेण्याबाबत कार्यवाही होत नाही व याबाबत पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही. भुसंपादन प्रकरणी महानगरपालिकेच्या अंतर्गत विभागांमध्ये जो पत्र व्यवहार केला जातो, त्यात विलंब होत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे द.सा.द.शे. 3 टक्के अतिरिक्त् घटकाची रक्कम अदा करावी लागत असल्याने सदरील रकमा खूप मोठया असल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होते. विशेष भुसंपादन अधिकारी यांना धनादेश पाठविताना पत्रात आयकर कपातीबबात स्पष्टपणे नमूद केले जात नाही.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे निवडक भुसंपान प्रकरणांची पडताळणी करताना खालील उणीवा निदर्शनास आल्या आहेत.

1)भुसंपादनाची प्रक्रिया झाल्यानंतर 7/12 उता-यास महानगरपालिकेचे नाव लावण्याबाबत व उतार प्राप्त करून घेण्याबाबत कार्यवाही होत नाही व याबाबत पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही. सर्वच प्रकरणी असे घडले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा प्रकरणी भविष्यात दुबार प्रदान होण्याची शक्यता आहे.

2)भुसंपादन प्रकरणी महानगरपालिकेच्या अंतर्गत विभागांमध्ये जो पत्र व्यवहार केला जातो, त्यात विलंब होत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे द.सा.द.शे. 3 टक्के अतिरिक्त् घटकाची रक्कम अदा करावी लागत असल्याने सदरील रकमा खूप मोठया असल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होते. याबाबत कोणतीही दक्षता घेतली जात नाही.

3)नस्त्यामधील पत्रव्यवहार दिनांकानुसार लावला जात नाही, त्यामुळे एकूण क्षेत्र, टी.डी.आर, एफ.एस.आय. मोबदला रक्कम इत्यादीबाबत खात्री करता येत नाही. उदा. 18 मीटर डी.पी. रोड(तपोवन श्रमचारी आश्रम भुसंपादन नस्तीस मिळकत व्यवस्थापक यांचे पत्र क्रमांक एलएसओ/वशी/530/06, दिनांक 08/06/2006 नंतर नस्तीमध्ये खर्च मंजूरी रूपये 6,17,20,871/- चा आदेश क्रमांक 1179 दिनांक 25/11/2013)

4)विशेष भुसंपादन अधिकारी यांना धनादेश पाठविताना पत्रात आयकर कपातीबबात स्पष्टपणे नमूद केले जात नाही.

5)रक्कम अदा झाल्यावर धनादेशाची छायांकित प्रत नस्तीस जोडण्यात येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 69, Hmm No : 104)

108 सर्वे नंबर 288 18 मीटर डी.पी.रोड (तपोवन श्रमचारी आश्रम) भुसंपादन प्रस्ताव.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नस्त्यांची पडताळणी करताना ब-याच ठिकाणी उपरोक्त् नमूद केल्याप्रमाणे विलंब झाल्याचे दिसून येते त्यामुळे मुल्यांकन दराव व अतिरिक्त् घटक रकमेत वाढ झाल्याने महानगरपालिकेला मोठया प्रमाणावर अतिरिक्त रकमांचे प्रदान करावे लागते. विभागीय आयुक्त यांचे पत्र क्रमांक भुसंना/प्रक्र.12/04/18 मि.वी.यो.रस्ता 38806/44509/10 दिनांक 27/06/2010 नुसार शासनास भुसंपादन प्रस्ताव मंजूरीस सादर करण्यात आला. त्याप्रकरणी पत्र क्रमांक एएनएम 10/975/प्रक्र.17/अ-4, दिनांक 08/09/2010 नुसार शासनाने आक्षेप कळविले. त्यातील आक्षेपानुसार रस्त्यापैकी काही क्षेत्र 60 मीटर रूंद मुंबई आग्रा रस्त्यात अशंतः येत असल्याचे दिसते, त्यामुळे पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांनी मोबदला दिला किंवा कसे याबाबत पडताळणी करणेबाबत नमूद केलेले आहे, परंतू त्याअनुषंगाने कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

सर्वे नंबर 288 18 मीटर डी.पी.रोड (तपोवन श्रमचारी आश्रम) भुसंपादन प्रस्ताव प्रकरणी सन 2004 च्या शिघ्रसिध्द किमतीच्या 2/3 रक्कम रूपये 46,62,000/- जमा करण्याबाबत विशेष भुसंपादन अधिकारी नाशिक यांनी त्यांचे पत्र क्रमांक विभुसअक्र 2/केस न.12/2004, दिनांक 07/08/2004 नुसार महानगरपालिकेकडे मागणी केली, त्याबाबत स्मरणपत्रे दिनांक 16/09/2005, दिनांक 28/10/2005, दिनांक 02/03/2006 महानगरपालिकेस प्राप्त झाली. सदरील खर्च रूपये 46,62,000/- यास सभा क्रमांक 42 विषय व ठराव क्रमांक 539 दिनांक 31/12/2004 नुसार मंजूरी मिळाली, त्याबाबतचे मंजूरी आदेश क्रमांक 1349 दिनांक 18/11/2005 रोजी झाले. याबाबत देयक दिनांक 18/11/2005 रोजी केल्याचे व धनादेश क्रमांक 581907 दिनांक 26/05/2006 रूपये 46,62,000/- मिळकत व्यवस्थापक पत्र क्रमांक एल.एस.ओ./ वशि/530 /06, दिनांक 08/06/2006 नुसार विशेष भुसंपादन अधिकरी क्रमांक 2 नाशिक यांना पाठविले. मागणी मंजूरी व रक्कम प्रदान होणेबाबत विलंब झालेला असून याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही.

सर्वे नंबर 288/2 बाबत टी.डी.आर. / एफ.एस.आय, मोबदला रोख स्वरूपात देण्यात आला का याबाबत विशेष

भुसंपादन अधिकारी क्रमांक 2 यांनी महानगरपालिकेस दिनांक 25/04/2011, दिनांक 07/05/2011, दिनांक 19/05/2012 रोजी पत्र व स्मरणपत्रे पाठविली, त्याबाबत मिळकत व्यवस्थापक यांनी नगररचना विभागास दिनांक 09/04/2011, दिनांक 11/5/2001, दिनांक 13/06/2011, दिनांक 28/07/2011, दिनांक 02/11/2012 रोजी पत्र व स्मरणपत्रे पाठविली. त्यानंतर नगररचना विभागाकडून दिनांक 02/02/2013 चे पत्रानुसार अभिप्राय मिळकत विभागास प्राप्त झाले. अभिप्राय प्राप्त झाल्यावर मिळकत विभागाने दिनांक 14/05/2013 रोजी विशेष भुसंपादन अधिकारी क्रमांक 2 नाशिक यांना कळविले आहे. नस्त्यांची पडताळणी करताना ब-याच ठिकाणी उपरोक्त् नमूद केल्याप्रमाणे विलंब झाल्याचे दिसून येते त्यामुळे मुल्यांकन दराव व अतिरिक्त् घटक रकमेत वाढ झाल्याने महानगरपालिकेला मोठया प्रमाणावर अतिरिक्त रकमांचे प्रदान करावे लागते. सर्वच प्रकरणी अशा घटना घडल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याअनुषंगाने कोणत्याही प्रकारची दक्षता घेतल्याचे दिसून येत नाही.

स्थायी समिती सभा क्रमांक 13 विषय व ठराव क्रमांक 51 दिनांक 12/07/2012 नुसार भुसंपादन प्रकरणी रोख रकमे विषयी टी.डी.आर. स्वरूपात मोबदला देवून भुसंपादन करण्याबाबत शासनचे मार्गदर्शन घेण्याबाबत ठराव मंजूर झाला त्याअनुषंगाने दिनांक 21/08/2012 रोजी प्रस्ताव तयार केल्याचे व सदरील प्रस्ताव अदयापही नस्तीतच असल्याचे दिसून येते. प्रस्ताव न पाठविल्याबाबत कोणतीही माहीती पडताळणी वेळी उपलब्ध झालेली नाही.

विभागीय आयुक्त यांचे पत्र क्रमांक भुसंना/प्रक्र.12/04/18 मि.वी.यो.रस्ता 38806/44509/10 दिनांक 27/06/2010 नुसार शासनास भुसंपादन प्रस्ताव मंजूरीस सादर करण्यात आला. त्याप्रकरणी पत्र क्रमांक एएनएम 10/975/प्रक्र.17/अ-4,दिनांक 08/09/2010 नुसार शासनाने आक्षेप कळविले. त्यातील आक्षेपानुसार रस्त्यापैकी काही क्षेत्र 60 मीटर रूंद मुंबई आग्रा रस्त्यात अशंत: येत असल्याचे दिसते, त्यामुळे पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांनी मोबदला दिला किंवा कसे याबाबत पडताळणी करणेबाबत नमूद केलेले आहे, परंतू त्याअनुषंगाने कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही व कोणतीही माहिती पडताळणी वेळी उपलब्ध झालेली नाही.

MINVAJM6901 (Ref No : 70, Hmm No : 105)

109 फर्निचर, कर्मचारी गणवेश व स्टेशनरी खरेदीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

खरेदीची कार्यवाही शासन निर्णय क्रमांक.भाखसं-1088/2512/उद्योग-6/मंत्रालय, मुंबई दिनांक.02/01/1992 नुसार करणे आवश्यक होते, सन 1992 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 5 व परिशिष्ट क्रमांक 3 नुसार उपरोक्त् क्रमांक 1 ते 3 याबाबी महाराष्ट्र लघुउदयोग विभाग महामंडळ यांचेकडून खरेदी करणे बंधनकारक

होते. तर परिशिष्ट क्रमांक 7 व परिशिष्ट क्रमांक 5(अ) 1 नुसार उपरोक्त् क्रमांक 5 ची बाब शासनाच्या अंगीकृत व्यवसाय महाराष्ट्र राज्य वस्त्रोदयोग महामंडळ यांचेकडून खरेदी करण्यासाठी राखीव होते. शासन निर्णय क्रमांक.भाखसं-1088/2512/उद्योग-6/मंत्रालय, मुंबई दिनांक.02/01/1992 मधील परिशिष्ठ 7 नुसार पुन: प्रत्ययी आदेश हे मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यापर्यत देता येतात तसेच बाजारातील दर/किमती मूळ आदेशापेक्षा कमी होणार नसतील किंवा स्थिर आहेत किंवा प्रमाणिकत आहेत याची शहानिशा करणे आवश्यक असताना व याबाबतची टिपण्णी संबंधित कागदपपत्रासह खरेदी करणा-या समितीपुढे सादर करणे गरजेचे असताना अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

महानगरपालिकेच्या निवडक महिन्यांच्या देयकांची पडताळणी करताना भांडार विभागाने विविध विभागांना लागणारे फर्निचर, कर्मचारी गणवेश व स्टेशनरी खरेदी निविदा पध्दतीने केलेल्या मंजूर दराने केले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अक्र	**देयक क्रमांक / दिनांक**	**मागणी पुस्तक क्रमांक / पृष्ठ क्रमांक**	**आदेश क्रमांक / दिनांक**	**पुरवठादाराचे नाव**	**तपशील**	**रक्कम रुपये**
1	10/17.10.13	246/43	141/05.10.13	मे.श्रीराम आर.सोनवणे, नाशिक	संगणक टेबल - 1	7538
2	11/17.10.13	246/44	142/05.10.13	मे.श्रीराम वुडन आर्ट्स, नाशिक	स्टील रॅक -2	7580
					स्टील कपाट (लहान) - 1	3950
					ऑफीस टेबल (लहान) - 2	10630
					लोखंडी खुर्ची - 3	5310
3	12/17.10.13	246/45	142/05.10.13	मे.ओंकार एंटरप्रायझेस, नाशिक	स्टील कपाट (मोठे) - 2	13670
					ऑफीस टेबल (मोठे) -1	8657

4	10/11.10.13	-	-	-	नाशिक मनपा कर्मचारी गणवेश शिलाई (नाशिक पूर्व)	6150
5	11/28.10.13	246/46	1017/21.10.13	मे.एमबी ट्डींग कंपनी नाशिक	ब्लाउज पीस रंगीत व सफेद बस्ता कापड (रेकॉर्ड बांधण्यासाठी) 3000 मीटर	225000
6	19/8.10.13	246/42	1454,5/3/13	मे.राका प्रिंटर्स नाशिक	अमोनिया 30	5145
					झेरॉक्स पेपर 200 रिम	127400
7	20/8.10.13	246/40	1454,5/3/13	मे.गणेश स्टेशनरी ॲन्ड जनरल स्टोर नाशिक	जेल पेन 100 नग	980
					कॅलक्युलेटर 12 डिजीट 30 नग	7938
8	21/8.10.13	246/41	1454,5/3/13	मे.गणेश एन्टरप्रायजेस नाशिक	स्टॅपलर पीन 10 न. 200	1120
					अमोनिया 150	20580
					एकूण	**451648**

उपरोक्त खरेदीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) खरेदीची कार्यवाही शासन निर्णय क्रमांक.भाखसं-1088/2512/उद्योग-6/मंत्रालय, मुंबई दिनांक.02/01/1992 नुसार करणे आवश्यक होते, सन 1992 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 5 व परिशिष्ट क्रमांक 3 नुसार उपरोक्त् क्रमांक 1 ते 3 याबाबी महाराष्ट्र लघुउदयोग विभाग महामंडळ यांचेकडून खरेदी करणे बंधनकारक होते. तर परिशिष्ट क्रमांक 7 व परिशिष्ट क्रमांक 5(अ) 1 नुसार उपरोक्त् क्रमांक 5 ची बाब शासनाच्या अंगीकृत व्यवसाय

महाराष्ट्र राज्य वस्त्रोदयोग महामंडळ यांचेकडून खरेदी करण्यासाठी राखीव होते.

2) शासन निर्णय क्रमांक.भाखसं-1088/2512/उद्योग-6/मंत्रालय, मुंबई दिनांक.02/01/1992 मधील परिशिष्ठ 7 नुसार पुन:प्रत्ययी आदेश हे मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यापर्यंत देता येतात तसेच बाजारातील दर/किमती मूळ आदेशापेक्षा कमी होणार नसतील किंवा स्थिर आहेत किंवा प्रमाणिकत आहेत याची शहानिशा करणे आवश्यक असताना व याबाबतची टिपण्णी संबंधित कागदपपत्रासह खरेदी करणा-या समितीपुढे सादर करणे गरजेचे असताना अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

3) पुरवठादाराकडून प्राप्त देयकाची/प्रमाणकाची प्रत किंवा छायाप्रत संबंधित नस्तीस लावली जात नाही, त्यामुळे प्राप्त साहित्याच्या नोंदी प्रमाणपत्र इत्यादी तपशीलाबाबत खात्री करता येत नाही.

4) उपरोक्त् नमूद 1 ते 3 प्रकरणे सन 2011-12 करीता विविध विभागांना लागणारे फर्निचर खरेदीबाबत आदेश क्रमांक 2416 दिनांक.09/01/2012 नुसार एकूण रक्कम रुपये 13,00,000/- खर्चास मंजूरी देण्यात आली. प्रत्येक प्रकरणी नवीन नस्ती व नवीन जडसंग्रह नोंदवही केली जात असल्याने मंजूर रकमेपेक्षा जादा खर्च झाला किंवा कसे याबाबत खात्री करता येत नाही. सन 2013-14 मधील खरेदीस, खर्चास नव्याने मान्यता घेतलेली नाही.

5) उपरोक्त क्रमांक 5 चे खरेदीबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 60, दिनांक 28/4/2011 व आदेश क्रमांक 1017, दिनांक 21/10/2013 नुसार मंजूरी दिलेली आहे. प्रत्येक प्रकरणी नवीन नस्ती व नवीन जडसंग्रह नोंदवही केली जात असल्याने मंजूर रकमेपेक्षा जादा खर्च झाला किंवा कसे याबाबत खात्री करता येत नाही. सन 2013-14 मधील खरेदीस, खर्चास नव्याने मान्यता घेतलेली नाही.

6) उपरोक्त अ.क्र. 6 ते 8 बाबत सन 2011-12 करीता विविध विभागांना लागणारे स्टेशनरी खरेदीबाबत आदेश क्रमांक 1454 दिनांक.05/03/2013 नुसार एकूण रक्कम 30 लक्ष खर्चास मंजूरी देण्यात आली. प्रत्येक प्रकरणी नवीन नस्ती व नवीन जडसंग्रह नोंदवही केली जात असल्याने मंजूर रकमेपेक्षा जादा खर्च झाला किंवा कसे याबाबत खात्री करता येत नाही. सन 2013-14 मधील खरेदीस, खर्चास नव्याने मान्यता घेतलेली नाही.

6) पुरवठादाराकडून जाहीरातीत नमूद केल्यानुसार रु.120 च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे दोन सक्षम जामीनदारांच्या स्वाक्षरी पुर्ण तपशीलासह व निविदेच्या तपशीलासह नमूद करणे आवश्यक आहे.

8) दरपत्रकाच्या लिफाफयावर प्राप्त दिनांक, संबंधितांची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे, तसेच जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे पुरवठादाराचे नाव व तपशील नमूद करणे आवश्यक आहे. लिफाफे उघडताना त्यावर सर्व संबंधितांच्या स्वाक्षऱ्या घेणे आवश्यक आहे अटीसह सादर केलेले दरपत्रक रद्द करणे आवश्यक आहे.

110 नोंदवहयांतील उणीवांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता यातील नमुना क्रमांक GEN 30 व 31 नुसार जंगम मालमत्ता नोंदवहीचा नमुना विहित करण्यात आला असून त्याप्रमाणे नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या भांडार विभागाच्या निवडक महिन्याच्या लेख्यांची पडताळणी करताना नोंदवहयामध्ये खालीलप्रमाणे उणीवा निदर्शनास आल्या आहेत.

1) बील नोंदवहीत नोंदीवर संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्या स्वाक्ष-या/अदयाक्षरे नाहीत. नोंदवहीत रकान्यात नमूद केलेली माहिती भरली जात नाही.

2) वजावट नोंदवहीत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या स्वाक्षरी/अदयाक्षरे नाहीत.

3) भांडार विभगातील मागणी पुस्तक क्रमांक 246 येथील फॉर्म A 1 ते 78 येथे सक्षम अधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत.

4) भांडार विभागातील मागणी पुस्तक क्रमांक 246 फॉर्म A क्र. 2,25,50,51,52,63,79 रदद केल्याचे दिसते पंरतू रदद करण्याबाबत त्यावर सक्षम अधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत.

5) साठा नोंदवहयामध्ये ब-याच नोंदवहयावर पृष्ठे 200 पेक्षा कमी किंवा जास्त आहेत, परंतू शेवटी पृष्ठे 1 ते 200 असल्याचे प्रमाणित केलेले आहे. उदा. बी-1 नोंदवही पृष्ठे 1 ते 194

6)राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता यातील नमुना क्रमांक GEN 30 व 31 नुसार जंगम मालमत्ता नोंदवहीचा नमुना विहित करण्यात आला असून त्याप्रमाणे नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

MINVAJM6901 (Ref No : 72, Hmm No : 110)

111 छपाई खर्चाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

शासन निर्णय क्रमांक.भाखसं-1088/2512/उद्योग-6/मंत्रालय, मुंबई दिनांक.02/01/1992 मधील परिशिष्ठ 7 नुसार पुन: प्रत्ययी आदेश हे मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यापर्यत देता येतात तसेच बाजारातील दर/किमती मूळ आदेशापेक्षा कमी होणार नसतील किंवा स्थिर आहेत किंवा प्रमाणिकत आहेत याची शहानिशा करणे आवश्यक असताना व याबाबतची टिपण्णी संबंधित कागदपपत्रासह खरेदी करणा-या समितीपुढे सादर करणे गरजेचे असताना अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

महानगरपालिकेच्या निवड महिन्याच्या देयकांची पडताळणी करताना छपाई विभागाने विविध विभागांना लागणारी स्टेशनरी साहित्याची छपाई निविदा पध्दतीने केलेल्या मंजूर दराने केले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	देयक क्र./दिनांक	मंजूरी आदेश क्र./दिनांक	पुरवठादार	छपाईचा तपशील	रक्कम
1	33, दि.10/10/13	-	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	विभागीय कार्यालयांना लागणारे विविध फॉर्म् व नोंदवहया	152146
				विविध विभागांना लागणारे फॉर्म व नोंदवहया	12891
2	34,दि.15/10/13	711,दि.13/8/13	मे.रवि एन्टरप्रायजेस नाशिक	संगणकीय जन्म दाखले	53418
				संगणकीय मृत्यू दाखले	46050
3	35,दि.15/10/13	711,दि.13/8/13	मे.रवि एन्टरप्रायजेस नाशिक	पगार शेडयुल्स पांढरा कागद	10800
				स्टेट बॅक कर्ज स्लिप पांढरा कागद	13365
				बॅक स्टेटमेंट स्लिप (ट्रीपलिकेट कार्बन सह)	17100
				पगार बील सींगल पेपर	7665

				लेखा परीक्षण स्लिप पांढरा कागद	12810
				संगणकीय पावत्या इ.	37647
		एकूण			**363892**

उपरोक्त् छपाईबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1)स्थायी समिती ठराव क्रमांक 65, दिनांक 28/4/2011 नुसार संगणकीय मृत्यू दाखले, स्टेशनरी छपाई इत्यादी छपाईस मंजूरी देण्यात आली आहे. पंरतू सदरील दर हे सन 2011-2012 मंजूर होते, त्याच दराने पुन्हा सन 2013-2014 मध्ये छपाईचा खर्च करण्यात आलेला आहे.

2) उपरोक्त् अ.क्र. 1 ची नस्ती पडताळणीस उपलब्ध न झाल्याने त्या अनुषंगाने छपाई खर्चाबाबत कोणतीही पडताळणी करता आलेली नाही.

3)पुरवठा आदेशात नमूद केल्यानुसार काम होण्याबाबत नस्तीमध्ये कोठेही सक्षम अधिका-याचे अभिप्राय नाहीत. त्याचप्रमाणे कागदाचा दर्जा आदेशात नमूद केल्याप्रमाणे आहे किंवा कसे याबाबत कोणतीही पडताळणी केल्याचे दिसून येत नाही.

4)छपाई साहित्याच्या नोंदी नोंदवहीत एकत्रित घेण्यात येत नाहीत, त्याप्रमाणे संबंधित विभागाने याबाबत नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. पंरतू अशी कार्यवाही केली जात नसल्याचे दिसून येते.

5) नस्तीसोबत छपाईच्या अनुषंगाने कोणतीही प्रमाणके लावली जात नाही. त्यामुळे प्रत्यक्ष छपाई त्यावरील शेरे, प्रदान रकमा, प्रमाणपत्र इत्यादी बाबत खात्री करता येत नाही.

6) देयक नोंदवहीतील नोंदवहीवर संबंधितांच्या स्वाक्ष-या/अध्यक्षांच्या स्वाक्ष-या नाहीत, ब-याच ठिकाणी खाडाखोड केलेले असून तेथे अदयाक्षरी नाही. नोंदवहयामध्ये पृष्ठांची संख्या कमी जास्त असूनही सरसकट 1 ते 200 पृष्ठे असल्याचे अखेरच्या पृष्ठावर प्रमाणिक केलेले आहे. (उदा.देयक नोंदवही 1 ते 398)

7) शासन निर्णय क्रमांक.भाखसं-1088/2512/उद्योग-6/मंत्रालय, मुंबई दिनांक.02/01/1992 मधील परिशिष्ठ 7 नुसार पुन:प्रत्ययी आदेश हे मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यापर्यत देता येतात तसेच बाजारातील दर/किमती मूळ आदेशापेक्षा कमी होणार नसतील किंवा स्थिर आहेत किंवा प्रमाणिकत आहेत याची शहानिशा करणे आवश्यक असताना व याबाबतची टिपण्णी संबंधित कागदपपत्रासह खरेदी करणा-या समितीपुढे सादर करणे गरजेचे असताना अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

112 महापौर चषक क्रीडा स्पर्धा 2012 मध्ये हेलिअम गॅस बलून प्रदर्शित करण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 05

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या महापौर चषक क्रीडा स्पर्धेमध्ये हेलिअस गॅस बलून प्रदर्शित करण्यासाठी नम्रता पब्लीसिटी नाशिक यांना दि.02/01/1992 च्या शासन निर्णयाविरुध्द व ठरवून काम देण्यात आलेले आहे व सदर काम देताना अनियमितता झालेली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या वतीने दि.25/12/2012 ते दि.30/12/2012 या कालावधीत महापौर चषक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेसाठी हेलिअम गॅस बलून प्रदर्शित करण्यासाठी नम्रता पब्लीसिटी नाशिक यांना आदेश क्रमांक 209 दि.09.05.2013 व देयक क्रमांक 50 दि.01.01.2013 अन्वये रक्कम रुपये 70,000/- अदा केलेले आहेत.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) उपरोक्त खर्च हे उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भाखंस-1088 /2512/उद्योग-6 दिनांक.02/01/1992 मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सुधारणा 2013 मधील अनुसूची "ड" प्रकरण 5(2) नुसार करणे आवश्यक होते. दि.02/01/1992 च्या शासन निर्णयानुसार खरेदीची एकाच वेळची किंवा वार्षिक मर्यादा रक्कम रुपये 50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त) पेक्षा जास्त असेल तेंव्हा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर निविदा मागविणे आवश्यक आहे. खरेदीचे स्पर्धात्मक, तुलनात्मक व वाजवी दर उपलब्ध व्हावेत हा निविदेमागील उद्देश असतो तसे न केल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ महानगरपालिकेस झालेला नाही.

2) नम्रता पब्लीसिटी नाशिक यांचे दरपत्रक दि.24/12/2012 रोजीची आहे व कार्योदेश (Work Order) हि त्याच दिवशी म्हणजेच दि.24/12/2012 रोजी देण्यात आलेली आहे यावरुन सदर पुरवठाधारकास ठरवून काम देण्यात आले आहे असे दिसून येते.

3) दरपत्रकावर महानगरपालिकेचा आवक क्रमांक, दिनांक, सही व शिक्का नाही तसेच नस्ती मध्ये पृष्ठ क्रमांक नसल्यामुळे उपरोक्त दरपत्रक स्पर्धेपुर्वी घेण्यात आले किंवा कसे याची पडताळणी करता आलेली नाही.

4) सदर कामासाठी करारनामा करण्यात आलेला नाही त्यामुळे मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 परिच्छेद क्रमांक 1 नुसार रक्कम रुपये 100/- इतक्या शासकीय मुद्रांक रकमेचे नुकसान झालेले आहे. सदर

रक्कम वसुलपात्र असून पुरवठाधारकांकडून वसूल करुन शासन जमा करावी.

5) दरपत्रक मागविण्यासाठी संबंधित पुरवठाधारकाला पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही.

उपरोक्त प्रकरणी दि.02/01/1992 च्या शासन निर्णयाविरुध्द पुरवठाधारकास काम देण्याची अनियमितता झालेली आहे. सदर बाब ही शासन निर्णयाविरुध्द असून नियमानुसार उचित कार्यवाही होणे आवश्यक होते.

FDSRKNM8201 (Ref No : 75, Hmm No : 119)

113 महापौर चषक क्रीडा स्पर्धा 2012 मधील निवास व्यवस्थेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 03

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या महापौर चषक क्रीडा स्पर्धेसाठी नाशिक शहरातील विविध हॉटेल्समध्ये उपस्थितांसाठी राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती परंतु सदर व्यवस्था करताना दि.02/01/1992 च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी न केल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या वतीने दि.25/12/2012 ते दि.30/12/2012 या कालावधीत महापौर चषक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेला उपस्थित राहीलेले पदाधिकारी, निरीक्षक, पंच, प्रमुख पाहुणे व खेळाडू यांची राहण्याची व्यवस्था खालील हॉटेल्समध्ये करण्यात आल्या होत्या.

अ.क्र.	हॉटेलचे नाव	बील क्रमांक	आदेश क्रमांक व दिनांक	रक्कम	सर्व्हीस टॅक्स	लक्झरी टॅक्स
1	हॉटेल न्यु उत्तम हिरा पॅलेस, नाशिक	1018	1123/18.11.13	225420	21420	---
2	हॉटेल पूजा इंटरनॅशनल, नाशिक	2232	1123/18.11.13	211380	11251	18079
3	हॉटेल पथिक, नाशिक	797	468/29.06.13	65780	5980	-----
4	हॉटेल रॉयल हेरिटेज, नाशिक	446	1401/03.01.14	1680142	90197	131320
5	हॉटेल शिल्पा, नाशिक	33901	469/29.06.13	103792	-----	3992

	एकूण			**2286514**		

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महापौर चषक स्पर्धेसाठी निवास व्यवस्थेकरीता रक्कम रुपये 22,86,514/- एवढा खर्च दरपत्रके व विनानिविदा बाजारभावाप्रमाणे आयुक्तांच्या अधिकारात केलेला आहे. वरील खर्च हा उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भाखंस-1088 /2512/उद्योग-6 दिनांक.02/01/1992 मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सुधारणा 2013 मधील अनुसूची "ड" प्रकरण 5(2) नुसार करणे आवश्यक होते. दि.02/01/1992 च्या शासन निर्णयानुसार खरेदीची एकाच वेळची किंवा वार्षिक मर्यादा रक्कम रुपये 50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त) पेक्षा जास्त असेल तेंव्हा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर निविदा मागविणे आवश्यक आहे. खरेदीचे स्पर्धात्मक, तुलनात्मक व वाजवी दर उपलब्ध व्हावेत हा निविदेमागील उद्देश असतो तसे न केल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ महानगरपालिकेस झालेला नाही.

2) हॉटेल शिल्पा, नाशिक यांना कार्योदेश (Work Order) देण्यात आलेली नाही.

3) सदर कामासाठी करारनामा करण्यात आलेला नाही त्यामुळे मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 परिच्छेद क्रमांक 1 नुसार रक्कम रुपये 100/- इतक्या शासकीय मुद्रांक रकमेचे नुकसान झालेले आहे. सदर रक्कम वसुलपात्र असून पुरवठाधारकांकडून वसूल करुन शासन जमा करावी.

उपरोक्त प्रकरणी दि.02/01/1992 च्या शासन निर्णयाविरुध्द काम देण्याची अनियमितता झालेली आहे . सदर बाब ही शासन निर्णयाविरुध्द असून याबाबत नियमानुसार उचित कार्यवाही होणे आवश्यक होते.

FDSRKNM8201 (Ref No : 76, Hmm No : 120)

114 अटल दयाल वाचनालय, प्रभाग क्रमांक 56(ए), शाहू नगर, नाशिक येथील ई लायब्ररीसाठी संगणक व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 6

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 578312.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 578312.00/-

निवीदा प्रकिया राबवितांना नियमांचे पालन करणेत आलेले नाही, करारामध्ये दंडात्मक रकमेची तरतूद करणेत

आलेली नाही, प्राप्त दरपत्रकांचे तुलनात्मक प्रपत्र तयार केलेले नाही, पुरवठा आदेशानूसार सदर संगणकांमध्ये Licence Antivirus software Install करणेत आलेले नाही.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-14 या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण सुरु करणेत आले आहे. संगणक विभागाकडून अटल दयाल वाचनालय, प्रभाग क्रमांक 56(ए), शाहू नगर , नाशिक येथील ई-लायब्ररीसाठी संगणक व इतर साहित्य खरेदी करणेत आलेले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1	प्रशासकीय मंजूरी	ठराव क्रमांक 251 दि.25.11.2013
2	निविदा कालावधी	14.1.2014 ते 22.1.2014
3	कामाचा कालावधी	45 दिवस (कार्यादेशापासून)
4	मक्तेदार	मे मल्टीप्लेक्स टेक्नॉलॉजीस, नाशिक
5	कार्यादेश क्रमांक	आ.क्र.22/26.2.2014
6	रक्कम	रु.578,312/- (वाटाघाटीनंतर)
7	तांत्रीक मंजूरी	आ.क्र.1609, दि.17.2.2014
8	देयक क्रमांक	2296/ 5.3.2014

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे-

1) सदर कामाला प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेत आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 73 नुसार 25.00 लक्ष पर्यतची कामे मा.आयुक्त मंजूर केलेल्या कामांना पुढील स्थायी समितीच्या बैठकीत माहितीस्तव माहिती सादर करणे अनिवार्य असते, परंतू सदर नियमाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

2) पुरवठादारांमध्ये केलेल्या तुलनेबाबतचे प्रपत्र नस्तीमध्ये आढळून आले नाही.

3) अटल दयाल वाचनालय, प्रभाग क्रमांक 56(ए), शाहू नगर, नाशिक यांची पोहच तसेच पुरवठादाराचे डिलेवरी चालान नस्तीमध्ये आढळून आली नाही. त्यामुळे पुरवठादाराने विहीत केलेल्या मुदतीत वस्तूचा पुरवठा केला किंवा कसे याची सत्यता प्रमाणित करता येत नाही.

4) निविदा मागवितांना तसेच तीचे अंतिमीकरण करतांना एकत्रित रकमेनिहाय तुलना करणेत आल्याचे दिसून आले. परंतू प्रत्यक्षात निविदामधील बाबनिहाय तुलना करून निविदा अंतिम करणे आवश्यक आहे. त्यामुळे मनपाला स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नाही.

5) सदर संगणकाची चाचणी आयटीआय सातपुर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक 45 दि.26.2.2014 अन्वये सादर केला असून त्यामध्ये Antivirus नमूद नसल्याचे दिसून आले परंतू पुरवठा आदेशानूसार सदर संगणकांमध्ये Licence Antivirus software असणे आवश्यक होते.

6) करारनाम्यामध्ये वस्तूचा पुरवठा विहीत मुदतीत न केल्यास दंडात्मक रकमेचा उल्लेख करणे आवश्यक आहे, परंतू तशी अट विहीत करणेत आलेली नाही.

CCFNKKM8401 (Ref No : 79, Hmm No : 131)

115 नाशिक महानगरपालिकेमधील कार्यरत अॅन्टीव्हायरस आज्ञावलीचा परवाना नूतनीकरण करणेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 5

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1520423.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1436423.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 84000.00/-

निविदांबाबतचा Activity Log मनपाने मागणी करूनही पडताळणी करणेसाठी उपलब्ध करुन दिला नाही, मक्तेदाराला कामाबाबतचे schedule तयार दिल्याबाबतचे पत्र / आदेश दिसून आले नाही, काम पुर्णत्वाचा प्रमाणपत्र / दाखला- नस्तीमध्ये दिसून आला नाही, 5 टक्के अनामत रक्कम देयकामधून वसूल करणेत आलेचे दिसून आले नाही.

नाशिक महानगरपालिकेचे वापरात असलेल्या संगणकामध्ये Install केलेल्या अॅन्टीव्हायरस आज्ञावलीचे upgradation / नूतनीकरण करणेकामी केलेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-

1	प्रशासकीय मंजूरी	महासभा ठराव क्रमांक 302, दि.206.2007
2	अर्थसंकल्पीय तरतूद	नमूद नाही
3	निविदा कालावधी	16.1.2014 ते 24.1.2014
4	कामाचा कालावधी	नमूद नाही
5	मक्तेदार	मे आर डी डेटा सिस्टीम नाशिक
6	कार्यादेश क्रमांक	57, दि.1.3.2014
7	निविदा रक्कम	रु.1672,468/-
8	तांत्रीक मंजूरी	घेण्यात आलेली नाही
9	देयक क्रमांक	13-14/471 दि.14.3.2014 रु.15,20,423/-(500 संगणकांसाठी)

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे-

1. सदरची निविदा ही ई निविदा पध्दतीने मागविल्या आहेत, सदर निविदांबाबतचा Activity Log मनपाने मागणी करूनही पडताळणी करणेसाठी उपलब्ध करुन दिला नाही.

2. निविदेमधील Special Condition of Contract या भागातील अट क्रमांक 9 - Method for Carryout the work नूसार Officer In Charge हा मक्तेदाराला कामाबाबतचे schedule तयार करून देईल, त्यानंतर मक्तेदाराने सदरचे काम करणे आवश्यक राहील, असे नमुद आहे. परंतू नस्तीमध्ये Officer In Charge ने मक्तेदाराला कामाबाबतचे schedule तयार दिल्याबाबतचे पत्र / आदेश दिसून आले नाही.

3. करारनाम्यातील अट क्रमांक 2 नूसार सदरचे काम 30 दिवसांत पूर्ण करावे असे नमूद आहे. परंतू प्रत्यक्षात

काम किती दिवसांत पूर्ण केले याबाबतचे अहवाल नस्तीमध्ये दिसून आले नाही. तसेच कार्यादेश देतांना सुध्दा त्यामध्ये उल्लेख करणेत आलेला नाही.

4. करारनाम्यातील अट क्रमांक 1 नूसार मक्तेदाराच्या देयकातून 5 टक्के अनामत रक्कम रु.42000/- x 2 = 84000/- प्रमाणे देयकातून कपात केली जाईल असे नमूद केले आहे. परंतू प्रत्यक्षात तशी कार्यवाही केली अगर कसे याबाबतचे कागदपत्र नस्तीमध्ये दिसून आले नाही.

5. नाशिक मनपाचे मुख्यालय व विभागीय कार्यालयातील एकूण किती संगणकांवर ॲन्टीव्हायरसचे नूतनीकरण करणेत आले, त्याबाबतचा विभागीय कार्यालयाकडील अहवाल तसेच काम पुर्णत्वाचा प्रमाणपत्र / दाखला- नस्तीमध्ये दिसून आला नाही.

आक्षेपाधिन रक्कम	रूपये 1520423.00
वसुलपात्र	रूपेय 84000.00

CCFNKKM8401 (Ref No : 81, Hmm No : 132)

116 अधिकारी / कर्मचा-यांकडून प्रतिभूती बंधपत्र न घेतल्याबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 01

मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9ड

प्रतिभूती बंधपत्र न घेतल्याबाबत झालेली अनियमितता.

नाशिक महानगरपालिकेमधील संगणक विभागामध्ये काम करीत असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांकडून सन 2013-14 साठी प्रतिभूती बंधपत्र घेण्यांत आलेले नाही. महाराष्ट्र आकस्मीक खर्च नियम - 1965 मधील नियम क्रमांक 51 नुसार, शासकीय कार्यालयातील भांडारपाल, उपभांडारपाल, भांडार लिपीक किंवा असे कर्मचारी की ज्यांचेवर मालमत्ता खरेदी करणेची किंवा सांभाळण्याची जबाबदारी सोपविण्यांत आलेली असते, अशा कर्मचा-यांकडून खालिल प्रकारांपैकी एकामध्ये प्रतिभूती बंधपत्र सिक्यूरीटी बॉड) घेणे आवश्यक असते. अशा प्रतिभूतीच्या रकमेबाबत सक्षम अधिका-याने, प्रत्येक प्रकरणी, स्थानिक परिस्थिती पाहून योग्य तो निर्णय घ्यावयाचा असतो.

प्रतिभूतीचे प्रकार -

1. प्रतिभूती बंधपत्र - दोन जामिनदार

2. कोणत्याही शासनमान्य विमा संस्थेचा "इमान हमी योजना" (फिडीलीटी गॅरंटी पॉलिसी)
3. रोख स्वरुपात किंवा मासिक वेतन देयकातुन कपात
4. पोस्टाची विमा पॉलिसी किंवा सावधी विमा पॉलिसी
5. पोस्टाच्या बचत बॅकेतील ठेवी.

परंतू महानगरपालिकेने संबधितांकडून कोणत्याही स्वरूपात प्रतिभूती बंधपत्र घेतलेले नाहीत.

CCFNKKM8401 (Ref No : 83, Hmm No : 133)

117 नाशिक महानगरपालीका क्षेत्रातील मोकाट व भटक्या श्वानांवर निर्बीजीकरणांची शस्त्रक्रिया करणेबाबतच्या अनिमीतता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 7

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 2764300.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2764300.00/-

नाशिक महानगरपालीकेच्या पूर्वविभागीय कार्यालयातील सन 2013-14 यावित्तीय वर्षातील महानगरपालीका क्षेत्रातील मोकाट व भटक्या श्वानांवर निर्बीजीकरणांची शस्त्रकिया करणेवर एकुण रु.2764300/- (3949 श्वानांसाठी) खर्च केले आहे.

नाशिक महानगरपालीकेच्या पूर्वविभागीय कार्यालयातील सन 2013-14 यावित्तीय वर्षातील महानगरपालीका क्षेत्रातील मोकाट व भटक्या श्वानांवर निर्बीजीकरणांची शस्त्रकिया करणेवर एकुण रु.2764300/- (3949 श्वानांसाठी) खर्च केले होते.

कार्यादेश क्रमांक 1049/11,12.2012 व महासभेचा ठराव क्रमांक 80/23.8.2012 अन्वये तसेच मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 च्या कलम 87 (क) नुसार मा.आयक्त यांनी मान्यता दिली आहे. या कालावधी साठी ठेका रु.700/- च्या प्रतीश्वान या दराने सोसायटी फॉर द प्रिव्हेंशन ऑफ क्रुएलटी टू उक्त प्रकरणी खालीलप्रमाणे देण्यात आला होता.

1)मनपाने महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासननिर्णय क्रमांक भाखस-1088(2512) उद्योग-6, मुंबईदिनांक 2.1.1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 (ह) परिशिष्ठ सात मधील मार्गदर्शन तत्वे यांची पालन झालेले नाही. पुर्नप्रचिती आदेश हे मुळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी कामाचे पुरवठा आदेश

दिलेले आहे.

2)अगोदरच्या करार जून 2012 रोजी संपूष्टात आला असतांना विनानिवीदा मागील मंजूर दराने दि.1.4.2013 ते 31.12.2013 या मुदतीसाठी त्याच मंजूर दराने पुरवठा आदेश प्रत्येक वेळी वाढवून रु.700/- या दराने संबंधित ठेकेदाराला विनानिविदा देण्यात आला आहे.

3) द अनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्स) रु.सन 2001 मधील नियम 4 नूसार मॉनिटरींग कमीटी स्थापन करावयाची असून सदर समितीच्या नियोजनानूसार सदर योजना राबविणे आवश्यक असतांना अशी समिती स्थान केलेलीदिसून येत नाही. श्वान पकडणे, निर्बीजीकरणे शस्त्रक्रिया करुन श्वानपान व्यवस्था, श्वानांवर कलर कोडींग व ओळखखूण करणे व सोडूण देणे बाबत समितीने निगराणी करणे आवश्यक आहे.

4) श्वान पकडण्यासाठी श्वान पथकांमध्ये श्वान वाहनाच्या वाहन चालक, दोन प्रशिक्षीत कर्मचारी व अनिमल वेलफेअर संघटनेच्या प्रतीनिधी असेण आवश्यक आहे. श्वान पकडतांना शहराच्या ज्या भागातून त्यांना पकडण्यात येत आहे. त्यार ठिकाणी सार्वजनिक दवंडयाव्दारे किंवा अन्य स्थानीक नागरींकाना याबाबत सुचित करणेत आवश्यक आहे. जेणेकरुन नागरीकांना श्वान बर्थ कंट्रोल कार्यक्रमांबाबत जागरुक शिक्षीत होऊन महानगरपालीका नागरीकांच्या सुरक्षतीतेसाठी योग्य त्या उपाययोजना करीत असल्याचे ज्ञात होईल तसेच शस्त्रक्रियेनंतर ज्या ठिकाणावरुन त्यांना पकडून आणले आहे. त्याचठिकाणी अ निमल वेफेअर संघटनेच्या प्रतीनिधी समक्ष त्यांना सोडणे आवश्यक आहे. अशा पध्दतीने कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

5) द अनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्स) सन 2001 मधील नियमावली नूसार खालील् अभीलेखे ठेवणे आवश्यक आहे.

1)Pre Operative Assessments

2)Driver Record Sheet

3)Surgery Case record sheet

4)Office Daily Record Sheet

5Medicine Inventory sheet

6)Detail of Monthly Expenditure

तरी मनपाने वरील प्रमाणे अभीलेखे ठेवल्याचे दिसून येत नाही.

6) सचिव, अनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडीया, भारत सरकार यांचेकडील सर्व नगरपालीका, महानगरपालीका यांना उददेशून लिहलेल्या अर्धशासकीय पत्र क्रमांक 12/2010 दि.28.5.2010 मधील सुचनेनूसार सदरचा कार्यक्रम राबविण्यासाठी 50 टक्के खर्च स्थानीक संस्थेने करणे आवश्यक होते, मनपाने सदरील 50 टक्के अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी कोणताही प्रस्ताव सादर न करता विना निवीदा दर निश्चीती करुन सर्व खर्च मनपा निधीतून केला आहे. त्यामुळे सन 2013-14 मध्ये झालेल्या खर्चाच्या 50 टक्के रक्कम म्हणजे

रु.2625050/- एवढी मनपा प्राप्त होण्यापासून वंचित राहीली आहे.

7) नाशिक मनपाने दराबाबत बाजारभाव व प्रचलित दर यांची तूलना इतर महानगरपालीकेसोबत केल्याचे दिसून आले नाही.

DATPDMM6101 (Ref No : 84, Hmm No : 114)

118 श्वानांवरील कर व बॅच विक्रीबाबत

NA
लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 3

मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

आरोग्य विभागातील पशु संवर्धन विभागाचे लेखा परीक्षणात पशु संवर्धन विभागाने श्वानांवरील कर व बॅच विक्रीबाबत सन 2014-2015 या आर्थिक वर्षात रूपये 80000/- ची तरतूद केली आहे. सन 2013-2014 च्या अंदाजपत्रकातील महसूली व भांडवली उत्पनाचा विचार केल्यास प्रत्येक विभागाने महसूली/भांडवली उत्पन्न व खर्चासाठी विशिष्ट तरतूद करणे आवश्यक आहे.

आरोग्य विभागाने नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील पाळीव श्वानांच्या नोंदणीसाठी रूपये 80000/- ची तरतूद सन 2014-2015 साठी केली असून सन 1.1.2013 ते 31.12.2013 या कालावधीत एकूण 182 पाळीव श्वानांची नोंदवणी केल्याचे नमूद केले आहे.याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1)पशुसंवर्धन विभागात पाळीव श्वानांवरील कर व बॅच विक्रीपासून जमा होणारा महसूली जमा विचारणा केली असता कर व बॅच विक्री केली नसल्याचे सांगण्यात आले परंतू अदांजपत्रकात सन 2014-2015 मध्ये 182 श्वानांची आकडेवारी कशी दाखविली याबाबत अनुपालन सादर करावे.

2)अंदाजपत्रकात दर्शविलेल्या बाबींवर महसूली व भांडवली उत्पन्नापासून महानगरपालिकेचे महसूली व भांडवली खर्चाचे अंदाज बांधता येतात व त्यानुसारच जनतेसाठी सोई सवलती देणे शक्य असते तेव्हा अंदाजपत्रकात जमेची तरतूद करून देखील कर व बॅच विक्री का केली नाही. तसेच शहरातील पाळीव प्राण्यांना देखील(उदा. म्हैस, गाय, बैल, शेळी, गाढव इ.) बॅच विक्री वाढवून उत्पन्नात वाढ करता येणे शक्य होते. परंतू अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3)अंदाजपत्रकानुसार महसूली जमा व भांडवली जमा व खर्चाचे अंदाज तयार करून महानगरपालिकेचे मा.महपौर मंजूर देतात व त्याप्रमाणे कर आकारणीचे अप्रत्यक्ष आश्वासने देतात तेव्हा त्यानुसार मा.आयुक्त योजनांची अंमलबजावणी करण्यास सक्षम ठरतात तेव्हा याबाबत सदरील तरतूदीचे पालन करण्यात आले नससल्याचे दिसून येते. याबाबत त्वरीत अनुपालन सादर करावे.

DATPDMM6101 (Ref No : 86, Hmm No : 122)

119 आरोग्य विभागांतर्गत मलेरिया/हिवताप विभागाकरिता सन 2013-2014 मध्ये डास निर्मूलन, डास प्रतिबंधात्मक कामी अळी नाशक, किटक नाशक औषधी खरेदी करण्यातील अनियमितता

NA
लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 6

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 6122586.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6122586.00/-

नाशिक महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत मलेरिया विभागाकरिता सन 2013-2014 या आर्थिक वर्षामध्ये नाशक, किटक नाशक औषधे पुरविण्याकामी अनियममितता झाल्या आहेत.

नाशिक महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत मलेरिया विभागाकरिता सन 2013-2014 या आर्थिक वर्षामध्ये नाशक, किटक नाशक औषधे पुरविण्याकामी ज्या अनियममितता झाल्या आहेत त्या खालीलप्रमाणे.

ई टेंडर निविदा सुचना क्रमांक 9

1) ई टेंडरसाठी निविदा प्रसिध्दी - दैनिक देशदूत दिनांक 3.12.2013
दैनिक नवशक्ती दिनांक 3.12.2013

2)प्रशासकीय मंजूरी - नाशिक मनपा महासभा ठराव क्र. 624 दिनांक 19.9.2013
रूपये 61,22,586/-

3)तांत्रिक मंजूरी - घेतल्याचे दिसून आले नाही.

4)दरास मान्यता - मनपा महासभा ठराव क्र.624 दिनांक 19.9.2013 अन्वये मा.आयुक्त यांनी पत्र क्रमांक 332, दिनांक 15.2.2014 अन्वये मान्यता दिल्याचे दिसून येते.

ई टेंडर निविदा मागविले असता मुदतीत एकूण दहा ठेकेदारांच्या मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या असुन त्यात तुलणात्मक दृष्टया कमी दर व पात्र ठेकेदार यांचेसोबत दिनांक 27.12.2013 रोजी दर वाटाघाटीचे लेखी पत्र देण्यात आले. नंतर तुलनात्मक दृष्टया कमी दर झालेले ठेकेदार यांचे दर निश्चित केले असून यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सदर अळीनाशक/किटकनाशक ही वेगवेगळया स्वरूपातील असून महाराष्ट् शासन उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक/भाखस/1088(2512)/उदयोग 6,दिनांक 2.01.1992 मधील 8.3(ब)नुसार एखादया निविदेतून कमी प्रतिसाद मिळाल्यास निविदा चौकशीला दोन वेळा मुदतवाढ दयावी असे नमूद आहे. तसेच प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्र निविदा किंवा कमीत कमी 3 वेळेस मागविणे आवश्यक होते. पंरतू एकच ई निविदा बोलावून पुरवठादार कमीत कमी 3 आहेत (प्रत्येक बाबीसाठी) हे पाहून तांत्रिक लिफाफा उघडणे शक्य होते. पंरतू काही बाबीसाठी पुरवठादार एक किंवा दोन असताना price bid का उघडण्यात आले पुन:श्च ई निविदा देवून व व्यापक खपाच्या वृत्तपत्रात जाहिरात देणे शक्य असताना पुरवठा आदेश कसे दिले. मनपाने उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार खरेदी प्रक्रीया राबविली नाही त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा मनपास झाला नसल्याचे दिसून येते.

2)पुरवठा धारकाने पुरवठा केलेल्या मालाचा नमूना घेवून शासकीय प्रयोगशाळेमार्फत स्वखर्चाने तपासणी करून अहवाल मनपा नाशिक कार्यालयास देणे आवश्यक असताना व नंतरच बील अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल परंतू सदरची बाब पाळली गेली नसल्याचे दिसून यते. तरी संबंधिताचे देयक अदा का केली याबाबत अनुपालन सादर करावे.

3)तुलनात्मक दर पत्रकावर समिती काही सदस्यांच्या स्वाक्षरी पहावयास मिळाल्या नाही.

4)निविदा अटी व शर्तीमधील 9 नुसार पुरवठादाराने ऑर्डरमध्ये नमूद वर्क ऑर्डर दिनांकापासून एक महिन्याच्या आत माल महानगरपालिका भांडार मध्ये पुरविला पाहिजे परंतू अल्फासायपर मेथ्रीन ऑर्डर 5 टक्के डब्लू.पी. चे खरेदी आदेश 3.3.2014 असताना पुरवठा दिनांक 23.4.2014 रोजी केल्याचे दिसून येते, त्यामुळे किमान 20 दिवस विलंब झाल्याचे दिसून यते. त्यामुळे प्रतिदिन रूपये 100 प्रमाणे 2000/- रकमेची दंडाची रक्कम वसूली केली नाही. तरी वसूली करणे आवश्यक आहे.

5)मा.सह संचालक व सहायक संचालक यांचेकडील मिळालेल्या प्राप्त औषधांची चलन पहावयास मिळाली नाही, त्यामुळे पुरवठा निश्चित किती झाला हे समजू शकले नाही.

6)अळीनाशक/किटकनाशक पुरवठादार रॉयल एन्टरप्रायजेस मुंबई, मे.केमेट वेटस ॲण्ड फलो अहमदाबाद यांचा करारनामा संचिकेत दिसून आला नाही. तसेच मे. श्रीराम अग्रो कॉरपोरेशन अमरावतील डायब्लू बे जुरॉन व बाय फेग्रीन या औषधांचे पुरवठादार असताना यांचा एकाच औषधाचा करारनामा पहावयास मिळाला. उपरोक्त बाबींचे अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आला.

120 डास नियंत्रणाकरिता पेस्ट कन्ट्रोल ठेका मंजूरीबाबत व नागरी हिवताप निर्मूलन अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी औषधी फरवाणी करणे कामातील अनियमिततेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 8

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत हिवताप निर्मूलन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी व डास नियंत्रणाकरिता पेस्ट कन्ट्रोल ठेका देण्यासाठी ई टेंडर निविदा बोलाविण्यात आल्या होत्या सदरची ई निविदा अंतिम करून वाटाघाटीनंतर सदरचा ठेका मे.एस एण्ड आर पेस्ट कन्ट्रोल नाशिक व मे. नेशन टेक्नोपेस्ट कन्ट्रोल नाशिक यांना विभागून देण्यात आला.

नाशिक महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत हिवताप निर्मूलन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी व डास नियंत्रणाकरिता पेस्ट कन्ट्रोल ठेका देण्यासाठी ई टेंडर निविदा बोलाविण्यात आल्या होत्या सदरची ई निविदा अंतिम करून वाटाघाटीनंतर सदरचा ठेका मे.एस एण्ड आर पेस्ट कन्ट्रोल नाशिक व मे. नेशन टेक्नोपेस्ट कन्ट्रोल नाशिक यांना विभागून देण्यात आला.

ई टेंडर ऑन लाईन विक्री दिनांक 6.9.2012 ते 26.9.2012

तांत्रिक निविदा - दिनांक 27.9.2012 दुपारी 3.00 वाजता

निविदा दर - दिनांक 27.9.2012 दुपारी 3.00 वाजता

निविदा उघडणे - दिनांक 27.9.2012 दुपारी 4.00 वाजता

ई निविदा जाहिरात - दैनिक गावकरी दिनांक 6.9.2012

- दैनिक सकाळ दिनांक 6.9.2012
- दैनिक सामना दिनांक 6.9.2012
- दैनिक महाराष्ट्र टाईम्स दिनांक 7.9.2012

कामाचा कार्यकाळ - दिनांक 01.11.2012 ते 1.10.2013

वाटाघाटीनंतरचे निविदा दर-

1) मे.एस एण्ड आर पेस्ट कन्ट्रोल नाशिक(पेस्ट कन्ट्रोलसाठी) 25 टक्के

2) मे. नेशन टेक्नोपेस्ट कन्ट्रोल नाशिक(पेस्ट कन्ट्रोलसाठी) 25 टक्के

3) मे.एस एण्ड आर पेस्ट कन्ट्रोल नाशिक(धुरफवारणीसाठी) 41 टक्के

कार्यादेश - मनपा नाशिक यांचे आदेश क्रमांक 1765/31.10.2012 रूपये 2,26,55,556/- याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) सदरील कामासाठी केवळ एक वेळेस ई निविदा बोलावण्यात आली महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक/भाखस/1088(2512)/उदयोग 6,दिनांक 2.01.1992 मधील 8.3 (ब) नुसार एखादया निविदेतून कमी प्रतिसाद मिळाल्यास निविदा चौकशीला दोन वेळा मुदतवाढ दयावी असे नमूद आहे.किमान 3 वेळेस ई निविदा देवून जे दर व निविदा येतील त्यामधून अंतिम करणे आवश्यक होते. त्यामुळे मनपाने वरील शासन निर्णयामधील तरतूदीनुसार प्रक्रीया राबविल्याचे दिसून आले नाही त्यामुळे सदरची कार्यवाही नियमबाहय ठरते. पुरवठादार एक व दोनच असताना पुरवठा आदेश कसे दिले याबाबत अनुपालन सादर करावे.

2)सर्वसाधारण अटी व शर्ती मधील 13 अन्वये निविदा धारकास जास्तीत जास्त दोन विभागाचा ठेका प्रदान करण्यात येईल असे असताना सदरच्या ठेक्यानुसार तीन तीन विभागाचा ठेका का देण्यात आला, मनपानेच अटी/शर्तीचे उल्लघन का केले ?

3) ठेकेदाराने कामगार वेतन भत्ते व सुरक्षा या कामगार कायाद्याचे पालन करणे बंधनकारक असताना त्यात मुख्यत: वेतन कायदा 1956, कंत्राटी कायदा 1970, कीमान वेतन कायदा 1949, कामगार भनिनि कायदा 1953 आणि त्यात वेळोवेळी होणाऱ्या सुधारणा नुसार पालन झाल्याचे दिसून आले नाही. किमान वेतन कायदा 1948 नुसार कामगारांना किमान वेतन अदा केल्याची खात्री विभागप्रमुख यांनी केल्याचे दिसून येत नाही, कंत्राटी कामगार (नियमन व निमुर्लन) अधिनियम 1970 मधील कलम 21 नुसार कामगारांना वेतन अदा करताना विभाग प्रमुख व त्यांचा प्रतिनिधी यांनी हजर राहून प्रत्यक्ष मजुरी दिल्याची खात्री करुन तसे प्रमाणित केले नाही. कलम 29 नुसार प्रत्येक कामगारांचे वय, तपशिल, त्याने केलेल्या कामाचे तास, स्वरुप, दिलेली मजुरी इत्यादीची विहीत नमुन्यातील नोंदवही ठेवली नसल्याचे दिसून आले.

4) मागील महिन्याचे भविष्य निर्वाह निधी व विमा रक्कम भरल्याची पावती चालू महिन्याच्या देयकासोबत जोडणे आवश्यक असून त्या शिवाय बिल मंजूर केले जाणार नाही असे असताना देखील सदरील नमूद केल्यानुसार कार्यवाही केल्याचे देयकावरुन दिसून आले नाही. तेंव्हा बील अदा करण्यास मंजुरी कशी दिली याबाबत अनुपालन सादर करावे.

5) ठेकेदाराने सर्व कामगारांना साक्षांकित केलेले फोटो, ओळखपत्र, पोशाख, हातमोजे व मास्क देणे आवश्यक आहे. परंतु वरील साहीत्य दिल्याची दिसून आले नाही किंवा अभिलेखे पाहावयास मिळालेले नाहीत.

6) ठेकेदाराने सर्व कामगारांचे बँकेमार्फत वेतन अदा करुन या कामी बँकेला देण्यात येणारे कर्मचारी निहाय वेतनाच्या विवरणाची एक प्रत प्रत्येक महिन्याला महानगरपालिकेस दिल्याचे दिसून आले नाही.

7) ठेकेदाराने प्रत्येक महिन्याला कामगारांची एकूण मंजुर सुट्टी व शिल्लक सुट्टी यांचा लेखा महानगरपालिकेस दिला असल्याचे दिसून आले नाही.

8) ठेकेदाराने फॉगींग मशिन्स प्रत्यक्ष कामकाजाच्या ठिकाणी ने-आण करणेकामी कमीत कमी तीन वाहने उपलब्ध करणे बंधनकारक असून यापैकी एक जरी वाहन दैनंदिन वेळेत उपलब्ध करुन न दिल्यास प्रतिवाहन / प्रतिदिन रक्कम रुपये 500/- दंड आकारण्यात येईल परंतु ठेकेदाराकडे किती फॉगींग मशिन्स कार्यरत आहेत याबाबत किंवा अन्य बाबीसंदर्भात माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

याशिवाय ठेकेदाराने कार्यरत कामगारांची हजेरी बायोमेट्रीक सिस्टीमने घेणे आवश्यक असताना तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याजवळ जीपीएस ट्रॅकिंग डीव्हाईस उपलब्ध करुन देणे आवश्यक असताना अशी यंत्रणा उपलब्ध केल्याचे दिसून आले नाही.

DATPDMM6101 (Ref No : 88, Hmm No : 124)

121 नाशिक महानगरपालिकेच्या विविध रुग्णालये, प्रसुतीगृहे, फिरता दवाखाना, आरोग्य केंद्रे व मोफत रोगनिदान शिबीरे या ठीकाणी येणाऱ्या रुग्णांवर औषध उपचार करणेकामी इंजेक्शन्स व इंजेक्शन्स (ARV, ASVS and I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे, विविध प्रकारचे सर्जिकल साहीत्य, व एक्स-रे फील्म्स व केमिकल्सची खरेदी जाहिर ई-निविदा मागवून करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 0

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या विविध रुग्णालये, प्रसुतिगृह व दवाखान्यात येणाऱ्या रूग्णांवर औषधोपचाराकामासाठी लागणारे इंजेक्शन्स व इंजेक्शन्स (ARV, ASVS and I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे, विविध प्रकारचे सर्जिकल साहीत्य, व एक्स–रे फील्म्स व केमिकल्सची सन 2013-14 या कालावधीत जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करताना निविदा प्रक्रीयेस बराच विलंब झाल्याने सन 2012-13 मधील दरानेच खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे काही औषधांच्या कमी किंमतीचा लाभ महानगरपालिकेस झालेला नाही. दि.02/01/1992 च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही तसेच शासकीय व निमशासकीय संस्थांना प्राधान्य देऊन त्यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असताना खाजगी पुरवठादारांकडून खरेदी करण्यात आलेली

आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या कालावधीतील वैदयकीय विभागाच्या निवडक बाबींचे लेखा परीक्षण केले असता नाशिक महानगरपालिकेच्या सर्व रूग्णालये, प्रसुतिगृहे, दवाखाने, फिरते दवाखाने, श.आ. सेवा केंद्रे, आर.सी.एच.केंद्रे. व मोफत रोग निदान शिबीरे इ. ठिकाणी येणाऱ्या रूग्णांवर औषधोपचाराकामासाठी लागणारी इंजेक्शन्स, इंजेक्शन्स (ARV, ASVS and I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे, सर्जिकल साहीत्य व एक्स-रे फील्म्स व केमिकल्स इत्यादी औषधे व साहीत्य जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करणेबाबतच्या नस्तींची पडताळणी केली असता सन 2013-2014 या कालावधीकरिता विविध औषधोपचारासाठी लागणारे औषधे व साहीत्य खरेदी करण्याकरीता निविदा प्रक्रीया राबविण्यात आली होती. त्यास खालील प्रमाणे मा.महासभा व मा.स्थायी समिती यांची मान्यता मिळालेली आहे.

अ.क्र.	विषय	मा.महासभा ठराव क्रमांक व दिनांक	मा.स्थायी समिती ठराव क्रमांक व दिनांक
1	इंजेक्शन्स खरेदी	918 / 04.01.2014	567 / 24.02.2015
2	इंजेक्शन्स (ARV, ASVS & I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे खरेदी	917 / 04.01.2014	568 / 24.02.2015
3	सर्जिकल साहीत्य खरेदी	922 / 04.01.2014	564 / 24.02.2015
4	एक्स-रे फील्म्स व केमिकल्स खरेदी	920 / 04.01.2014	908 / 31.03.2015

उपरोक्त प्रमाणे मा.स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यामुळे सदरच्या निविदा दराचा लाभ सन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये मिळालेला नाही. त्यामुळे सन 2012-13 मध्ये मंजुर झालेल्या निविदेतील दरानेच औषधे व इतर साहीत्यांची खरेदी करण्यात आलेली आहे.

अ) इंजेक्शन्स खरेदीचा तपशिल -

अ.क्र	बील क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठादाराचे नाव
1	4, दि. 10/4/13	6038	स्थायी आ.क्र.1717,दि.30/12/11	मे.अस्टीन हेल्थ केअर
2	41, दि. 3/7/13	45000	स्थायी आ.क्र.1717,दि.30/12/11	मे.राहूल एन्टरप्रायजेस
3	42, दि. 3/7/13	11712	स्थायी आ.क्र.1717,दि. 30/12/11	मे.गेटवेल डिस्टीब्युटर्स
4	47, दि. 20/7/13	197428	मा.आ.आदेश क्र.1015,दि. 3/12/12	मे.गेटवेल डिस्टीब्युटर्स
5	51, दि. 20/7/13	198243	मा.आ.आदेश क्र.1015,दि 03/12/12	मे.पी. एस. फार्मा

6	57, दि. 20/7/13	5001	मा.आ.आदेश क्र.615,दि. 16/10/12	मे.पी. एस. फार्मा
7	71, दि. 24/08/13	935212	स्थायी आ.क्र.731,दि. 18/02/13	मे.राहूल एन्टरप्रायजेस
8	77, दि. 24/08/13	1000988	स्थायी आ.क्र.731,दि. 22/02/13	मे.श्री.स्वामी समर्थ
9	81 दि. 24/08/13	68257	स्थायी आ.क्र.731,दि. 22/02/13	मे.मातोश्री डीस्ट्रीब्युटर्स
10	85 दि. 24/08/13	368447	स्थायी आ.क्र.731,दि. 22/02/13	मे.गेटवेल डिस्टीब्युटर्स
11	89 दि. 10/09/13	262171	स्थायी आ.क्र.731,दि. 18/07/13	मे.गेटवेल डिस्टीब्युटर्स
12	97 दि. 10/09/13	778756	स्थायी आ.क्र.731,दि. 18/03/13	मे.मातोश्री डीस्ट्रीब्युटर्स
13	99 दि. 10/09/13	109838	स्थायी आ.क्र.731,दि. 22/03/13	मे.अस्टीन हेल्थ केअर
14	109 दि. 23/09/13	255212	स्थायी आ.क्र.731,दि. 22/02/13	मे.श्री.स्वामी समर्थ
15	115 दि. 23/09/13	49556	मा.आ.आदेश क्र.2563,दि 25/02/12	मे.अस्टीन हेल्थ केअर
16	116 दि. 23/09/13	55250	स्थायी आ.क्र.798,दि. 22/02/13	मे.ए.पी. डिस्ट्रीब्युटर्स
17	117 दि. 23/09/13	407283	स्थायी आ.क्र.791,दि. 22/02/13	मे.गेटवेल डिस्टीब्युटर्स
18	136, दि. 1/10/13	45045	स्थायी आ.क्र.731,दि. 22/02/13	मे.गेटवेल डिस्टीब्युटर्स

ब) इंजेक्शन्स (ARV, ASVS & I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे खरेदी तपशिल -

अ.क्र	बील क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठादाराचे नाव
1	7, दिनांक 10/4/13	147950	मा.आ.आदेश क्र.673, दि.16/10/12	मे.सागर मेडीकल
2	8, दिनांक 10/4/13	136675	स्थायी आ.क्र.70,दिनांक 28/4/11 व मा.आ.आ.क्र.2420,दिनांक 11/1/12	मे.सागर मेडीकल
3	10, दि. 10/4/13	41100	स्थायी आ.क्र.1745,दिनांक 30/12/11	मे.सागर मेडीकल
4	17, दि. 15/5/13	60465	मा.आ.आदेश क्र.1394, दि. 15/2/13	मे.हफकीन बायोफार्मा
5	34, दि. 4/6/13	850282	मा.आ.आदेश क्र.1427,दि. 21/2/13	मे.सागर मेडीकल
6	32, दि. 31/5/13	12938	स्थायी आ.क्र.1445,दिनांक 30/12/12	मे.सागर मेडीकल

7	40, दि. 3/7/13	824175	स्थायी आ.क्र.799,दिनांक 22/2/13	मे.राहूल एन्टरप्रायजेस
8	43, दि. 3/7/13	577000	स्थायी आ.क्र.799,दिनांक 22/2/13	मे.सागर मेडीकल
9	49, दि. 20/7/13	35200	स्थायी आ.क्र.1745,दिनांक 30/12/11	मे.सागर मेडीकल
10	69, दि. 13/08/13	649235	मा.आ.आदेश क्र.1427, दि. 21/02/13	मे.अशोका डिस्ट्रीब्युटर्स
11	74, दि. 24/08/13	645375	स्थायी आ.क्र.799,दिनांक 22/02/13	मे.सागर मेडीकल
12	79, दि. 24/08/13	223009	स्थायी आ.क्र.799,दिनांक 22/02/13	मे.श्री.स्वामी समर्थ
13	80 दि. 24/08/13	155438	स्थायी आ.क्र.799,दिनांक 22/02/13	मे.मातोश्री डीस्ट्रीब्युटर्स
14	87 दि. 24/08/13	143350	स्थायी आ.क्र.799,दिनांक 22/02/13	मे.अशोका डिस्ट्रीब्युटर्स
15	90 दि. 10/09/13	124575	स्थायी आ.क्र.799,दिनांक 22/02/13	मे.राहूल एन्टरप्रायजेस
16	103 दि. 10/09/13	197276	स्थायी आ.क्र.799,दिनांक 22/02/13	मे.सागर मेडीकल
17	131, दि. 1/10/13	400971	स्थायी आ.क्र.799,दिनांक 22/02/13	मे.स्वामी समर्थ
18	134, दि. 1/10/13	271525	स्थायी आ.क्र.799,दिनांक 22/02/13	मे.अशोका डिस्ट्रीब्युटर्स
19	135, दि. 1/10/13	466675	स्थायी आ.क्र.809,दिनांक 10/02/13	मे.राहूल एन्टरप्रायजेस

क) सर्जिकल साहीत्य खरेदीचा तपशिल -

अक्र	बील क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठादाराचे नाव
1	3, दिनांक 10/4/13	54700	स्थायी आ.क्र.1718, दि.30/12/11	मे.अस्टीन हेल्थ केअर
2	5, दिनांक 10/4/13	39508	स्थायी आ.क्र.1718, दि. 30/12/11	मे.सागर मेडीकल
3	6, दिनांक 10/4/13	29960	मा.आ.आदेश क्र.674,दि.16/10/12	मे.सागर मेडीकल
4	9, दिनांक 10/4/13	23805	स्थायी आ.क्र.1718,दि.30/12/11	मे.सागर मेडीकल
5	48, दिनांक 20/7/13	82500	मा.आ.आदेश क्र.674,दि.16/10/12	मे.सागर मेडीकल
6	70, दिनांक 13/08/13	57000	स्थायी आ.क्र.798, दि.22/02/13	मे.ए.पी. डिस्ट्रीब्युटर्स
7	75, दिनांक 24/08/13	565625	स्थायी आ.क्र.730, दि.18/02/13	मे.सागर मेडीकल

8	84 दिनांक 24/08/13	342255	स्थायी आ.क्र.730, दि.18/12/13	मे.प्लास्टी सर्जिकल इंडिया
9	88 दिनांक 19/10/13	41000	स्थायी आ.क्र.798, दि.22/02/13	मे.अे.पी. डिस्ट्रीब्युटर्स
10	92 दिनांक 10/09/13	1211073	स्थायी आ.क्र.730, दि.18/02/13	मे.अशोका डिस्ट्रीब्युटर्स
11	93 दिनांक 10/09/13	81750	स्थायी आ.क्र.730, दि.18/02/13	मे.रिषभ टेडींग
12	98 दिनांक 10/09/13	1218006	स्थायी आ.क्र.730,दि.18/02/13	मे.मातोश्री डीस्ट्रीब्युटर्स
13	100 दि. 10/09/13	92000	स्थायी आ.क्र.730, दि.18/02/13	मे.अस्टीन हेल्थ केअर
14	105 दि.10/09/13	1100987	स्थायी आ.क्र.730,दि.18/02/13	मे.सागर मेडीकल
15	113 दि. 23/09/13	50500	स्थायी आ.क्र.674, दि. 16/10/12	मे.अशोका डिस्ट्रीब्युटर्स
16	114 दि. 23/09/13	30802	स्थायी आ.क्र.730, दि.18/02/13	मे.अशोका डिस्ट्रीब्युटर्स
17	129 दि. 01/10/13	32638	स्थायी आ.क्र.730, दि.18/02/13	मे.सागर मेडीकल
18	132, दिनांक 1/10/13	202655	स्थायी आ.क्र.730,दि. 22/02/13	मे.मातोश्री डीस्ट्रीब्युटर्स
19	137, दिनांक 1/10/13	1281731	स्थायी आ.क्र.799, दि. 22/03/13	मे.सागर मेडीकल

ड) एक्स-रे फील्म्स व केमिकल्स खरेदीचा तपशिल -

अ.क्र	बील क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र.व दिनांक	पुरवठादाराचे नाव
1	35, दि. 12/06/13	521700	मा.आ.आदेश क्र.1665,दि. 22/3/13	मे.एस अॅण्ड सी असोशिएटस
2	76, दि. 24/08/13	1219943	मा.आ.आदेश क्र.1665,दि. 22/03/13	मे.सागर मेडीकल
3	104 दि. 10/09/13	176190	मा.आ.आदेश क्र.1665,दि. 22/03/13	मे.सागर मेडीकल

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सन 2013-2014 या कालावधीकरीता विविध औषधोपचारासाठी लागणारे इंजेक्शन्स, इंजेक्शन्स (ARV, ASVS and I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे, सर्जिकल साहीत्य व एक्स-रे फील्म्स व केमिकल्स इत्यादी औषधे व साहीत्यांची खरेदी करण्याकरीता निविदा प्रक्रीया राबविण्यात आली असता मा.स्थायी समितीची मंजुरी विलंबाने मिळाल्यामुळे सदरच्या निविदेतील दराचा लाभ सन 2013-14 मध्ये मिळालेला नाही. त्यामुळे सन 2012-13

मध्ये मंजुर झालेल्या निविदेतील दरानेच खरेदी करण्यात आलेली आहे. सन 2012-13 च्या मंजूर दराने इंजेक्शन्स स्वरुपातील औषधे, इंजेक्शन्स, सर्जिकल साहीत्य व एक्स-रे फील्म्स व केमिकल्स खरेदी केल्यामुळे ज्या औषधांची व साहीत्यांची किंमती कमी झाल्या आहेत. त्यांचा फायदा महानगरपालिकेस मिळू शकलेला नाही.

2) उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/2512/उदयोग-6, दि.02/01/1992 च्या शासन निर्णयातील परिशिष्ठ सात नुसार पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते मुळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या अवधीतच देण्यात यावे असे स्पष्ट असताना सन 2012-13 चे निविदेतील दराने सन 2013-14 मध्ये खरेदी करण्यात आलेली आहे.

3) वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांक डिपीआर-2003/सीआर-373/प्रशासन दि.08/09/2009 नुसार हाफकीन जीव औषधी निर्माण महामंडळ मर्यादीत, मुंबई व अजिंठा फार्मासिटीकल्स, जळगांव या शासन अंगीकृत उपक्रमाने उत्पादीत केलेली औषधी व इतर उत्पादने निविदा पध्दतीने खरेदी न करता विकत घ्यावी असा निर्णय घेण्यात आला असून त्यात वेळोवेळी मुदत वाढही देण्यात आली आहे.

हाफकीन जीव औषधे निर्माण महामंडळ मर्यादीत मुंबई व अजिंठा फार्मासिटीकल्स, जळगांव हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असल्याने तसेच हिदुस्तान अँटीबायोटिक्स लिमिटेड पुणे ही केंद्र शासनाची अंगीकृत कंपनी असल्याने त्यांच्या विविध प्रकारच्या औषध निर्मीतीस प्रोत्साहान देणे खरेदी प्रक्रीयेतील क्लिस्टता व विलंब टाळण्याच्या दृष्टीने व औषधे पुरवठयामधील फसवणुक टाळण्याच्या उद्देशाने मक्तेदारी असलेल्या संस्थेच्या गरजेच्या 75 टक्के औषधी व मक्तेदारी नसलेली गरजेच्या 37.5 टक्के औषधी प्राधान्याने वरील संस्थेकडून खरेदी करणे दिनांक.08/09/2009 नुसार बंधनकारक केले आहे. परंतु महानगरपालिकेने खाजगी पुरवठादारांकडून निविदा पध्दतीने खरेदी केली आहेत. वरील संस्थेकडून पुरवठा करणे शक्य नसल्यास मागणीपत्र मिळाल्यापासून 8 ते 10 दिवसांत संबंधित मागणी करणाऱ्या संस्थेस कळविणे आवश्यक असून त्यानंतरच अप्राप्त औषधी उपलब्ध करण्यासाठी शासकीय संस्था, केंद्रिय कामगार विमा योजनेच्या व बृहमुंबई महानगरपालिकेच्या दर संहितेचा वापर करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे महानगरपालिकेने कार्यवाही न केल्यामुळे शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही व खाजगी पुरवठादारांकडून खरेदीपोटी जादा रक्कम दयावी लागल्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदरबाबत अर्धसमास पत्र क्रमांक - 171, 172, 173 व 174 दिनांक - 08/11/2016 अन्वये विचारणा करण्यात आली असता त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

FDSRKNM8201 (Ref No : 119, Hmm No : 171)

122 नाशिक महानगरपालिकेच्या सर्व दवाखान्यांसाठी लागणारे सुचर मटेरीयल जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या सर्व दवाखाने, रुग्णालये व प्रसुतिगृह येथील रुग्णांवर औषधोपचारासाठी लागणारे आवश्यक सुचर मटेरीयल खरेदी करताना शासन निर्णय दिनांक 02/01/1992 व दिनांक 04/02/2003 मधील तरतूदी मधील शासनाच्या दर करारानुसार व शासनाचे दरकरार अस्तित्वात असल्याची खात्री न करता खुल्या बाजारातून जाहिर निविदा मागवून खरेदी केलेली आहे त्यामुळे विहित केलेल्या खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या कालावधीतील वैदयकीय विभागाच्या निवडक बाबींचे लेखा परीक्षण केले असता नाशिक महानगरपालिकेच्या सर्व रूग्णालये, प्रसुतिगृहे, दवाखाने, फिरते दवाखाने, श.आ. सेवा केंद्रे, आर.सी.एच.केंद्रे. व मोफत रोग निदान शिबीरे इ. ठिकाणी येणाऱ्या रूग्णांवर औषधोपचाराकामासाठी लागणारे सुचर मटेरीयल जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करणेबाबत नस्तीची पडताळणी केली असता सन 2013-2014 मध्ये काही कालावधीसाठी मा.आयुक्त आदेश क्रमांक 120 दिनांक 02/06/2012 तसेच उर्वरित कालावधीसाठी मा.महासभा पारित ठराव क्रमांक 140 दिनांक 24/08/2012 अन्वये रक्कम रू.20 लक्ष ची विविध सुचर मटेरीयल खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याने जाहिर ई-निविदा प्रक्रीया राबवून न्युनतम पुरवठादारांकडून मा.आयुक्त आदेश क्र.1664 दिनांक 22/3/2013 अन्वये औषधे खरेदी व उपकरणे देखभाल दुरूस्ती या सदरातून अदा करणेबाबत मंजूरी देण्यात आली आहे. सदर सुचर मटेरीयल खरेदीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	देयक क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठादाराचे नाव
1	18, दि. 24/5/13	34280	मा.आ.आदेश क्र.120, दि 02/06/12	मे.रिषभ टेडींग
2	19, दि. 24/5/13	499943	मा.आ.आदेश क्र.120, दि. 02/06/12	मे.रिषभ टेडींग
3	82 दि. 24/08/13	708013	मा.आ.आदेश क्र.1664, दि.22/03/13	मे.मातोश्री डीस्ट्रीब्युटर्स
4	86 दि. 24/08/13	581937	मा.आ.आदेश क्र.1664, दि.22/03/13	मे.गेटवेल डिस्टीब्युटर्स
5	91 दि. 10/09/13	296509	मा.आ.आदेश क्र.1664, दि 22/03/13	मे.अशोका डिस्ट्रीब्युटर्स
6	94 दि. 19/10/13	364018	मा.आ.आदेश क्र.1664, दि 22/03/13	मे.रिषभ टेडींग

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/2512/उदयोग-6,दिनांक 02/01/1992 व

शासन निर्णय क्र.भाखंस-2002/2990/उदयोग-6,दिनांक 04/02/2003 नुसार शासनाच्या दर करारानुसार खरेदी करणे आवश्यक असताना जाहिर निविदा प्रक्रीया दवारे प्राप्त झालेल्या न्युनतम दराने खरेदी केली आहे. त्यामुळे विहित केलेल्या भांडार खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब झाल्याचे दिसून येत नाही.

2) बील क्रमांक 82 दिनांक 24/08/2013 मध्ये मे.मातोश्री डिस्ट्रीब्युशन यांचा रक्कम रू. 354499/- एवढया रकमेचा REQUISITION ORDER AND DATE 240/158 दिनांक 25/03/2013 असा नमूद आहे परंतू पुरवठादाराचे देयक क्र.1032 दिनांक 05/03/2013 रोजीचे आहे. सदर बाबत पुरवठा आदेश मिळण्यापूर्वीच पुरवठादाराने पुरवठा केल्याचे प्रमाणाकावरून दिसून येते. सदरची बाब नियमबाहय आहे.

DGPVJTM8301 (Ref No : 126, Hmm No : 169)

123 नाशिक महानगरपालिकेच्या सर्व दवाखान्यांसाठी लागणारे सिरप, लिक्वीड, टॅबलेट व कॅप्सुल स्वरूपातील औषधे जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या विविध रुग्णालये, प्रसुतिगृह व दवाखान्यात येणाऱ्या रूग्णांवर औषधोपचाराकामासाठी लागणारे सिरप, लिक्वीड, टॅबलेट व कॅप्सुल स्वरुपातील औषधे सन 2013-14 या कालावधीत जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करताना दि.02/01/1992 च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही तसेच शासकीय व निमशासकीय संस्थांना प्राधान्य देऊन त्यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असताना खाजगी पुरवठादारांकडून खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे काही औषधांच्या कमी किंमतीचा लाभ महानगरपालिकेस झालेला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या कालावधीतील वैदयकीय विभागाच्या निवडक बाबींचे लेखा परिक्षण केले असता नाशिक महानगरपालिकेच्या सर्व रूग्णालये, प्रसुतिगृहे, दवाखाने, फिरते दवाखाने, श.आ.सेवा केंद्रे, आर.सी.एच.केंद्रे. व मोफत रोग निदान शिबीरे इ. ठिकाणी येणाऱ्या रूग्णांवर औषधोपचारा कामासाठी लागणारे सिरप व लिक्वीड स्वरूपातील औषधे खरेदी करण्यासाठी मा.महासभा ठराव क्रमांक 798 दिनांक - 24.08.2012 व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक - 798, दिनांक - 22/02/2013 अन्वये तसेच टॅबलेट व कॅप्सुल स्वरुपातील औषधे खरेदी करण्यासाठी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक - 800 दिनांक - 22/02/2013 अन्वये

जाहिर ई-निविदा प्रक्रीया राबवून न्युनतम दराने पुरवठादारांकडून तसेच पुढील वर्षाचे जाहिर ई-निविदा दर मंजूर होईपर्यत औषधे खरेदी व उपकरणे देखभाल दुरूस्ती या सदरातून अदा करणेबाबत मंजूरी देण्यात आली आहे.

1) सिरप, लिक्वीड स्वरूपातील औषधे खरेदी तपशिल -

अ.क्र	देयक क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठादाराचे नाव
1	1, दि. 10/4/13	63586	स्थायी आ.क्र.1673,दि. 23/12/11	मे.अस्टीन हेल्थ केअर
2	31, दि. 31/5/13	230189	स्थायी आ.क्र.1672,दि. 23/12/11	मे.पी. एस. फार्मा
3	44, दि. 3/7/13	23892	स्थायी आ.क्र.1673,दि. 23/12/11	मे.पी. एस. फार्मा
4	50, दि. 20/7/13	29056	मा.आ.आदेश क्र.2465,दि.31/1/12	मे.पी. एस. फार्मा
5	52, दि. 20/7/13	10856	स्थायी आ.क्र.1717,दि. 30/12/11	मे.पी. एस. फार्मा
6	55, दि. 20/7/13	584069	स्थायी आ.क्र.1613, दि. 30/03/12	मे.पी. एस. फार्मा
7	73, दि. 24/08/13	353100	स्थायी आ.क्र.798, दि. 22/02/13	मे.पी. एस. फार्मा
8	83 दि. 24/08/13	132500	स्थायी आ.क्र.798, दि. 22/02/13	मे.मातोश्री डीस्ट्रीब्युटर्स
9	95 दि. 19/10/13	147350	स्थायी आ.क्र.798, दि. 22/02/13	मे.रिषभ टेडींग
10	102 दि.10/09/13	128629	स्थायी आ.क्र.798, दि. 22/03/13	मे.अस्टीन हेल्थ केअर
11	107 दि.10/09/13	1161005	स्थायी आ.क्र.798, दि. 22/02/13	मे.पी. एस. फार्मा
12	111 दि.23/09/13	237650	स्थायी आ.क्र.798, दि. 22/03/13	मे.श्री.स्वामी समर्थ
13	120 दि.23/09/13	1973728	स्थायी आ.क्र.798, दि. 22/02/13	मे.पी. एस. फार्मा
14	127 दि.01/10/13	400298	स्थायी आ.क्र.798, दि. 22/02/13	मे.पी. एस. फार्मा
15	128 दि.01/10/13	100506	स्थायी आ.क्र.798, दि. 22/02/13	मे.रिषभ टेडींग
16	130 दि.01/10/13	108950	स्थायी आ.क्र.798, दि. 22/02/13	मे.गेटवेल डिस्टीब्युटर्स
17	133, दि.01/10/13	61380	स्थायी आ.क्र.798, दि. 22/02/13	मे.अस्टीन हेल्थ केअर

2) टॅबलेट व कॅप्सुल स्वरूपातील औषधे खरेदी तपशिल -

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठादाराचे नाव

1	1702, दिनांक 23/5/13	61280	1716, दिनांक 30/12/2011	मे.अस्टीन हेल्थ केअर
2	5993, दिनांक 16/09/13	130659	675, दिनांक 16/10/2012	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
3	5986, दिनांक 16/9/13	1483315	1661,दिनांक 22/3/2013	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
4	5996, दिनांक 16/9/13	15750	1889,दिनांक 1/12/2011	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
5	5990,दिनांक 16/09/13	76553	1716,दिनांक 30/12/2011	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
6	5994,दिनांक 16/09/13	1613	2563,दिनांक 27/2/2012	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
7	8894,दिनांक 29/10/13	87250	1716,दिनांक 30/12/2011	मे.केप्स फार्मा, मुंबई
8	10038,दिनांक 18/11/13	95339	1716,दिनांक 30/12/2011	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
9	9686,दिनांक 1/11/13	1038855	800,दिनांक 22/2/2013	मे.श्रीस्वामी समर्थ एन्टरप्रायजेस, नाशिक
10	10035,दिनांक 18/11/13	69899	800,दिनांक 22/2/2013	मे.अस्टीन हेल्थ केअर
11	9689,दिनांक 1/11/2013	1067224	800,दिनांक 22/2/2013	---------
12	9686,दिनांक 01/11/13	785164	800,दिनांक 22/2/2013	मे.श्रीस्वामी समर्थ एन्टरप्रायजेस,नाशिक
13	9729,दिनांक 01/11/13	114775	800,दिनांक 22/2/2013	मे.अस्टीन हेल्थ केअर
14	10036,दिनांक 18/11/13	2224	2593,दिनांक 24/2/2012	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
15	9690,दिनांक 1/11/2013	762273	800,दिनांक 22/2/2013	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
16	10037,दिनांक 01/11/13	43800	1522,दिनांक 13/12/2010	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
17	10234,दिनांक 01/11/13	236683	800,दिनांक 22/2/2013	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
18	2602,दिनांक 05/08/14	2734775	800,दिनांक 22/2/2013	मे.पी.एस.फार्मा, नाशिक
19	365,दिनांक 05/05/14	451516	800,दिनांक 22/2/2013	मे.श्रीस्वामी समर्थ एन्टरप्रायजेस,नाशिक
20	369,दिनांक 03/05/14	220067	800,दिनांक 22/2/2013	मे.अस्टीन हेल्थ केअर

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/2512/उदयोग-6,दिनांक 02/01/1992 व शासन निर्णय क्र.भाखंस-2002/2990/उदयोग-6,दिनांक 04/02/2003 नुसार शासनाच्या दर करारानुसार खरेदी करणे आवश्यक असताना जाहिर निविदा प्रक्रीया दवारे प्राप्त झालेल्या न्युनतम दराने खरेदी केली आहे. त्यामुळे विहित केलेल्या भांडार खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब झाल्याचे दिसून येत नाही.

2) वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांक डिपीआर-2003/सीआर-373/प्रशासन दि.08/09/2009 नुसार हाफकीन जीव औषधी निर्माण महामंडळ मर्यादीत, मुंबई व अजिंठा फार्मासिटीकल्स, जळगांव या शासन अंगीकृत उपक्रमाने उत्पादीत केलेली औषधी व इतर उत्पादने निविदा पध्दतीने खरेदी न करता विकत घ्यावी असा निर्णय घेण्यात आला असून त्यात वेळोवेळी मुदत वाढही देण्यात आली आहे.

हाफकीन जीव औषधे निर्माण महामंडळ मर्यादीत मुंबई व अजिंठा फार्मासिटीकल्स, जळगांव हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असल्याने तसेच हिदुस्तान अँटीबायोटिक्स लिमिटेड पुणे ही केंद्र शासनाची अंगीकृत कंपनी असल्याने त्यांच्या विविध प्रकारच्या औषध निर्मीतीस प्रोत्साहान देणे खरेदी प्रक्रीयेतील क्लिस्टता व विलंब टाळण्याच्या दृष्टीने व औषधे पुरवठयामधील फसवणुक टाळण्याच्या उद्देशाने मक्तेदारी असलेल्या संस्थेच्या गरजेच्या 75 टक्के औषधी व मक्तेदारी नसलेली गरजेच्या 37.5 टक्के औषधी प्राधान्याने वरील संस्थेकडून खरेदी करणे दिनांक.08/09/2009 नुसार बंधनकारक केले आहे. परंतु महानगरपालिकेने खाजगी पुरवठादारांकडून निविदा पध्दतीने खरेदी केली आहेत. वरील संस्थेकडून पुरवठा करणे शक्य नसल्यास मागणीपत्र मिळाल्यापासून 8 ते 10 दिवसांत संबंधित मागणी करणाऱ्या संस्थेस कळविणे आवश्यक असून त्यानंतरच अप्राप्त औषधी उपलब्ध करण्यासाठी शासकीय संस्था, केंद्रिय कामगार विमा योजनेच्या व बृहमुंबई महानगरपालिकेच्या दर संहितेचा वापर करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे महानगरपालिकेने कार्यवाही न केल्यामुळे शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही व खाजगी पुरवठादारांकडून खरेदीपोटी जादा रक्कम दयावी लागल्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदरबाबत अर्धसमास पत्र क्रमांक - 168 व 170 दिनांक - 07/11/2016 अन्वये विचारणा करण्यात आली असता त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

DGPVJTM8301 (Ref No : 127, Hmm No : 168)

124 एस अंड आर पेस्ट कंट्रोलच्या ठेक्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 4

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

आरोग्य वैद्यकीय अधीकारी नशिक यांचे मे.एस अंड आर पेस्ट कंट्रोल सर्वीसेस - 2 नाशीक यांना धूर फवारणी कामकाज संपुष्टात आणणे बाबतचे पत्र क्रमांक 704/दि.07.5.2013 अन्वये संबंधीत ठेकेदार मनपा आदेश क्र.1765/ दि.31.10.2012 अन्वये धूर फवारणीचे काम देण्यात आले होते. तरी संबधीत ठेकेदारा विरुध्द प्रशासकिय कार्यवाही म्हणून मनपा हददीतीत दि 07.05.2013 पासून आपली धूर फवारणीची उर्वरीत सेवा संपूष्टात आणून दंड म्हणून आपली सुरक्षा अनामत जप्त केल्याचे नमुद केले आहे.

ठेकेदार एस अंड आर पेस्ट कंट्रोल सर्वीसेस नाशीक यांचे पेस्ट कंट्रोल यांचे 5 कर्मचारी विरुदध भद्रकाली पोलीस स्टेशन नं. गु.र.नं.140/2013 भादवि 408, 34 प्रमाणे दि.03.05.2013 रोजी रात्री 10.30 वा. चोरी प्रकरणी गुन्हा नोंदवीण्यात आला.

7 लहान हॅण्ड फॉगींग मशीन औषध मिश्रीत डिझेल व पेट्रोल भरुन धूर फवारणी करीता देण्यात आले होते. तसेच MH 15 Z 6195 या वाहनांत 4 लहान हॅण्डफॉंगीग मशीन औषध मिश्रीत डिझेल व 11 लिटर पेट्रोल धूर फवारणी करीता मलेरीया गोडावून व्दारका येथून सांय. 06.30 वा. पाठवीण्यात आले होते. रात्री 08.45 वाजता दरम्यान भद्रकाली पोलीस निरीक्षक यांनी कन्नमवार पुल येथील सदर हँड फॉगींग मशीन मधुन डिझेल चोरी करतांना संबंधीतास पकडले.

आरोग्य वैद्यकीय अधीकारी नशिक यांचे मे.एस अंड आर पेस्ट कंट्रोल सर्वीसेस - 2 नाशीक यांना धूर फवारणी कामकाज संपुष्टात आणणे बाबतचे पत्र क्रमांक 704/दि.07.5.2013 अन्वये संबंधीत ठेकेदार मनपा आदेश क्र.1765/ दि.31.10.2012 अन्वये धूर फवारणीचे काम देण्यात आले होते. तरी संबधीत ठेकेदारा विरुध्द प्रशासकिय कार्यवाही म्हणून मनपा हददीतीत दि 07.05.2013 पासून आपली धूर फवारणीची उर्वरीत सेवा संपूष्टात आणून दंड म्हणून आपली सुरक्षा अनामत जप्त केल्याचे नमुद केले आहे. यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1.संबधीत ठेकेदाराची सुरक्षा अनामत जप्त केल्याची अभीलेखे लेखापरीक्षणात पहावयास मिळाली नाहीत.

2.संबंधीत ठेकेदाराचा ठेका दि 07.05.2013 पासून रद करण्यात आला असल्याचे नमुद असतांना संबंधीत ठेका चालु असल्याचे नमुद आहे परंतु सदरचा ठेका रदद निश्चीत कोणत्या तारखेपासुन रदद करण्यात आला ? त्याची सुरक्षा अनामत जप्त करुन व इतर देयके रदद करुन त्याचे नांव काळया यादीत टाकणे आवश्यक आहे.

3.संबंधीत ठेकेदाराकडुन हँड फॉगींग मशीन व इतर साहीत्य प्राप्त केल्याचे निदर्शनास आले नाही.

4.पेस्ट कंट्रोलचा नवीन ठेका अन्य ठेकेदारास दिला आसल्याचे अभीलेखे / कार्यवाही दिसून आले नाही याबाबत त्वरीत अनुपालन सादर करावेत.

125 नाशिक महानगरपालिका हददीतील घरोघरचा व रस्त्याच्याकडेचा केरकचरा वाहनादवारे संकलित करून पाथर्डी स्थित खतप्रकल्पावर वाहतूक करणेबाबतच्या खर्चाबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 13

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिका क्षेत्राचे हददीतील घरोघरचा व रस्त्याच्या कडेचा केरकचरा मनपा मालकीचे घंटागाडीचे वाहनदवारे व ठेकेदाराकडील आवश्यकतेनुसार नेमन्यात येणारी खाजगी वाहनादवारे सन 2013-2014 मध्ये कामाचा आदेश दिल्यापासून पुढील दोन वर्षाकरीता संकलित करून मनपा खत प्रकल्पावर वाहतूक करण्याकरिता घंटागाडी ठेकेदार नेमण्याकरिता जाहिर निविदा दर मागविले असून त्याबाबतचा परिच्छेद पुढील प्रमाणे आहे.

नाशिक महानगरपालिका क्षेत्राचे हददीतील घरोघरचा व रस्त्याच्या कडेचा केरकचरा मनपा मालकीचे घंटागाडीचे वाहनदवारे व ठेकेदाराकडील आवश्यकतेनुसार नेमन्यात येणारी खाजगी वाहनादवारे सन 2013-2014 मध्ये कामाचा आदेश दिल्यापासून पुढील दोन वर्षाकरीता संकलित करून मनपा खत प्रकल्पावर वाहतूक करण्याकरिता घंटागाडी ठेकेदार नेमण्याकरिता जाहिर निविदा दर मागविले असून त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1	प्रशासकीय मंजूरी	महसभा ठराव क्र.334 दिनांक 14.12.2012 रू.11,00,00,000/-
2	वित्तीय मंजूरी	स्थायी समिती ठराव क्र.162 दिनांक 10.6.2013 अन्वये 2013-2014 व 2014-2015 खर्चास मंजूरी देण्यात आली.
3	कामाचा कालावधी	दिनांक 8.7.2013 ते 7.7.2015

ठेकेदार, मंजूर दर व कामाचे आदेश खालीलप्रमाणे.

अ.क्र.	विभाग	ठेकेदाराचे नाव	मंजूरी दर (प्रतिटन)	कामाचे आदेश
1	नाशिक पूर्व	सय्य्द आसिफ अली, नाशिक	1352/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1173, दि.4.7.13

2	नाशिक (प)	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	1251/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1174, दि.4.7.13
3	नाशिक रोड	विशाल सर्विसेस नाशिक	1335/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1175, दि.4.7.13
4	सिडको	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	1161/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1176, दि.4.7.13
5	सातपूर	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	1314/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1177, दि.4.7.13
6	पंचवटी	समिक्षा कन्स्ट्रक्शनस ठाणे	1314/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1172, दि.4.7.13

मनपा घंटागाडी वाहन वापराकामी प्रति वाहन रूपये 8,000/- मासिक भाडे आकारण्यात आले.

लेखाशिर्ष :- केरकचरा वाहतूक

केरकचरा वाहतूकीवर झालेला खर्च सन 2013-2014

अ.क्र.	विभाग	ठेकेदाराचे नाव	करारनामा दिनांक	खर्च रक्कम	एकूण केरकचरा संकलन मे.टन
1	नाशिक पूर्व	सय्य्द आसिफ अली, नाशिक	17.6.2013	24966517	26015 मे.टन
2	पंचवटी	समिक्षा कन्स्ट्रक्शनस ठाणे	17.6.2013	21559762	23282 मे.टन
3	नाशिक रोड	विशाल सर्विसेस नाशिक	17.6.2013	23855788	24676 मे.टन
4	नाशिक (प)	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	दिसून आला नाही	13268692	15017 मे.टन
5	सिडको	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	18.6.2013	18291150	22195 मे.टन
6	सातपूर	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	18.6.2013	13380619	14203 मे.टन

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1)सन 2013-2014 या आर्थिक वर्षात केरकचरा वाहतूकीवर रूपये 115322528/- एवढा खर्च केला असून एकूण 125389 मे.टन एवढा कचरा वाहनादवारे गोळा करण्यात आला आहे. कचरा वाहतूक करणा-या वाहनांच्या इलेक्ट्रॉनिक्स वजन काटाच्या पावत्या व त्यामध्ये दर्शविण्यात आलेले वजन व त्यातून वजा करण्यात आलेले मातीचे वजन बरोबर असल्याचे प्रमाणित करून देयकासोबत जोडलेले नाही. कचरा खाजगी वाहनादवारे गोळा करण्यापूर्वी वाहन निहाय पूर्व परवानगी घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

2)कचरा वाहनाचे वजन करताना त्यामध्ये बांधकामातील खराब साहित्य, दगड, माती, कापलेली झाडे किंवा इतर साहित्य नसल्याचे व प्रत्येक कचरा वाहन हे नेमून दिलेल्या मार्गावरून दररोज कचरा गोळा करत आहे किंवा कसे ? याबाबत प्रमाणित केलेले नाही.

3)ठेकेदाराचे देयकातून दंड वसूली करण्यात आल्याचे दिसून येते, परंतू सदरचा दंड वाहने निश्चिती वेळेत उपलब्ध न झाल्याचा आहे किंवा कचरा न उचलला गेल्याबाबत आहे, प्रत्येक वाहन कचरा संकलनाकरीता कृती आराखडा सादर न केल्याबाबत आहे, याचा उलघडा आहे लेखापरीक्षणात/देयकात करण्यात आलेला नाही किंवा सदरचे कारण नमूद केलेले नाही.

4)कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर ठेकेदाराने कामाचे प्रभावी अंमलबजावणीकरिता सात दिवसाचे आत प्रभाग निहाय नियुक्त्या केलेल्या कर्मचा-यांची व वाहनांची यादी मनपास सादर केल्याचे दिसून आले नाही, त्यामुळे कर्मचारी व वाहने विभागनिहायच काम करित असल्याचे दिसून आले नाही.

5) ठेकेदारामार्फत प्रत्येक विभागीय कार्यालयात घंटागाडी विषयक तक्रार निवारन कर्मचारी वर्ग व सोईसुविधा उपलब्ध केल्याचे आढळून आले नाही.

6) घंटागाडी वाहनावर सद्यस्थितीत कार्यरत जीपीएस यंत्रणा कार्यान्वित केल्याबाबत कार्यवाही आढळून आली नाही.

7) विभागीय स्वच्छता निरीक्षक, विभागीय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांनी वेळोवेळी निर्देशित केलेनुसार घंटागाडी कामकाजाचा दैनिक आठवडी व मासिक अहवाल सादर करण्याच्या सुचना असताना असा कोणताही अहवाल संचिकेत पाहावयास मिळाला नाही.

8) महानगरपालिका मालकीच्या घंटागाडी वाहनाची संपूर्ण देखभाल व दुरुस्ती ठेकेदाराने करावयाची आहे. त्यासाठी दरमहा उपअभियंता, खत प्रकल्प किंवा महानगरपालिकेने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांमार्फत खातरजमा केल्याबाबत दिसून आले नाही.

9) प्रभागनिहाय व वाहननिहाय उचलण्यात आलेल्या कचऱ्यांची नोंद, मनपा घंटागाडी वाहनांचे सुस्थितीबाबत संबंधितांनी दिलेला दाखला, पी.एफ / ई.एस.आय.सी इत्यादीच्या चलनाच्या पावत्या दर्शविण्यात आलेल्या नाहीत.

10) किमान वेतन कायदा 1948 नुसार कामगारांना किमान वेतन अदा केल्याची खात्री विभागप्रमुख यांनी केल्याचे दिसून आले नाही. कंत्राटी कामगार अधिनियम 1970 मधील कलम 21 नुसार कामगारांना वेतन अदा करताना विभागप्रमुख व त्यांचे प्रतिनिधी यांनी हजर राहून प्रत्यक्ष मजुरी दिल्याची खात्री करुन प्रमाणित केले असल्याबाबत दिसून आले नाही.

तसेच कलम 29 नुसार प्रत्येक कामगाराचे वय, तपशिल त्याने केलेले कामाचे तास, दिलेले मजुरी इत्यादींची विहीत माहिती नोंदवहीत दिसून आली नाही.

11) कंत्राटी कामगार (नियमन व निमुर्लन) 1971 व मध्यवर्ती नियमानुसार मस्टर रोल, मजुरी नोंदवही, मजुरी कपात नोंदवही, जादा कामाची नोंदवही, मजुरी स्लिप इत्यादी लेखे ठेवल्याचे दर्शविण्यात आले नाहीत. कंत्राटी

कामगाराचे तास व सेवेच्या इतर शर्ती हया किमान वेतन अधिनियमान्वये निश्चित केल्यानुसार आहेत किंवा नाहीत याची देखील खात्री विभागाने केल्याचे दिसून येत नाही.

12) ठेकेदाराने त्या त्या विभागात काम करण्याऱ्या कर्मचारी व कामगारांचा विमा संचालनालयाकडे काढल्याबातचे अभिलेखे दिसून आली ती पुढीलप्रमाणे – नाशिक (पश्चिम) दि.16/11/2015, सिडको दि.24/11/2015, सातपुर दि.16/11/2015, पंचवटी दि.26/11/2015, नाशिक (पुर्व) दि.09/12/2015, नाशिक रोड दि.11/11/2015 रोजी काढल्याचे दिसून येते परंतु अंदाजे दीड वर्षानंतर विमा का काढण्यात आला याबाबत समर्पक खुलासा करावा.

13) टर्म डिपॉझिटसाठी वॉटरग्रेस पॉड्रक्टस यांनी दि.शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि. व दिग्विजय इंटरप्रायझेस यांनी दि नाशिक मर्चंट्स को-ऑप बँक लि. या बँका राष्ट्रीयकृत / शेडयुल्ड असल्याबाबतची माहिती होऊ शकली नाही तसेच सदर बँकेने रक्कम रुपये 50 लाखाची बँक सॉलव्हन्सीसाठी देखील उपरोक्त प्रमाणे माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. उपरोक्त बाबींची पुर्तता त्वरीत करावी व अनुपालन सादर करावे.

DATPDMM6101 (Ref No : 89, Hmm No : 125)

126 वार्ड क्रमांक 98 नाशिक रोड येथील सौभाग्य नगर उदयानात आर्यन कास्ट पॅगोडा बसविणे कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 11

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 467691.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 467691.00/-

उदयानाच्या मालकीसंबंधी महसूल विभागाकडून प्राप्त 7/12 उतारा/ मालकी हक्कासंबंधी कोणतीही खात्री केलेली नाही. तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास एकतर निविदा स्विकारण्याचा कालावधी वाढविणे आवश्यक होते, कालावधी वाढवूनही निविदा प्राप्त न झाल्यास पात्र पैकी एकाची निवड करून सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेसह प्रस्ताव स्थायी समितीपुढे मांडणे आवश्यक होते.

वार्ड क्रमांक 98 नाशिक रोड येथील सौभाग्य नगर उदयानात आर्यन कास्ट पॅगोडा बसविणे काम महानगरपालिकेतर्फे करण्यात आले सदरील कामाचे प्राकलन रक्कम रुपये 4,77,236/- चे होते. या कामास प्रभाग समिती ठराव क्रमांक्र 433 दिनांक 11/03/2011 नुसार प्रशासकीय व वित्तीय मंजुरी होती. स्थायी

समिती सभा ठराव क्रमांक 1033 दिनांक 22/09/2011 नुसार या कामाचा खर्च 4,67,691/- यास मंजुरी होती. या कामाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) शासन निर्णय उदयोग ऊर्जा व कामगार विभाग क्र.भाखस.1088/(2512)/उदयोग-6, दिनांक.02/01/1992 मधील 8.3 मधील (फ) नुसार व महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 मधील 2(1) नुसार निविदा मागवून काम करणे आवश्यक होते. परंतु सदरील काम दरपत्रके मागवून करण्यात आली आहेत. त्यामुळे नियमांचे उल्लंघन झालेले आहे.

2) दरपत्रकाच्या प्रसिध्दीबाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही तसेच दरपत्रके लिफाफे उघडणेबाबत दिनांक व वेळ याबाबत मक्तेदारास काही कळविल्याचे दिसून येत नाही. प्रसिध्दीबाबत नस्तीस काही संलग्न नसल्याने याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

3) या कामासाठी उज्वल गार्डन नाशिक, आयडीएल इंजिनिअरींग वर्क्स, नाशिक व श्री.धर्नीधर स्टील फर्निचर, नाशिक यांचे दरपत्रके प्राप्त झाली आहेत. दरपत्रके प्रसिध्दीबाबत कोणताही तपशिल नस्तीत नसल्याने व उपलब्ध न झाल्याने अंतिम दिनांक, अटी व शर्ती इत्यादी माहितीबाबत कोणतीही खात्री करता आली नाही. आयडीएल इंजिनिअरींग वर्क्स, नाशिक व श्री.धर्नीधर स्टील फर्निचर, नाशिक यांचे दरपत्रकावर दिनांक नमूद नाहीत.त्यामुळे ही दरपत्रके पात्र नाहीत.त्याचप्रमाणे लिफाफयावर स्वाक्षऱ्या, प्राप्त दिनांक, तपशिल इत्यादी माहिती नमूद नाही. पात्र दरपत्रकांची संख्या फक्त एकच असल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहीता-2011परिशिष्ठ 3 (नियम 466[4])-28 नुसार तीन पेक्षा कमी दरपत्रके प्राप्त झाल्यास एकतर दरपत्रके स्वीकारण्याचा कालावधी वाढविणे आवश्यक होते. कालावधी वाढवूनही दरपत्रके प्राप्त न झाल्यास पात्रपैकी एकाची निवड करुन सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेसह प्रस्ताव स्थायी समितीपुढे मांडणे आवश्यक होते. परंतु नियमानुसार कार्यवाही या प्रकरणी झालेली दिसून येत नाही.

4) नस्तीस उदयानाच्या मालकीसंबंधी 7/12 किंवा अन्य दस्ताऐवज उपलब्ध नसल्याने कामाच्या ठिकाणाबाबत मालकी हक्कासंबंधी कोणतीही खात्री करता आली नाही.

5) नस्तीस ठरावाच्या मुळ प्रती जोडण्यात आलेल्या नाहीत.

6) काम पुर्णत्वाचा दाखला दिनांक 15/03/2012 रोजी देण्यात आला त्यावर कामासंबंधी कोणताही तपशिल नमूद नाही. ना-हरकत प्रमाणपत्र यावर रक्कम, तपशिल नमूद नाही. ना-हरकत प्रमाणपत्र दिनांक 07/09/2013 रोजी दिल्याचे निर्दशनास येते. काम पुर्ण झाल्यानंतर ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास एवढा विलंब का झाला याचे प्रयोजन कळत नाही.

7) जामीन नामेनुसार जामीनदार हा नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टिने सक्षम आहे किंवा कसे याची कोणतीही माहिती नस्तीत नाहीत. त्याचे रहिवास, व्यवसाय इत्यादी दस्ताऐवजे जामीन नाम्यास जोडलेली नाहीत.

8) करार करण्याबाबतचे मक्तेदारास पाठविलेले पत्र याची माहिती नस्तीत नसल्याने करारनामा मुदतीत केला किंवा कसे याची खात्री करता येत नाही.

9) कार्योदेशावर मुदत तीन महिने आहे तर करारनाम्यावर मुदत दोन महिने नमूद केलेली आहे.

10) क्वॉलिटी कंट्रोल डीपार्टमैंट यांचे अहवालाची प्रत अत्यंत अस्पष्ट आहे व त्यावर दिनांक दिसून येत नाही.

11) मोजमाप पुस्तक क्रमांक 1381 उपलब्ध झाले नाही त्यामुळे पृष्ठ क्रमांक 124 ते 126 येथील नोंदीची खात्री करता आली नाही.

MINVAJM6901 (Ref No : 90, Hmm No : 126)

127 मुळ दस्ताऐवजे, प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 0

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नस्तीला टिपण्णी, मंजूरी आदेश, प्राकलन, करारनामे इत्यादी दस्तऐवजांच्या छायांकित प्रती जोडल्या जातात. मूळ प्रती लेखापरीक्षणावेळी अप्राप्त आहेत.

उदयान विभागातील सन 2013-14 मध्ये लेख्यांची तपासणी करताना असे निदर्शनास आले की, नस्तीस मुळ दस्ताऐवजे, प्रमाणके लावली जात नाहीत. नस्तीला टिपणी, मंजुर आदेश, प्राकलन, करारनामे इत्यादी दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती जोडल्या जातात. लेखापरीक्षणावेळी मागणी करुनही मुळ प्रती प्राप्त झालेल्या नाहीत तसेच कोणत्याही नस्तीस प्रमाणकांच्या प्रती लावल्या जात नाहीत तसेच शासकीय व इतर वसुल रकमांच्या संबंधात भरणा केलेली दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केली जात नसल्याने त्याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही. नस्तीला सर्व मुळ प्रती लावणे आवश्यक आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 नियम 4(अ) नुसार अभिलेखे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची आहे, त्याचे पालन झाले नाही.

देयक क्रमांक 155 दिनांक 15/10/2013 व देयक क्रमांक 162 दिनांक 15/10/2013 संबंधित नस्त्यांची तपासणी करताना नस्तीत खालील बाबी नमूद केल्याचे निदर्शनास आलेले आहेत.

1) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर न करता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केली जाते.

2) काम न करता पैसे अदा केले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

3) विभागात समांतर नस्ती कार्यवाहीत नाही याची खात्री करावी.

4) दुबार प्रदान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

5) कामाचे प्रमाणात पैसे न देता जादा पैसे जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

6) एजन्सी बदल झाल्याची व त्या प्रमाणात पैसे दिल्याची खात्री करावी.

उपरोक्त 1 ते 6 प्रकरणी सन 2013-14 ची माहिती त्याचप्रमाणे खाली नमूद केलेली माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 143, दिनांक 24/09/2016 अन्वये कळविण्यात आले होते, परंतू सदरची माहिती प्राप्त झालेली नाही.

1) उदयान विभागात चोरी, हानी, अफरातफर, पोलिस केस इत्यादी प्रकरणे असल्यास त्याचा सविस्तर तपशील व सदयस्थिती माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेली नाही.

2) मक्तेदारावर कारवाई केल्याचे प्रकरणाचा तपशिल उपलब्ध झालेला नाही.

3) असमाधानकारक कामाची प्रकरणे असल्यास दंडाच्या वसुलीच्या प्रकरणांचा तपशिल उपलब्ध झालेला नाही.

MINVAJM6901 (Ref No : 91, Hmm No : 143)

128 उदयान विभागातील नोंदवहयातील त्रुटींबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 06

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. मोजमाप पुस्तकांचा ताळमेळ घेतला जात नाही. वृक्ष संरक्षकांची मोठया प्रमाणावर खरेदी केली जाते, परंतू जडसंग्रह नोंदवही नसल्याने त्यांच्या संख्येबाबत कोणतीही खात्री करता येत नाही. जडसंग्रह नोंदवही विभाग निहाय व एकत्रित नोंदवही मुख्यालय स्तरावर ठेवणे आवश्यक आहे.

उदयान विभागाचे सन 2013-14 चे लेखापरीक्षण करताना नोंदवहयांमध्ये खालीलप्रमाणे उणीवा निदर्शनास आलेल्या आहेत.

1) महानगरपालिकेच्या ताब्यात सदयस्थितीत 400 पेक्षा अधिक उदयाने असून मोठया प्रमाणावर नवीन उदयाने विकसित केली जात आहेत अस्तित्वात असलेल्या उदयानांचे नुतणीकरण केले जात आहे. उदयाने, जॉगिंग ट्रॅक, कारंजे, खेळणी इत्यादींवर देखभाल व दुरुस्तीसाठी मोठया प्रमाणावर निधी खर्च केला जातो. त्यामुळे उदयाननिहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात प्रकल्पाचे नाव, क्षेत्रफळ, रोपे, वृक्ष व त्यांचा तपशिल, जंगम मालमत्ता, दरवर्षी होणारा खर्च, देखभाल व दुरुस्तीचा तपशिल याबाबत सर्व माहितीची नोंद करण्यात यावी त्यामुळे उदयानावरील होणारा खर्च, त्यावरील नियंत्रण तेथील कामाचे नियोजन करणे सोयीचे होईल तसेच एखादया कामाची रक्कम चुकून दुबार प्रदान होणार नाही याची दक्षता घेणे शक्य होईल.

2) जंगम मालमत्ता व साठा मालमत्ता यांच्या नोंदवहया विभागनिहाय व उदयाननिहाय ठेवण्यात येऊन मुख्यालयात मध्यवर्ती नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.सदरील साहीत्याची पडताळणी करुन दरवर्षी जुन अखेर जडसंग्रह / जंगम साहीत्याची, सप्टेंबर व मार्च या महिन्याअखेर कंझ्युमेबल साहीत्याची पडताळणी करुन निष्कर्षासह प्रमाणपत्र वरीष्ठांना पाठविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

3) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका परिशिष्ठ 24 नुसार मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. मोजमाप पुस्तकांचा ताळमेळ घेतला जात नाही. (वापरलेली व कोरी मोजमाप पुस्तके) पुर्ण झालेली मोजमाप पुस्तके विभागाकडून जतन केली जात नाहीत. सर्व मोजमाप पुस्तकांची (वापरलेली व कोरी मोजमाप पुस्तके) पडताळणी करुन सर्व मोजमाप पुस्तके पुस्तकी शिलकीप्रमाणे अस्तित्वात असल्याची खात्री करावी.

4) वृक्ष / रोपे लागवडीसाठी वृक्ष संरक्षकाची मोठया प्रमाणावर गरज असल्याने उदयाने विभागाकडे मोठया प्रमाणावर वृक्ष संरक्षक आहेत तसेच त्यांची वेळोवेळी गरजेनुसार खरेदी केली जाते. परंतु याबाबत वृक्ष संरक्षक जडसंग्रह नोंदवही ठेवलेली नसल्याने त्याच्या नोंदी, संख्येबाबत कोणतीही खात्री करता येत नाही. वृक्ष संरक्षकांची संख्या विभागनिहाय, एकत्रित संख्या इत्यादीबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही.

5) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता यातील नमुना क्रमांक GEN 30 व 31 नुसार जंगम मालमत्ता नोंदवहीचा नमुना विहित करण्यात आला असून त्याप्रमाणे नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम 156 तसेच महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियम 95 ते 103 नुसार जडसंग्रह साहित्याची वार्षिक पडताळणी प्रत्येक वर्षी जून अखेर व इतर साहित्याची सहामाही पडताळणी सप्टेंबर व मार्च अखेर करणे आवश्यक आहे.

MINVAJM6901 (Ref No : 92, Hmm No : 144)

129 नाशिक महानगरपालिका हददीतील फळझाडाचे वार्षिक हर्रासी / लिलाव न केल्याने होणाऱ्या नुकसानीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 0

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

वृक्ष गणना सन 2007 च्या अहवालानुसार महानगरपालिका हददीतील, रस्त्यावरील व उदयानातील एकूण फळझाडांची संख्या 54,687 इतकी होती, त्यानंतर वृक्ष गणना झाली नाही. सदर फळझाडांची वार्षिक हर्रासी/ लिलाव न केल्याने महानगरपालिकेचे फळ झाडांपासून होणाऱ्या उत्पन्नाचे नुकसान झालेले आहे.

वेळोवेळी वृक्ष गणनेची माहिती लेखा परीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी करण्यात आली होती. परंतु माहिती प्राप्त झालेली नाही त्यामुळे नाशिक महानगरपालिका हददीतील रस्त्यावरील व उदयानातील फळझाडांची संख्या याबददल माहिती उपलब्ध झाली नाहीत. सन 2007 मधील वृक्षगणना अहवालातील आकडेवारीनुसार महानगरपालिका हददीतील विविध 30 प्रकारच्या फळझाडांची संख्या 54,687 एवढी तर एकूण वृक्षांची संख्या 11,41,751 इतकी होती. सन 2013-14 मध्ये त्यात मोठया प्रमाणावर वाढ झाली असण्याची शक्यता आहे. सदरील वृक्षांपैकी उन्मळून पडलेले, तोडलेले व वाळलेली वृक्षे यांचे वार्षिक लिलाव करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे आवश्यक होते. परंतु याबाबत काही माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाही.

फळझाडांचे वार्षिक लिलाव केल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात मोठया प्रमाणात व नियमित वाढ झाली असती.

MINVAJM6901 (Ref No : 93, Hmm No : 146)

130 मजूर संस्थांना वाटप केलेल्या कामाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 05

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

मजुर सहकारी संस्थांना रोस्टर पध्दतीने कामे देणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही. काम मागणीबाबत संस्था व बेरोजगार अभियंता यांचे कोणतेही अर्ज / पत्र संबंधित नस्तीस नाहीत.

उदयान विभागातील सन 2013-14 मधील लेख्यांची तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, उदयान, देखभाल, दुरुस्ती, वृक्ष प्राधिकरणाकडील कामे, उदयान विकास इत्यादी रक्कम रुपये दोन लक्षाच्या आतील कामे निविदा न मागविता अंदाजपत्रकीय दराने देण्याबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 641 दिनांक 18/07/1996 नुसार नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थांना देणेबाबत कामकाज वाटप समितीला प्राधिकृत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक सीएटी-07/06/प्र.क्र.14/इमारती-2, दिनांक 19/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांना अनुक्रमे 33%, 33% व 34% कामे दयावयाचे आहेत. सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना निविदा न मागविता कामे वाटप करावयाची आहेत. वाटप करावयाची कामे कामवाटप सभेच्या सात दिवस अगोदर महानगरपालिकेच्या बेवसाईटवर / नोटीसबोर्डवर जाहीर करुन त्यांचे वाटप लॉटरी पध्दतीने करणे (महागनरपालिका अधिनियमानुसार) आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

2) मजुर सहकारी संस्थांना रोस्टर पध्दतीने कामे देणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही तसेच लेखापरीक्षण पथकास रोस्टर नोंदवही तपासणीसाठी उपलब्ध झालेली नाही.

3) कामकाजवाटप समिती नियुक्ती, त्यांच्या सभा सभेतील विषय, सभेचे इतिवृत्त, कामे वाटप करताना अवलंबिण्यात आलेली पध्दत याचा कोणताही तपशिल / दस्ताऐवजे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाहीत.

4) पात्र मजुर संस्था, सुशिक्षित बेरोजगार व नोंदणीकृत कंत्राटदार यांची यादी सक्षम अधिकाऱ्याकडून घेतली जात असल्यास त्याबाबतची दस्ताऐवजे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे त्यांचे अधिकृतता / सत्यता याबाबत कोणतीही खात्री करता आली नाही.

5) काम मागणीबाबत संस्था व बेरोजगार अभियंता यांचे कोणतेही अर्ज / पत्र संबंधित नस्तीस नाहीत.

MINVAJM6901 (Ref No : 94, Hmm No : 147)

131 उदयाने व खुल्या जागेमध्ये विविध प्रकारची खेळणी, बेंचेस बसविण्याच्या कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 15

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1822792.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1822792.00/-

सन 2008-2009 चे वार्षिक मंजूर दराने सन 2013-2014 मध्ये खरेदी करण्यात आली आहे. पुनः प्रत्ययी आदेश हे मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यापर्यत देता येतात. केंद्र व राज्य शासनाचा याबाबत दर करार अस्तित्वात असलेबाबत कोणती खात्री न करता उपरोक्त खरेदी केलेली आहे. नस्त्यांना महानगरपालिकेच्या मालकी हक्काबाबत कोणतीही संबंधित दस्तएवजे संलग्न नाहीत. गुणवत्ता चाचणी होण्यापूर्वीच ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील लेखा परिक्षणाच्या वेळी विविध उदयानात व खुल्या जागांमध्ये खेळणी, बैंचेस बसविण्याची कामे केल्याचे निदर्शनास आले त्यांचा तपाशिल खालीलप्रमाणे.

अ. क्र.	देयक क्र. व दिनांक	उदयानाचे नाव	मक्तेदाराचे नाव	रूपये	मोजमाप पुस्तक क्र. / पृष्ठ क्र.
1	150,15/10/13	जय नगर	मे.दिपक एजन्सीज	197147	161/176
2	151,15/10/13	ड्रिम कॉलनी	मे.दिपक एजन्सीज	88678	539/190
3	152,15/10/13	उत्कर्ष कॉलनी	मे.दिपक एजन्सीज	399732	2214/----
4	165,15/10/13	वॉर्ड क्रमांक 106 मधील विविध उदयाने	मे.गणेश फेब्रीकेशन	449324	1915/----
5	166,15/10/13	सर्वे नंबर 319/2 अ,ब/1	मे.गणेश फेब्रीकेशन	101000	1915/----
6	167,15/10/13	सर्वे नंबर 319/2 अ,ब/1	मे.गणेश फेब्रीकेशन	94000	1915/----
7	30,24/06/13	नंदन सोसायटी इ.	मे.दिपक एजन्सीज	492911	1380/172 ते 175
			एकूण	1822792	

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील उदयाने व खुल्या जागेमध्ये विविध प्रकारची खेळणी बसविण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.1410 दिनांक 8/5/2008 नुसार सात मक्तेदाराचे वार्षिक दर मंजूर करण्यात आले होते. सन 2008-2009 चे वार्षिक मंजूर दराने सन 2013-2014 उपरोक्त खरेदी करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र.भांखड 1088/2522/उदयोग-6/दिनांक 2/1/1992 मधील परिशिष्ट सात नुसार पुन:प्रत्ययी आदेश हे मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांपर्यत देता येतात तसेच बाजारातील दर/किमती मूळ आदेशापेक्षा कमी होणार नसतील किंवा स्थिर आहेत किंवा प्रमाणिकृत आहेत याचा शहानिशा करणे आवश्यक होते तसेच याबाबत संबंधित कागदपत्रासह माहिती खरेदी करणा-या समितीपुढे सादर करणे आवश्यक असूनही अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही असे दिसून येते.

2) केंद्र व राज्य शासनाचा याबाबत दर करार अस्तित्वात असलेबाबत कोणतीही खात्री न करता उपरोक्त खरेदी केलेली आहे.

3) उदयान विभागाने सन 2013 मध्ये महानगरपालिकेच्या निधीतून एकूण रूपये 94,39,730/- एवढा खर्च खेळणी व बेंचेससाठी केलेला आहे यात नगरसेवक, डिपीडीसी इत्यादी निधीचा समावेश नाही त्यासंबंधी स्वतंत्र नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही सन 2013-2014 मधील सर्व खर्च निविदा न मागविता सन 2008-2009 मंजूर वार्षिक दराने केला आहे. त्यामुळे खेळणी व बेंचेस बसविण्याच्या कामी केलेला सर्व खर्च वाजवी व स्पर्धात्मक दराने झाला असे म्हणता येणार नाही.

4) विविध उदयानात बसविण्यात आलेली खेळणी, बेंचेस ही अंदाजपत्रकातील योग्य त्या दर्जाचे व वजनाचे असल्याचे दर्जात्मक तपासणी केल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

5) देयक क्र. 30 व 152 नुसार केलेल्या कामांची मूळ प्रमाणके मोजमाप पुस्तके नोंदवहया मूळ नस्ती इतर अनुषंगिक दस्ताएवजे वारंवार मागणी करूनही लेखापरिक्षण पथकास उपलब्ध झाले नाही त्यामुळे या खर्चाबाबत खात्री करता आलेली नाही.

6) नस्त्यांना महानगरपालिकेच्या मालकी हक्काबाबत कोणतीही संबंधित दस्तएवजे संलग्न नाहीत. नस्त्यांना मंजूरीबाबत सर्व छायांकित प्रती लावलेल्या आहेत. मूळ नस्तीत प्रस्ताव केलेले नाहीत मूळ नस्ती पडताळणी वेळी उपलब्ध झालेली नाही.

7) उपरोक्त खरेदीबाबत निविदा प्रकीयेशी संबंधित कोणतीही दस्तएवजे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झाले नाही.

8) उपरोक्त कामांबाबत साहित्य प्राप्त होणेबाबत डिलीव्हरी चलन तसेच इनव्हाईस इत्यादी दस्तएवजे नस्तीस संलग्न नसल्याने प्रत्यक्ष प्राप्त साहित्य त्याची मुदत, रक्कम, प्रमाणपत्र, देयके पारीत करण्याचे अभिप्राय, साठानोंदवहीतील नोंदी देयकातून वसूली केलेल्या रकामांविषयी कोणतीही दस्तएवजे व त्यांचा तपशिल उपलब्ध न झाल्याने वसूली रकमांच्या भरणा केल्याबाबत खात्री करता आलेली नाही .

9) साठानोंदवही लेखापरीक्षण पथकास उपलब्ध न झाल्याने खरेदी साहित्याच्या नोंदीबाबत कोणतीही खात्री करता

आलेली नाही.

10) देयक क्र. 150 बाबत कामाची मुदत दिनांक 1/09/2010 ते 30/11/2010 अशी तीन महिने होती काम पुर्णत्वाचा दाखला दिनांक 30/11/2010 रोजी दिला आहे तर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने दिनांक 15/10/2013 रोजी दिले असून त्यावर सक्षम अधिका-याची स्वाक्षरी नाही.

11) नाशिक महानगरपालिकेच्या क्षेत्रातील विविध उदयाने व खुल्या जागेमध्ये विविध प्रकारची खेळणी बसविण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.1410 दिनांक 8/5/2008 नुसार सात मक्तेदारांचे दर विविध खेळण्यांसाठी मंजूर करण्यात आले असूनही सर्व खरेदी मे.दिपक एजन्सीज यांचेकडून करण्यात आली. वास्तविक न्युनतम दरानुसार मेरीगो राउंड चार सीटर रूपये 23,887/- श्री साई इंडस्ट्रिज, ए टू बी क्लाईंबर रूपये 20,160/- सिध्दटेक इंडस्ट्रिज, सॅटेलाईट क्लाईंबर रूपये 35,700/- सिध्दटेक इंडस्ट्रिज, डिलक्स बेंच रूपये 8,578/- उदय क्रिएशन यांचेकडून घेणे आवश्यक हाते.

12) देयक क्रमांक 151 बाबत करारनाम्यावर क्रमांक दिनांक रक्कम इत्यादी माहिती नमूद केलेली नाही तसेच स्पेसिफिकेशन करारनामा जामीननामा येथे सक्षम अधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत.

13) देयक क्रमांक 165 बाबत कामाची मुदत दिनांक 20/12/2012 ते 20/03/2013 अशी तीन महिने होती. गणेश फॅब्रीकेशन वर्क्स नाशिक यांचे डिलीव्हरी चलन यावर क्रमांक दिनांक आदेश क्रमांक इत्यादी कोणतीही माहिती नमूद केलेली नाही त्यामुळे साहित्य वेळेवर पुरवठा होण्याबाबत, दर्जाबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही तसेच टॅक्स इन्व्हॉईस क्रमांक 61 यावरही दिनांक नमूद नाही. प्राप्त साहित्य प्रमाणिकृत केलेले नाही. करारनामा जामीननामा येथे सर्व माहिती नमूद नाही व सक्षम अधिका-याची स्वाक्षरी नाही. काम पूर्ण झाल्याचा दाखला दिनांक 25/02/2013 रोजी दिला असला तरी गुणवत्ता नियंत्रणाचा अहवाल विलंबाने दिनांक 25/10/2013 रोजी दिल्याचे तर ना हरकत प्रमाणपत्र दिनांक 15/10/2013 दिले असल्याचे दिसून येते त्यानुसार गुणवत्ता तपासणीपूर्वीच ना हरकत प्रमाणपत्र दिल्याचे निदर्शनास येते. देयकावर सक्षम अधिका-याची स्वाक्षरी नाही.

14) देयक क्रमांक 166 चे काम डीपीडीसी अंतर्गत असल्याचे नस्तीवरून दिसून येते, याबाबत स्वतंत्र नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही तसेच याप्रकरणी शासनाकडून किती निधी प्राप्त झाला याची माहिती प्राप्त झाली नाही. डिलीव्हरी चलन क्रमांक 74 व टॅक्स इनव्हाईस क्रमांक 74 यावर दिनांक नमूद नाही त्यामुळे प्राप्त साहित्य दर्जा, साहित्याचा तपशील, नोंदी, प्रमाणपत्र इत्यादीबाबत खात्री करता आली नाही. ना हरकत प्रमाणपत्रावर दिनांक नमूद केलेला नाही.

15) देयक क्रमांक 167 चे काम डीपीडीसी अंतर्गत असल्याचे नस्तीवरून दिसून येते, याबाबत स्वतंत्र नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही तसेच याप्रकरणी शासनाकडून किती निधी प्राप्त झाला याची माहिती प्राप्त झाली नाही. डिलीव्हरी चलन क्रमांक 73 व टॅक्स इनव्हाईस क्रमांक 73 यावर दिनांक नमूद नाही. त्यामुळे प्राप्त साहित्य दर्जा, साहित्याचा तपशील, नोंदी, प्रमाणपत्र इत्यादीबाबत खात्री करता आली नाही. काम पूर्णत्वाचा दाखला दिनांक 11/02/2013 रोजी दिलेला असून गुणवत्ता चाचणी व ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने अनुक्रमे दिनांक 25/10/2013 व दिनांक 15/10/2013 रोजी दिल्याचे दिसून येते. गुणवत्ता चाचणी होण्यापूर्वीच ना

हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. ना हरकत प्रमाणपत्रावर रक्कम रूपये व पूर्ण तपशील नमूद केलेला नाही.

MINVAJM6901 (Ref No : 95, Hmm No : 148)

132 उदयान विभागातील वाहन खर्चातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 15

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 312390.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 312390.00/-

पुन: प्रत्ययी आदेश हे मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांपर्यत देता येतात. सन 2008-2009 चे वार्षिक मंजूर दराने सन 2013-2014 मध्ये वाहनांवर खर्च करण्यात आलेला आहे. ट्रॅक्टर संबंधी कोणतीही वैध कागदपत्रे नस्तीस संलग्न नाहीत, तसेच वाहतूक संबंधी तपशीलवार नोंदवही ठेवलेली नाही. अटी व शर्ती यांचे पालन झालेले नाही. वाहन विभागाचे प्रमाणपत्र/अभिप्राय घेतलेले नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील लेखापरीक्षणावेळी उदयान विभागाअंतर्गत वाहनांवर खर्च करण्यात आला असून त्यांसंबंधीच्या देयकांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	देयक क्र / दिनांक	विभागाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक / पृष्ठ क्रमांक
1	106/11.10.2013	नाशिक रोड	भारतरत्न मजूर बांधकाम सोसायटी	ट्रॅक्टनभाडे तत्वावर घेणे	91980	1901/165
2	107/11.10.2013	पंचवटी	भारतरत्न मजूर बांधकाम सोसायटी	ट्रॅक्टनभाडे तत्वावर घेणे	42180	1901/167
3	142/15.10.2013	नवीन नाशिक	चे.योगेश मजूर सोसायटी	ट्रॅक्ट1रभाडे तत्वावर घेणे	37230	1902/97
4	153/15.10.2013	नाशिक पुर्व	प्रथमेश मजूर बांधकाम सोसायटी	ट्रॅक्ट1रभाडे तत्वावर घेणे	72000	110/--

5	154/15.10.2013	नाशिक पश्चिम	प्रथमेश मजूर बांधकाम सोसायटी	ट्रॅक्ट1रभाडे तत्वावर घेणे	69000	110/--
	एकूण				**312390**	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) आदेश क्रमांक - 1532 दि.29/05/2008 नुसार ट्रॅक्टचरभाडयाबाबतचे दर मंजूर असल्याचे नस्तीवरुन दिसून येते. दर निश्चितीबाबत कोणतीही दस्ताऐवजे उपलब्ध झाली नाहीत. जुनेच वार्षिक दर मंजूर आहे. शासन निर्णय क्रमांक.भाखसं-1088/2512/उदयोग-6/मंत्रालय, मुंबई दिनांक.02/01/1992 मधील परिशिष्ठ 7 नुसार पुन:प्रत्ययी आदेश हे मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यापर्यत देता येतात तसेच बाजारातील दर / किमती मुळ आदेशापेक्षा कमी होणार नसतील किंवा स्थिर आहेत किंवा प्रमाणिकृत आहेत याची शहानिशा करणे आवश्यक असताना व याबाबतची टिपण्णी संबंधित कागदपत्रांसह खरेदी करणाऱ्या समितीपुढे सादर करणे गरजेचे असताना अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

2) ट्रॅक्टर संबंधी कोणतीही वैध कागदपत्रे, विमा, आर.सी.बुक, इतिवृत्त नोंदवही इत्यादी नस्तीस संलग्न नाहीत.

3) ट्रॅक्टरच्या वाहतूकीसंबंधी ठीकाण, दिनांक, काम, वेळ, अंतर, तास, मजुरांचे हजेरी पुस्तक यासंबंधी नोंदी घेऊन नोंदवही ठेवणे आवश्यक होते. परंतु अशी नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही.

4) अटी व शर्ती यांचे पालन झाल्याबाबत खात्री करुन देयकाच्या रकमेचे प्रदान करणे आवश्यक होते. परंतु ना हरकत प्रमाणपत्र देताना याबाबत कोणतीही खात्री करण्यात आली नाही मोघम स्वरुपात ना - हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

5) अटी व शर्ती क्रमांक - 4 नुसार ट्रॅक्टरची वैध कागदपत्रे घेणे आवश्यक होते तसेच क्रमांक - 5 नुसार अपघात / विमा उतरविणेबाबत कार्यवाही करणे आवश्यक होते. याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

6) वाहन उपलब्धतेबाबत वाहन विभागाचे प्रमाणपत्र / अभिप्राय घेतलेले नाहीत.

7) रुपये 2,00,000/- च्या मर्यादेत कामे होण्यासाठी निविदा न मागविता तुटकरित्या कामे केल्याचे निदर्शनास येते.

8) मोजमाप पुस्तक क्र.110 लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न झाल्याने त्यातील नोंदींबाबत खात्री करता आली नाही.

9) देयक क्रमांक - 106 व 107 च्या कामात दि.09/11/2012 नुसार प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे आदेश क्रमांक - 1474 दि.15/03/2013 नुसार आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. परंतु या संबंधी करारनामा दि.06/03/2013 रोजी करण्यात आल्याचे दिसून येते. कामाची मुदत 180 दिवस असून काम दि.04/12/2012 पासून सुरु करणेबाबत कळविलेले आहे. लेखापरीक्षणावेळी वाहनाचे लॉगबुक, इतिवृत्त व पुस्तक इत्यादी दस्तऐवजे व नोंदवहया उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे काम कधीपासून सुरु झाले, प्रत्यक्षात आदेशाप्रमाणे काम केले किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही. अटी व शर्ती वर कंत्राटदाराच्या स्वाक्षऱ्या नाहीत. जामीननाम्यातील माहिती पुर्ण भरलेली नाही. ना हरकत प्रमाणपत्रावर रक्कम नमूद नाही. काम पुर्तता प्रमाणपत्र

व ना हरकत प्रमाणपत्र यावर कामाच्या मुदतीत तफावत आहे. दि.11/10/2013 चे ना हरकत प्रमाणपत्रावर रक्कम नमूद केलेली नाही.

10) देयक क्रमांक - 142 - या विषयी कामाच्या नोंदींची नोंदवही दि.01/04/2012 ते 18/12/2012 या कालावधीची असून त्यावर स्वाक्षऱ्या नाहीत. नोंदीमधील तपशील मोघम स्वरुपात आहे. त्यावर वाहन क्रमांक, खेपांचा तपशील, अंतर, ठीकाण, वेळ, वाहतूकीचे साहीत्य इत्यादी नोंदी नमूद नाहीत. करारनामा क्रमांक -16 दि.21/08/2012 असून तो रु.100/- च्या स्टॅम्पपेपरवर करण्यात आलेला आहे. काम पुर्ण झाल्याचा दिनांक.18/12/2012 असून ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने दि.15/10/2013 रोजी देण्यात आले आहे.

11) देयक क्रमांक - 153 व 154 - दि.28/09/2012 रोजी ई - टेंडर दवारे निविदा मागविणेबाबत नमूद केले असले तरी प्रत्यक्षात याबाबत कोणतीही दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाली नाहीत व नस्तीसही संलग्न नाहीत त्यामुळे निविदा प्रकीया व दर निश्चितीबाबत खात्री करता आली नाहीत.

12) देयक क्रमांक - 153 बाबत करारनामा रु.120/- ऐवजी रु.100/- चे स्टॅम्प पेपरवर करण्यात आला आहे. कमी रकमेच्या स्टॅम्पची वसुली करुन रक्कमेचा भरणा करण्यात यावा.

13) देयक क्रमांक - 154 बाबत देयकावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. स्थायी समिती ठराव क्रमांक - 828 दि.22/02/2013 नुसार या कामास मंजुरी होती सदरील काम हे प्रथमेश मजूर बांधकाम सोसायटी यांना देण्यात आले. मंजुरी आदेशानुसार हे काम मे.आकाश कन्स्ट्रक्शन यांना देणे आवश्यक होते. या बदलाबाबत नस्तीत कोणतीही माहिती नसून लेखापरीक्षणावेळी याविषयी कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही.

14) मोजमाप पुस्तक क्रमांक - 1902 येथील पृष्ठ क्रमांक - 97 येथे नोंदीवर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

15) नस्तीस सर्व छायाप्रती जोडण्यात आल्या आहेत. करार करणेबाबत कंत्राटदाराला पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न नाही. त्यामुळे कराराची वैधता, स्टॅम्पची रक्कम याबाबत खात्री करता येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 99, Hmm No : 155)

133 उदयान विभागातील दुरुस्तीच्या कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 12

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 587730.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 587730.00/-

उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारा) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता आली नाही. नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. कंत्राटदारास करार करण्याबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केलेले नाहीत. मूळ नस्तीस प्रस्ताव सादर न करता नव्याने नस्ती केलेली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील लेखापरीक्षणावेळी उदयान विभागाअंतर्गत विविध उदयानावर दुरुस्तीच्या कामासाठी खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	देयक क्र / दिनांक	उदयानाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक/ पृष्ठ क्रमांक
1	147/ 15.10.2013	लोखंडे मळा	चे.संघमित्र मजूर सोसायटी	कर्बिंग बसविणे, कंम्पाउंड वॉल व पाथवे दुरुस्ती करणे	189250	1507/176
2	149/ 15.10.2013	सिंगापूर उदयान	चे.शुभम मजूर सोसायटी	रिपेअरींग करणे व रंगरंगोटी करणे	199070	3218/1
3	183/ 25.10.2013	नाशिक (पश्चिम) प्रभाग क्रमांक - 25	अंजनी मजूर बांधकाम सोसायटी	कंम्पाउंड वॉल दुरुस्ती व रंगरंगोटी	199430	1074/186
				एकूण	**587730**	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) देयक क्रमांक 147 - प्राकलन प्रमाणिकृत नाही. तांत्रिक तपासणी अहवाल मोघम स्वरुपात दिलेला आहे. ना हरकत प्रमाणपत्रावर रक्कम नमूद केलेली नाही. साहीत्य वापर विवरणपत्रात कमी जादा साहीत्याबाबत स्पष्टीकरण दिलेले नाही.

2) देयक क्रमांक - 149 - गुणवत्ता नियंत्रण अहवालात कामाच्या दर्जाबाबत स्पष्ट अभिप्राय नाहीत. त्यात नमूद मोजमाप पुस्तक क्रमांक व पृष्ठ क्रमांक यात तफावत दिसून येते. दि.15/10/2013 चा तांत्रिक तपासणी अहवाल मोघम स्वरुपात दिलेला आहे. देयकावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. साहीत्य वापर विवरणपत्रात

कमी जादा साहीत्याबाबत स्पष्टीकरण दिलेले नाही.

3) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

4) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

5) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

6) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

7) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

8) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

9) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

10) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

11) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

12) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस

संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 100, Hmm No : 156)

134 उदयान विभागामार्फत महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व अधिनियम 1975 चे कलम 7(ख) अन्वये झाडांची गणना पाच वर्षातून एकदा न करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 0

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व अधिनियम 1975 चे कलम 7(ख) अन्वये झाडांची गणना पाच वर्षातून एकदा करणे आवश्यक असून सन 2007 नंतर वृक्ष गणना झालेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणावेळी उदयान विभागाने महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 चे कलम 7(ख) अन्वये वृक्ष प्राधिकरणाने डिसेंबर 1996 पुर्वी एकदा आणि त्यानंतर प्रत्येक पाच वर्षातून त्यांच्या अधिकारीतेतील जमीनीवरील सर्व वृक्षांची गणना करणे आवश्यक होते. परंतु प्रत्यक्षात उदयान विभागाने सन 2007 मध्ये वृक्ष गणना केली त्यानंतर सन 2012 मध्ये वृक्ष गणना करणे आवश्यक असूनही याबाबत कार्यवाही अदयापही झालेली नाही.

MINVAJM6901 (Ref No : 101, Hmm No : 157)

135 उदयान विभागाशी संबंधित नसलेल्या कामावर केलेल्या खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 13

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 435609.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 435609.00/-

उदयानाशी संबंधित नसूनही उदयान निधीतून खर्च केलेला आहे. नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. प्राकलन प्रमाणित नाही. खर्चाची मूळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील लेखापरीक्षणावेळी उदयान विभागाशी सबंधित नसलेल्या कामावर उदयानाशी संबंधित निधीतून खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	देयक क्र / दिनांक	उदयानाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक / पृष्ठ क्रमांक
1	96/10.10.2013	------	श्री.सय्यद असीफ अली	सुरक्षा अनामत रक्कम परतावा	23817	------
2	123/15.10.2013	-------	नवनीत	विविध चौकांमध्ये सुशोभिकरणाची कामे	120050	203/160
3	128/15.10.2013	-------	चे.महात्मा मजूर बांधकाम सोसायटी	रस्ता सुशोभिकरण (काटया मारुती चौक ते राष्ट्रीय महामार्ग)	112312	1801/131
4	168/24.10.2013	--------	मे.कल्पना एंटरप्रायझेस	सुरक्षा अनामत रक्कम परतावा	77448	--------
5	169/25.10.2013	--------	मे.कल्पना एंटरप्रायझेस	निविदा बयाणा रक्कम परत देणेबाबत.	100000	--------
6	190/28.10.2013	--------	----------	भ्रमणध्वनी बिल	1982	--------
				एकूण	**435609**	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) उपरोक्त नमूद प्रकरणी केलेला खर्च उदयानाशी संबंधित नसूनही उदयान निधीतून सदरील खर्च केल्याचे निदर्शनास येते.

2) देयक क्रमांक 96,168,169 व 190 - हि देयके लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाली नाहीत तसेच सुरक्षा अनामत रकमेबाबत कोणतीही नोंदवही ठेवलेली नाही त्यामुळे रक्कम परताव्याबाबत, जमा रकमेच्या अनुषंगाने कोणतीही खात्री करता येत नाहीत. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

3) देयक क्रमांक - 123 - निविदेसंबंधी कोणतीही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न नाहीत फक्त रिकामे लिफाफे नस्तीस संलग्न असून त्यावरही कोणतीही माहिती नमूद नाही. नस्तीस असलेले अभिलेखे दिनांकानुसार नाहीत. कार्योदेश नस्तीस संलग्न नाहीत. अटी व शर्ती येथे कंत्राटदार, सक्षम अधिकाऱ्याचे स्वाक्षरी नाहीत. करारनामा करणेबाबत दिनांक 03/07/2006 चे पत्रानुसार करारनामा तीन दिवसात रु.120/- च्या स्टॅम्पपेपरवर करणे आवश्यक होते. परंतु स्टॅम्प विक्रीचा दिनांक.14/07/2006 नमूद केलेला आहे. म्हणजेच करारनामा विहीत मुदतीत झालेला नसून तो वैध नाही. ना हरकत प्रमाणपत्र दि.15/10/2013 यावर देयकासंबंधी तपशील नमूद केलेला नाही. काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीस संलग्न नाही.

4) देयक क्रमांक - 128 - प्राकलन प्रमाणिकृत नाहीत. देयकावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाहीत. कमी जादा साहीत्य वापराबाबत स्पष्टीकरण दिलेले नाहीत.

5) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

6) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

7) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

8) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

9) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

10) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

11) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची

स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

12) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

13) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 102, Hmm No : 159)

136 उदयानांवरील देखभालीच्या खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 58

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 7070452.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7070452.00/-

सक्षम अधिकाऱ्याकडून पात्र अधिकृत संस्थांच्या यादया घेण्याबाबत कार्यवाही केली जात नाही. मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नियमित कंत्राटदार यांना अनुक्रमे 33%, 33%, 34% कामे वाटप करणे आवश्यक होते, परंतू अशी कार्यवाही अवलंबिण्यात आली नाही. नस्त्यांना मूळ प्रती ऐवजी छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. कंत्राटदारास करार करण्याबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले नाही. उदयाने महानगरपालिकेच्या नावे असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे नस्तीस जोडलेले नाहीत. प्रस्ताव सादर करताना जागेच्या मालकीबाबत कोणतीही खात्री केली नाही तसेच या सबंधी नगररचना विभागाचे अभिप्राय घेतले नाहीत असे दिसून येते. त्याचप्रमाणे तरतूदी नसताना, तांत्रिक मंजूरी व खाते प्रमुखांची मंजुरी न घेता प्राकलन प्रमाणित नसतानाही प्रस्ताव सादर केले आहे. काही प्रकरणात काम पूर्णत्वाचा दाखला दिल्यावर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने दिले आहे व करारनाम्याच्या छायांकित प्रती नस्तीस संलग्न आहेत.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील निवड महिन्यांचे लेखा परिक्षणाच्या

वेळी देयक नोंदवहीवरुन विविध उदयानातील देखभालीवर खर्च केल्याचे दिसून आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र	देयक क्रमांक / दिनांक	उदयान नाव	कंत्राटदार नाव	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक/पृष्ठ क्रमांक
1	73/03.10.13	स्वामी समर्थ केंद्र व मासाहेब मिनाताई ठाकरे उदयान	धनधन सदगुरु महिला बचत गट	66500	2077/138
2	74/03.10.13	वडनेर गाव स्मशान भूमी उदयान	चे.आकार मजूर सोसायटी	84000	2077/142
3	75/04.10.13	अवधपुरी सोसायटी	श्री.एच.ए.रेडडी	70000	2252/--
4	76/04.10.13	श्री.जयनगर उदयान	श्री.एच.ए.रेडडी	84000	2252/--
5	77/04.10.13	शनिमंदीर	श्री.एच.ए.रेडडी	77790	2252/--
6	79/04.10.13	टागोर नगर	चे.चारुदत्त मजूर बांधकाम सोसायटी	174096	2252/--
7	80/04.10.13	लिंगायत कॉलनी	चे.चारुदत्त मजूर बांधकाम सोसायटी	111322	2252/--
8	85/05.10.13	आनंद नगर	चे.प्रथमेश मजूर बांधकाम सोसायटी	126000	2077/143
9	89/07.10.13	पंचवटी इंद्रकुंड	श्री.डी.डी.चुंबळे	28000	2678/--
10	89अ/07.10.13	पंचवटी इंद्रकुंड (येथील कुंडयांची)	श्री.डी.डी.चुंबळे	28000	2678/--
11	91/08.10.13	ब्रम्हगिरी सोसायटी	हरीवास्तु मजुर बांधकाम सोसायटी	17500	2680/--
12	92/08.10.13	भिमनगर	हरीवास्तु मजुर बांधकाम सोसायटी	17500	2680/--
13	97/10.10.13	हेरंब सोसायटी	अस्मिता मजूर	77000	1593/--

			बांधकाम सोसायटी		
14	98/10.10.13	निसर्ग गोविंद सोसायटी	चे.संजीवनी मजूर बांधकाम सोसायटी	35000	1593/--
15	99/10.10.13	अपुर्व कॉलनी	चे.अदीत्य मजूर बांधकाम सोसायटी	63000	1593/--
16	100/10.10.13	मधुबन कॉलनी	अस्मिता मजूर बांधकाम सोसायटी	73500	1593/--
17	101/10.10.13	संगमेश्वर नगर	योगेश मजूर बांधकाम सोसायटी	73500	1593/--
18	102/10.10.13	स्वामी समर्थ नगर	राज मजूर बांधकाम सोसायटी	73500	1593/--
19	103/10.10.13	गुरुदत्त नगर	अस्मिता मजूर बांधकाम सोसायटी	73500	1593/--
20	104/10.10.13	चंपानगरी	संजीवनी मजूर बांधकाम सोसायटी	35000	1593/--
21	105/10.10.13	श्रीराम सोसायटी	संजीवनी मजूर बांधकाम सोसायटी	35000	1593/--
22	117/11.10.13	सदगुरु नगर उदयान	महारुद्र स्वयंरोजगार संस्था	73500	2240/137
23	118/11.10.13	उदय कॉलनी	सोमेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	35000	2240/135
24	119/11.10.13	विशाल चौक येथील उदयान	वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	38500	2240/133
25	120/11.10.13	फाल्गून सेक्टर	समृध्दी मजूर बांधकाम सोसायटी	31500	2240/131
26	121/11.10.13	दुर्गामाता मंदीर	विश्वकर्मा मजूर बांधकाम सोसायटी	35000	2240/129

27	124/15.10.13	यशोदा सोसायटी	श्री.एन.डी.भगत	49000	1801/135
28	126/15.10.13	ब्रम्हचैतन्य सोसायटी	मे.प्रसाद नर्सरी	24500	1801/128
29	127/15.10.13	सप्तश्रृंगी कॉलनी	चे.निर्माण मजूर बांधकाम सोसायटी	21000	1801/126
30	131/15.10.13	गणपती मंदिर येथील उदयान	चे.अजिंक्य मजूर बांधकाम सोसायटी	28000	1801/136
31	132/15.10.13	विघ्नहर्ता गणपती मंदिर उदयान	चे.अजिंक्य मजूर बांधकाम सोसायटी	49000	1801/138
32	134/15.10.13	गणेश कॉलनी (वडाळा गाव)	चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	56000	960/131
33	135/15.10.13	गणेश कॉलनी (वडाळा)	चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	196000	960/133
34	136/15.10.13	शितल सोसायटी	चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	77000	960/139
35	137/15.10.13	सिंगापूर सोसायटी	चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	42000	960/142
36	138/15.10.13	गोडेबाबा नगर	चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	84000	960/135
37	139/15.10.13	निर्मल कॉलनी	चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	35000	960/137
38	140/15.10.13	धवलगिरी सोसायटी	चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	42000	960/141
39	141/15.10.13	चेतना नगर	चे.सोमेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	378000	1902/93
40	143/15.10.13	किशोर नगर	चे.क्रांती मजूर बांधकाम सोसायटी	140000	1902/99
41	144/15.10.13	संभाजी चौक	स्वामीनी महिला बचत	21000	1902/107

			गट		
42	145/15.10.13	निवांत सोसायटी	चे.क्रांती मजूर बांधकाम सोसायटी	87838	1902/105
43	148/15.10.13	उषाकीरण सोसायटी	चे.कामधेनू मजूर बांधकाम सोसायटी	124193	1902/--
44	155/15.10.13	गोपीनाथ मुंडे उदयान	श्री.आर.के.खरात	120000	1132/180
45	156/15.10.13	दुर्गानगर	श्री.आर.के.खरात	120000	1132/182
46	158/15.10.13	शिवनेरी चौक	सदगुरु स्वामी समर्थ मजूर बांधकाम सोसायटी	7000	1132/184
47	159/15.10.13	पांडूरंग शास्त्री आठवले उदयान	नारळीमाता महिला बचत गट	24500	1507/--
48	160/15.10.13	डॉ.बाबासाहेबआंबेडकर पुतळयाजवळील उदयान	नारळीमाता महिला बचत गट	14000	1507/--
49	161/15.10.13	गणपती मंदिर (अश्विनी नगर)	नारळीमाता महिला बचत गट	45000	960/---
50	162/15.10.13	मिनाताई ठाकरे उदयान	नारळीमाता महिला बचत गट	45000	960/---
51	170/25.10.13	कै.वसंत कानेटकर उदयान	मयुरेश्वरी महिला बचत गट	42000	3005/--
52	171/25.10.13	कै.वसंत कानेटकर उदयान	आई पदमावती महिला बचत गट	42000	3005/--
53	172/25.10.13	कै.वसंत कानेटकर उदयान	निर्मल महिला बचत गट	42000	3005/--
54	173/25.10.13	कै.वसंत कानेटकर उदयान	सोमेश्वर महिला बचत गट	42000	3005/--

55	174/25.10.13	कै.वसंत कानेटकर उदयान	सई महिला बचत गट	42000	3005/--
56	175/25.10.13	कै.वसंत कानेटकर उदयान	ओम गुरुदेव महिला बचत गट	42000	3005/--
57	176/25.10.13	कै.वसंत कानेटकर उदयान	मनाली महिला बचत गट	42000	3005/--
58	177/25.10.13	कै.वसंत कानेटकर उदयान	साईकृपा महिला बचत गट	42000	3005/--
59	178/25.10.13	कै.वसंत कानेटकर उदयान	सुयोग महिला बचत गट	42000	3005/--
60	179/25.10.13	श्रीकृष्ण नगर	श्री.कला सृष्टी महिला बचत गट	31500	2256/--
61	180/25.10.13	मिनाताई ठाकरे उदयान	संकल्प महिला बचत गट	70000	2256/--
62	181/25.10.13	महात्मा फुले उदयान	महालक्ष्मी महिला बचत गट	70000	2256/--
63	182/25.10.13	महात्मा जोतिबा फुले उदयान	जयदुर्गामाता महिला बचत गट	70000	2256/--
64	185/28.10.13	रुद्राक्ष कॉलनी शिखरेवाडी	महालक्ष्मी महिला बचत गट	60000	3217/--
65	186/28.10.13	कानिफनाथ नगर	आदर्श महिला बचत गट	35000	1071/--
66	187/28.10.13	हेरंब सोसायटी	आदर्श महिला बचत गट	31500	1071/--
67	188/28.10.13	मुक्तांगण सोसायटी	किरण मोरे महिला बचत गट	42000	2241/198
68	189/28.10.13	विकास कॉलनी	जनवादी महिला बचत गट	31500	2241/199

69	191/28.10.13	मृत्युंजय महादेव मंदिर	शितल मजूर बांधकाम सोसायटी	40000	2681/---
70	192/28.10.13	हनुमान मंदिर	शितल मजूर बांधकाम सोसायटी	40000	2681/--
71	193/28.10.13	सुर्योदय कॉलनी	शितल मजूर बांधकाम सोसायटी	90000	2681/--
72	194/30.10.13	आडगांव महालक्ष्मी उदयान	कल्पतरु कन्स्ट्रक्शनस	168000	-----
73	195/31.10.13	दादोजी कोंडदेव नगर उदयान	सानेगुरुजी मजूर बांधकाम सोसासटी	52500	2680/--
74	78/04.10.13	इंदिरा नगर	श्री.एच.ए.रेडडी	217654	2252/--
75	80/04.10.13	लिंगायत कॉलनी	चे.चारुदत्त मजूर सहकारी संस्था	111322	2251/--
76	81/04.10.13	धनराज नगर	श्री.के.एस.मोरे	126000	2487/--
77	83/04.10.13	शिवराम नगर	चे.आदीत्य मजूर सोसायटी	128437	2487/--
78	84/04.10.13	स्वामी समर्थ नगर	महाराष्ट्र मजूर सोसायटी	113638	2487/--
79	86/05.10.13	विडीकामगार नगर	श्री.डी.डी.चुंबळे	116795	2678/--
80	88/05.10.13	मखमलाबाद - विदयानगर	श्री.डी.डी.चुंबळे	56525	2678/--
81	108/11.10.13	कलानगर	चे.विशाखा मजूर बांधकाम सोसायटी	55529	755/--
82	109/11.10.13	वृंदावन कॉलनी	श्री.पि.यु.चवरे	30030	1068/--
83	111/11.10.13	नवीन नाशिक वार्ड क्रमांक 80	श्री.पि.यु.चवरे	23153	1068/--

84	112/11.10.13	दत्त नगर	श्री.पि.यु.चवरे	21928	1068/--
85	116/11.10.13	राधाकृष्ण मंदिर	चे.क्रांती मजूर बांधकाम सोसायटी	41552	1068/--
86	141/15.10.13	चेतना नगर	चे.सोमेश्वर मजूर बांधकाम सोसायटी	378000	1902/--
87	40/01.07.13	कॉम्बेट आर्मी एव्हीऐशन ट्रेनिंग सेंटर	श्री.डी.डी.चुंबळे	789860	2678/65 ते 67
88	184/28.10.13	नाशिक रोड प्रभाग क्रमांक 56 - विविध उदयाने	महालक्ष्मी महिला बचत गट	105000	-----
89	78/04.10.13	इंदिरा नगर	श्री.एच.ए.रेडडी	77790	2252/---
			एकूण	7070452	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 संविदा 2 (1) नुसार काम करणे, सामुग्री किंवा माल पुरविणेसाठी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च होणार असेल तेंव्हा सात दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात नोटीस देऊन निविदा मागविणे किंवा दोन लाखापेक्षा कमी खर्च होणार असल्यास सुचना महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन दिसून येत नाही.

2) उदयान विभागातील उदयान देखभाल, दुरुस्ती,वृक्ष प्राधिकरणाकडील कामे, उदयान विकास या लेखाशिर्षांतर्गत रुपये दोन लाखापर्यंतची कामे विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने देण्याबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 641 दिनांक.18/07/1996 नुसार नियुक्त केलेल्या कामकाजवाटप समितीला प्राधिकृत केल्याबाबत नस्तीवरुन दिसून येते. परंतु त्याबाबतचे दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाही. सन 2013-14 मध्ये आयुक्त यांनी स्थापन केलेल्या समितीमार्फत कामाचे वाटप केल्याचे दिसून येत नाही.

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.सीएटी-07/06/प्र.क्र.14/इमारती-2, मुंबई, दिनांक 16/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नियमित कंत्राटदार यांना अनुक्रमे 33 टक्के, 33 टक्के व 34 टक्के कामे दयावयाची आहेत. याबाबत कार्यपध्दती अवलंबण्यात आल्याची दिसून येत नाही. सक्षम अधिकाऱ्याकडून पात्र अधिकृत संस्थांच्या यादया घेणेबाबत कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या

खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

4) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- टिपणी, करारनामा, मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे. उदा. देयक क्रमांक 156, 81 इत्यादी.

5) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

6) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाही. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे. बऱ्याच प्रकरणी करारनामे रु.100 व काही करारनामे रु.120 च्या स्टॅम्पपेपरवर केलेले आहेत. उदा. देयक क्रमांक - 156 चा करारनामा रु.100 च्या स्टॅम्प पेपरवर केला आहे त्यामुळे जेथे असे कमी रकमेचे स्टॅम्प लावलेले आहेत त्याची माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दयावी व लेखापरीक्षण कालावधीतील सर्व प्रकरणी अशी सर्व रक्कम वसुल करुन “0030 मुद्रांक व नोंदणी” या शासन लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावे.

7) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

8) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

9) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

10) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

11) प्रशासकीय, वित्तीय मंजुरी / खर्च मंजुरी आदेशात कालावधी, कंत्राटदार, संस्थेचे नाव इत्यादी नमूद केलेले नसल्याने त्या अनुषंगाने खात्री करता येत नाही. कार्योदेशावर दिनांक नमूद केलेले नाही. उदा. देयक क्रमांक - 91

12) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक - जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक.03/11/2003 व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक - प्रीविनि-2305/सहविमा/साव्हावि/फ-2,दिनांक- 12/09/2005 नुसार कंत्राटी कामाच्या कालावधीचा विमा उतरविणे

आवश्यक आहे. कंत्राटदाराने कंत्राटीकामाचा विमा न उतरविल्यास कामाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्के रक्कम वसुल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक होते. परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. कार्योदेशात याबाबत नमूद केलेले असले तरी देयकाची रक्कम अदा करताना कंत्राटदाराने विमा रक्कम भरल्याचे खात्री केली जात नाही. सन 2013-14 या कालावधीतील अशा सर्व प्रकरणी किती रक्कम भरावयाची बाकी आहे याबाबत महानगरपालिका स्थरावर खात्री होवून योग्य ती होणे अपेक्षित आहे.

13) देखभालाचा कालावधी संपल्यावर काम कोणती संस्था करणार किंवा काम बंद आहे याबाबत कोणतीही माहिती नस्तीतून उपलब्ध होत नाही. बऱ्याच विलंबाने कार्योत्तर मंजूरीच्या अनुषंगाने कार्यवाही केली जाते. टिपणीवर दिनांक नमूद केले जात नाहीत. उदा.देयक क्रमांक - 73,75,76,77,79,80 इत्यादी.

14) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

15) काम पुर्णत्वाचा दाखला दिल्यावर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने दिल्याचे बऱ्याच प्रकरणी दिसून येते. जर काम समाधानकारकरित्या पुर्ण केलेले असेल तर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने देण्याचे प्रयोजन कळत नाही. याबाबत कोणतीही माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेली नाही.उदा.देयक क्रमांक - 89 च्या कामाचा कालावधी दिनांक -31/12/2012 पर्यंत होता व काम पुर्णत्वाचा दाखला ही कार्यकारी अभियंता यांनी दिनांक - 31/12/2012 रोजीच दिलेला आहे परंतु रक्कम अदा करणेबाबत कार्यकारी अभियंता यांनी दिनांक - 07/10/2013 रोजी ना हरकत प्रमाणपत्र दिले असून ते विलंबाने देण्यात आलेले आहे.

16) देयक क्रमांक - 92 संबंधी दिनांक - 13/07/2010 चे मंजूरी आदेशात कालावधी नमूद केलेला नाही.

17) कार्योदेशात, करारनामा, जामीननामा येथे दिनांक नमूद केले जात नाहीत त्यामुळे कराराच्या वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. उदा.देयक क्रमांक - 156 व 91. याबाबत कामाचा कालावधी दिनांक - 01/01/2013 ते 31/08/2013 असे 8 महिने असल्याचे दिसून येते परंतु कार्योदेश दिनांक - 09/10/2013 रोजी दिलेले आहेत. काम चालू ठेवण्याबाबत कोणतीही परवानगी घेतल्याचे दिसून येत नाही व याबाबत नस्तीत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही.

18) बऱ्याच देयकात प्राकलन प्रमाणिकृत केलेले नाहीत. उदा. देयक क्रमांक - 98,99,100,101 व 102 इत्यादी.

19) देयक क्रमांक - 102 च्या नस्तीस करारनामा संलग्न नाही. सदरील उदयान हे दिनांक - 20/01/2007 ते 19/01/2010 या कालावधीत मे. नवनीत कन्स्ट्रवेल यांना देखभालीस दिल्याचे दिसून येते. दिनांक - 20/01/2010 ते 31/10/2011 या कालावधीतील देखभालीची माहिती नस्तीत नाही. त्यामुळे या कालावधीत उदयानाची देखभाल केली किंवा कसे, या कालावधीत उदयानाचे नुकसान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

20) प्रस्ताव सादर करताना जागेच्या मालकीबाबत कोणतीही खात्री केली जात नाही तसेच या सबंधी नगररचना

विभागाचे अभिप्राय घेतले जात नाहीत असे दिसून येते. त्याचप्रमाणे तरतूदी नसताना, तांत्रिक मंजूरी व खाते प्रमुखांची मंजुरी न घेता प्राकलन प्रमाणिकृत नसतानाही प्रस्ताव सादर केले जात असल्याचे निदर्शनास आले.

21) देयक क्रमांक - 119 बाबत खर्चाचा मंजूरी आदेश नस्तीस नसून लेखापरीक्षण वेळी तो उपलब्ध झाला नाही व त्याची माहिती प्राप्त झाली नाही.

22) काही नस्त्यांना देयकाची प्रत सोडून सर्व दस्तऐवजे मूळ न जोडता छायाप्रती जोडलेल्या आहेत. याबाबत लेखापरीक्षणावेळी मूळ दस्तऐवजे उपलब्ध झाली नाहीत व कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. उदा. देयक क्रमांक - 124.

23) देयक क्रमांक - 124 मधील कामाचा कालावधी दिनांक - 27/05/2012 ते 31/12/2012 असा होता त्याअनुषंगाने केलेला करारनामा क्रमांक - 193 दिनांक.07/10/2013 आहे. तर खर्चाचे मंजूरी आदेश दिनांक - 14/10/2013 रोजीचे आहेत. काम पुर्णत्वाचा दाखला दिनांक - 31/12/2012 रोजी दिला असून ना हरकत प्रमाणपत्र दिनांक-15/10/2013 रोजी दिला आहे. मंजुरी न घेता काम सुरु ठेवल्याचे दिसून येते तसेच काम पुर्ण झाल्यानंतर करारनामा केल्याचे दिसून येते याबाबत लेखापरीक्षणावेळी कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही.

24) कंत्राटदाराकडून करुन घेतलेले कामाच्या संदर्भात संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कोणतेही अहवाल वेळोवेळी घेतल्याचे दिसून येत नाहीत तसेच हजेरीसंदर्भात उदयानात नोंदवही ठेवली जात नाही असे दिसून येते.

25) कंत्राटदाराने कामावर नियुक्त केलेले कामगार / सेवक यांना अनुज्ञेय रक्कम धनादेशाद्वारे तसेच त्यांचे ईएसआय, ईपीएफ, व्यवसाय कर, कामगार निधी इत्यादी रकमा संबंधित प्राधिकारणाकडे जमा केल्याबाबत विभागाकडून खात्री करणे आवश्यक होते परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजावरुन अशी कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

26) काम न करता पैसे मिळणार नाहीत, समांतर नस्ती कार्यवाहीत असल्यास ती थांबविण्यात यावीत, दुबार प्रदान होणार नाही याची काळजी घ्यावी असे अभिप्राय देयक क्रमांक - 155 शी संबंधित नस्तीत नमूद केल्याचे निदर्शनास आलेले आहेत अशा सर्व प्रकरणांची माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्यात यावीत.

27) देयक क्रमांक - 155 व 156 बाबत करारनामा नोंदविला नसून त्यावर क्रमांक, दिनांक नमूद नाहीत तसेच त्यावर पुर्ण तपशील, माहिती नमूद नसून सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. देयक क्रमांक - 155 बाबत कामाची मुदत दिनांक - 01/01/2013 ते 31/08/2013 असे 8 महिने होती परंतु करारनामेसाठी वापरलेला मुद्रांक क्रमांक - HP385270 हा दिनांक - 30/08/2013 रोजी खरेदी केल्याचे दिसते. त्यामुळे या प्रकरणी काम पुर्ण झाल्यावर आदेश निर्गमित केल्याचे व करारनामा केल्याचे निदर्शनास येते. या गोष्टी नियमानुसार झालेल्या नाहीत.

28) देयक क्रमांक - 159 बाबत नस्तीत दिनांक, कामाचा कालावधी नमूद केलेले नाहीत.टिपणीत प्राकलन रु.2,52,000/- तर तरतूद रु.1,25,000/- दर्शविलेले आहेत. दिनांक - 08/12/2010 च्या आदेशात कालावधी नमूद नाहीत, खर्च मंजूरी आदेश नस्तीस संलग्न नाहीत, कामाचा आदेश क्रमांक - 701 येथे दिनांक नमूद नसून कामाचा कालावधी दिनांक - 01/02/2011 ते 31/01/2014 दर्शविला आहे. करारनामा क्रमांक - 52 दिनांक - 06/11/2011 असल्याचे दिसून येते. करारनामा जाहीरातनामा येथे दिनांक स्थळ इत्यादी नमूद नाही. करारनामा

विलंबाने केल्यामुळे तो वैध ठरत नाही.

29) देयक क्रमांक - 160 बाबत करारनामा करणेबाबत पत्र महानगरपालिकेने कंत्राटदारास दिनांक- 27/05/2011 रोजी निर्गमित केलेले आहे. तर करारनामा क्रमांक - 65 दिनांक - 06/06/2011 आहे. म्हणजेच करारनामा विहीत मुदतीत केलेला नसल्याने तो ग्राहय धरता येत नाही. करारनाम्यावर स्थळ, दिनांक इत्यादी माहिती नमूद नसून त्यावर संबंधितांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. दिनांक - 27/05/2011 च्या पत्रानुसार करारनामा रु.120/- च्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक होते परंतू करारनामा रु.100/- चे स्टॅम्पपेपरवर करण्यात आलेला आहे. नस्तीस ना हरकत प्रमाणपत्र संलग्न नाही.

30) देयक क्रमांक - 162 बाबत नस्तीस मुळ टिपणी, आदेश इत्यादी दस्तऐवजे नाहीत. छायांकीत प्रती लावण्याचे प्रयोजन कळत नाही. मुळ प्रती मागणी करुनही लेखा परीक्षणावेळी उपलब्ध झाले नाहीत. टिपणीवर दिनांक नमूद केले जात नाहीत. मूळ नस्तीत टिपणी सादर केले जात नाहीत. नवीन नस्तीत उदयान क्षेत्र, मुदत, पुर्वीची मुदत, मुदतवाढ, मालकी हक्कासंबंधी अभिप्राय / दस्ताऐवजे इत्यादी माहिती नमूद केली जात नाहीत. काम न करता पैसे मिळणार नाहीत, समांतर नस्ती कार्यवाहीत असल्यास ती थांबविण्यात यावीत, दुबार प्रदान होणार नाही याची काळजी घ्यावी, कामाचे प्रमाणात पैसे, असमाधानकारक कामाचे पैसे कपात, एजन्सी बदलल्यास त्यानुसार पैसे इत्यादी काळजी उदयान निरीक्षकाने घेण्याचे टिपणीत नमूद असल्याचे दिसून येते. परंतु यावर उदयान निरीक्षकाकडून कोणताही अहवाल माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच यावर कोणतीही कार्यवाही केली जात नाही. अशा सर्व प्रकरणांची माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्यात यावीत. कार्योदेश दिनांक - 20/09/2013 नुसार कामाची मुदत दि.01/01/2013 ते 31/12/2013 असल्याचे दिसते याबाबत केलेला करारनामा क्रमांक - 1 दिनांक - 20/09/2013 आहे. करारनामा विहीत कालावधीतील नसल्याने वैध ठरत नाहीत. कार्योदेश विलंबाने निर्गमित झाला असून काम पुर्व परवानगीने चालू होते किंवा कसे याबाबत कोणतीही माहिती नस्तीत उपलब्ध नाहीत तसेच करारनामा रु.100/- च्या स्टॅम्प पेपरवर करण्यात आलेला आहे. विहीत रकमेचे स्टॅम्प लावलेले नाहीत. करारनामा, जामीननामा, अटी व शर्ती, दिनांक, स्थळ इत्यादी माहिती नमूद नसून त्यावर संबंधितांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

31) देयक क्रमांक - 170 च्या कामाचा कालावधी दि.01/02/2010 ते दि.31/03/2013 होता तर करारनामा क्र.88 दि.15/06/2011 रोजी केलेला आहे. मंजुरी पुर्वी सदरील काम चालू होते किंवा कसे याबाबत पुर्व परवानगी घेतली होती का इत्यादी माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाली नाही. परंतु सदरील कालावधीतील रकमांचे प्रदान झालेले आहे. बचत गट, सुवर्ण जयंती रोजगार योजनेअंतर्गत स्थापन महिला दारीद्रय रेषेखालील यादीतील आहेत असे नमूद केलेले असले तरी त्यासंबंधी दस्ताऐवजे, माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाली नाहीत. तांत्रिक मंजुरी, खाते प्रमुखांची मंजुरी न घेताच प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. देयक क्रमांक - 170 ते 178 यामध्ये सर्व देयकांमध्ये उपरोक्त नमूद बाबी असल्याचे दिसून येते. देयक क्रमांक - 177 येथे संबंधित सक्षम अधिकारी व विभाग प्रमुखांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. देयक क्रमांक - 170 ते 178 मधील करारनामे मुदतीत न केल्याने ते ग्राहय नाहीत.काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर दिनांक व स्वाक्षरी नाहीत. ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने दिलेले आहेत त्यावर ही संबंधितांच्या स्वाक्षऱ्या नाहीत या विषयी कोणतीही माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाली नाही.

32) देयकांमध्ये करारनामा, अटी व शर्ती, कार्योदेश येथे मुदतीत तफावत / खाडाखोड दिसून येते. उदा. देयक

क्रमांक - 83

33) देयक क्रमांक - 84 येथे पुर्णत्वाच्या दाखल्यावर उदयान अधिक्षकांची स्वाक्षरी नाही.

34) देयक क्रमांक - 85,89अ, 158,161,117,118,120,121,127,134,135,140,179,180,181,182,185 व 194 यासंबंधी नस्त्या, देयके इत्यादी कोणतेही दस्तऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न झाल्याने त्या अनुषंगाने झालेल्या कामाविषयी खर्चाविषयी कोणतीही खात्री करता आली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

35) मोजमाप पुस्तक क्रमांक - 2252,2487,2678,2680,1593,755,1902,907,3005 व 2256 पडताळणी वेळी उपलब्ध न झाल्याने त्यातील नोंदीबाबत खात्री करता आली नाही.

36) देयक क्रमांक - 112 च्या संदर्भात मोजमाप पुस्तक क्रमांक - 1068 पृष्ठ क्रमांक - 185 येथे देयक पारीत करण्याबाबत अभिप्राय व सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

37) देयक क्रमांक - 132 च्या संदर्भात मोजमाप पुस्तक क्रमांक - 1801 पृष्ठ क्रमांक - 138 येथे संबंधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

38) देयक क्रमांक - 135 च्या संदर्भात मोजमाप पुस्तक क्रमांक - 960 पृष्ठ क्रमांक - 133 येथे संबंधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

39) देयक क्रमांक - 136 च्या संदर्भात मोजमाप पुस्तक क्रमांक - 960 पृष्ठ क्रमांक - 139 येथे 5 टक्के व 100 टक्के तपासणीबाबत संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. देयकाची रक्कम रुपये 77,000/- असूनही देयक रु.38,723/- ने पारीत करण्याबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

40) देयक क्रमांक - 141,142,143,145 चे संदर्भात मोजमाप पुस्तकातील सर्व नोंदी पुर्ण झाल्यानंतर सुमारे वर्षभरानंतर देयके लेखाशाखेकडे सादर केल्याचे दिसून येते. या विलंबाबाबत कोणतीही माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाली नाही.

41) देयक क्रमांक - 142 च्या संदर्भात मोजमाप पुस्तक क्रमांक - 1902 पृष्ठ क्रमांक - 97 येथे संबंधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

42) देयक क्रमांक - 144 व 146 चे संदर्भ मोजमाप पुस्तक क्रमांक - 1902 पृष्ठ क्रमांक - 107 व मोजमाप पुस्तक क्रमांक - 1507 पृष्ठ क्रमांक - 171 येथे नोंदीचे दिनांक, तपशील इत्यादी माहिती पुर्ण नोंदविलेले नाहीत.

43) देयक क्रमांक -126 बाबत दिनांक - 17.09.2010 च्या कार्योदेशानुसार कामाचा कालावधी दिनांक - 01/10/2010 ते दिनांक - 30/09/2013 होता. सदरील काम पुर्णत्वाचा दाखला दिनांक - 27.09.2013 रोजी दिलेला असून काम पुर्ण होण्यापुर्वीच पुर्णत्वाचा दाखला दिल्याचे दिसून येते. करारनामा क्रमांक - 92 दिनांक - 13.12.2010 असून हा करारनामा विहीत मुदतीत न केल्याने तो वैध नाही.

44) देयक क्रमांक - 131 व 132 बाबत कार्योदेशातील मंजुर कालावधी 36 महिने आहेत. आदेशातील मंजुरी 7 महिन्यांची असल्याचे दिसून येते.

45) देयक क्रमांक - 127 बाबत काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

46) देयक क्रमांक - 139 चे देयक चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी यांच्या नावे असून नस्तीमध्ये ना हरकत प्रमाणपत्र व पुर्णत्वाचा दाखला येथे गीताई मजूर बांधकाम सोसायटी यांचे नावे आहे. ना हरकत प्रमाणपत्रावर खाडाखोड केलेली असून त्यावर स्वाक्षरी नाही. काम पुर्णत्वाचा दाखला दिनांक - 31/12/2012 रोजी दिलेला आहे. ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने म्हणजेच दिनांक - 15/10/2013 रोजी दिलेले आहे. सदरील नस्तीस मुळ दस्ताऐवजे जोडलेली नाहीत. दिनांक - 20/09/2011 ते 20/09/2012 या कालावधीचे देयक चे.वरदेश्वर मजूर बांधकाम सोसायटी यांना तर दिनांक - 01/08/2013 ते 30/07/2014 या कालावधीचे देयक गीताई मजूर बांधकाम सोसायटी यांना अदा केल्याचे दिसून येते.याबाबत कोणतीही माहिती दस्तऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाले नाहीत. या बदलाबाबत कोणतीही मंजूरी सुध्दा घेतलेली नाही हे नियमबाहय आहे.

47) देयक क्रमांक - 141 चे नस्तीस मंजुरीची छायाप्रत अत्यंत अस्पष्ट आहे. काम पुर्णत्वाचा दाखला दिनांक - 31/12/2012 रोजी दिलेला आहे. ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने म्हणजेच दिनांक - 15/10/2013 रोजी दिलेले आहे.

48) देयक क्रमांक - 143 बाबत कामाची मुळ मुदत, वाढीव मुदत यात पुर्णपणे विसंगती दिसून येते वाढीव मुदत दिनांक - 31/12/213 पर्यंत असून करारनामा क्रमांक - 147 दिनांक - 14/09/2013 रोजी केलेला आहे. सदरील करारनामा विलंबाने केलेला आहे. त्यामुळे तो वैध नाही.

49) देयक क्रमांक - 145 बाबत आदेशात मंजुर दिनांकाबाबत तफावत दिसून येते तसेच विहीत मुदतीत करारनामा न केल्याने तो वैध नाही. त्याची मुळ प्रत नस्तीस संलग्न नाही.

50) देयक क्रमांक - 148 बाबत नस्तीस अटी व शर्ती संलग्न नाहीत. नस्तीस सर्व दस्ताऐवजे यांच्या छायाप्रती असून रु.20/- चा स्टॅम्प करारनाम्यास कमीचा लावलेला आहे. दिनांक - 13/09/2012 च्या मंजुरी आदेशात नाव, दर, कालावधी इत्यादी स्पष्ट नमूद नाही. काम पुर्णत्वाचा दाखला दिनांक -31/12/2012 रोजी दिलेला आहे. ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने म्हणजेच दिनांक - 15/10/2013 रोजी दिलेले आहे.

51) उदयान देखभालीसाठी जुनेच दर सन 2002 मध्ये मंजुर केल्याचे नस्तीवरुन दिसते. त्यानुसार अर्धा एकर क्षेत्रासाठी रु.3500/- प्रति महिना तर एक एकर क्षेत्रासाठी रु.7000/- प्रति महिना दर मंजूर आहेत. त्या दरात दिनांक - 01/01/2013 पासून सुधारणा झाली असून ते अनुक्रमे 7000/- व 10000/- प्रति महिना इतके करण्यात आले असल्याचे दिसून येते तथापि सदरील दर कोणत्या आधारे निश्चित केले ? या संबंधी शासनाच्या संबंधीत विभागाकडे पत्रव्यवहार केला होता का याविषयी कोणतेही दस्ताऐवजे माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाले नाहीत.

52) देयक क्रमांक - 191,192 व 193 बाबत करारनामा करणेबाबतचे पत्र नस्तीस नाही. सदरील करारनामे नोंदविलेले नसून त्यावर क्रमांक व दिनांक नाहीत. हे करारनामे विहीत कालावधीत केल्याचे दिसून येत नाहीत त्यामुळे ते ग्राहय नाहीत. रु.100/- च्या स्टॅम्पवर हे करारनामे केले असून कमी रकमेचे स्टॅम्प वापरलेले आहेत.

मुळ करारनामे नस्तीस लावणे आवश्यक असूनही त्याचे छायाप्रती नस्तीस लावलेले आहेत. नस्तीस सर्व दस्ताऐवजांच्या छायाप्रती लावलेल्या असून मुळ प्रती लेखापरीक्षणावेळी प्राप्त झालेल्या नाहीत. प्राकलन प्रमाणिकृत केलेले नाहीत. कामाची मुदत दिनांक - 31/12/2013 रोजी संपत असताना कार्योदेश ऑक्टोंबर 2013 म्हणजेच विलंबाने निर्गमित केल्याचे दिसून येते. जानेवारी 2013 ते ऑक्टोंबर 2013 पर्यंत काम केले किंवा कसे ? कोणाची परवानगी घेतली, वेळेवर आदेश का निर्गमित झाले नाहीत. याविषयी कोणतीही माहीती नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन प्राप्त झालेले नाहीत.

53) बऱ्याच देयकांसंबंधात नस्तीस सर्व छायाप्रती जोडलेल्या आहेत - टिपणी आदेश, प्राकलन, इत्यादी . उदा. देयक क्रमांक - 195

54) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यप्रणालीबाबत मा.आयुक्तांनी दिनांक - 26/01/2012 रोजी मंजुरी दिल्याचे नस्तीत नमूद असले तरी याविषयी कोणतीही माहिती, दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाहीत.

55) काही देयकांवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. उदा. देयक क्रमांक - 77,78 व 79

56) करारनाम्यातील अटी व शर्ती, कामाचे आदेशात नमूद बाबी, हजेरी पुस्तक या अनुषंगाने कोणतेही अहवाल संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे झालेल्या कामाबाबत व नुकसानीबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

57) देयक क्रमांक - 99,100,101 व 102 येथील ना हरकत प्रमाणपत्रावरील रकमेत खाडाखोड असून त्यावर स्वाक्षरी नाही. तसेच सदरील करारनामे रक्कम रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करण्यात आलेला आहे. देयक क्रमांक - 102 बाबत करारनाम्याची प्रत नस्तीस संलग्न नाही. स्टॅम्प रकमेची वसुली करणे आवश्यक आहे.

58) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

137 मुळ मुदत ठेव पावत्या / धनादेश नस्त्यांना मुदतीनंतरही तसेच पडून असल्याने झालेल्या अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 06

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 177922.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 177922.00/-

मूळ मुदत ठेव पावत्या / धनादेश मुदत संपल्यानंतरही नस्तीस संलग्न आहेत, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

उदयान नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील निवड महिन्यांचे लेखा परिक्षणाच्या वेळी नस्त्यांची तपासणी करताना मूळ मुदत ठेव पावत्या / धनादेश मुदत संपल्यानंतरही नस्तीस संलग्न असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	देयक क्रमांक / दिनांक	कंत्राटदार नाव	बॅकेचे नाव/ शाखा	मुदत ठेव पावती क्र.	व्याज दर	कालावधी	गुंतवणूक रक्कम	मुदत नंतरची रक्कम
1	86/ 05.10.13	श्री. डी.डी.चुंबळे	जनलक्ष्मी सह. बॅक लि.	347248	7%	20.8.07 ते 21.6.07	6200	6271
2	82/ 04.10.13	अस्मिता मजूर सोसायटी	पंजाब नॅशनल बॅक	00004522	5.50%	20.6.10 ते 26.12.10	30050	30882
3	91/ 08.10.13	हरीवास्तु मजूर बांधकाम सोसायटी	नाशिक जिल्हा मध्यवर्ती सह. बॅक लि. नाशिक	813978	8.25%	8.3.11 ते 8.3.14	300	322
4	110/ 11.10.13	श्री. पी.यु.चवरे	गोदावरी अर्बन को.ऑप बॅक लि. नाशिक	0065004	-	5.9.09	23872	23872
5	159/ 15.10.13	नारळीमाता महिला	जनकल्याण को.ऑप बॅक लि.	19761	-	11.1.11	2500	2500

		बचत गट	नाशिक					
6	159/ 15.10.13	नारळीमाता महिला बचत गट	जनकल्याण को.ऑप बॅक लि. नाशिक	19762	-	11.1.11	2500	2500
7	157/ 15.10.13	श्री. आर. के. खरात	नाशिक मर्चंट को.ऑप बॅक लि. नाशिक	930849	7.50%	15.6.10 ते 15.7.12	51000	59535
8	174/ 25.10.13	सई महिला बचत गट	विश्वास को.ऑप बॅक लि. नाशिक	72991	7.50%	30.11.10 ते 30.11.13	6300	7873
9	177/ 25.10.13	साई कृपा महिला बचत गट	स्टेट बॅक ऑफ इंडिया	31505077968	7.25%	19.11.10 ते 19.11.13	6300	7815
10	175/ 25.10.13	ओम गुरूदेव महिला बचत गट	सेंट्रल बॅक ऑफ इंडिया	0050824	8.75%	7.6.11 ते 7.6.13	2600	3091
11	173/ 25.10.13	सोमेश्वर महिला बचत गट	सेंट्रल बॅक ऑफ इंडिया	0050823	8.75%	7.6.11 ते 7.6.13	2600	3091
12	176/ 25.10.13	मनाली महिला बचत गट	देना बॅक	9748064	9.25%	14.6.11 ते 14.6.14	2500	नमूद नाही
13	170/ 25.10.13	महेश्वरी महिला बचत गट	सेंट्रल बॅक ऑफ इंडिया	0050855	8.80%	29.6.11 ते 29.6.14	2520	3272

14	125/ 25.10.13	मे. प्रसाद नर्सरी	जनलक्ष्मी सह. बॅक लि.	365187	10%	16.6.08 ते 16.6.11	10000	13449
15	126/ 25.10.13	मे. प्रसाद नर्सरी	जनलक्ष्मी सह. बॅक लि.	365185	10%	16.6.08 ते 16.6.11	10000	13449
एकूण							159242	177922

उपरोक्त विषयी खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) अनुक्रम 1 ते 3 व 6 ते 15 बाबत मूळ मुदत ठेव पावत्या नस्तीस सलग्न आहेत, यापैकी काही मुदत ठेव पावत्या सन 2007 पासून नस्तीस आहेत असे दिसून येते. या पावत्या नस्तीस ठेवण्याचे कोणतेही कारण उपलब्ध दस्तऐवजावरून दिसून आले नाही, तसेच लेखापरीक्षणावेळी याविषयी कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. सदरील रकमा व त्यावरील व्याज यांचा विचार करता या रकमा वेळीच महानगरपालिकेच्या लेख्यात जमा केल्या असत्या तर महानगरपालिकेस आर्थिक लाभ झाला असता. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

2) अनुक्रमे 4, 5 व 6 बाबत मूळ धनादेश नस्तीस सलग्न आहेत, हे धनादेश नस्तीस ठेवण्याचे कोणतेही कारण उपलब्ध दस्तऐवजावरून दिसून आले नाही, तसेच लेखापरीक्षणावेळी याविषयी कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. सदरील रकमा व त्यावरील प्राप्त होणार व्याज यांचा विचार करता या रकमा वेळीच महानगरपालिकेच्या लेख्यात जमा केल्या असत्या तर महानगरपालिकेस आर्थिक लाभ झाला असता. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

3) सदरील रकमा कंत्राटदारास परत दिल्या किंवा कसे याची कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही, याबाबत नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे सदरील रकमा कंत्राटदारास परत केल्या असतील तर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याची शक्यता आहे व या रकमा वसूल कराव्या लागतील.

4) अनुक्रमांक 2 च्या मुदत ठेव पावतीवर बँकेचा शिक्का नाही. मुदतठेव पावती जमा करताना याची खात्री करणे आवश्यक होते.

5) निवड महिन्यांच्या लेख्यांची पडताळणी करताना उपरोक्त बाबी निदर्शनास आल्या असून लेखापरीक्षण कालावधी सन 2013-2014 मधील इतरही नस्त्यांना अशा मूळ मुदत ठेव पावत्या व धनादेश तसेच सलग्न असतील तरी त्याची माहिती व कारणे लेखा परीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात यावी.

6) मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

138 उदयान विभागातील नुतणीकरण, सुशोभिकरण कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 16

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1436199.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1436199.00/-

उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारा) नस्तीस जोडलेले नाहीत. नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाकिंत प्रती जोडलेल्या आहेत. मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2013-2014 मधील लेखापरीक्षणावेळी उदयान विभागाअंतर्गत वाहनांवर खर्च करण्यात आला असून त्यांसंबंधीच्या देयकांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	देयक क्र / दिनांक	विभागाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक / पृष्ठ क्रमांक
1	348/ 15.03.2014	पंचवटी	जितेंद्र ऊगावकर	प्रभाग क्रमांक 7 मधील 3 वेगवेगळया खुल्या जागेत कंपाऊंड वॉल बांधणे	608942	2927/--
2	94/ 08.10.2013	वि.वा. शिरवाडकर	चे.साईनाथ मजूर बांधकाम सोसायटी	कमान नुतणीकरण करणे	199841	2681/66
3	146/ 15.10.2013	नाशिक प्रभाग क्र. 25	चे.सप्तर्षी मजूर बांधकाम सोसायटी	हॉटेल संस्कार समोरील उदयानातील पाथवेचे नुतणीकरण, अंतर्गत रिपेअरींग करणे	196642	1507/171
4	83/	शिवराम	चे.आदीत्य मजूर	सुशोभिकरण करणे	128437	2487/--

	04.10.2013	नगर	बांधकाम सोसायटी			
5	84/ 04.10.2013	स्वामी समर्थ नगर	महाराष्ट्र मजूर सोसायटी	सुशोभिकरण करणे	113638	2487/--
6	93/ 08.10.2013	वनसंपदा कॉलनी	ज्योती मजूर बांधकाम सोसायटी	सुशोभिकरण करणे	188699	2681/69
		एकूण			**1436199**	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) देयक क्रमांक 348 - कंत्राटदाराकडील सार्वजनिक बांधकाम विभाग, विक्रीकर विभाग येथील नोंदणी प्रमाणपत्र नस्तीस सलग्न नाही. देयकावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. नस्तीमध्ये कंत्राटदाराला 23.87 टक्के कमी दराने काम देताना दर्जाबाबत दक्षता घेण्याचे नमूद केले असले तरी त्याअनुषंगाने कोणतीही माहिती नस्तीस उपलब्ध नाही.ज्या जागांवर हे काम केलेले आहे, त्या जागा उदयानाच्या असल्याबाबत नस्तीस कोठेही उल्लेख नाही, त्यामुळे या जागा उदयानाच्या नसतील तर उदयानाच्या निधीतून त्यावर खर्च केल्याचे दिसून येते. देयकातून रूपये 25879/- गौण खनिजाची रक्कम वसूल करण्यात आली आहे, परंतू त्यासंबंधी भरणा करणेबाबत चलन नस्तीस सलंग्न नाही, त्यामुळे शासकीय लेख्यात रक्कम जमा करणेबाबत खात्री करता आली नाही.

2) देयक क्रमांक 146 - प्राकलन प्रमाणिकृत नाही. तेथे बऱ्याच ठीकाणी खाडाखोड केलेली आहे.

3) देयक क्रमांक 83 - प्राकलन प्रमाणिकृत नाहीत. कामाच्या कालावधीबाबत खाडाखोड केलेली असून काम पुर्ण झाल्याचा दाखला दिनांक 31/01/2012 रोजीचा आहे. तर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने दि.31/01/2013 रोजी दिले आहे.

4) देयक क्रमांक - 93 - प्राकलन प्रमाणिकृत नाहीत व त्यावर रकमेत खाडाखोड आहेत.

5) देयक क्रमांक - 84 - काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर दिनांक नमूद नाहीत व सक्षम प्राधिकाराची स्वाक्षरी नाही.

6) मोजमाप पुस्तक क्रमांक 2487 लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने त्यातील नोंदींबाबत खात्री करता आली नाही.

7) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

8) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

9) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

10) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे. करारनामा रु.100/- च्या स्टॅम्प पेपरवर केला आहे.

11) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

12) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

13) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

14) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

15) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

16) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

139 महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व अधिनियम 1975 अन्वये वृक्ष उपकर बसविणे व त्याच्या वसुलीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 00

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

प्रत्यक्ष महसुली जमा रकमेवर 0.5 टक्के येणारी रक्कम रूपये 140 लक्ष असताना वृक्ष प्राधिकरण निधी मध्ये रूपये 50 लक्ष निधी जमा केला आहे तसेच वृक्ष प्राधिकरण निधीचा उपयोग नवीन वृक्षाचे लागवडीसाठी करणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे उदयान विभागाचे लेखापरीक्षणात महाराष्ट्र नागरीक्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 चे कलम 18(1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबद्ध कायदयान्वये जेथे नागरी स्थानिक प्राधिकरण इमारतीत आणि जमिनीवर मालमत्ता कर बसवित असेल तेथे संबद्ध कायदयामध्ये काहीही अंतर्भुत असल, तरी वृक्ष प्राधिकरणाने विनंती केल्यास या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी इमारतीवर आणि जमिनीवर प्राधिकरण ठरवील अशा मालमत्तेच्या करपात्र मुल्याच्या एक टक्क्याहून अधिक नसणाऱ्या दराने "वृक्ष उपकर" नावाचा अतिरिक्त कर प्राधिकरणाने बसवणे कायदेशीर असेल . त्याचप्रमाणे उक्त अधिनियमातील कलम 18(1)(क) अधिनियमान्वये जेथे नागरी स्थानिक प्राधिकरण इमारतीवर आणि जमिनीवर भांडवली मुल्यानुसार मालमत्ता कर बसवित असेल तेथे पोटकलम (1) अन्वये बसविण्यात येणारे वृक्ष उपकर राज्य शासन राजपत्रातील अधिसुचनेव्दारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे इमारतीच्या व जमिनीच्या भांडवली मूल्याच्या 0.5 टक्क्याहून अधिक असणार नाही अशा दराने बसविता येईल असे स्पष्ट नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे उक्त् अधिनियमातील कलम 15(ड) अन्वये वृक्ष प्राधिकरणाला वर विनिर्दिष्ट केलेल्या सर्व मार्गांनी मिळालेल्या एकुण जमा रक्कमा नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या एकुण अर्धा टक्क्यापेक्षा कमी असतील तर नागरी स्थानिक प्राधिकरण प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी तुटीची रक्कम वृक्ष प्राधिकरण निधीकडे जमा खाती घालील असे स्पष्ट नमुद असतांना नाशिक महानगरपालिकेची सन 2013-2014 मधील प्रत्यक्ष महसुली जमा रकमेवर 0.5 टक्के येणारी रक्कम रूपये 140 लक्ष असताना वृक्ष प्राधिकरण निधी मध्ये रूपये 50 लक्ष निधी जमा केला आहे. उर्वरित निधी रूपये 90 लक्ष वृक्ष प्राधिकरण निधीमध्ये वर्ग करणे बाकी आहे. वृक्ष प्राधिकरण निधीमधून रूपये 54.78 लक्ष निधी खर्च केल्याचे लेखापरीक्षणास सादर केलेल्या लेख्यावरून दिसून येते. वृक्ष प्राधिकरण निधीचा उपयोग नवीन वृक्षाचे लागवडीसाठी करणे आवश्यक आहे.

MINVAJM6901 (Ref No : 130, Hmm No : 145)

140 मंजूर तरतूदीपेक्षा कमी / अत्यंल्प खर्च केल्याने झालेली अनियमितता.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 04

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

अनावश्यक तरतूदी करून चुकीचा अंदाजपत्रक सादर करण्याची अनियमितता केली आहे, शासनाकडून किती अनुदान प्राप्त झाले, कधी प्राप्त झाले, मागील शिल्लक अनुदान किती याबाबतचा तपशिल अंदाजपत्रकात नमुद करणेत आलेला नाही

लेखापरिक्षण कालावधीमधील सन 2013-14 चे अंदाजपत्रक आणि वजावट नोंदवही तपासली असता, त्यामध्ये मंजूर बाबीवर मंजूर तरतूदीपेक्षा कमी / अत्यल्प खर्च नोंदविण्यात आलेला आहे.सदर प्रकरणी खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

आर्थिकवर्ष 2013-14 मधीलमंजूरतरतूदवझालेलाखर्चयाचातपशिल

अ.क्र	संगणकसंकेतांक	बाब	मंजूरतरतूद	झालेलाखर्च	तफावत
1	2515	माध्यमिक शाळा स्थायी आस्थापना वेतन	40000000	7284716	32715284
2	2522	ग्रंथालय स्थायी आस्थापना	2000000	0	2000000
3	2020	हायस्कूल लायब्ररी	500000	0	500000
4	2910	मनपा माध्यमिक विद्यालय मुलींसाठी सायकल खरेदी	6000000	1634850	4365150
5	2708	हायस्कूल वीज बील	100000	39622	60378
6	2709	हायस्कूल पाणी बील	50000	0	50000
7	2710	हायस्कूल टेलीफोन बील	50000	18720	31280
8	2711	हायस्कूल संगणक व प्रयोगशाळा	2000000	0	2000000
9	2783	माध्यमिक शाळा क्रिडा स्पर्धा	1000000	0	1000000
10	2784	मनपा शाळेतील विद्यार्थीनी शिष्यवृत्ती	1250000	744000	506000
11	2853	गरीब विद्यार्थ्यांना गणवेश पुरवणे	4500000	1708400	2791600
12	2518	फर्निचर व साहित्य खरेदी	2500000	1132280	1367720
13		एकूण	59950000	12562588	47387412

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे . -

अ) कमी केलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदीबाबत -

1. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका अन्वये अर्थसंकल्पातील खर्चाचे अंदाज तयार करतांना अंदाजीत रकमा या शक्यतोवर प्रत्यक्ष रकमां इतक्याच असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अंदाज प्रत्यकक्ष रकमांच्या जास्तीत जास्त नजिकचे असावेत, प्रतयेक बाबीवर योग्य मंजूरी अन्वये त्या त्या वर्षात प्रत्यक्षात किती रक्कम खर्च करणे अपेक्षित व शक्य आहे त्याच्या आधारे तरतूद करणे आवश्यक आहे. तथापि, मंडळाने मागील 3 वर्षामधील खर्चाच्या सरासरीचा प्रत्यक्ष अंदाज न घेता, अनावश्यक तरतूदी करून चुकीचा अंदाजपत्रक सादर करण्याची अनियमितता केली आहे.

2. मंडळाला शासनाकडून किती अनुदान प्राप्त झाले, कधी प्राप्त झाले, मागील शिल्लक अनुदान किती याबाबतचा तपशिल अंदाजपत्रकात नमुद करणेत आलेला नाही, त्यामुळे मंडळाच्या आर्थिक स्थितीबाबतची अचूकता पडताळणी करणे शक्य झाले नाही.

3. अंदाजपत्रकामध्ये खर्च व उत्पन्न यांचा समावेश न करता, फक्त खर्चाचेच अंदाजपत्रक सादर केले आहे.

4. सन 2013-14ची एकूण तरतूद रु.5.99कोटी असून त्यापैकी झालेला खर्च रु.1.25कोटी आहे, म्हणजे रु.4.73कोटी रूपये कमी खर्च करणेत आला. आवश्यकता नसतांना अंदाजपत्रकात एवढया मोठया निधीची तरतुद का करणेत आली? जर निधीचीआवश्यकता होती तर प्रत्यक्षात खर्च का गेला नाही? तरी याबाबत मंडळाने अनूपालन दर्शवावे.

ब) खर्च अत्यल्प करणे अथवा खर्च न करणेबाबत -

1 .सन 2013-14अंदाजपत्रकाची पडताळणी केली असता, बहुतांश शिर्षाखांतर्गत तरतूद उपलब्ध असूनही कोणताच खर्च करणेत आलेला नाही.

उदा :- 1) हायस्कूलटेलीफोनबील

2) माध्यमिकशाळाक्रिडास्पर्धा

3) ग्रंथालयसारथाआस्था

CCFNKKM8401 (Ref No : 111, Hmm No : 102)

141 सुरक्षा रक्षकांना कालबध्द पदोन्नतीचा लाभाची परीगणना चुकीची करणेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 6

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

सुरक्षा विभागाचे सेवा पुस्तके तपासणी केले असता सुरक्षा रक्षकांना दिलेल्या कालबध्द पदोन्नतीचा लाभाची परीगणना चुकीची करण्यात आली असल्याचे आढळून आले आहे.

दिनांक	वेतनश्रेणीनूसार मुळ वेतन	ग्रेड वेतन	एकुण
1.7.2011	8180.00	1900.00	10080.00
24.12.2011	8480.00	1900+200=2100	10580.00

त्यामुळे श्री.कुमावत यांना देण्यात आलेली वेतनश्रेणीची परीगणना चुकीची झालेली आहे.

2) त्याचप्रमाणे सुधारीत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वेतननिश्चिती करतेवेळी शासन निर्णय क्र. वेतन-1199/प्र.क्र.2/सेवा 3/मंत्रालय, मुंबई दिनांक. 20 जूलै2001 अन्वये आणि त्यानंतरच्या झालेल्या सुधारणांनूसार, योजनेअंतर्गत 1ला किंवा 2रा लाभ देण्यापूर्वी सदर कर्मचा-यांचे गोपनीय अहवालाची पडताळणी केली किंवा कसे? याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.
वरीलप्रमाणे दर्शविल्यानुसार श्री.कुमावत व आस्थापनेवरील इतर सुरक्षा रक्षक ज्यांना सुधारीत आश्वासित प्रगती योजना - पहिला किंवा दुसरा लाभ देण्यात आलेला आहे, त्यांची आपल्या स्तरावर सदर शासन निर्णयानूसार वेतननिश्चितीची पडताळणी होणे आवश्यक आहे.

CCFNKKM8401 (Ref No : 115, Hmm No : 130)

142 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत शहरातील विविध घटकातील लाभार्थ्यांना केलेल्या अर्थसहाय्याबाबत व योजनेतील अखर्चित अनुदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 04

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत केलेल्या अर्थसहाय्यात लाभार्थ्यांना लाभ देताना या योजनेतून यापुर्वी लाभ दिला नसल्याची पडताळणी करण्यात आलेली नाही तसेच लाभार्थ्यांच्या नावात काही प्रकरणी

अंशत: बदल किंवा चुका असल्याचे आढळून आलेले आहेत. सदर योजनेतील निधी हा मागासवर्गीयांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात खर्च करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही तसेच योजनेतील विविध घटकांवर केलेला खर्च, शिल्लक राहीलेला निधी, शासनाने ठरवून दिलेले उद्दिष्टे व साध्य केलेले उद्दिष्टे याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेतील सन 2013-14 या कालावधीतील सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत केलेल्या अर्थसहाय्याची ठराविक प्रकरणे तपासली असता, त्यामध्ये खालीलप्रमाणे उणीवा आढळून आलेल्या आहेत.

1) शहरी स्वयंरोजगार कार्यक्रमांतर्गत (USEP), शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रमांतर्गत (UWSP) व शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रमांतर्गत (T & C) लाभार्थ्यांना लाभ देतांना या योजनेतून यापूर्वी लाभ दिला नसल्याची पडताळणी समूह संघटक स्तरावर केल्याचे दिसून आले नाही तसेच दुबार लाभ मिळाल्याची तपासणी लाभार्थी लाभ नियंत्रण नोंदवही नसल्यामुळे पडताळणी करता आलेली नाही.

2) सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या विविध घटकांतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची नावे व त्यांचे बीपीएल प्रमाणपत्रावरील नावे यामध्ये काही प्रकरणी अशंत: बदल किंवा चुका असल्याचे दिसून आलेले असून लाभार्थ्यांच्या नावात सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजूरीने योग्य त्या दुरुस्त्या करणे आवश्यक आहे. तसेच लाभ घेणारा लाभार्थी बरोबर असल्याची खात्री विभागाने करणे आवश्यक आहे.

3) सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत प्राप्त होणारा निधी व देण्यात येणारे भौतिक उद्दिष्ट यांपैकी अनुसुचित जाती जमातींसाठी त्याचे स्थानिक लोकसंख्येच्या प्रमाणात, अल्पसंख्यांकांसाठी 15 टक्के व महिलांसाठी 30 टक्के व अपंगांसाठी 3 टक्के अशी राखून ठेऊन खर्च करणे अपेक्षित आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4) सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम (USEP), शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रम (UWSP), बचत व पतसंस्था (T & C), शहरी गरिबांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम Step-Up, शहरीसमाज विकास नेटवर्क, आस्थापना खर्च, मुलभूत सोयीसुविधा सहाय्य व शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम (अनुसूचित जाती) या विविध घटकांवर केलेला खर्च, शिल्लक राहीलेला निधी, शासनाने ठरवून दिलेले उद्दिष्टे व साध्य केलेले उद्दिष्टे याबाबतची माहिती वारंवार मागणी करुनही लेखापरीक्षण पथकास उपलब्ध न झाल्याने या कालावधीत प्राप्त झालेला सर्व निधी खर्च झाला किंवा कसे याची खात्री करता आली नाही. त्यामुळे सन 2013-14 या कालावधीतील अनुदानाचे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक - 180 व 181 दिनांक - 23/11/2016 अन्वये विचारणा करण्यात आली असता त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

FDSRKNM8201 (Ref No : 121, Hmm No : 181)

143 नगररचना विभागातील बांधकाम परवान्यासंबंधी विविध शुल्कांच्या वसूलीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 03

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

बांधकाम परवान्यासंबंधी विविध शुल्क आकारणीबाबत सन 2012-2013 साठी मंजूर असलेल्या दरानेच सन 2013-2014 मध्ये बांधकाम परवान्यासंबंधी विविध शुल्क आकारणीबाबत कार्यवाही केलेली आहे.

नगररचना विभागातील व नाशिक रोड विभागीय कार्यालयातील बांधकाम परवान्यासंबंधी निवडक प्रकरणांची पडताळणी करतांना विविध शुल्काच्या वसूलीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. बांधकाम परवानगीसाठी परवानगीसाठी छाननी शुल्क, विकास शुल्क, वृक्ष निधी अनामत, प्लिंन्थ कंम्प्लीशन न घेतल्याबददल तडजोड फी, विनापरवाना वापराबाबत तडजोड फी, जीना अधिमुल्य, एकत्रिकरण, सत्यप्रती-अतिरिक्त् प्रतिसाठी शुल्क, ना हरकत दाखले, इंजिनिअर / स्ट्रक्चरल इंजिनिअर / सुपरवायझर यांची परवाना फी, गटार जोडणी शुल्क, विविध प्रकारचे दाखले इत्यादीसाठी आदेश क्रमांक नगररचना / वशि /354/2011, दिनांक 23.03.2011 नुसार सन 2011-2012 व सन 2012-2013 साठी दर निश्चित केल्याचे दिसून आले. त्याच जुन्या दराने आकारणी करून सन 2013-2014 मध्ये विविध प्रकारच्या शुल्काची वसूली केल्याचे लेखा परीक्षणावेळी निदर्शानास आले सन 2013-2014 साठी दर मंजूर नव्हते व त्यासंबंधी कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कदाचित महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ शकते.

2. बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कोणतीही टिपण्णी सादर केल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही, नस्तीस शुल्क आकरणी करणेबाबत तक्ता संलग्न नाही / याबाबत कोणताही तपशील नस्तीत उपलब्ध नाही. त्यामुळे शुल्क आकरणी व त्याअनुषंगिक बाबी संदर्भात सक्षम अधिकाऱ्याची मंजूरी घेतली जात नाही असे निदर्शनास येते व शुल्क आकारणी संबंधी बोध होत नाही.

3. वाढीव परवानगी बाबत प्रस्ताव मूळ नस्तीस संलग्न न करता नव्याने नस्ती करून प्रस्ताव सादर केला जातो.

MINVAJM6901 (Ref No : 131, Hmm No : 187)

144 इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (Structural Audit) करण्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 01

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 265 (अ) नुसार इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (Structural Audit) करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 265 (अ) नुसार कोणत्याही इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यापासून 30 वर्षाचा कालावधी समाप्त झाला असेत अशा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार यांनी महानगपालिकेच्या अधिकाऱ्याकडून इमारत मानवी वस्तीसाठी योग्य आहे या प्रयोजनासाठी बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले आहे.

अधिनियम कलम 265 (अ) (3) नुसार भोगवटादाराने असे प्रमाणपत्र न घेतल्यास आयुक्त यांचे आदेशानुसार बांधकाम सुस्थित प्रमाणपत्र सादर करण्याचे निर्देश इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला देता येतील. कलम (अ) 4 नुसार इमारतीच्या मालाकाकडून दोषनिवारक दुरूस्त्या करण्यास कसूर केल्यास आयुक्तांना त्या दोषानिवारक दुरूस्त्या करता येतील व अशा दुरूस्त्यांवर आयुक्ताने केलेला त्यांची मागणी केल्यानंतर तीस दिवसांच्या आत भरणा न केल्यास मालमत्ता कराच्या थकबाकी प्रमाणे मालक/ भोगवटादाराकडून वसूली केला जाईल. परंतू त्यानुसार प्रत्यक्षात कार्यवाही केली जात असे दिसून येते.

MINVAJM6901 (Ref No : 132, Hmm No : 188)

145 नगररचना विभागातील इमारत परवानगी नोंदवही व इतर नोंदवहयाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 05

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

इमारत परवानगी नोंदवही विहित नमुना क्रमांक 45 नुसार ठेवण्यात आलेली नाही, त्यातील नोंदीवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

महानगरपालिका नाशिकचे सन 2013-2014 चे लेखापरीक्षणावेळी नगररचना विभागाकडील नोंदवहयांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी दिर्शनास आल्या आहेत.

1. इमारत परवानगी नोंदवही विहित नमुना क्रमांक 45 नुसार ठेवण्यात आलेली नाही, त्यातील नोंदीवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

2. इमारत परवानगी नोंदवही व बांधकाम पूर्णत्व संबंधी नोंदवही एकत्र ठेवण्यात आली असून, त्यातील नोंदी एकत्रित घेण्यात आलेल्या आहेत.

3. बांधकाम पूर्ण होऊन संबंधितांनी ते ताब्यात घेतल्याबाबत दिनांकाचा तपशिल नोंदविण्यात आलेला नाही.

4. कर आकरणी झाल्याचा दिनांक व अनुज्ञेय क्षेत्रफळ इत्यादी तपशिल नोंदवहीत नोंदवण्यिात आलेला नाही, त्यामुळे कर आकारणी वेळेत झाली किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

5. हस्तांतरणीय विकास हक्क नोंदवही विहित नमुन्यात ठेवलेली नाही, त्यातील नोंदींवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत, यातील नोंदी मोघम स्वरूपात घेण्यात आलेल्या आहेत.

MINVAJM6901 (Ref No : 134, Hmm No : 190)

146 नगररचना विभागात विविध शुल्कांपोटी वसूल केलेल्या रकमा व त्यांच्या रोखवहीतील नोंदीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 17

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

रोखवहीतील नोंदींची तपासणी केली जात नाही. नोंदींवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. विहित पध्दतीने रोखवहीतील नोंदी केल्या जात नाहीत. व्यवहार मोठया प्रमाणावरील असूनही संगणक प्रणालीचा कोणताही वापर केला जात नाही. अचानक रोख रकमेची तपासणी सक्षम अधिकाऱ्याकडून केली जात नाही. जमा व खर्च रकमांसंबधी ताळमेळाचे कामकाज केले जात नाही.

नगररचना विभागातील सन 2013-2014 मधील निवड महिन्यांच्या लेख्यांची पडताळणी करताना रोखवहीत

खाली नमूद केल्याप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

1. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 नियम 98(2) नुसार ज्या अधिकाऱ्यांना रोख रकमा स्विकारणे व हाताळणे याबाबतचे व्यवहार करावे लागतात त्यांनी पाळावयाचे नियम दिले आहेत, त्यानुसार रोखवही नमुना क्र. 4 प्रमाणे ठेवलेली नाही. रोखवहीत पैशाच्या व्यवहाराच्या नोंदी केल्यावर त्या तपासलेल्या नाहीत, तपासल्याची खूण म्हणून त्या नोंदी अनुप्रमाणित केल्या जात नाहीत. रोखवहीतील बेरजांची पडताळणी करून त्या बरोबर असल्याची अदयाक्षरी केली जात नाही. रोख पुस्तकातील शिलकेची पडताळणी केली जात नाही. त्याअनुषंगाने प्रमाणपत्र रोखवही नमूद केलेले नाहीत. बॅकेत भरणा रक्कम व शिल्लक रक्कम यांची खात्री रोखवहीत नुसार केली जात नाही. अचानक रोख रकमेची तपासणी सक्षम अधिकाऱ्याकडून केली जात नाही. रोखवहीत जमा व खर्च बाजूत याप्रमाणे लिहिणे आवश्यक असून तशी कार्यवाही केली जात नाही.

2. महानगरपालिकेतील विविध विभागात संगणकीकरणाचे काम झालेले असून संगणक प्रणालीवर त्याचे कामकाज केले जाते, नगर रचना विभागात सन 2013-2014 मध्ये प्राप्त झालेल्या रकमांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	तपशील	रक्कम रूपये
1	तपासणी	19709865
2	अनामत	8711247
3	बांधकाम विकास शुल्क	311069313
4	भुखंड विकास निधी	118862809
5	इतर	254730
6	गटार जोडणी	28389905
7	गुंठेवारी	505735
8	इतर शुल्क	15644335
9	अनधिकृत बांधकाम	39059520
10	सेस चार्जेस	181628534
	एकूण	723835993

एवढया मोठया प्रमाणावर रकमा नगरविकास विभागात प्राप्त होतात व त्यांचा भरणा बॅकेत केला जातो, रूपये 2 लक्ष पेक्षा जास्त रक्कम असल्यास धनादेश घेतला जातो, असे तपासणी वेळी सांगण्यात आले. एवढया मोठया प्रमाणावरील व्यवहार असूनही येथे संगणक प्रणालीचा कोणताही वापर केला जात नाही. या नोंदींची तपासणी होत नाही. त्यावर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत, म्हणजेच रोखरक्कम, रोखवही याबाबत

पर्यवेक्षण होत नाही, बेरजांची तपासणी केली जात नाही, त्याप्रमाणे यावर कोणाचे नियंत्रण नाही, असे दिसून येते, त्यामुळे यात काही चुका, अफरातफर / गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3. जमा व खर्च रकमांसंबधी ताळमेळाचे कामकाज केले जात नाही.

4. बॅकस्क्रोल / पासबुक उपलब्ध नसल्याने प्रत्यक्ष बँकेत रक्कम भरणा झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

5. दैनंदिन व्यवहार संपल्यानंतर रोखवहीत शिल्लक रक्कम अंकी अक्षरी दर्शविली जात नाही, तेथे सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेतलेली नाही.

6. महिना संपल्यानंतर महिनाअखेर मासिक व आर्थिक वर्ष संपाल्यानंतर वर्षाअखेर वार्षिक गोषवारे विहित काढलेले नाहीत.

10. सन 2013-2014 मध्ये 18,16,28,534/- एवढा सेस जमा झाल्याचे रोखवहीवरून दिसून येते, शासन निर्णय उदयोग, उर्जा व कामगार विभाग बीसीए.2009/प्र.क्र.108/कामगार-7/अ दिनांक 17.06.2010 नुसार बांधकाम परवाना देताना एकूण बांधकाम खर्चाच्या 1 टक्के कामगार उप कराची रक्कम वसूल करून सदरील रक्कम शासनाच्या खाती/लेख्यात भरणा करणे आवश्यक आहे, सेसची रक्कम शासन खाती जमा होण्याबाबत चलन उपलब्ध न झाल्याने सदरील रक्कम शासन खाती जमा होणेबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही. तसेच ही रक्कम वेळेत जमा झाली किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

11. रोखशाखेत विविध पाच रोखवहया ठेवलेल्या आहेत, त्यात बऱ्याच ठिकाणी प्रमाणपत्रात पृष्ठांची संख्या अयोग्य नमूद केलेली आहे. उदा. प्रत्यक्षात 400 किंवा जास्त पृष्ठे असूनही 1 ते 200 पृष्ठे असल्याचे प्रमाणित केलेले आहे.

12. पावती पुस्तकातील कोऱ्या पावत्यावंर रदद करण्याबाबत शिक्के मारलेले आहेत, परंतू त्यावर सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या नाहीत, त्याप्रमाणे रोखवहीतील पृष्ठे बऱ्याच ठिकाणी असून त्यावरही रदद करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. उदा. क्रमांक 326 (65 ते 100) , 593(88 ते 100), 2543(14 ते 100) चलन पुस्तक क्रमांक 1294 (88 ते 100), 1305(95 ते 100)

13. चलन पुस्तक 1305 (51 ते 75) येथे प्रमाणपत्र दिलेले नाही, तर चलन पुस्तक क्रमांक 1305(73 ते 100) येथे प्रमाणपत्र पृष्ठ 1 ते 100 असल्याचे नमूद केलेले आहे.

14. प्राप्त पावती पुस्तके, चलन पुस्तके, रोखवहया त्यांच्या नोंदींवर नोंदवहीत संबंधितांच्या स्वाक्षऱ्या /अदयाक्षऱ्या नाहीत, त्याचप्रमाणे याबाबत छपाई विभागाशी कोणताही ताळमेळ घेतला जात नाही.

15. पावत्यांच्या स्थळ प्रतीवर पावती मिळाल्याबददल पावती घेणाऱ्याची स्वाक्षरी घेतलेली नाही.

16. रोखवहीत बऱ्याच ठिकाणी कोरी जागा सोडण्यात आलेली आहे.

17. नगररचना बांधकाम परवाना शुल्क व इतर शुल्क यांच्या रोख रकमांचे नाशिक रोड विभागीय क्षेत्रातील सर्व व्यवहार नाशिक रोड विभागीय कार्यालयातून केले जातात, लेखापरीक्षणावेळी नाशिक रोड विभागीय कार्यालयातील

सन 2013-2014 संबंधी रोखवही, पावती पुस्तके, चलने, इत्यादी उपलब्ध न झाल्याने त्यातील नोदींबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेखे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची आहे, त्यांचे पालन झालेले नाही.

MINVAJM6901 (Ref No : 135, Hmm No : 191)

147 नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षात लेखापरीक्षणात आढळून आलेल्या सर्वसाधारण अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 33

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात महानगरपालिका अधिनस्त विभागांचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या सर्वसाधारण अनियमिततेबाबत

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात महानगरपालिका अधिनस्त विभागांचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या सर्वसाधारण अनियमितता खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.RMR-2005/प्र.क.201/रस्ते 1, दि.02/01/2006 मध्ये नमुद केल्याप्रमाणे रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण कामाचे संदर्भात मंजुर अंदाजपत्रकातील खडी साहित्याची तरतुदीप्रमाणे जाडीचे (थर) कामे झाली किंवा कसे हे समजण्यासाठी तसेच अस्तित्वातील खडीची जाडी याची नोंद ठेवणे आवश्यक असतांना अश्या नोंदी ठेवलेल्या नाहीत. (बांधकाम विभाग)

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 171(6) नुसार निविदा उघडल्याच्या दिनांकापासून एक आठवडयात व जास्तीत जास्त एक महिन्यात त्या निकाली काढणे आवश्यक असतांना काही प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.(सर्व विभाग)

3) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक गौण.खनिज/10/1009/सीआर-309/ख, दिनांक 11/02/2010 नुसार देयकातून रु.70.67 प्रती घन मीटर दराने रॉयल्टी आकारणी व वसूल करणे आवश्यक असतांना सर्व प्रकरणी रॉयल्टी आकारणी व वसूल केलेली नाही. (बांधकाम व पाणीपुरवठा विभाग/भुमिगत गटार योजना) तसेच रॉयल्टीच्या संदर्भात काही मक्तेदारांनी महसुल विभागाकडे एकत्रिनत रॉयल्टी भरणा केल्याबाबतचे

चलने सादर केलेली आहे, त्यासाठी महसूल विभाग राजपत्र दिनांक 28/02/2001 नुसार वाहतूक पास नमुना नं.ई नियम 6 किंवा महसुल विभागाकडील रॉयल्टी क्लीअरन्स सर्टीफिकेट यासारखे अधिकृत कागदपत्रे प्राप्त करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन नगर विभाग परिपत्रक क्रजी.ईएन/1098/1357/प्र.क्र.166/98 मवी-24 दिनांक 3.11.2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा सदर परिपत्रकातील अनुक्रमांक 3 नुसार कंत्राटीकमाच्या मूल्याच्या 1 टक्का दराने रक्कम कपात करणे आवश्यक आहे. तथापि काही प्रकरणी रक्कम कपात न करताच मक्तेदारास प्रदान करण्यात आले आहे. (सर्व विभाग)

5) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक 2004/प्र.क्र.109/रा.म.2, दिनांक 23.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. काही प्रकरणी अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही. तसेच डांबर कामाच्या चाचणी अहवालात डांबराची प्रत नमूद केलेली नाही. त्यामुळे योग्य दर्जाचे डांबर वापरल्याची खात्री होत नाही. (सर्व विभाग)

6) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह केल्याचे मोजमाप पुस्तीकेवरून दिसून आले नाही. (सर्व विभाग)

7) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा. तथापि अशी कार्यवाही बहुतांशी प्रकरणी करण्यात आलेली नाही.(सर्व विभाग)

8) कामाच्या स्वरूपानुसार 25/50/100 पानांच्या मोजमाप पुस्तिकांचा वापर करणे आवश्यक असून एका मोजमाप पुस्तकेत एकाच कामाची नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केली जात नाही. तसेच काही प्रकरणी मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत. (सर्व विभाग)

